# महाभारत

## खंड २१ : अज्ञातवासपर्व ४

मराठी अनुवाद :

## श्री. अशोक कोठारे



# महाभारत

## महाभारत खंड एकविसावा

### अज्ञातवास पर्व भाग चौथा

### उद्योग पर्व (पुढे चालू)

अशोक कोठारे

**ई साहित्य प्रतिष्ठान**

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.

http://www.esahity.com/23092343238123512366234023812350.html

महाभारत

मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**ई साहित्य प्रतिष्ठान**

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**

©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रकाशन : १० ऑक्टोबर २०१९**

# - अनुवादकाचे दोन शब्द -

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळया परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बऱ्याच वेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, एक शैक्षणिक माध्यम म्हणून वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना तो गद्यात केला आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये. त्या शिवाय, सामान्य वाचकांना कथाभाग अधिक चांगल्या प्रकारे समजावा म्हणून कांहीं टीपा दिल्या आहेत.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना प्राचीनतेचा अनुभव यावा म्हणून मुद्दाम

प्राचीन (Archaic) शब्दप्रयोग वापरतात परंतु, माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत चाळीसांपेक्षां जास्त खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी अपेक्षा आहे. त्यातील हा एकविसावा खंड आपण आता वाचणार अहात, त्यात उद्योग पर्वातील भागवत यान पर्व आपण पहाणार आहोत.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणाऱ्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्या आधीची असती तर त्याचा उल्लेख त्या काळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्या नंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच

सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, सम्राट अशोकाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे. कदाचित असें म्हणता येईल कीं, महाभारत हा एक दंतकथांचा संग्रह आहे व त्याद्वारा नैतिकमुल्ये शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असत. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राज्यांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळयासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक

ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ नाही असे माझे मत आहे. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता, व्याध गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई-साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहेत म्हणून त्यांना शतशः

धन्यवाद.

अशोक कोठारे



माझा ई-मेल –

ashokkothare@gmail.com

ashokkothare@yahoo.co.in

ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल. ह्या ई-पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई-साहित्य करणार आहेत परंतु, हे ई-पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

**माझे ब्लॉग –**

Ashok Kothare, http://ashokkotharesblog.blogspot.com/ for stories

I reckon, http://kotharesviews.blogspot.com/ for philosophy

Ideas and tips on any subject, http://kotharay.blogspot.in/ for intelligent discussions.

Freedom of Expression, http://kothare-thinks.blogspot.in/

My Marathi Blog, http://kothare-marathi.blogspot.in/ मला असे वाटते

# उद्योग पर्व

## भगवत यान पर्व सुरू

## भाग बाहत्तरावा

जनमेजय बोलतो, "जसा संजय पांडवांच्या ठिकाणाहून निघाला धृतराष्ट्राकडे जाण्यासाठी, माझे पणजोबा, पंडुचे पुत्र काय करत होते ते समजून घेण्याची इच्छा आहे मला अहो ब्राह्मणा".

वैशंपायन बोलतात, संजय गेल्यानंतर युधिष्ठीर कृष्णाला बोलतो, "अहो सत्तवतांचे शिरोमणी, आपण आपल्या चाहत्यांची नेहमी सेवा करता. आता वेळ आली आहे तुम्हाला तुमच्या मैत्रीची झलक दाखवण्याची पांडवांसाठी. आमच्या ह्या अरिष्टाच्या प्रसंगी दुसरा कोणी आमच्या मदतीला येऊ शकेल असे वाटत नाही. अरे माधवा, मी सर्वस्वी तुझ्यावर विसंबून आहे. तू पहातो आहेस कीं, आम्ही आमचा हिस्सा निर्भयपणे त्यांच्या कडे मागितला जो ठरलेल्या अटींप्रमाणे ते आम्हाला देणे लागतात. दुर्योधन त्याच्या अहंकाराने फुलला आहे. त्याचा लोभीपणा अमर्याद झाला आहे. तू जसा वृश्नींना सावरतोस तसे आता आम्हाला सांभाळून घ्यावेस असे मला वाटते. माझा विश्वास आहे की, तुझे पांडव त्या कृपेसाठी योग्य आहेत".

दैवी शक्तीने प्रेरीत असा कृष्ण बोलतो, "हा येथे मी हजर आहे, सांग मला तुला काय नेमके म्हणावयाचे आहे. मी तुमच्या बरोबर आहे".

युधिष्ठीर बोलतो, "तू आताच ऐकले आहेस धृतराष्ट्राचे विचार काय आहेत ते. संजयाने आपल्याला ते सांगितले आहेत. संजय धृतराष्ट्राचं मन आहे. जे त्याच्या मनात असते ते संजय ओळखून सांगत असतो. त्याच्या सुचनांचे तो तंतोतंत पालन करत असतो. तसें नाही केले तर त्याचा मृत्यू अटळ आहे. एक वकील त्याच्या धन्याचीच भाषा बोलत असतो. धृतराष्ट्राला शांतता पाहिजे परंतु आमचा हिस्सा देण्यास तो तयार नाही. अशा परिस्थितीत अरे कृष्णा, तू जे सांगशील तसे करण्याचे मी ठरवले आहे. आम्ही अटींचे पालन केले आहे परंतु, तो मात्र क्षत्रियासारखे वागत

नाही. त्याचा लोभीपणा त्यातून स्पष्ट दिसत आहे. मला वाटत होते कीं, तो तसे पाप करणार नाही परंतु, तो त्याच्या मुलावरील प्रेमापोटी असे पाप करत आहे. आम्ही दिलेल्या अटींप्रमाणे बारा वर्ष वनात काढली आणि एक वर्ष अज्ञातवासात काढली त्याला शेकडो ब्राह्मण साक्षिदार आहेत. हे पाहून मला फार दुःख होत आहे. मी माझ्या मातेला व भावंडाना त्याबद्दल पटवू शकत नाही. मी वाद नको म्हणून फक्त पांच गांव मागितली तर ते सांगतात सुईच्या अग्रा एवढी सुद्धा जागा मिळणार नाही. त्यात अविशस्थल, माकंडी, वरनावळ, वृकस्थल आणि आणखीन कोणतेही. ते सुद्धा न देण्याच्या गोष्टी ते करत आहेत. आम्ही त्यांना सांगितले कीं घरात वाद नको म्हणून आम्ही इतक्यावर समाधानी राहू. परंतु, तो पापी दुर्योधन तेसुद्धा मान्य करावयाला तयार नाही. ह्याच्यापेक्षा आणखीन काय जास्त दुःखदायक असेल. उच्चकुळात जन्मलेला मनुष्य धनाच्या लोभाने इतक्या खालच्या थराला जातो त्याचे मला दुःख होते. त्याचा विवेक संपतो व विवेक संपला कीं लाज शरम सुद्धा रहात नाही. त्याच्या सगळया जीवनमुल्यांचा ऱ्हास होत जातो. अखेरीस जेव्हां त्या लोभीपणाचा अतिरेक होतो तो नाश पावतो. ते माझ्या काका व चुलत भावांचे होणार आहे. असे वाटते. त्याला आप्त, मित्र हितचिंतक कोणा कोणाची पर्वा रहात नाही त्या लोभामुळें. अशी जर परिस्थिती माझी झाली तर मी जगू शकणार नाही. मला चिंता खात आहे कीं अशा काकापुढे मी काय करावे. मी त्याचा मान राखत असतांना तो मात्र माझ्या चांगुलपणाचा आणि माणूसकीचा वाईट प्रकारे फायदा घेत आहे. वास्तविक जगात धन दौलत महत्वाची असते. त्याशिवाय माणूस जगू शकत नाही. ज्यांच्याकडे धन नाही ते मेल्यातल्यासारखेच समजावेत. संहार करून जे दुसऱ्याची संपत्ती मिळवतात ते स्वतःचीसुद्धा अध्यात्मिक संपत्तीच्या बाबत हानी करत असतात. पैशाशिवाय माणसें वेडीपिशी होतात. कांहीं मृत्यू निवडतात तर कांहीं वैराग्य पसंत करतात. कांहीं इतरांच्या आहारी जातात. गरीबी माणसाला त्याच्या मृत्यूहून जास्त पिडा देत असते. अशांना संपत्ती हेंच सर्वस्व होऊन बसते. गेल्या जन्माच्या चुकीच्या कर्मामुळें त्याला ह्या जन्मी गरीबी आलेली असते, पण तो त्याचा दोष देवांना देऊन बसतो, ज्या देवांची तो पुजा करत असतो. पैशाशिवाय ब्राह्मण सुद्धा वेदाचे ज्ञान असून व्यर्थ असतो. म्हणूनच कृष्णा, कुबेर माणसांच्या खांद्यावर बसलेला आहे असें समजतात. पैशा अभावी त्याची नियत बिघडते व तो त्याच्या मित्र, हितचिंतक अशा सगळयांचा घात करण्यास तयार होतो. क्रोध, सारासार बुद्धीचा नाश, त्यामुळें तो पापाचरणात मग्न होतो. अशांमुळें वर्णसंकर होतो व समाज नष्ट होतो. जर वेळीच असा माणूस सावध झाला नाही तर तो कायमचा बरबाद होतो. परंतु सावध झाला तर कदाचित वाचतो. त्याला त्याच्या चुका समजू लागतात कारण त्याचा विवेक जागृत झालेला असतो. पहिला बदल होतो कीं त्याला लाज शरम वाटू लागते. लाज माणसाला पापापासून मुक्ती देते. त्याचे वागणे सुधारते व तो पुण्याच्या मार्गाने जाऊ लागतो. त्यामुळें दैवते त्याला

सावकाशपणे अनुकूल होतात व त्याचे दिवस सुधारू लागतात. तो पुन्हा समृद्धीकडे वाटचाल करू लागतो. त्याच्यात चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया हे उत्तम गुण वाढत जातात. त्याची अध्यात्मिक उर्जा वाढते. तो एक गुणी माणूस होतो. अरे कृष्णा, माझ्यात हे सगळे बदल होत गेलेले तू पाहिले असशील. आमची राज्यसत्ता गेली ती आम्हाला परत मिळवलीच पाहिजे. त्या दृष्टीने माझा पहिला प्रयत्न असेल. जर आम्ही दोघे, कौरव आणि पांडव समजा शांतपणे राहू शकलो तर ते चांगले होईल पण तसे होईल असें दिसत नाही. म्हणून आम्हाला त्यांना मारण्याशिवाय दुसरा मार्ग दिसत नाही. अरे कृष्णा, दोनही बाजूंकडे आपापले मित्र आहेत. त्या सगळयांची कत्तल होईल ते मला वाटते पाप कृत्य होईल, जरी ते क्षत्रिय वर्णाचे कर्तव्य असेल. आम्ही त्या वर्णात जन्म घेतला आहे. तसे करणे पुण्यमय असेल कां पापमय"? "त्यात कसे पुण्य असेल? क्षत्रियांचे काम संहार करणे असते, शुद्र सेवा करतो, वैश्य व्यापार, ब्राह्मण भिक मांगतो पोट भरण्यासाठी. असा संहार पुण्य कसा समजला जातो. दुर्दैवाने माझा जन्म अशा नीच क्षत्रिय वर्णात झाला आहे. सगळ्या युद्धात कली असतोच. त्या प्रसंगामुळे जीवितहानी मोठी होते. तरी त्यातून कोण जिंकणार ते लढणाऱ्यांच्या दैवावरच अवलंबून असते. जीवांचे जगणेसुद्धा त्यांच्या मर्जीने होत नाही. तेसुद्धा विधाता ठरवत असतो. जगणे अथवा मरणे कोणाच्या हातात नसते तरी मी मारलं असं समजण्याचा अज्ञानीपणा त्यांत पहातो. मी जिंकलो असें तो समजतो. त्याला कोणी जिंकवले ते त्याला कधींच समजत नसते. कांहींवेळा एक अनेकांना मारतो तसेंच कधी अनेक एकाला मारतात. कदाचित एकादा भित्रा अनवधानाने एकाद्या वीराला ठार मारतो तर कधी एकादा अप्रसिद्ध योद्धा प्रसिद्ध योद्ध्याला मारतो. कांहींही होते युद्धात पण मी समजतो युद्ध हे पापाला उत्तेजना देणारे कार्य आहे. सगळें युद्धात एकमेकांना मारत असतात. कोणासाठी ते बऱ्याचवेळा त्यांना माहीत सुद्धा नसते. मार देणारा सुद्धा मार खात असतो. तो मारला जात नसला तरी कोणीतरी त्याच्या प्रिय व्यक्तीला मारत असतोच. हे मरण्या मारण्याचे काम युद्धात सतत होत असते. तशात मिळणारे यश पापाने भरलेले असते, त्यात कोणता संतोष मानावयाचा अरे कृष्णा"?

पुढे युधिष्ठीर बोलतो, "शांत प्रवृत्तीची, नम्र, गुणी, पुण्यवंत, दयाळू असे लोक प्रायः मारले जातात आणि लुच्चे, क्रूर, रागीट, पापमय, नालायक असें लोक वाचतात. शत्रूचा पराभव केल्यानंतरसुद्धा त्या बद्दल मनात उद्वेग चालू रहातोच. जे शत्रूचे लोक वाचतात ते उरलेल्यांना ताप देतच रहातात. प्रश्न सोडवण्याच्यासाठी त्या प्रश्नाचा दुसरा भागच मारून टाकण्याचे काम अशी युद्ध करत असतात. अशा जिंकण्याने कायम स्वरुपी वैरभाव उत्पन्न होत असतो. जे हरले ते

दुःखात रहातात. जो शांतताप्रेमी आहे तो नेहमी सुखाने निद्रा घेतो. तो जिंकण्याचा अथवा हरण्याचे विचार करत नाही. जो युद्धाची परिस्थिती उत्पन्न करतो तो सदैव तशा भ्रांतीत विचार करत रहातो. त्याला मनःशांती कधी मिळत नाही. मला वाटते अशारितीने माणसं मारून त्याला कुप्रसिद्धी प्राप्त होते त्या माणसाला कोणी चांगला समजत नाहीत. लोक त्याला विसरण्याचा प्रयत्न करतात. शत्रूत्व कधी युद्धाने संपत नाही ते आणखीन गहन होत असते. त्यासाठी दोनांपैकी एका पक्षाचा सर्वनाश करावा लागतो. तिसरे पक्ष त्या दोघांतील झगड्याचा फायदा उठवण्याचा प्रयत्न करतात. वैर कधी संपत नाही, ते धुमसणाऱ्या गवताच्या ढीगाऱ्यासारखे असते. शांतता कधीच मिळत नाही. शत्रूचा सर्वनाश केल्याने जिंकणाऱ्याला भरभराटी येऊ शकते पण अरे माधवा, त्यात क्रौर्य मला दिसते जे मला आवडणारे नाही. त्यासाठी आम्ही जर आमचा राज्याचा हक्क सोडला तर ते मृत्यूपेक्षा जास्त दुःखदायक होणार आहे. शत्रू स्वतःला जिंकलेला समजणार व आपले आणखीन हाल त्यामुळें होऊ शकतात. अशा एकतर्फी परतण्याचे चुकीचे अर्थ काढले जाणार व आपल्यावर नामर्द असल्याचे दुषण लागणार हे सुद्धा योग्य होणार नाही. आम्हाला आमचे राज्य कदापीही सोडावयाचे नाही. त्याच वेळी आमच्या घराण्याचा नाश होणेसुद्धा आम्हाला मंजूर नाही. मला वाटते अशा परिस्थितीत कमीपणा घेऊन शांतता राखणे योग्य होईल. अशा स्थितीत शांतता राखणाऱ्यांना ते हरल्याची जाणीव होईल. तेसुद्धा क्षत्रियांना न शोभणारे असेल. म्हणजे मग युद्ध करण्याशिवाय गत्यंतर नाही. त्यात आपली हिम्मत दाखवता येईल. समेट न झाल्यास भविष्य भयानक होणार आहे. ज्ञानी लोक ते सगळे जाणतात व त्याबद्दल त्यांनी लिहीलेसुद्धा आहे. तसें आपले होणार आहे असें दिसते. जे बलवान आहेत ते कमजोरांशी लढत नाहीत. आपल्यात वडीलांचा मान ठेवणे महत्वाचे आहे व धृतराष्ट्र आम्हाला पित्यासमान आहेत म्हणून त्यांच्यासाठी माघार घेणे योग्य होईल कां"? तेसुद्धा योग्य होणार नाही कारण त्याला त्याच्या स्वतःच्या मुलांत जास्त माया आहे म्हणून तो आम्हाला पित्यासमान धरता येणार नाही. जर त्याच्या वागण्यात आम्ही सगळे एकसारखे असते तर ते योग्य असते परंतु, अरे कृष्णा, तशी परिस्थिती नाही. त्याच्या मुलांना समझौता मान्य नाही म्हणून तो सुद्धा तशा गोष्टीला तयार होणार नाही. माझी बुद्धी हरली आहे. आता तू सांग मी काय करावे"? ज्यामुळें हित आणि पुण्य दोनही राखले जातील. तू माझ्या सगळया हितचिंतकात एक असा आहेस कीं, ज्याची विवेक क्षमता निर्विवाद आहे".

वैशंपायन पुढे सांगतात, जनार्दन ते ऐकल्यावर युधिष्ठीराला बोलतो, "मी कुरु सभेत जातो दोघांच्यावतीने व तुमचे नुकसान होणार नाही असा प्रस्ताव मांडतो जर तो त्यांनी

स्वीकारला तर पाहू काय होते. जमलं तर शांतता नांदेल असें पाहू. जर ते झाले तर मोठे धर्मकार्य माझ्याकडून झाले असें मी समजेन. त्यामुळें अनेक कुरु आणि श्रींजयांचे प्राण वाचतील. पांडवांचे आणि धृतराष्ट्राचे दोनही बाजूचे बरेच लोक मरण्यापासून वाचतील.

युधिष्ठीर बोलतो, "मला नाही वाटत तू जावेस कारण दुर्योधन तुझे ऐकणारा नाही. तुझा जर अपमान झाला तर ते मला आवडणार नाही. दुर्योधनाच्या आज्ञेत असलेले जगातील सगळे क्षत्रिय तेथे जमलेले आहेत. त्यांच्यात तू जाणे माझ्याखातर मला मंजूर नाही. ते तुझी कुचेष्टा करू शकतात, ते झाले तर मला फार खेद होईल". कृष्ण त्याला सांगतो, "मला माहीत आहे दुर्योधन किती नालायक आहे. तेथे जाण्यामुळें त्या युद्धाची जबाबदारी कौरवांवर येईल व त्यामुळें होणाऱ्या संहाराचे पातकसुद्धा त्यांच्यावर जाईल. सगळे राजे समजतील कीं, पांडव समझौता करण्याचा प्रयत्न करत होते त्या अटीनुसार परंतु, कौरवांनी त्या अटी न मान्यकरून युद्ध ओढवले आहे. अटी मोडण्याचा गुन्हा ते करत आहेत हे जाहिर होणे आवश्यक आहे आणि जर त्यांनी माझ्यावर हात टाकण्याची हरकत केली तर मी त्यांचे भस्म करून टाकीन, तू माझी काळजी करू नकोस. माझे जाणे कोणत्याही प्रकारे व्यर्थ जाणार नाही".

युधिष्ठीर बोलतो, "अहो जनार्दना, तुला जे योग्य वाटते ते मला मंजूर. तुझे भले हो, जा हस्तिनापुराला. तू यशस्वी होऊन येशील अशी मी आशा करतो. तेथे जाऊन असा शांतता करार करून ये कीं, सगळे भरतवंशी सुखाने एकत्र राहू शकतील. तू आमचा बंधू आणि मित्र आहेस. आम्हा सगळयांना तू फार प्रिय आहेस. आम्ही तुला इतका आमचा समजतो कीं, आमच्या सगळया गोष्टी तुला सांगितल्याशिवाय रहात नाही. आमच्या व पृथ्वीच्या भल्यासाठी जा. तेथे दुर्योधनाला असें पटवण्याचा प्रयत्न कर की, आमचे भले होईल".

भगवत यान पर्व भाग बाहत्तरावा संपला.

## भगवत यान पर्व

## भाग त्र्याहत्तरावा

भगवान (कृष्ण) बोलतात, "मी संजयाचे ऐकले आहे व आता तुझे ऐकले आहे. मला तुम्हा दोघांचे अंतस्थ उद्देश चांगलेच समजले आहेत. तुला चांगुलपणा वाढवावयाचा आहे तर त्यांना वैर वाढवावयाचे आहे हा दोघांतील उद्देशांचा फरक समजला आहे मला. आपला मतलब युद्धाशिवाय साध्य करावा असा तुझा विचार आहे. परंतु, अरे क्षत्रिया, ब्राह्मणासारखे जन्मभर ब्रह्मचर्य पाळण्यासाठी ब्रह्मांने क्षत्रिय वर्ण निर्माण केलेला नाही हेसुद्धा तू लक्षात घे. क्षत्रियाच्या जबाबदाऱ्या तू नीट समजून घे, ते आता आवश्यक आहे. क्षत्रियांने केवळ लढावयाचे नसते तरी ती वेळ आली तर ते यथायोग्य करणे हे त्याला जमले पाहिजे अशी विधात्याची अपेक्षा असते. आपल्यातील डरपोकपणाचे समर्थन त्याने विविध सबबी दाखवून करू नये हेसुद्धा तू लक्षात घे. भित्रेपणाने कधी कोणाचे भले झालेले नाही. तू शक्तिमान आहेस ह्याचा जर तुला विसर पडला असेल तर ते एका क्षत्रियाला न शोभणारे आहे. हिम्मत दाखव आणि शत्रूचा पराभव कर. त्यात कोणतेही पाप नाही. म्हणून नको तिथे पाप आणि पुण्याच्या गोष्टी करण्यात समय व्यर्थ दवडू नकोस. पाप व पुण्य केवळ कृत्यावर अवलंबून नसते ते त्या कृत्यामागील उद्देशामुळें सिद्ध होत असते. म्हणून निसर्ग सदैव मारत आणि जन्माला घालत असतो प्राणी आणि वनस्पतींना पण त्यामुळें निसर्गाला न कधी पाप लागत वा पुण्य मिळत कारण, त्याच्या त्या कार्यात कोणताही स्वार्थी उद्देश नसतो. अशा उद्देशहीन कृत्यांना जड कृत्य समजले जाते. युद्धात सैनिक शत्रूपक्षाच्या सैनिकाना मारतात त्यात त्या सैनिकाचा कोणताही व्यक्तिगत मतलब नसतो तो केवळ हुकूमाचे पालन करत असतो म्हणून त्यामुळें त्याला पाप लागत नाही. खाटीक प्राणी मारतो दुसऱ्यांच्या खाण्यासाठी त्यात त्याचा कोणताही उद्देश नसतो म्हणून त्या मारण्यामुळें त्याला पाप लागत नाही. हे तू समजले पाहिजेस. सैनिकाने मारले म्हणून तो मेला असें जर तू समजत असशील तर ते तुझे अज्ञान आहे. त्याचा मृत्यू नसेल तर तो कधीच मरणार नाही. मरणाऱ्याला मारणारा असतो यमदेव, माणसं केवळ कारण मात्र असतात. हे सगळे जाणत असूनही तू अशा बाष्कळ गोष्टी करत आहेस ह्याचे मला नवल वाटते. तुझे चुलत भाऊ बरीच वर्षे साम्राज्य उपभोगून व बरेच राजे जमा करून सामर्थ्यवान झाले आहेत. म्हणून त्यांचा आत्मविश्वास आणि अहंकार वाढलेला आहे. अशा परिस्थितीत तो माझे ऐकेल असें मला वाटत नाही पण तुझ्या समाधानासाठी जात आहे.

त्याशिवाय भिष्म, द्रोण आणि कृप ह्यांच्या बळाचासुद्धा तो विचार करत आहे. जोवर तू असा मवाळपणे वागत रहाशील ज्यामुळे तुम्हाला सर्वांना ह्या आधी वनवास आणि अज्ञातवासात जावे लागले, तोवर त्याचा माज कमी होणार नाही. तुझ्यावर तुझ्या भावंडांनी नेतृत्व टाकले आहे त्याचा दुरुपयोग तुझ्या भित्रेपणासाठी करणे तुला शोभत नाही. तू स्वतः एक उच्च कुलिन क्षत्रिय असतांना तू तुझ्या वर्णाला तुच्छ समजतोस हे मला आवडलेले नाही. वाईटाच्या नाशासाठी हत्त्या करावीच लागते त्यात कोठले आले आहे पाप"? ब्रह्माने क्षत्रिय वर्ण उत्पन्न केला आहे त्याच कामासाठी व तेंच कार्य करण्यास तू अयोग्य समजत असशील तर तुला सावध व्हावे लागेल कारण जो क्षत्रिय आपले सज्जन संरक्षणाचे कार्य करण्याचे टळतो ते नरकात जातो हे तू विसरला आहेस. त्याने तुमच्यावर अनेक अन्याय केले तुझ्या मवाळ वागण्याचा फायदा घेऊन त्याची त्याला शिक्षा जर तू देणार नाहीस तर तू खरा राजा होण्यास लायक नाहीस असंच म्हणावे लागेल. तू क्षत्रिय वर्णाचा अपमान करतोस व ब्राह्मण वर्णाच्या योग्यतेचासुद्धा रहाणार नाहीस. त्याला क्षमा करणे म्हणजे अपात्र दान करण्यासारखे महापाप होईल. त्या पापामुळे तू नरकात जाशील हे समजून घे.

अरे युधिष्ठीरा, त्या अपमानकारक बोलण्याने तुला जर क्रोध होत नसेल तर तुझ्यात कांहीं दोष आहे असें मला म्हणावे लागेल. चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया अपात्र जागी करण्याने मोठे पाप लागते हे तुझ्या कसे लक्षात येत नाही"?

"तो नीच दुर्योधन समजतो कीं, पांडवांकडे आता कांहीं ताकद उरलेली नाही. त्यांच्याकडे जमिनीचा तुकडासुद्धा नाही. त्यांचे नांव आणि प्रतिष्ठा संपलेली आहे. त्यामुळें त्यांचा पराभव करणे सोपे आहे. त्यासाठी तो कोणताही समझौता करण्यास तयार नाही. समझौता नेहमी कमजोर पक्ष करत असतो, बलवान पक्ष नाही. त्यांचे सगळे माझ्या ताब्यात असल्याने त्यांना पुन्हा वनात जाण्यापलिकडे दुसरा मार्ग नसेल. तेंच विचार होते जेव्हां भर दरबारात दुःशासनाने असहाय द्रौपदीला खेचून आणले. ते कृत्य तो भिष्म, द्रोण इत्यादींच्या समक्ष करत होता. त्यावरून त्यांची पापी हिम्मत किती वाढली आहे ते समजते. त्यावेळी तुम्हा पांडवांची छित्थू झाली तुझ्या भेकडपणामुळें, केवळ तुझ्या आज्ञेची ते वाट पहात होते पण तू गप्प बसला होतास त्यांत कोणता सात्त्विकभाव तू पहात होतास? त्या चारांनी तुला नेता मानले ह्यात त्यांची मोठी चूक झाली होती, त्या महारथींचा नेता होण्याची तुझी योग्यता नाही हे तू त्यावेळी दाखवून दिलेस. अशा सगळ्या तुझ्या दांभिक वागण्यामुळें तू दुर्योधनाचा माज वाढवत होतास. तुला वाटत होते कीं, तू मोठे तात्त्विक निर्णय घेत आहेस परंतु, तुझे निर्णय पापाचरणाला उत्तेजन देणारे होते म्हणून त्या

पापाचा तू सुद्धा भागीदार झाला आहेस. पुन्हा सांगतो अरे युधिष्ठीरा, अपात्र चांगुलपणा दाखवणे पापकृत्य समजले जाते, तशी पापकृत्य तू सदोदीत करून कौरवांच्या पापात सामील होत होतास. मी अखेरीस सांगतो कीं, तुझा नितीशास्त्राचा अभ्यास योग्य नाही. तुझ्या त्या नेभळट वागण्यामुळें तुझे हितचिंतकसुद्धा त्या सभेत असूनही कांहीं करू शकत नव्हते. तरी खाजगीत ते सगळे दुर्योधनाची निर्भत्सना करत होते असें मला नंतर समजले. अशा निर्भत्सनेपेक्षा सज्जनाला मृत्यू योग्य वाटतो. परंतु, दुर्योधन सज्जन नसल्यामुळें त्याला त्याचे कांहींच वाटले नाही. अशा पापमय माणसाला मारणे हे प्रत्येक कुलीन क्षत्रियाचे कर्तव्य आहे. त्यात तुला कोणता दोष दिसतो? त्याला मारून टाक, त्यात केवळ पुण्य कर्म आहे. मला ते जर तू केलेस तर फार संतोष होईल. अशा कुकर्म्यांना मारणे हेंच सत्कर्म आहे हे तुझ्या लक्षात कां येत नाहीस कां तुझ्या भित्रेपणामुळे त्याकडे तू बुद्ध्या दुर्लक्ष करत आहेस ते समजत नाही. तुझ्या ह्या वागण्यामुळें कलीचा फायदा होत आहे कारण बऱ्याच लोकांचा असा समज आहे कीं, तू मोठा नितीशास्त्री आहेस व म्हणून ते तुझ्या निर्णयाची वाट पहात आहेत. मी तेथे जाऊन दुर्योधनाच्या नीचपणाचे पुरावे देईन व त्यामुळें लोकांचा जो समज आहे कीं, तुम्ही पांडव नालायक अहात व कौरवच योग्य आहेत तो दूर होईल. माझे यथायोग्य पद्धतीने सांगणे त्या राजांना समजेल व ते तुमच्या बाजूने होतील. त्याना हेसुद्धा लक्षात येईल कीं, दुर्योधन कसा द्वेषी आहे व केवळ त्या मत्सरापोटी तो त्याच्या सज्जन भावांचा नाश करू पहात आहे. त्यात ते राजे सामील होणार नाहीत हे मी पाहीन. त्या सभेत चारही वर्णाचे लोक असतील, लहान मोठे सगळे ते ऐकतील. तुम्ही शांततापूर्ण समझौता मांगता व त्याद्वारा तुमचा हिस्सा परत मिळवू इच्छिता हे सगळयांना समजेल. त्यामुळें लोकमत तुमच्या बाजूने होईल. ते करून मग मी परत येईन. हे युद्ध होणे हे निश्चित आहे. सगळे शुभशकून मी पहात आहे सांगतात कीं, तुमचा विजय होणार हे निश्चित आहे. पक्षी आणि प्राणी भयंकरपणे ओरडणे, संध्याकाळी घुबडं घुत्कार करणे, मोठे हत्ती व घोडे त्यांच्या आकारात घाबरवून टाकणारा बदल होणे, अग्नीमधून वेगवेगळे रंग दिसणे, असें होते जेव्हां मोठ्या प्रमाणात नरसंहार होणार असतो. म्हणून पांडव त्यांची शस्त्रं पाजळवून तयार ठेवतील तर उत्तम. युद्धाच्या तयारीला लागा, मी आता निघतो. तुझे समृद्ध राज्य दुर्योधनाच्या कचाट्यातून जोरांनी काढून घेऊ.

भगवत यान पर्व भाग त्र्याहत्तरावा संपला.

# भगवत यान पर्व

## भाग चौऱ्याहत्तरावा

त्यावेळी तेथे उपस्थित असलेले भिम बोलतात, जर अशा परिस्थितीत त्यांना एकदम युद्धाची धमकी तू देऊ नये असे मला वाटते. ते जर आपल्या मागण्या आपसुकपणे स्वीकारत असतील तर त्यामुळें इतर असंख्य वीर जे नाहक मारले जाणार त्यांचे जीव संरक्षित होतील हे जे माझ्या भावाचे म्हणणे आहे त्यात मला तथ्य दिसते. माझ्या मते तू सुरूवात प्रेमाने करावीस. आपले वैर आहे दुर्योधन, शकूनी, कर्ण आणि दुःशासनांशी. त्याकरता इतर त्यात ओढले जाणे व नंतर मारले जाणे युद्धाच्या कारणांने हे खरोखरच आवश्यक नाही. तसे पाहिले तर मी माझे त्यांना मारण्याचे काम व अर्जुन कर्णाचा वध करण्याचे काम आम्ही नंतर सवडीनेसुद्धा उरकू शकू. त्याकरता मोठ्या युद्धाची आवश्यकता मला दिसत नाही. म्हणून मला वाटते, युधिष्ठीराचे बोलणे बऱ्याच अंशी सकारण आहे. आपल्याला माहित आहे कीं, दुर्योधन अहंकारी, उद्धट, विश्वासघातकी, पापकृत्याकडे कल असलेला, उनाड आहे. तो रागीट आहे व सहजपणे कोणाला ऐकणारा नाही. सत्ता आणि अधिकार ह्याने माजलेला असा तो कौरव तयार होईल असें वाटत नाही. परंतु, तू जसे समजतोत तसे त्याने आपला शांतता करार मान्य न करता युद्धाचाच पर्याय पुढे केला तर त्यानंतर होणाऱ्या युद्धाची जबाबदारी त्यांच्यावर येईल हे आपल्याकरता चांगले असेल. परंतु जर तो तयार झाला तर आपल्यासाठी ते चांगलेच होईल, ह्याअर्थी तुझी शिष्टाई उपयोगी होऊ शकते. तुला माहीत आहे ते अठरा राजे ज्यांनी त्यांच्या आप्तांचे वध केले छोट्या फायद्यासाठी, आणि नंतर स्वतः बरबाद झाले त्यावेळी धर्म मेला आणि कलीचा जन्म झाला होता. ते सगळे तुझ्याच कृपेने झाले होते. कली असुरात जन्मला होता. त्यात तो समृद्ध झाला होता. तसांच उद्वर्त हैह्य कुळात जन्मला होता. जनमेजय निप कुळात आणि वपुल तलजंघ कुळात जन्मले होते. वसु क्रीमी अजपिंदू सुविरात, ऋषर्धिक सुरशस्त्रात, अर्कल वल्हीमध्ये धौतमुलक चिन्यात, हयग्रीव्ह विदेह्यांत, वरायु महौजसात, वाहू सुंदरात, पुरुरव दिप्ताक्ष, सहज छेड्डीमध्ये, मत्स्य आणि वृशद्धज प्रविरात, धरण चंद्रभत्यात, बिगहन मुकुटांमध्ये, शम नंदीवेगात असे सगळे कःपुरूष विविध कुळांत जन्मले होते. अरे कृष्णा तू दर युगाच्या अंती उठतोस त्या त्या विविध कुळात जन्म घेतोस व त्यांचा नाश करत असतोस. त्याप्रमाणे आता कुरु वंशात हा पापात्मा कली जन्मला आहे त्याचा त्याच्या सगळया दोस्तांबरोबर विनाश करण्यासाठी तू अवतरला आहेस. त्या पापात्म्यास तुझ्या वाणींने तू जर पटवू शकलास तर आपला भरतवंश मोठ्या संकटातून वाचेल. तू आमच्या

आजोबास व इतर ज्येष्ठांना त्याला समजावण्यासाठी सांगावे जर तो तयार झाला तर आम्ही सगळे सुखाने राहू. त्यात कोणाची हानि होणार नाही. मी तुला असें सांगतो कारण आम्ही पांचही जणांना युद्ध नको आहे त्यात अर्जुनसुद्धा आहे. जरी आम्ही युद्धाची तयारी केली असली तरी ते न होण्याचाच आमचासुद्धा विचार आहे. कारण आम्ही सगळे त्या निष्पाप वीरांच्या व त्यांच्या परिवारांचा विचार करतो ज्यांचा पांडव कौरव वितुष्टाशी अजिबात संबंध नाही जे अशा युद्धात नाहक मारले जाणार असतात.

भगवत यान पर्व भाग चौऱ्याहत्तरावा संपला.

## भगवत यान पर्व

## भाग पंच्याहत्तरावा

वैशंपायन पुढे सांगतात, भिमाचे ते मवाळ बोलणे ऐकून कृष्णाला हसावे कां काय ते समजेना. त्याचा अपेक्षेपेक्षा वेगळे ते भिमाचे उद्गार होते. त्याला हसूं आवरेना व तो विचारतो भिमाला, "हे तू बोलतोस अरे वृकोदरा? जो नेहमी युद्धाच्या व कौरवांच्या नाशाच्या गोष्टी करत होता तो हे असें समजूतीचे बोलणे कसे बोलतोस"? भिमाच्या बोलण्यातील मृदूपणा व दयाळू पणा पाहून तो केशव कमालीचा गोंधळून गेला होता. तो विचारतो, भिमाला कीं, युद्धाच्या भयंकरपणाची कल्पना आल्यामुळें भिमाचा धीर सुटला नाहीं नां? असे अचानकपणे प्रेमाचे विचार त्या सदैव मारामारीच्या गोष्टी करणाऱ्याच्या मनात कसे आले? काय भिम युद्धाच्या कल्पनेने घाबरला तर नाही, कारण त्याची भाषा त्याच्या मोठ्या भावाची होती. जे कमालीचे विलक्षण जनार्दनाला वाटले होते. तो विचारतो, "अरे भिमा तुला नेहमी युद्ध आवडते व त्यात तू कधी मागे फिरत नाहीस अशा  परिस्थितीत आज हे असे विचार तुझ्या मनात कसे आले, मला समजत नाही, नेमके तुला काय म्हणावयाचे आहे. नेहमी युद्धाच्या गर्जना करणारा, आव्हानं देणारा, ज्याच्या हृदयात सदैव युद्ध असते त्याला हि मवाळ प्रवृत्ती कशी सुचली आज? आताचे तुझे बोलणे तुझ्या स्वभावात बसणारे नाही. जणूकाय कांहीं जबरदस्त बोजा तुझ्या मनावर आला आहे असें तुझे हे बोलणे आहे. तुझे डोके फिरले आहे कां? माणूस त्याच्या स्वभावात शोभतो तुझे बोलणे त्यात बसत नाही. तू वादळी वाऱ्यासारखा असतोस परंतु आता तू शांत वाऱ्यासारखा वागत आहेस. कधी एकटा बसून दोन गुडघ्यात डोके घेऊन विचार करत बसणारा तू आज असा कसा बोलत आहेस? एकदा गदा घेऊन दुर्योधनाला मारण्यासाठी धावणारा असा कसा झाला आहेस? तुला दुर्योधनाबद्दल अचानक माया कशी जागृत झाली? मी समजतो कीं, जेव्हां मोठे युद्ध प्रत्यक्ष होणार असे समजते माणसाला भिती वाटू लागते. तुझे तसे झाले आहे कां? तुझ्यातला पुरुषार्थ कोठे गेला? त्यासाठी तू शांतता मांगत आहेस कां? तुझ्या ह्या बोलण्याने तुझ्या भावांनासुद्धा आश्चर्य वाटत असेल. तुझ्या वर्णाला आणि वंशाला तुझे बोलणे शोभणारे नाही. अरे भरता, असा धीर घालवून बसू नकोस. तो नालायक तुझ्या दयेच्या योग्यतेचा नाही. असें तर नाही कीं, मी युधिष्ठीराला बोललो त्यासाठी तू त्याला बरे वाटावे म्हणून त्याच्या सारखे केवळ

त्याच्या वरील प्रेमापोटी बोलत आहेस? क्षत्रिय मरणाला भित नाहीत म्हणून त्या युद्धात जे मरतील ते स्वर्गात जाणार आहेत हे लक्षात घेऊन त्यांचा विचार करावयाचा नसतो.

भगवत यान पर्व भाग पंच्याहत्तरावा संपला.

## भगवत यान पर्व

## भाग श्याहत्तरावा

वैशंपायन सांगतात, ते वासुदेवाचे ऐकल्यावर नेहमी रागात असणारा भिम शुद्धीवर आल्यासाखा भानावर येतो. तो बोलतो, ""अरे अच्युता, मला तसे म्हणावयाचे नव्हते परंतु मला एका विशिष्ट प्रकारे ते सांगावयाचे होते. तू मात्र वेगळ्या अर्थाने ते माझे बोलणे घेतलेस. मला युद्ध आवडते व तो माझा स्वभाव आहे. त्याबद्दल दुमत नाही. तू मला योग्य प्रकारे ओळखतोस, आपले एकमेकांचे संबंध फार जुने आहेत. परंतु अशाप्रकारे मला रागावलास जसे कांहीं मी कोणता मोठा अपराध केला आहे. अरे माधवा, मला तुझ्याशिवाय कोणीही रागावू शकत नाही. आता तुला सांगतो मला नेमके काय सांगावयाचे होते, स्वतःची स्तुती करणे चांगले समजले जात नाही तरी ते मी करणार आहे. तरी तू मला अशारितीने दम दिला आहेस म्हणून सांगतो. ते पहा आकाश आणि पृथ्वी दोनही कोणाच्याने हलणारे नाहीत. त्यातच सगळें आश्रय घेत असतात. त्यातच ते असंख्य जीव उत्पन्न होत असतात. समज ते दोन कांहीं अपघाताने एकमेकांवर आदळले तर मी माझ्या ह्या दोन हातांनी त्यांना वेगळे करू शकतो. माझे हात पहा कसे गदेसारखे आहेत. माझ्या कह्यात आलेला कोणी त्यातून सुटू शकत नाही. तो हिमालय, ते सागर, वलाला मारणारा इंद्र, कोणीही त्याला माझ्या तावडीतून सोडवू शकणार नाही. माझ्या पायाखाली मी सगळे क्षत्रिय तुडवू शकतो. कोणाची हिम्मत आहे पांडवांशी लढण्याची. ते तू चांगलेच जाणत आहेस. अरे अच्युता, राजसुय यज्ञाच्या वेळी मी पृथ्वीचे राजे कसे अंकीत केले तुला माहीत असेल. जर तुला माहीत नसेल माझी ताकद जी दुपारच्या सूर्या सारखी तळपणारी आहे, तर ती मी तुला दाखवू शकतो. अशा प्रसंगी मला तू असें टोचून बोललास ते मला आवडलेले नाही. त्यामुळें माझ्या मनाला जखमा झाल्या आहेत. परंतु, लक्षात असूदे कीं मी जे सांगितले त्यापेक्षा किती जास्त शक्तिमान व धाडशी मी आहे ते वेळीच दाखवून देईन. जेव्हां ते युद्ध सुरू होईल तेव्हां तू पहाशील मी कसे हत्ती आणि रथ त्यांच्या घोड्यासकट फेकून देतो. एका फटक्यात कसे ते क्षत्रिय ठार मारतो तेसुद्धा तू पहा. तू आणि तुझ्यासारखे इतर पहातील मी कसें शत्रूंचे सैनिक रगडून काढतो. माझ्या हाडांची ताकद संपलेली नाही कीं, माझ्या हृदयात भितीची धडकन सुरू झाला आहे कीं, मी मवाळ बोलू. सगळे जग जरी माझ्या अंगावर तुटून पडले तरी मला भिती वाटणार नाही, अरे कृष्णा, मला भिती माहीतच नाही. मी जे बोलत होतो ते केवळ दयेच्या पोटी व माझ्या भावाला बरे वाटावे म्हणून होते पण तू ते समजलास नाही. मी एकापरीने गंमत करत होतो. त्यात तू फसलास ह्याचे मला नवल वाटते. मात्र आता त्यांचा नाश करावयाचाच आहे.

# भगवत यान पर्व

## भाग सत्याहत्तरावा

भगवान (कृष्ण) सांगतात, केवळ प्रेम आणि हितचिंतनाच्या उद्देशाने मी ते बोललो होतो. तुझ्यातील अग्नी किती तेजस्वी आहे ते पहावयाचे होते. त्यात तुझा निर्भत्सना करण्याचा किंवा तुला कमजोर ठरवण्याचा हेतू अजिबात नव्हता. मला तुझ्या हिम्मतीची आणि गुणवत्तेची पूर्ण कल्पना आहे. तुला चिडवण्याचा माझा उद्देश नव्हता. मी माझ्या ज्ञानाने प्रेरित होऊन किंवा रागाने किंवा कांहींतरी बोलावयाचे म्हणून मी बोलत नव्हतो. मला माहीत आहे कीं, जेव्हां युद्ध होईल तेव्हा तू पांडवांच्या भल्यासाठी कितीतरी मोठे काम करणार आहेस. तुझे भाऊ तुझ्यासाठी योग्य आप्त आहेत, एकाच तोलामोलाचे तुम्ही एकमेकांसाठी अहात. तुम्हाला सगळे राजे फार मानतात. तरी त्यांना नेमकी कल्पना नसल्यामुळें ते कोण योग्य आणि कोण चूक ते समजत नाहीत. तो संशय मला त्या सभेत जाऊन काढून टाकावयाचा आहे. कारण कौरवांनी तुमच्या गैरहजेरीत तुमच्या बद्दल बरेच कांहीं खोटेनाटे सांगून तुमच्या बद्दल गैरसमज पसरवण्याचे काम केले आहे. माणसाच्या यशाचे जे कारण असते तेंच कारण त्याच्या अपयशाचेसुद्धा होऊ शकते. म्हणून माणसाच्या कामाचे परिणाम नेमके कसे येतील ते सांगता येत नाही. बऱ्याच वेळा त्याच्या अपेक्षेपेक्षां वेगळे परिणाम अनुभवायला येतात असें दिसते. ज्ञानी माणसे त्यांच्या अंदाजानुसार कांहीं करण्यास सांगतात. परंतु, घडते नेमके विरुद्ध त्यांचे अंदाज चुकतात कारण कार्यात दैव सुद्धा कार्यरत असते व त्याचे कोणाला समजत नाही. ज्योतिषी अंदाज करतात परंतु, ते बरोबर होतील असें कधीच सांगता योणार नाही कारण भाग्य कोणालाही तंतोतंत ओळखता येत नाही. जसें वारा कसा वाहील ते सांगता येत नाही तसें हे असते. कितीही उत्तम अभ्यास करून कांहीं आडाखे मांडले तरी भाग्य त्यात बदल करून वेगळेच निष्पन्न हाती येते असा अनुभव आहे. त्यामुळें मोठे जाणकार सुद्धा हतबल होतात. कांहीं वेळा केवळ वातावरणाच्या विरुद्ध होण्यांने चांगले आडाखे खोटे ठरतात. ते माणसाच्या आवाक्या बाहेरचे असते. माणसाची सगळी मेहनत वाया जाते. म्हणून आपले कर्म भाग्य आणि निसंर्गाचे कार्य ह्यांचा मेळ घालावा लागतो अंतिम यश मिळण्यासाठी जे माणसाच्या कुवती बाहेरचे असते. त्याकरतां स्मृती आणि श्रुतीत जे दिले आहे ते पहातात. त्यावेळी भिमा, देवतांच्या कृपेची उपयुक्तता समजते. कारण त्या देवतां निसर्गाला नियंत्रित करत असतात. देवतां त्यांना अनुकूल असतात जे तपस्या करतात, व्रतस्थ जीवन जगतात आणि वासनांच्या आहारी जात नाहीत जसे ब्रह्मचारी असतात. ते सगळे तुम्हीं पांडवांनी योग्य

सांभाळलेले असल्याने तुम्हाला ह्या युद्धात त्या सगळया देवतां मदत करणार आहेत. जे अशारितीने तयारीने आपली कामं करतात त्यांना यश मिळते. ते यश त्या देवतांचे असल्याने ते त्यांना द्यावयाचे असते. आपण फक्त कृती करत रहावयाची असते. त्यासाठी आपल्या दैवाला दोष देत उगाचच नाराज न होता देवतांची आठवण करत आनंदात रहावे. असें वेदात सांगितले आहे. म्हणून माझ्या बोलण्याचा विनाकारण चुकीचा अर्थ काढू नकोस. तुझी शक्ती जितकी आवश्यक आहे तितकेच देवतांचे सहकार्य सुद्धा आवश्यक आहे हे तुझ्या लक्षात आले असेल. मी उद्या निघणार आहे हस्तिनापुराला. तेथे धृतराष्ट्राला भेटणार आहे. मी माझ्यापरिने कोशिश करणार पांडवाचे त्याना युद्धाविना मिळवून देण्यासाठी. जर कौरव तयार झाले तर सोन्याहून पिवळे, माझ्या किर्तीत मोठी वाढ होईल कीं, मी कौरवांना पटवले. तुझे मनाप्रमाणे झाल्याचे तुला समाधान मिळेल. परंतु, जर ते मला ऐकणार नसतील तर मात्र अरे वृकोदरा, युद्ध निश्चित होणार हे समजून त्या तयारीत तुम्ही राहिले पाहिजे. तशा परिस्थितीत भिमसेना तुझी जबाबदारी मोठी असेल. तू आणि अर्जुन ह्यांना मोठी जबाबदारी पेलावयाची आहे. मी असेनच, विभत्सुची इच्छा आहे कीं, मी त्याचा रथ चालवावा म्हणून मी त्याचा सारथी होणार आहे. म्हणजे मी तुमच्या बरोबर आहेच त्या युद्धभूमीवर. त्यासाठी तुझ्यातील उर्जा वाढवण्यासाठी मी तसे बोललो, तू उगाचच त्याबद्दल मनाला लावून घेऊ नकोस.

भगवत यान पर्व भाग सत्याहत्तरावा संपला.

# भगवत यान पर्व

## भाग अठ्ठ्याहत्तरावा

अर्जुन बोलतो, अहो जनार्दना, युधिष्ठीराने सगळे सांगितले आहे तेंच पुन्हा बोलण्यात मला अर्थ वाटत नाही, तुझ्या बोलण्यावरून एक गोष्ट स्पष्ट होते कीं, शांतता करार करणे वाटते तितकी सहज साध्य होणारी बाब नाही. धृतराष्ट्राच्या व त्याच्या मुलांच्या लोभीपणामुळें ते शक्य होणार नाही. तू असेसुद्धा सांगत आहेस कीं, केवळ मानवी प्रयत्नाने यश मिळत नाही तर त्या कार्यात इतर घटक सुद्धा गुंतलेले असतात त्यांचीसुद्धा दखल घ्यावयाची असते. केवळ मानवाच्या हिम्मतीने आणि धाडसांने ते साध्य होते जेव्हां देवतांची त्या कार्याला परवानगी असते म्हणजे देवता (लोकपाल) अनुकूल असल्या पाहिजेत आणि त्या अनुकूल असतात जेव्हां माणसाच्या वागण्यात सत्पात्र चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया असते व त्याचे त्याच्या वासनांवर पूर्ण नियंत्रण असते. तू असें सुद्धा सांगतोस कीं, आमचे आमच्या वासनांवर पूर्ण नियंत्रण आहे कारण आम्ही गेली तेरा वर्षे शुक्ल ब्रह्मचर्याचे अनुचरण करत आहोत. कौरव ते करत नाहीत. त्यामुळें आम्हाला यश मिळण्याची शक्यता जास्त आहे, असें तू अप्रत्यक्षपणे सुचवत सुद्धा आहेस. तरीसुद्धा मला वाटते, कांहींही अशक्य नाही. "केल्याने होत आहे रे, आधी केलेच पाहिजे", असें जे ज्ञानी सांगतात, त्याची दखल आपण घेणे हेंच उचित आहे. कौरवांना वाटते कीं, आपण तेरा वर्षें वनात आणि अज्ञातवासात काढल्यामुळें आपला ह्या जगाचा संपर्क राहीलेला नसणार व म्हणून लोक आपल्याला विसरलेले असणार. त्यामुळें आपल्यातील प्रतिकार शक्ती संपुष्टात आली असेल. त्यासाठी त्याकाळी दिलेला शब्द पाळण्याची आवश्यकता नाही. आणि जर युद्ध झाले तर पांडवांना ते सहजपणे पराजित करू शकतील. त्या आत्मविश्वासात ते आहेत, असें तू मानतोस आणि म्हणून, ते सहजा सहजी आमचे आम्हाला देणार नाहीत व म्हणून युद्ध क्रमप्राप्त आहे. युधिष्ठीराच्या मते तरीसुद्धा शांतता कराराचा प्रस्ताव मांडणे परिस्थितीनुसार जरूरीचे आहे, त्यांनी तो ठुकरला व युद्ध झाले तर त्या युद्धाची नैतिक जबाबदीरी कौरवांची असेल व जे अतोनात नुकसान होईल आणि जे पाप होईल त्याचीसुद्धा जबाबदारी त्यांचीच असेल, जग त्यांना त्या नुकसानीसाठी जाब विचारतील, आपल्याला नाही. तुला कदाचित ते जमेल म्हणून तुझे जाणे मलासुद्धा वाटते योग्य होईल. तू आम्हा दोघांचा सारखाच मित्र आहेस. त्याशिवाय तू दुर्योधनाला त्याने मागितले तेव्हां तुझे सैन्य विना तक्रार दिले आहेस त्यामुळें ते तुझ्या उपकाराखाली आलेले आहेत. आमचे भले करणे आता तुझ्या हातात आहे. तरी आम्हाला द्रौपदीच्या अपमानाचा वचपा

काढावयाचा आहे त्यासाठी दुर्योधन, कर्ण आणि दुःशासन व शकूनी ह्याचा बंदोबस्त करावयाचा आहे ते नंतर पाहू. जसा प्रजापती देव आणि असुर दोघांचा असतो तसे तुझे आहे. तू मनात आणलेस तर शांतता करार करणे तुला अशक्य नाही. तुझ्या मनात जे आहे ते होणार आहे हे मी जाणतो जर तुला युद्ध पाहिजे तर युद्ध व शांतता, तर शांतता हे मी ओळखून आहे. तू जो निर्णय घेशील त्याला आमचे नेहमी अनुमोदन असेल. मला तर वाटते युद्ध झाले पाहिजे कारण ज्या पद्धतीने त्याने आमच्या चांगुलपणाचा गैरफायदा उचलला, त्याबद्दल त्याला व त्याच्या परिवाराला शिक्षा झालीच पाहिजे. त्याला शिक्षा करण्याचे भाग्य मला लभावे असें वाटते. युधिष्ठीराने अपात्र चांगुलपणा दाखवला त्याची शिक्षा आम्हा सगळयांना वनवासाच्या व अज्ञातवासाच्या रुपाने मिळाली कारण तो आमचा मुख्या आहे. आता कौरवांना त्यांची शिक्षा भोगावयाची वेळ आली आहे. तू तुझ्या मित्रांसाठी कसा मदत करतोस ते समजणे सोपे नसते. पाप करणाऱ्याला तू कसा शिक्षा करतोस ते समजणे अवघड आहे. परंतु, जे करावयाचे ते लवकरात लवकर करून टाक. तेथे बोलतांना द्रौपदीचा जो नाहक अपमान झाला ज्यामुळे पांचाल आणि श्रींजय दुखावले गेले आहेत त्याची किंमत सुद्धा त्या कौरवांना द्यावयाची आहे, केवळ आमचे राज्य हा एक विषय नाही. अपात्राला क्षमा करण्याने मोठे पाप लागते ते लक्षात ठेवून आपण आपले निर्णय घेतले पाहिजेत. दुर्योधनात चांगुलपणा आणि भूतदया अजिबात नाही आणि माणूसकी केवळ स्वतःच्या फायद्यापुरती आहे हे पहाता तो शांतता कराराला मान्यता देईल असें वाटत नाही.

भागवत यान पर्व भाग अठ्ठ्याहत्तरावा संपला.

# भागवत यान पर्व

## भाग एकोणऐंशीवा

भगवान कृष्ण बोलतात, "तुम्ही जसें समजता तसेंच होईल. मी असा प्रयत्न करणार आहे किं, त्यामुळे दोन्ही पक्षांचे भले होईल, कदाचित ते मला जमेल. पहा ती जमीन ओली आहे पण माणसाच्या कर्मामुळें भकास पडली आहे. पाऊस नसेल तर पीक कसे येणार"? कांहीं बोलतात, कृत्रिम जलसिंचन करावे पण, वातावरणातील उष्णतेमुळे तसे दिलेले पाणीसुद्धा वाळून जाते म्हणजे त्यालासुद्धा निसर्गाची साथ असावी लागते कारण अरे पांडवांनो, हे जग देवांचे आहे, माणसे त्यात पाहुण्यासारखी असतात ते माणूस विसरतो व स्वतःला जगाचा स्वामी समजून काम करू लागतो. त्या वागण्यामुळें त्याला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. तुला कल्पना नाही पण ह्या निसर्गात कांहीं बदल करण्यासाठी त्यांशी संबंध असलेल्या कार्यकारी देवतेची अनुमती घ्यावी लागते ते माणूस विसरतो. पण जर तो माणूस वेदात दिल्याप्रमाणे (माणूसकी, चांगुलपणा आणि भूतदया) त्याचे कार्य करत असेल तर त्या देवता अनुकूल लवकर होतात.

मला जेवढे जमेल तेवढे करीन परंतु, निसर्गाच्या कार्यक्रमात मी ढवळाढवळ करणार नाही".

अर्जुन बोलतो, दुर्योधन सातत्याने पापकारक कृत्यात गुंतलेला आहे. त्याला त्याचा पस्तावासुद्धा नाही. तसेंच, त्याच्या पापमय कृत्यांना त्याचे सल्लागार शकूनी आणि कर्ण आणि बंधू दुःशासन मदत करत आहेत. राज्य देऊन समझौता तो कधींच करणार नाही. आमच्या हातून त्याच्या सगळया नातेवाईकांचा संहार होणार, असें जर प्राक्तनात असेल तर ते होणारच. युधिष्ठीरसुद्धा राज्य सोडण्यास तयार नाही. ज्यामुळें त्याच्या क्षत्रियबाण्याची कुचेष्टा सर्वत्र होईल. नीच प्रवृत्तीचा दुर्योधन राज्य केवळ बोलण्याने देणार नाही, ह्याचा अर्थ तू म्हणतोस तसें युद्ध अनिवार्य आहे. म्हणून मला वाटते त्यांच्याकडे जाऊन त्यांना फुकटचा भाव देणे श्रेयस्कर नाही. दुर्योधन अटींचे पालन करणार नाही हे ठरलेले आहे, मग कशाला त्यांना उगाचच भाव द्यावा? माझी इच्छा आहे कीं मी त्याला ठार मारावे. त्याने जे अयोग्य कृत्य केले आहे त्याची सजा मी त्याला देणार".

कृष्ण म्हणतो, "तुम्हाला तो तुमच्या बालपणांपासून त्रास देत आहे. तुमचे बालपण त्यांने खराब केले आहे. त्याला युधिष्ठीराची सुबत्ता डोळयात खुपत होती. त्याने बऱ्याच वेळा मला तुमच्यापासून दूर करण्याचे प्रयत्न केले आहेत. मी तुझ्या भावाची साथ सोडावी म्हणून तो सतत प्रयत्न करत असतो. विधात्याची ह्याबद्दलची आज्ञा काय आहे हे तुला माहित आहे. अशा शत्रूबरोबर कधी सलोखा करणे शक्य असते कां"? तरी मी एक औपचारीक, म्हणून तेथे जाऊन बोलणी करण्याचा विचार करत आहे. त्यामुळें तुमची बाजू जगाला स्पष्ट होईल. युद्धाची जबाबदारी त्यांच्यावर पडेल. तुला आठवते कां, गेल्या वर्षी तू विराटाचे पशुधन कौरवांकडून परत मिळवले होतेस त्यावेळी भिष्मांने त्या सलोख्याचा उल्लेख केला होता, त्यावेळी दुर्योधन कसा बोलला. अरे अर्जुना माझे ऐक, जर तू समजतोस कीं, त्यांचा नाश होणार तर तसे होणार अशी विधात्याची रचना आहे. दुर्योधन अगदी थोड्या समयासाठी सुद्धा त्याचे राज्य सोडावयाला तयार नाही. युधिष्ठीराची जर तशी इच्छा असेल तर तेथे एकदा जाऊन यायला कांहींच हरकत नाही".

भगवत यान पर्व भाग एकोणऐंशीवा संपला.

# भगवत यान पर्व

# भाग ऐंशींवा

नकुल बोलतो, "तुम्ही सगळे मिळून बरेच मुद्दे बोलले गेले आहेत. अरे माधवा, युधिष्ठीर न्याय शास्त्राचा ज्ञानी आहे व त्याच प्रमाणे अर्जुन काय बोलला ते तू ऐकले आहेस, माझे मत असें आहे कीं, जे तू बऱ्याच वेळा पुन्हा पुन्हा सांगितले आहेस, कीं, प्रथम शत्रूपक्ष काय बोलतो ते ऐकावे. त्यानंतर आपल्याला काय करावयाचे तेंच करावे. अरे केशवा, विविध परिस्थितीसाठी विविध निर्णय घ्यावे लागतात. परंतु, यश तेव्हांच मिळते जेव्हां योग्य निर्णय अमलात आणला जातो. परिस्थिती बदलली कां त्या बद्दलचे निर्णयसुद्धा बदलावे लागतात. म्हणून एकच निर्णय सर्ववेळी लागू होत नाही. आपण जेव्हां वनात फिरत होतो तेव्हां राज्याचा विचार मनातसुद्धा येत नव्हता. अज्ञातवासात असतांना त्याबद्दलचे विचार प्राधान्याने होते आणि आता राज्य मिळवण्यासाठी विचार होत आहे. आता दोस्त राज्यांच्या मदतीने सात अक्षौहीणी सैन्य उभे राहिले आहे तुझ्या कृपेने. त्याबरोबर दोस्त राजे, त्यांच्या शक्तीनिशी आपल्याबरोबर आलेले आहेत म्हणजे परिस्थिती बदललेली आहे म्हणून त्या प्रमाणे आपले निर्णय असले पाहिजेत. ते दाखवून दुर्योधनाला घाबरवणे शक्य आहे. म्हणून माझ्या मते प्रथम युधिष्ठाराच्या सांगण्या प्रमाणे सामोपचाराच्या गोष्टी करता करता जर तो ऐकत नाही असें लक्षात आले तर सरळ धमकीची भाषा तू सुरू करावी, असें मला वाटते. त्यामुळे दुर्योधन घाबरेल असें मला वाटते. आपल्या बरोबर कोण आहेत ह्याची त्याला कल्पना द्यावी. त्यात भिमसेन, अर्जुन, मी, सहदेव त्याशिवाय दृष्टद्युम्न, विराट आणि त्याचे बहादूर मुलगे, काशीचा राजा, दृष्टकेतू, जे कौरवांना दाद न देणारे आहेत हे दाखवावे. त्यात आपण व बलराम, सत्यकी असें असल्याचे सांगावे. त्यानंतर भिष्म, द्रोण आणि विदूर, सोमदत्त, वल्हीक ह्यांना त्या पापी दुर्योधनाला पटवण्याचे सांगावे. ते वडील आहेत त्यांचा दबाव आणता येतो कां ते पहावे. ते धृतराष्ट्राला सांगू शकतात ज्यामुळें युद्ध टाळता येईल. असे केले तर मला वाटते तुझे शांतता करार करण्याचे काम सोपे होईल असें वाटते.

भगवत यान पर्व भाग ऐंशीवा संपला.

# भगवत यान पर्व

# भाग एक्यांऐंशीवी

सहदेव बोलतो, राजा जे बोलला ते सत्याला धरून आहे. परंतु, मला वाटते कीं, तू असें करावे कीं, युद्ध सुरू होईल. जरी कौरव शांतता कराराला तयार झाले तरी तो सोडून तू त्यांना युद्धासाठी उसकवावे. मला माहित आहे, युधिष्ठीर, भिम आणि अर्जुन ह्यांना मधून मधून शांततेच्या, पुण्याच्या उचक्या येतात कारण ते पुण्यवंत आहेत. पण मी पुण्य वगैरे बाजूला ठेवून दुर्योधन आणि दुःशासन ह्याना ठार मारणार आहे, मला राज्याचे तेवढे वाटत नाही ते आपण केव्हांही त्यांच्या कडून हिसकावून घेवू. मला द्रौपदीचा जो अपमान झाला त्याचाच विचार आहे व ते मी सहन करू शकत नाही. मला पाप लागले काय किंवा दुसरे काय होवो पण द्रौपदीच्या अपमानाचा सूड मी उगवणार आहेच, तो एक हिशोब माझ्यामते जास्त महत्वाचा आहे. ह्या मुद्यावर मी व माझा भाऊ नकुल युधिष्ठीराचे नेतृत्व मानत नाही. राज्य आपण खेचून घेणारच आहोत त्याची मला घाई नाही. म्हणून तू असें कर की, युद्ध सुरू होईल, त्यासाठी त्यांना सरळ सरळ आव्हानच देऊन ये. शक्य झाल्यास संपूर्ण युद्धापेक्षा द्वंद्वाचे प्रस्ताव ठेव म्हणजे जसें द्युतात युधिष्ठीर हरला तसे आपण द्वंद्वात दुर्योधन, दुःशासन आणि कर्ण ह्यांना हरवून किंवा त्यांना ठार मारून टाकू आणि राज्य मिळवू तर ते चांगले होईल व असंख्य क्षत्रियांचे प्राण वाचतील".

ते ऐकल्यावर सत्यकी बोलतो, "सहदेव जे बोलतो ते मला पूर्णपणे सम्मत आहे. प्रत्येक वेळी पुण्य वगैरेंचा विचार करावयाचा नसतो त्यासाठी बरेच आयुष्य आहे. द्रौपदी आणि पांडवांना त्या चामड्याच्या वस्त्रात पाहिल्यापासून मी कौरवांच्या नाशाची स्वप्न पहात आहे. म्हणून जे सगळे योद्धे येथे जमले आहेत ते परत जाण्यासाठी जमलेले नाहीत, ते शूरवीर योद्धे मरणाला भित नाहीत, क्षत्रिय कधी मरण्याला भित नाही ते ब्राह्मणांचे काम असते. त्या सगळया जमलेल्या योद्ध्यांचा विरस होईल असें कांहीं करू नकोस जनार्दना. माद्रीची मुलं जे सांगतात ते पांडवांच्या जमलेल्या सगळया सैन्याचे मत आहे म्हणून त्याचीसुद्धा दखल आपण घ्यावी". वैशंपायन सांगतात, ते युयुधनाचे रांगाने बोलणे ऐकून तेथे जमलेले सगळे योद्धे सिंहगर्जना व्हावी असें ओरडले. त्या आवाजाने सगळे आसमंत दणाणून गेले. ते सत्यकीच्या बोलण्याला दुजोरा देत होते. "शाब्बास, शाब्बास, आम्ही लढण्यासाठी जमलो आहोत", ते युयुधनाचा जयजयकार करतात.

भगवत यान पर्व भाग एक्यांऐंशीवा संपला.

# भगवत यान पर्व

# भाग ब्यांऐशींवा

वैशंपायन सांगतात, युधिष्ठीराचे शहाणपणाचे बोलणे ऐकल्यावर पांचाल देशाची राजकन्या द्रौपदी सहदेवाच्या बोलण्याची प्रशंसा करत आणि सत्यकीला शाब्बासकी देत माधवाला बोलते, "अहो मधूचा वध करणारे, आपण जाणता कशाप्रकारे पांडवांची फसवणूक दुर्योधनानी केली शकूनीच्या मदतीने. आमचे सगळे जीवन बरबाद केले आहे". तिच्या बरोबर नकुल आणि सहदेव उभे असतात, जसे त्यांचा एक गट तयार झाला आहे. तेथे कृष्णाच्या बाजूला बसलेल्या भिमाकडे रोखून पहात ती मानिनी पुढे सांगते, "तुला माहीत आहे, जो संदेश राजाने संजयाला खाजगीत दिला व संजय काय बोलला. त्या संदेशात म्हंटले होते, आम्हाला फक्त पांच गांव द्या. त्यात अविस्थल, वृकस्थल, मकोडी आणि आणखीन कोणतेही जवळचे अशी द्यावीत. तोंच संदेश दुर्योधन आणि त्याच्या सल्लागारांना दिला होता. परंतु, युधिष्ठीराचे ते मवाळ मांगणे पाहून दुर्योधन त्याप्रमाणे करण्यास तयार झाला नाही. त्यावरून समजले पाहिजे कीं, ते कोणताही शांतता प्रस्ताव स्वीकारायला तयार नाहीत. मग तेथे पुन्हा कशाला जावयाचे स्वतःला कांहीं मानपान आहे कीं नाही? पांडव आणि श्रींजय धृतराष्ट्राच्या सैन्याचा मुकाबला करण्यास समर्थ आहेत. जर त्यांना शहाणी भाषा समजत नसेल तर त्यांना एवढा भाव देण्याची काय आवश्यकता आहे"? त्याच्याकडे जाऊन विनंती करण्यास माझा व माझ्या मुलांचा आणि माझ्या दोन पतींचा सक्त विरोध आहे ह्याची नोंद घ्यावी. त्या उलट त्यांच्याशी सक्तीने आपण वागले पाहिजे. म्हणून अहो महाबली अच्युता, अशांना जास्तात जास्त मोठी शिक्षा दिली गेली पाहिजे. आणि तेसुद्धा जितक्या लवकर देता येईल तितक्या लवकर दिली गेली पाहिजे. ते गुन्हागार आहेत म्हणून खऱ्या क्षत्रियाचे कर्तव्य पार न पाडता आपण त्या गुन्हागारांपुढे भिक मागावी हे आम्हाला मंजूर नाही. तिच्या बोलण्यावर नकुल आणि सहदेव सम्मती दर्शवातात. सत्यकी आणी त्याचे सैनिक हात वर करून त्यांचे अनुमोदन दाखवतात. एकच गदारोळ होतो कारण कांहीं सैनिक अनुमोदनार्थ जोरांने ओरडू लागतात. तसे केले तर समस्त क्षत्रिय वर्गाला त्याचा अभिमान वाटेल. सर्वकाळ पुण्य हित अशा गोष्टी करण्यात क्षत्रिय आपले कर्तव्य विसरला तर राज्य कसे चालणार? जो आपली मर्यादा ओलांडून दुसऱ्याच्या संपत्तीचा मोह धरतो तो चोर असतो त्याच्याशी समझौता कशासाठी

करावयाचा"? अशा माणसाला ठार मारले पाहिजे व जर तो राजकर्ता असेल तर त्याची सगळी सेना मारून टाकली पाहिजे नाहीतर सामान्य माणसाला जगणे अशक्य होईल. नितीशास्त्राप्रमाणे ज्याला शिक्षा झाली पाहिजे त्याच्याशी समझौता करणारा त्याहूनही मोठा गुन्हेगार असतो. म्हणून माझे पहिले तीन पती गुन्हेगार आहेत पण मी त्यांना दोष देत नाही कारण, त्यांच्या आईचा मवाळपणाचा गुण त्यांच्यात आला आहे. आमची सासू सदैव अशीच पडखाऊ म्हणून मलासुद्धा खूप भोगावे लागले आहे पण आता नाही. त्यानंतर द्रौपदी आपल्या धाकट्या दोन पतींकडे पहात म्हणते, अहो माझे संरक्षक पती, आपली माता माद्री विरांगना होती. ती तुमच्या पित्याबरोबर युद्धभूमीवर लढण्यासाठी जात होती. तुम्ही त्या प्रमाणे आपल्या आईचे रक्त सिद्ध कराल असें मी समजते. मी सुद्धा यज्ञजा माझ्या भावाप्रमाणे विरांगना आहे, आपण आपल्या त्या वारसाची बूज राखली पाहिजे. आपण पांच गांव मागता कामा नये. आमचे सगळे व तुमचेसुद्धा शिक्षा म्हणून काढून घ्यावयाची ताकीद त्या नराधमाला दिली पाहिजे. पुन्हा ती त्या तीन पतींकडे पहात कुत्सितपणे बोलते, अहो ब्रह्मचारी, तुम्ही तुमच्यातील लोकपालांला विसरला अहात, तेव्हां तुम्हीसुद्धा तपश्चर्या करण्यासाठी वनात जा, कारण तोंच एक मार्ग दुर्योधनाने तुमच्यासाठी ठेवला आहे, तुम्हाला पांच गावांची तरी काय गरज आहे, ब्राह्मणांप्रमाणे भिक मागत स्वर्गाचा रस्ता पकडा. तुमचे नितीशास्त्र तुम्हाला तेंच करण्याचे शिकवत आहे परंतु, आमचे नितीशास्त्र वेगळे सांगते व त्या प्रमाणे आम्ही म्हणजे माझे धाकटे दोन पती व त्यांची सेना कौरवांचा नाश करण्यासाठी जाण्यासाठी सज्ज आहोत. ते ऐकल्यावर सत्यकी आणि त्याचे सैनिक पुन्हा एकदा मोठ्याने ओरडून त्यांची लढण्याची उत्सुकता दाखवतात. श्रीकृष्ण मंदपणे स्मित करत ते सगळे पहात असतो. त्यानंतर कृष्णा दामोदराकडे पहात बोलते, अहो भगवान, आता आपण जात अहात तर असे पहा कीं, मला न्याय मिळेल. मी पृथ्वीवर अशी एक कन्या आहे जी यज्ञकुंडातून बाहेर आली आहे. मी दृष्टद्युम्नाची बहिण आहे. माझा विवाह अजमिदा घराण्यात झाला व मी पंडूंची सून झाले, मी सगळया पांडवांची राणी आहे. जिने इंद्रप्रस्थावर राज्य केले आहे. माझ्या पांच नवऱ्यांपासून मला पांच राजपुत्र झाले आहेत. ते सगळे महारथी झाले आहेत. ते सगळे तुला मनाने मानतात. माझ्या सारखीचे हे केस, ती तिचे केस दाखवत, बोलते, धरून मला भर सभेत खेचून आणले तो केवळ माझा नव्हे तर माझ्या सासऱ्याचा सुद्धा अपमान होत होता. ते होत असतांना हे माझे पांच नवरे नुसते तोंड पहात बसले होते. मला काय वाटले असेल त्याची तू नुसती कल्पना कर. माझ्या ह्या नवऱ्यांना माझ्या, त्यांच्या पित्याच्या इज्जतीची लाज वाटली नव्हती, ते नितीशास्त्राचे धडे गिरवत बसले होते. मी "मला वाचवा, मला वाचवा", असं ओरडत होत्ये परंतु, हे माझे पती कांहीं करत नव्हते. त्यानंतर मी चतुराईने माझ्या ज्येष्ठ सासऱ्याकडे गेले व त्यांना

विनंती केली. ती त्यांनी मान्य केली व माझ्यामुळें ह्या नकर्त्यांची सुटका झाली. पुन्हा तोंच डाव खेळला गेला व आम्ही पुन्हा त्या द्युताच्या भोवऱ्यात अडकलो ते ह्या महान नितीशास्त्रीमुळें, असें बोलत ती त्वेषाने युधिष्ठीराकडे पहाते. मी अशा नवऱ्यांचा धिक्कार करते. माझे धाकटे दोन पती त्यावेळी मोठ्यांच्या दबावाखाली त्यावेळी गप्प बसले होते पण आता ते गप्प बसणार नाहीत. हे तू अरे जनार्दना, आता पाहिलेस. आता आम्ही आमच्या मनाप्रमाणे करणार आहोत. त्या नराधमाचा बळी घेणार आहोतच, मग हे महान नितीशास्त्री आमच्या बरोबर येवोत अगर न येवोत. मला तुझा मदत पाहिजे. माझे दुःख समजून घे. मी भिष्म आणि धृतराष्ट्र ह्या दोघांची सून आहे. ते सुद्धा मला वाचवू शकले नाहीत. मी माझ्या तीनही मोठ्या पतींचा धिक्कार करते. जर तुला माझ्याबद्दल जराशी तरी भावना असेल तर तू त्या दुर्योधनावर रागावशील आणि त्याचा नाश करशिल.

वैशंपायन पुढे बोलतात, द्रौपदी ते बोलत असतांना तिच्या डोळयांतून अश्रूच्या धारा लागल्या होत्या तिचे वरचे वस्त्र त्या अश्रूंनी भिजले होते. ती पुढे बोलते तिचे काळेभोर केस हातात धरून की, हे माझे केस त्या नीचाने त्याच्या पापी हाताने घट्ट पकडले होते. मला तो ह्या सगळयांच्या समक्ष खेचत होता व हे मर्द खाली मान घालून बसलेले होते. ते बसलेले म्हणून हे धाकटे सुद्धा गपचूप बसले होते. माझे वृद्ध पिता आणि माझा भाऊ ह्यांना माझ्या अपमानाचा वचपा काढावयाचा आहे. त्यासाठी आम्हा सगळयांना हे युद्ध हवे आहे. माझ्या पांचही मुलांना युद्ध पाहिजे. त्यांना त्यांच्या आईच्या अपमानाचा सूड उगवावयाचा आहे. जेव्हां त्या दुःशासनाचे हात उखडून काढले जातील ज्या हातांनी त्याने माझे केस पकडले होते तेव्हांच माझी शांती होईल. मी तेरा वर्षे त्या गोष्टीची वाट पहात आहे. माझ्या हृदयात ती आग धुमसत आहे आणि आताच्या भिमाच्या गचाळ वक्तव्यामुळे ती आग आणखीनच भडकली आहे. राक्षसांचा बळी घेणारा आता त्याच्या भेकड भावाच्या नादी लागून नितीशास्त्र बोलायला लागला आहे. ते बोलताना ती तिचे अश्रू आवरू शकली नाही व जोराजोराने रडू लागली. त्या आकांताचे पडसाद तेथे जमलेल्या सैनिकांत उमटू लागतात. तेथील वातावरण तापलेले होते. आता द्रौपदीच्या त्या रडण्यामुळें परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाईल हे लक्षात घेऊन कृष्ण मध्येच तिला थांबवतो व तिला सगळयांच्या समक्ष सांगतो, "अहो पांचाली, तुझ्या ह्या रडण्याचे पडसाद पुढे उमटणार आहेत जेव्हां कौरव ठार मारले गेल्यावर त्यांच्या बायका गळा काढून ह्यापेक्षा मोठ्याने आकांत करणार आहेत. सगळे भारत कुळ नष्ट होणार आहे तुझ्यावरील अत्याचाराची फार मोठी किंमत ते देणार आहेत. हे लक्षात असूं दे. आम्ही जरी हे शांतता कराराचे नाटक करत असलो तरी तुला जे हवे तेंच होणार आहे. त्या युद्धात युधिष्ठीराच्या नेतृत्वाखाली भिम आणि अर्जुन व तुझे दोन धाकटे पती

कौरवांच्या कुळाचा संहार करणार आहेत. म्हणून तू अशी रडू नकोस. ह्या नाटकाची गरज आहे उद्याच्या मुत्सद्देगिरीसाठी. युद्ध होणार व त्यात तुझ्या अपमानाचा सूड उगवला जाणार आहे म्हणून तू निश्चिंत रहा. मला माझे काम करावयाला जावयाला पाहिजे. कौरवांची वेळ आली आहे. कारण ते सुद्धा युद्ध मांगत आहेत. माझी ही वाणी अभेद्य आहे. एकवेळ आकाश खाली कोसळेल, हिमालयाचे तुकडे होतील, पृथ्वी दुभंगेल पण माझे वचन कधी मांगे होणार नाही. तुझे अश्रू आवर, माझ्या भगिनी, लवकरच तू ह्या जगाची राणी होणार आहेस, हे माझे शब्द आहेत.

भगवत यान पर्व भाग ब्यांऐंशीवा संपला.

# भगवत यान पर्व

# भाग त्र्यैंऐंशीवा

अर्जुन बोलतो, तू आम्हा सगळ्यांचा चांगला मित्र आहेस. तू दोनही पक्षांना प्रिय आहेस. म्हणून तूच असा समझौता करू शकतोस. अशा कामात तू चांगला तरबेज आहेस. त्यासाठी जा आणि बघ काय होते ते. त्या शिघ्रकोपी दुर्योधनाला जसे सांगावयाचे ते तू जाणतोस तसें कर ज्यामुळें सगळ्यांचे भले होईल. त्यानंतर जे होईल त्याची जबाबदारी त्यांची असेल. माझ्यामते तू जमलेतर कौरवांच्या बायकांनासुद्धा भेट आणि युद्धापासून त्यांच्या नवऱ्यांना परावृत्त करण्यासाठी सांग. मला वाटते ते जास्त परिणाम कारक होईल.

श्री भगवान बोलतात, "मी तेंच करणार आहे. चांगुलपणाच्या तत्त्वाप्रमाणे हे करणे अगत्याचे ठरते.

वैशंपायन पुढे सांगतात, रात्र संपल्यावर पूर्वेकडून सूर्यबिंब उगवते. मैत्र मुहूर्त सुरू झाला होता. सूर्याचे किरण अजून मंद होते, महिना कौमुद कार्तिकेय होता, रेवती नक्षत्र उगवले होते, शरदऋतु नुकताच संपला होता. सगळीकडे पिकं तयार झालेली दिसत होती. अशा मुहूर्तावर जनार्दन ब्राह्मणांचे वचन ऐकून त्यांचे आशिर्वाद घेऊन सकाळचे सगळे विधी उरकून सूर्याची आणि अग्नीची पुजा करून त्यानंतर अग्नीला प्रदक्षिणा करून शुभ गोष्टींचे दर्शन घेऊन तो मग सत्यकीला सांगतो कीं, त्याचा रथ तयार करावा. त्यात कृष्णाचे शंखू चक्र आणि गदा घेतलेले असा तयार केलेला रथ घेऊन तो निघतो. दुर्योधन, दुःशासन, कर्ण आणि शकूनी ह्यांच्या भरवशावर न रहाता प्रसंगी ती हत्यारं उपयोगी येतील अशा खबरदारीने तो जय्यत तयारीने निघतो. कृष्णाचे सहायक त्या प्रमाणे सगळी व्यवस्था करून रथ सज्ज होतो. जगाच्या अंतकाळी जसे तेज असेल तसे तेज त्या रथाला होते. त्याच्या रथाच्या पताकेवर चंद्रकला आणि सूर्य होते. त्या रथाला सुगंधी फुलांच्या माळांनी सजवलेले होते. त्याशिवाय अनेक रत्न त्या रथाच्या सजावटीत वापरलेली होती. त्या रथाच्या संरक्षणार्थ विशेष व्यवस्था केलेल्या होत्या. त्यातील आसनं वाघाच्या कातड्यांमी होती. त्याला कृष्णाचे आवडते घोडे शैव आणि सुग्रीव जोडलेले होते. त्याशिवाय मेघपुष्प आणि वल्हक असें आणखीन दोन घोडे सजवून जोडले होते. रथाच्या दांड्यावर पताका

होती त्यावर गरूड येऊन बसला. तो बसतांना मोठा आवाज झाला. त्याचा सारथी शौरी येऊन बसला. त्यांने सत्यकीला सुद्धा येण्याचे सांगितले व असें ते सगळे निघाले. त्या रथाच्या आवाजाने सगळे आकास आणि पृथ्वी हादरून गेली. ते निघाले तशी शुभलक्षणं दिसू लागली. वातावरण स्वच्छ झाले. अनेक पक्षी त्यांच्या रथाबरोबर उडत होते. वसिष्ठ, वामदेव, भूरिद्युम्न, गया, क्रथ, शुक्र, कौशिक, आणि भृगु कृष्णाच्या उजव्या बाजूला उभे दिसत होते. कृष्णाच्या पाठून युधिष्ठीर, भिम आणि अर्जुन जात होते. त्यांच्या मागून माद्रीची दोन लेकरं जात होती. कृष्णाला अभिवादन करण्यासाठी थोर क्षत्रिय, चेकीतन, धृष्टकेतु, द्रुपद, काशीनरेश, शिखंडी, दृष्टद्युम्न, विराट आणि त्याची मुलं, केकय राजपुत्र त्यात होते. असें सगळे कांही अंतर प्रवास करतांत व नंतर रिवाजाप्रमाणें परत फिरतात. त्या आधी तो कुंतीचा ज्येष्ठ पुत्र गोविंदाला आलिंगन देतो. आणि बोलतो, "आमची माता जिने आम्हाला जन्म दिला, जी सतत उपवास आणि तपस्या करत असते, पुजापाढातजिचा सगळा समय जात असतो, जी देव आणि माणसें सगळयांचे सन्मानपूर्वकपणे स्वागत करते, जिने वरिष्ठांची सेवा केली, जिने आम्हाला प्रेम दिले, तिच्या प्रेमात आम्ही सदैव असतो, दुर्योधनाच्या सगळया कारवायांपासून तिने आम्हाला वाचवले, अशा आमच्या मातेची चौकशी करावयाला विसरू नकोस. तिला सांग आम्ही तिची सदैव आढवण करत असतो. तिला आमच्या वतीने नमस्कार कर आणि आमच्या वतीने मिठीसुद्धा मार. कांहीं कारण नसतांना तिच्या लग्नापासून तिने फक्त कष्ट केले आहेत. तिने कधी तक्रार केली नाही. कशा परिस्थितीत तिने आम्हाला मोठं केला ते आम्हालाच माहित. मला माझ्या आईला सुखाचे दिवस दाखवावयाचे आहे. आम्हीन जेव्हां वनवासात गेलो तेव्हां ती आमच्या मागे धावत येत होती. ते तिला मी शेवटचे पाहिले आहे. त्याला बरीच वर्षे गेली आहेत. त्यानंतर तिचे दर्शन आम्हाला झालेले नाही. दुःख माणसाला मारत नाही म्हणून ती बहुधा अजून जीवंत आहे. त्याच प्रमाणे आमचे वडीलधारे भिष्म, द्रोण, कृप, विदूर आणि धृतराष्ट्र राजा वल्हीक ह्या सगळयांना माझा नमस्कार सांग, त्यानतर तो भगवंताच्या भोवती एक प्रदक्षिणा घालतो. रथ पुढे सावकाशपणे जात असतो, अर्जुन पुढे गेल्यावर कृष्णाला सांगतो, "अरे दशर्हाच्या कुळातील माझ्या मित्रा, जेव्हां ते वनवासचे ठरले तेव्हां परत आल्यावर आमचे आम्हाला परत देण्याचे ठरले होते सगळया राजांच्या समक्ष. त्यांचा सन्मान होईल व ते एका मोठ्या संहारातून वाचतील. परंतु, त्यांची लोभी दुर्बुद्धी तशीच राहिली तर मी त्याच्या बरोबर असणाऱ्या सगळया क्षत्रियांचा सर्वनाश करणार आहे ते त्यांना सांग".

वैशंपायन पुढे सांगतात, ते अर्जुनाचे बोलणे ऐकून भिमाला आनंद झाल्याचे दिसते. तो पंडुपुत्र संतापाने थरथरत होता. तो जोरांने ओरडतो, ती आरोळी ऐकून सगळे तेथे जमलेले योद्धे थरकापू लागतात. हत्ती मुततात आणि हगतात. अर्जुन ते कृष्णाला मिठी मारतो व सांगून

परत जातो. त्यानंतर सगळे राजे तेथेच उभे रहातात व कृष्णाचा रथ हस्तीनापुराच्या दिशेने निघून जातो. वासुदेव दारुकाला सांगतो, आकाशातून रथ ने, त्याप्रमाणे ते जात असतांना त्यांना कांहीं ऋषी दिसतात. ते सूर्यासारखे चमकत होते. ते त्या वाटेत रथाच्या दुतर्फा असें उभे होते. त्याना पाहून कृष्ण त्याचा रथ थांबवतो व त्यांना नमुन नमस्कार करतो. त्यांना विचारतो, "काय परिस्थिती आहे? जगात शांतता आहे कां? पुण्यकार्य कसे चालले आहे? बाकीचे तीन वर्ण ब्राह्मणांचे ऐकतात कां? तुम्हाला तुमच्या कामात यश प्राप्त होत आहे कां? आता कोठे चालला अहात? कोणत्या उद्देशाने जात अहात? मी तुम्हाला कांहीं मदत करावी असें वाटते कां? तम्हाला कोणत्या कामासाठी पृथ्वीवर यावे लागत आहे"? ते ऐकल्यावर त्यांच्यातील एक ऋषी, जमदाग्नीचा मुलगा, जो ब्रह्माचा मित्र आहे, त्याला भेटून मिठी मारतो. बोलतो, "अहो दशर्हा, ते सगळे पुज्य तपस्वी त्या तुझ्या संभाषणाची वाट पहात आहेत कारण त्यांना ते ऐकावयाचे आहे जे तू तुझ्या मित्राशी (अर्जुनाशी) करणार आहेस. पुढे होणाऱ्या युद्धाच्या सुरूवातीला. जेव्हां पृथ्वीवरील सगळे क्षत्रिय एका ठिकाणी जमलेले असतील. तेव्हां भिष्म, द्रोण वगैरे सुद्धा उपस्थित असतील. अहो यादवाच्या सिंहा, आम्ही तेथे आकाशात एकत्र राहून तुझी वाणी ऐकणार आहोत. त्या निमित्ताने आपण पुन्हा भेटणार आहोत. आता तू निवांतपणे जा त्या कौरवांच्या सभेकडे.

भगवत यान पर्व भाग त्र्यांऐंशीवा संपला.

# भगवत यान पर्व

# भाग चौऱ्यांऐंशीवा

वैशंपायन पुढे सांगतात, जसा तो शत्रुघ्न त्याच्या रथातून हस्तिनापुरी निघतो त्याच्या मागून दहा सशस्त्र भरून योद्धे सगळया लढण्याच्या तयारीने जात असतात. त्यांच्या बरोबर एक हजार पायदळ असते. त्याशिवाय हजार घोडदळ, शेकडो इतर लढवय्ये त्यांच्या बरोबर निघतात. त्यांच्याकडे सगळया प्रकारचे साहित्य असते.

जनमेजय विचारतो, "तो महान योद्धा, दशर्ह कुळाचा राजा त्याचा प्रवास कसा करत होता? त्याना कांहीं शुभलक्षणं दिसली कां"?

वैशंपायन सांगतात, आता माझे ऐक, मी तुला सगळे स्वाभाविक व कृत्रिम लक्षणं जी त्यांना दिसली ती सांगतो. तेथे आकाशात ढग अजिबात नव्हती, तरी आकाशात विजा चमकत होत्या, तुरळकपणे असलेली ढगं जोराचा पाऊस त्या रथाच्या मागून देत होत्या. सात मोठ्या नद्या सिंधू धरून ज्या साधारणपणे पूर्वेकडे वहातात त्या पश्चिमेकडे वाहू लागल्या होत्या. सगळीकडे आगी लागल्या होत्या. तलाव आणि विहीरी पाण्याने तुडूंब भरून गेल्या होत्या. सगळीकडे भर दिवसा अंधार वाटत होता. तशा कारणांने दिशांचा अंदाज करता येत नव्हता. आकाशातून मोठे आवाज येत होते ज्याचे कारण समजत नव्हते. असे सगळया देशभर होत होते. वायव्येकडील वारा इतका जोरात वहात होता कीं तो झाडे उपटून फेकून देत होता. हस्तीनापुरात मोठे वादळ सुरू झाले होते. ज्या भागातून त्याचा रथ जात होता त्याभागात मात्र सगळे सुदर आणि प्रसंन्न होते. आकाशातून सुगंधी फुलांचा वर्षाव होत होता. त्यामुळे त्यांचा प्रवास सुखकर झाला होता. प्रवासात जेथे ते थांबत तेते ब्राह्मण त्यांची स्तुती करण्यासाठी येत होते. वाटेत स्त्रीया जंगली सुवासिक फुलं त्या सैनिकांवर टाकत होत्या. प्रवास करत तो सलीभवन नांवाच्या ठिकाणी येतो. तेथे शेतांतून विपुल पिके आलेली दिसत होती. त्यांच्या वाटेतील गांवातून मध आणि इतर खाद्य पदार्थांची लयलुट होती. लोकं त्यांचे स्वागत करत होते. उपप्लव्यचे रहिवासी सुखात होते. त्यांच्यावर कोणी आक्रमक येत नव्हते. त्यांना कृष्णाचे दर्शन घ्यावयाचे होते. त्याचे सगळीकडे स्वागत होते, लोक त्याची पुजा करत होते. तसे करत तो वृकस्थल कडे पोहोचतो. त्यावेळी

संध्याकाळ झाली होती. तो रथातून उतरतो व संध्याकाळची पुजा करतो. तो रथाचे घोडे सोडावयास सांगतो. सगळे आराम करू लागतात. कृष्ण सांगतो आपण येथे रात्र काढावयाची आहे. ते ऐकताच त्याचे सेवक तेथे रहाण्याची व्यवस्था करतात. तेथे रहाणारे ब्राह्मण जे उच्चकुलिन होते व वेदाचे ज्ञान असलेले होते. हृषिकेशाची पुजा करतात. कृष्णसुद्धा त्यांचा यथायोग्य सन्मान करतो. तो त्यांच्या घरी जाऊन त्याची पुजा स्वीकारत असतो. अशारितीने त्यांना मिठाई देऊन व त्यांच्याकडील पदार्थ खाऊन तो ती रात्र तेथे काढतो.

भगवत यान पर्व भाग चौऱ्यांऐंशीवा संपला.

# भगवत यान पर्व

# भाग पंच्याऐंशीवा

वैशंपायन पुढे सांगत असतात, त्या सुमारास हेरांच्यामुळे दुर्योधनाला चाहुल लागते कीं, कृष्ण हस्तिनापुराकडे येत आहे आणि आता तो वृकस्थलात आहे. ते ऐकून त्याच्या अंगावर कंटा उभा रहातो पण वेळ पाहून तो ठरवतो तीं, त्या जगन्नाथाचे स्वागत तेथे वृकस्थलातच करावे. त्याप्रमाणे त्याच्या स्वागतासाठी सगळी व्यवस्था तेथे केली जाते. भिष्म आणि द्रोण आणि संजय ह्यांना सुद्धा ते समजते. पांडवांसाठी तो येत आहे त्याचे दुर्योधनाला खटकते. सगळी माणसे त्याच्या येण्याबद्दल बोलत होती. तो पांडवांसाठी येतो ते सगळयांना समजते. त्याचे स्वागत करावयालाच पाहिजे हे तो दुर्योधन समजून जातो व त्यासाठी वृकस्थलात सगळी व्यवस्था तो करतो. तो ओळखतो कीं, त्याची योग्य बडदास्त ठेवण्यातच आपले भले आहे, म्हणून तो त्याच्या स्वागतासाठी रस्त्यातच मोठा शामियाना उभा करण्याची आज्ञा देतो. त्याची मेहेरनजर आपल्याला फायद्याची आहे व जर तो नाराज झाला तर सगळे देव आपल्यावर उलटतील ते तो जाणत असतो. तो भिष्माला विचारतो आपले काय मत आहे? भिष्म त्यावर मोठा आनंद व्यक्त करतात. दशर्हाचे स्वागत केलेच पाहिजे ते सांगतात. अशी व्यवस्था करा कीं तो संतुष्ट होईल. त्यासाठी रत्नजडीत सजावटी केल्या गेल्या होत्या. धृतराष्ट्रसुद्धा खूष झाले होते कारण तो त्यांचासुद्धा मित्र होता. त्या शामियान्यात बसण्यासाठी उत्तम प्रकारच्या आसनांची व्यवस्था केलेली होती. सुंदर मुली त्याच्याकडे लक्ष देण्यासाठी पाठवल्या होत्या. त्याशिवाय मद्य आणि इतर पेये तयार ठेवली होती. स्वर्गातील असावी अशी सगळी व्यवस्था केलेली होती. सगळी व्यवस्था उत्तम केली आहे त्याची वार्ता तो आपल्या पित्याला देतो. धृतराष्ट्र संतुष्ट होतो. परंतु, कृष्ण त्या सर्व सोयींकडे दुर्लक्ष करत थेट हस्तिनापुराला पोहोचतो.

भगवत यान पर्व भाग पंच्याऐंशीवा संपला.

# भगवत यान पर्व

# भाग श्यांऐंशीवा

धृतराष्ट्र बोलतो, धृतराष्ट्र बोलतो, "अहो विदूर, जनार्दन उपप्लव्य कडून निघाते आहेत असें ऐकतो आहे. आता तो वृकस्थलात आहे असेंसुद्धा समजले आहे. जनार्दन अहुकांचा प्रमुख आहे, सतवतांचा सन्माननीय सदस्य आहे. त्याचे सामर्थ्य सगळे जाणतात. माधव वृश्नींचा संरक्षक आहे. तसेंच तो तिनही जगांचा कर्ता आहे. वृश्नी त्याच्या बुद्धीची फार मोठी तारीफ करत असतात. जसें आदित्य, वसु आणि रुद्र बृहस्पतीची करतात. मी सुद्धा त्या महान विभूतीची पुजा करी इच्छितो. ती माझी पुजा मी तुला ऐकवू इच्छितो. मी त्यात त्याला सोळा सोन्याचे रथ दान करू इच्छितो. त्या प्रत्येक रथाचे सारख्या रंगाचे प्रत्येकी चार उच्च दर्जाचे वल्हीक जातीचे घोडे देणार आहे. त्याशिवाय मी त्याला आठ हत्ती दान करणार आहे. ज्यांचे मध त्यांच्या गंडस्थळातून वहात आहे असें माजावर आलेले ते असतील. ज्यांचे सुळे नांगराच्या फाळासारखे लांब व मजबूत असतील. जे युद्धात शत्रूचा बिमोड करतील. त्या प्रत्येकासाठी आठ माहूत असतील त्याची देखभाल करण्यासाठी. त्याला मी शंभर सुंदर सेविका देईन ज्यांचा रंग सोन्यासारखा असेल. आणि पुरूष सेवक त्याला जेवढे हवेत तेवढे देईन. मी त्याला ऐंशी हजार लोकरीचे बुरणूस देईन जे मला पहाडी लोकांनी भेट दिले होते. चीन मधून आणलेले हरणाची कातडी देईन. त्याशिवाय जे त्याच्या योग्यतेचे आहे ते देण्यास तयार आहे. माझी गाडी जी खेचरं ओढतात, तीसुद्धा त्याला भेट म्हणून देईल. त्याच्या सगळया लोकांच्या जितक्या गरजा आहेत त्यांच्या आठपट मी त्याला देईन. त्याचे स्वागत करण्यासाठी माझे सगळे पुत्र, नातवंड त्यांच्या जाम्यानिम्यासह जातील फक्त दुर्योधन जाणार नाही. एक हजार नर्तिका रस्त्यावरून नाचत जाऊन त्याचे स्वागत करतील. त्या लावण्यवती त्यांचे पदर काढून त्यांचे उघड्या चेहऱ्याने स्वागत करतील. शहरातील सगळया बायका मुलांना व रहिवाश्यांना जनार्दनाचे दर्शन होऊ द्यावे. त्याना सांगा कीं, ते सुर्याचे दर्शन ज्या भक्तिने घेतात, त्याच भक्तीने ते माधवाचे दर्शन घेतील. ज्या रस्त्याने तो येईल ते रस्ते पाण्याने स्वच्छ धुतलेले असले पाहिजेत. रस्त्यावर तोरणं, पताका लावलेल्या असतील ज्यामुळें त्याला समजेल कीं कौरव त्याचा किती सन्मान करत आहेत. दुःशासनाचे घर दुर्योधनाच्या घरापेक्षा जास्त प्रशस्थ आहे म्हणून त्यामध्ये त्याची रहाण्याची व्यवस्था करावी. हे सगळे लवकरात लवकर झाले पाहिजे. त्या घरात आमची सगळी संपत्ती ठेवलेली आहे. सगळया सुखसोयी आहेत. त्याचा अनुभव वृश्नींच्या प्रमुखाला, कृष्णाला आला पाहिजे.

भगवत यान पर्व भाग श्यांऐंशीवा संपला

## भगवत यान पर्व

## भाग सत्यांऐंशीवा

विदूर धृतराष्ट्राला बोलतो, "अहो राजश्री, आपल्याला सगळया जगात मान्यता आहे. आपल्याला सगळे प्रेम देतात, ह्या वयात आपण जे बोलता ते शास्त्र संम्मतच असणार, आपले मन नेहमी काबूत असणार, आपण जेव्हां बोलता तेव्हां ते पूर्ण विचार करूनच असणार, जसें दगडावरील रेष असावी. आपले बोलणे शहाणपणाला धरूनच असणार. अहो राजे, आपल्या कृपेने सगळयांचे भले होत असते, त्यासाठी आता वेळ आली आहे कीं, तो शहाणपणा व ती दूरदृष्टी वापरून आपण आपल्या मुलांचे, नातवांचे व इतर आपल्या आप्तांचे प्राण वाचवावेत जे आपल्याला प्रिय आहेत. आपण कृष्णाला ते देण्याच्या गोष्टी करता कारण तो आपला सन्मामनीय पाहूणा आहे. अगदी पृथ्वीसुद्धा देण्याच्या गोष्टी करत अहात. परंतु मला नाही वाटत तुम्ही ते खरोखरच त्याला देऊ इच्छिता. अशा गोष्टी करणे हे फसवणूकीचा प्रकार ठरतो हे तुमच्या लक्षात येते कां? असें वर वरचे बोलून काय साध्य होणार आहे? आपला खरा उद्देश कोणता आहे ते मला समजत आहे. ते पांच पांडव फक्त पांच गांव मांगत आहेत ते त्यांची अफाट संपत्ती जणूकाय तुम्हाला दान करत आहेत. ते त्यांना तुम्ही देऊ शकत नाही आणि ह्या दानाच्या बाता कां मारता? त्यांच्याशी शांतता करार करण्यास तुम्ही तयार नाही. आणि त्याचवेळी त्या प्रबळ वृश्नीला लांच देऊन आपलेसे करण्याचा मानवी प्रयत्न करत अहात. त्या प्रकारे तुम्ही पांडव आणि कृष्ण ह्यांच्यात फूट पाडण्याचा डाव खेळत अहात हे कोणाही धूर्त माणसास सहज समजण्यासारखे आहे. अहो राजन, अशारितीने आपण त्यांच्यात फूट पाडू शकणार नाही. तो कृष्ण मानव अवतारात असला तरी भगवान आहे ह्याचा आपल्याला विसर पडला आहे कां? ते नर आणि नारायण जोडी युगायुगाची आहे त्यांच्यात फूट कशी पडेल? ते दोन नाहीत, ते एकच आहेत हे तुमच्या कसे लक्षात येत नाही. किती मूर्ख झाला अहात पुत्रप्रेमापोटी. त्याचे पाय धुणे, त्याला अर्घ्य देणे, आणि नेहमीची औपचारिक चौकशी करणे एवढेंच आपण त्याच्यासाठी करू शकतो. दुसरी कोणतीही गोष्ट तो स्वीकारणार नाही. त्याची कृपा जर आपल्याला हवी असेल तर त्यांला जे पाहिजे तेंच तुम्हाला द्यावे लागेल. बाकीच्या ह्या गोष्टी त्याच्याकडे आहेतच, तुमच्याकडून घेण्याची त्याला गरज नाही. केशवाला शांतता करार पाहिजे, ज्यानुसार आपल्याला त्यांचे राज्य त्याना द्यावे लागेल. दुसरे

कांहीं चालणार नाही. कृष्णाला पांडव आणि कौरव एकत्र सुखाने रहावेत असें वाटते, ते तुम्ही त्याला देऊ शकता कां"? त्याचा सल्ला घ्या, आपण दुर्योधनाचे पिता अहात व पांडव आपल्याला मुलासारखे आहेत. आपण वडील अहात त्या सगळ्यांचे. म्हणून आपण त्या प्रमाणे वागले पाहिजे. म्हणजे आपला मान राखला जाईल.

भगवत यान पर्व भाग सत्यांऐंशीवा संपला.

# भगवत यान पर्व

# भाग अठ्ठ्यांऐंशीवा

दुर्योधन ते ऐकून बोलतो, "जे विदूर काका सांगतात कृष्णाबद्दल ते सगळे सत्य आहे. जनार्दन खरोखरच पांडवांशी विशेष प्रकारे जोडलेला आहे. त्याला त्यांच्यापासून वेगळे करणे शक्य नाही. तसा प्रयत्न करणे हे सुद्धा वेडगळपणाचे ठरेल. त्याला लांच देण्याचा प्रयत्न करण्याने उलट आपली प्रतिमा त्याच्या समोर खराब होईल. परंतु, तो पुजनीय आहे हेसुद्धा तितकेच खरे. परंतु, ह्या परिस्थितीत त्याची पुजा करण्याचा असा अर्थ काढला जाऊ शकतो कीं, मी त्याला घाबरत आहे. तेसुद्धा योग्य होणार नाही. असें मला वाटते. शहाण्या क्षत्रियांने ह्या सगळया बाबींकडे लक्ष दिले पाहिजे. नाहीतर अशाने आपली नाचक्की होऊ शकते. तरी मी जाणतो कीं, तो मोठ्या डोळयाचा कृष्ण सर्व प्रकारच्या सन्मानास पात्र आहे. कोणीही त्याची पुजा करावी असाच तो आहे. परंतु, ह्यावेळी नको जेव्हां तो पांडवांच्यावतीने बहुतेक करून शांततेची बोलणी करण्यासाठी आला आहे. आणि आपण त्यांच्याशी युद्ध करण्याच्या तयारीत आहोत. मला कोणत्याही परिस्थितीत ते युद्ध टाळले जाणार नाही असें व्हावे असें वाटते".

वैशंपायन पुढे सांगतात, दुर्योधनाचे ते उद्धटपणाचे बोलणे ऐकून भिष्म विचित्रवीर्याच्या मुलास बोलतो, "पुजा करा अगर नका करू, जनार्दन कधीच रागावत नाही. त्याला दुर्लक्षणे मात्र फार मोठी चूक होईल. केशव सदैव आदरणीयच आहे. तो जे करण्यासाठी येत आहे ते कोणीही चुकवू शकत नाही. त्याच्या आदर करण्याचा व त्याच्या येण्याच्या उद्देशाचा कांहीं संबंध लावणे चुकीचे आहे. तो जे सुचवतो ते निमुटपणे मान्य कर व शांतता येणे शक्य असेल तर ती आणण्यास मदत कर. त्यातच आपले सगळयांचे भले होईल. वासुदेवाच्या मध्यस्थीने जर सलोखा होत असेल ह्या भावंडांत तर त्याच्या सारखी उत्तम गोष्ट दुसरी नाही. जनार्दन जे बोलेल ते नैतिकतेला व हिताला धरूनच असणार कारण तो दोनही पक्षांचा मित्र आहे. त्याच्या कडून कोणावरही अन्याय होणार नाही".

दुर्योधन सांगतो, "अहो आजोबा, मी कोणत्याही परिस्थितीत ही अफाट संपत्ती पांडवांबरोबर वाटून घेण्याच्या विरुद्ध आहे. ऐका माझा बेत काय आहे ह्या कृष्णासाठी. मी

त्याला आत्ता कैद करून पांडवांना शह देणार आहे. तो उद्या सकाळी येणार आहे. त्याला अटक केल्यानंतर सगळे वृश्नी आणि पांडव आणि सगळी पृथ्वी मला शरण जाईल. त्यासाठी कृष्णाला, माझा हा बेत समजता कामा नये हे लक्षात घ्या. त्याला बेसावध ठेवावयाचे म्हणजे त्याला कळणार नाही कीं मी त्याला कैदेत टाकणार आहे".

वैशंपायन पुढे सांगतात, तो दुर्योधनाचा भयंकर बेत ऐकून धृतराष्ट्र आणि इतर दरबारी भयचकीत होतात. त्याचा बाप दुर्योनाला सांगतो, "अरे राजा, अशा गोष्टी करू नकोस. अशी प्रथा आपल्यात नाही. हृषिकेश येथे पांडवांचा वकील म्हणून येत आहे. त्याशिवाय तो आपला नातेवाईक आहे आणि मित्र सुद्धा. तो आम्हा सर्वांचा आवडता सुद्धा आहे. त्यांने आपले कांहीं नुकसान केलेले नाही मग कोणत्या कारणांने तू त्याला कैद करणार"? भिष्म बोलतात, "तुझा हा हलकट मुलगा, धृतराष्ट्रा, त्याचे दिवस भरलेले आहेत हे खरे पण इतरांना कां तो मारत आहे"? तो फक्त पाप करू शकतो. त्याच्या हितचिंतकांचे सुद्धा तो वाईटच करणारा आहे. तूसुद्धा त्याच्या हलकट कामात भागिदार होत आहेस. लक्षात असू दे विचित्रवीर्याच्या मुला, कृष्ण त्याला व त्याच्या सगळया दोस्तांचा ताबडतोब नाश करून टाकील व हे प्रकरण संपुष्टात आणेल. मला तुझ्या पापी मुलाच्या बाता ऐकण्याची इच्छा नाही. असें बोलून तो वृद्ध शूरयोद्धा त्या सभेतून निघून जातो.

भगवत यान पर्व भाग अठ्ठ्यांऐंशीवा संपला.

# भगवत यान पर्व

## भाग एकोणनव्वदावा

वैशंपायन पुढे सांगतात, भगवान कृष्ण, सकाळी उठून प्रातःकाळचे सर्व विधी उरकून ब्राह्मणांचा आशिर्वाद घेतो. त्यानंतर त्याच्या जाम्यानिम्यासह कुरुंच्या नगरीला, हस्तिनापुराला प्रयाण करतो. वृशस्थलाचे रहिवासी त्याला निरोप देण्यासाठी त्यांच्या घरातून बाहेर येतात. तो गेल्यावर ते परत त्यांच्या घरी जातात. सगळे धृतराष्ट्राचे चिरंजीव दुर्योधन सोडून त्याच्या स्वागतासाठी त्यांचे उत्तम कपडे घालून तयार होतात. त्यांच्या बरोबर भिष्म, द्रोण, कृप आणि इतर मान्यवर असतात. हस्तिनापुरातील शेकडो नागरिक त्याच्या स्वागतासाठी जातात. कृष्णाचा काफिला शहरात प्रवेश करतो. त्या नगराचे रस्ते सुशोभित केलेले होते. सुंदर ललना नृत्य करत त्यांचे स्वागत करतात. वातावरणात सुगंध पसरलेला होता. त्या शहरातील बायकामुलं त्यांच्या घरातून दरवाज्यातून, खिडक्यांतून डोकावून कृष्णाचा काफिला पहात असतात. सगळे वातावरण आनंदमय झाले होते. सगळे वासुदेवाचे दर्शन घेण्यासाठी उत्सुक होते. काहीं त्याची स्तुती करणारी कवन गांत होती. कांही घराच्या गच्चा माणसाने इतक्या भरल्या होत्या कीं, त्या त्यांच्या वजनाने खाली कोसळतात कीं काय असें वाटत होते. त्या गर्दीमुळें कृष्णाचा काफिला मंद गतीने पुढे सरकत होता. कांहीं मातानी त्यांची अर्भक कृष्णाच्या पायाला लावण्यासाठी त्याच्या रथाजवळ आणलेली होती. त्या अर्भकांना दामोदर दुवा देत होता. त्यामुळें ती मिरवणूक सावकाशपणे सभागृहाच्या दिशेने जात होती. अखेरीस तो सगळा जामानिमा धृतराष्ट्राच्या राखाडी रंगाच्या राजवाड्यात येतो. त्या आलिशान वाड्याची तीन दालनं ओलांडल्यानंतर तो धृतराष्ट्राच्या दालनात येतो. तेथे तो अंध सम्राट त्याच्या स्वागतासाठी उभा रहातो. त्याच्या सह भिष्म आणि द्रोणसुद्धा असतात. त्याशिवाय कृपाचार्य, सोमदत्त, वल्हीक सुद्धा असतात. ते सगळे कृष्णाचे स्वागत करण्यासाठी आलेले असतात. त्यांची औपचारीक बातचीत होते. माधव सुद्धा त्यांना अभिवादन करतो. ज्याच्या त्याच्या मानाप्रमाणे ते होत असते रिवाजानुसार. त्यानंतर द्रोण व त्यांचा पुत्र अश्वत्थामा ह्यांची विशेष विचारपुस करतो. त्यानंतर धृतराष्ट्र कृष्णाला आसनस्थ होण्याची विनंती करतो. तो एका सुंदरशा उत्कृष्ट कारागिरी केलेल्या लाकडी आसनावर विराजमान होतो. त्या आसनावर सोन्याचा मुलामा होता आणि नक्षीमध्ये रत्नं जडवलेली होती.

त्यानंतर धृतराष्ट्राचा पुरोहित माधवाला एक गाय भेट देतो. त्याप्रमाणे दही, पाणी आणि मधाचे, मधूपर्क अर्घ्य दिले जाते. त्या आदर्तीथ्य करण्याचा औपचारिक विधा झाल्यानंतर, तो गोविंद कांहीं काळ तेथे थांबतो. तेथे कौरवांच्या घरची माणसं त्याच्याशी गप्पा गोष्टी करतात. त्यानंतर तो सन्मान घेतल्यानंतर कृष्ण धृतराष्ट्राच्या परवानगीने रजा घेतो आणि विदूराच्या निवासस्थानी जातो. तेथे त्याचे तेथे पुनः स्वागत होते. विदूर बोलतो, "मला सांगता येत नाही कीं, मला तुझे स्वागत करतांना किती संतोष होत आहे. तू साक्षात परब्रह्म मानव रुपात आहेस व ते रुप माझ्या घरात आले आहे, काय सुदैव आहे माझे पहा. असें सगळे औपचारीक झाल्यानंतर तो व्यवहार चतूर पांडवांच्या बद्दल चौकशी करतो. कृष्ण जो जाणत असतो कीं, विदूर खरोखरच पांडवांचा हितचिंतक आहे व त्यांच्या भल्यासाठी सगळे कांहीं करणारा आहे, त्याला पांडवांची सद्याची परिस्थिती काय आहे त्याची माहीती सांगतो. ते थोडावेळ त्याबद्दल चर्चा करतात.

भगवत यान पर्व भाग एकोणनव्वदावा संपला.

# भगवत यान पर्व

## भाग नव्वदावा

वैशंपायन पुढे सांगत असतात, जनार्दन, विदूराशी बोलल्यावर त्याच्या आत्येच्या, पार्थाच्या दालनात जातो. कृष्णाला आलेला पाहून ज्याचे तेज सूर्यासारखे होते, ती त्याला मिठी मारते. त्याला ती तिच्या आवेदना सांगू लागते. ती तिच्या मुलांच्या आठवणीने व्यथित झालेली होती. कित्येक वर्षात त्यांच्या बद्दल कांहीं समजत नसल्यामुळे तिचा दुःखावेग वाढला होता. कृष्णाला सुद्धा तिने अनेक वर्षात पाहिलेले नसते त्यामुळें ती फक्त अश्रू ढाळत असते. त्यानंतर ती त्याला बसण्यासाठी आसन देते. तो बसतो ती त्यांची आरती ओवाळते. त्यानंतर ते बोलत बसतात. वयापरत्वे सुरकुतलेल्या हाताने ती त्याच्या चेहऱ्या वरून तिचा हात फिरवते. शोकाकुल अशी ती कंठ दाटून आल्यामुळें रडकुंड्या आवाजात बोलते, "माझी मुलं नेहमी वरिष्ठांचा मान ठेवत आली आहेत, ते कधी मित्राचा अव्हेर करत नसत. तो त्यांचा स्वभाव नाही. त्यांच्या विश्वासाचा अशारितीने गैरफायदा घेतला गेला, त्यांचे सर्वस्व गेले. कोठे गेले मला कोणी सांगत नाही. मला विचारावयाची हिम्मत नाही. तुझ्याशी मी जरा मोकळेपणी बोलू शकेन असें वाटते कारण, तू माझ्या मुलासारखाच आहेस, माझी मुलं क्रोध आणि सुख ह्यांच्यावर विजय मिळवलेली अशी आहेत, ते ब्राह्मणांचे फार करतात. सत्यवचनी माझी मुलं मला येथे ठेवून वनात गेली मला कांहीं सुचत नाही. त्यांना पहाण्याची फार इच्छा होते पण ते कोणाला सांगणार? विदूर भावोजी खूप चांगले आहेत. माझी भगिनीप्रमाणे काळजी घेतात. कारण नसतांना त्यांने हे सगळे भोगावे लागत आहे. ते रहातात त्या जंगलात वाघ, हत्ती असें वन्य पशु असतात कां? त्यांच्या बालपणी ते त्यांच्या पित्याला मुकले. किती लहान होते ते तुला काय सांगू. त्यांच्या माता पित्यांच्या शिवाय ते कसे रहातात, लहानपणी त्यांना उठवण्यासाठी शंखनाद व बासरी वाजवली जात असें. घरी असतांना ते त्यांच्या आलिशान घरात रहात होते. त्यांना झोपण्यासाठी मऊ रिंकू हरणाच्या कातडीचे बिछाने होते. ते जेव्हां वनता त्याच्या पित्याच्या काळात रहात होते सकाळी हत्तींच्या चित्काराने ते उठत असत. रथांच्या चाकांचा आवाज आणि भजनाच्या आवाजाने ते उठत असत. ब्राह्मणांच्या वेदोच्चाराने त्यांची पहाट जात असें. त्यानंतर ते श्रीमंती झगे घालून ब्राह्मणांना दानं करत असत. त्या बदल्यात त्याना काय मिळाले ते तू पहात आहेस! आता ते जंगलात झाडांखाली

झोपत असतील. भोवती वन्यपशुंचा वावर असणार. मला माहीत आहे कारण मी माझी सवत माद्री तशा वनात त्यांच्या पित्याबरोबर राहिलो आहोत. हे सगळे काय झाले आहे. कोणत्या कर्माची त्यांना अशी सजा झाली आहे ते मला समजत नाही. जे सकाळी वाद्यांच्या सुमधून आवाजाने उठत ते आता वन्यपशुंच्या ओरडण्याने उठत असतील. त्यांना अनेक सेवकांची सवय होती इंद्रप्रस्थात तुला माहित असतील ते दिवस. आता वनात त्यांची सेवा कोण करणार? माझ्या मुलांनी बाह्य शत्रूंपेक्षा आतील रिपूचा पराभव करण्यास जास्त प्राधान्य दिले होते हे तू जाणत असशिल. क्रोध, लोभ, मोह अशा आंतरिक रिपूंचा त्या माझ्या सगळ्या मुलांनी पराभव केला आहे. ते स्थितप्रज्ञासारखे झाले होते. अशा गुणी जनांना ब्रह्मा अशी सजा कां करत आहे ते तू मला सांग. त्यांचे कोठे चुकले म्हणून ही शिक्षा ते भोगत आहेत. ते सतत चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया ह्या तीन धोरणाने आपले जीवन जगत होते त्यात काय कमी झाले ते मला तू आता सांग मी तुला विचारते कारण मला माहीत आहे कीं, तू हे सगळे चांगले समजतोस. प्राचीन काळी होऊन गेलेल्या श्रेष्ठ राजर्षी अम्वरिष, मंदीअत्री, ययाति, नहूष, भारत, दिलीप आणि सिवी ह्यांच्या योग्यतेचे तप ते करत असतील. पुण्यापलिकडे ते कांहीं करूच शकत नाहीत, ज्यांचा कधी गुणग्राहीपणात गोंधळ होत नाही, ते तिन्ही जगाचे नृप होण्याच्या योग्यतेचे असतांना त्यांना असे कां जगावे लागत आहे ते मला समजत नाही. हांच कां ब्रह्माचा न्याय आहे? माझा मोठा मुलगा न्यायी, कोणावरही अन्याय न करणारा, नितीमान, धर्मज्ञ. दुसरा भिम, मोठा शक्तीमान, वाऱ्याच्या वेगांने जाणारा, ज्याने अनेक राक्षस त्याच्या हातांने मारले आहेत असा बलवान ज्याची शक्ती इंद्रासारखी आहे, तो काय करत आहे आता मला माहीत नाही. अशी हिम्मतवान मुलं पण त्यांचे विधीने काय हाल करून ठेवले आहेत पहा. तिसरा मुलगा अर्जुन, किती सुंदर आणि शस्त्रविद्येत प्रवीण ज्याचा पिता साक्षात शक्र तो काय करत आहे ते मला सांग. ते सगळे त्यांच्या मोठ्या भावाच्या आज्ञेत रहात होते कारण मी त्यांना तसे करण्याचे सांगितले होते. माझे ते तीन मुलगे कार्तवीर्याच्या तोडीचे आहेत. उर्जेमध्ये ते आदित्याच्या बरोबरीचे आहेत, संयमात ते साक्षात पृथ्वीसारखे संयमी आहेत. व्यवस्थापन कौशल्यात ते इंद्रासारखे आहेत. त्यांनी माझ्या समक्ष सगळी पृथ्वी जिंकली आणि तो मोठा यज्ञ सिद्ध केला, राजसुय यज्ञ. कोठे गेली ती सगळी उर्जा कीं त्यांने असें दिवस भोगावे लागत आहेत. त्यांची पत्नीसुद्धा त्यांच्या बरोबर असते त्या मुलीचा काय अपराध कीं, ती वनात रहात आहे त्यांच्या बरोबर. माझा तिसरा मुलगा धनंजय तुझा मित्र त्याचे काय झाले आहे? माझा चौथा मुलगा सहदेव त्याची रथ चालवण्याची कसब अद्वितीय आहे, त्याला कोणी हरवू शकत नाही असा माद्रीचा मुलगा तो कसा आहे. मला त्यांची फार चिंता लागते कारण अरें कृष्णा, त्यांच्या मातेस, मी शब्द दिला आहे कीं, मी तिच्या मुलांची तितकीच काळजी करेन जितकी माझ्या पोटच्या मुलांची परंतु, पहा काय दैव फिरले आणि आमची

ताटातूट झाली आहे. मी माझ्या सवतीला काय तोंड दाखवू? ती स्वर्गात बसून मला दोष तर देत नाही नां? ती माझी शेवटची दोन मुलं त्यांच्या वडील भावांच्या सतत आज्ञेत रहात असतं. त्यांच्यावर माझी माझ्या पोटच्या मुलांइतकीच माया आहे पण मी त्यांना साधे पाहूसुद्धा शकत नाही. किती गुणी आहेत ती दोन माद्रीची मुलं काय सांगू, त्यांची मला नेहमी जास्त आठवण येते व मी स्वतःला दोष देत रहाते कारण मी त्यांच्या मातेस दिलेला शब्द पाळण्यास असमर्थ झाले आहे. त्यांचे सौंदर्य तू पाहिले आहेस, किती देखणे आहेत ते दोघे, साक्षात मदनाचे अवतार. म्हणून जेव्हां मी द्रौपदीला त्या सगळयांची समाईक पत्नी बोलले तेव्हां तिला ते मान्य करावेसे वाटले कारण ते सगळे इतके देखणे आहेत कीं, ती त्यांच्या मोहात पडली व म्हणून तिने ते सगळे पती म्हणून स्वीकारले हे तुला माहीत नसेल कदाचित, असे बोलून त्या स्थितीत सुद्धा कुंतीला हसून आवरेना. माझ्या सगळया मुलांत सर्वात जास्त प्रिय आहे तो नकूल किती सुंदर आहे तो, आश्विनींचा पुत्र त्याच्या सौंदर्याची कोणी तुलना करू नये. त्याची धनुर्विद्या त्याला अर्जुनाने शिकवली. त्याचे त्याच्या भावंडांवरील प्रेम वाखाणण्या सारखे आहे. कोठे आहेत ते सगळे, मला ते माझ्या ह्या आयुष्यात दिसतील कां? द्रौपदी मला सून कमी व मुलगी जास्त होती. तिच्या पावित्र्याचे काय सांगू दामोदरा. ती उच्चकुलिन साक्षात यज्ञजा. अशी सून मिळण्यास मोठे भाग्य लागते. ती पंडुच्या सगळया मुलांची सारखीच काळजी करत असे. आजसुद्धा ती तशींच करत असेल असें मी समजते. एकेकाळी तिच्या सेवेसाठी सेवक सेविकांचा मोठा ताफा असायचा आणि आता मी स्वतःचे कपडे स्वतः धूत असेल! तिची मुलं द्रुपदाच्या घरी  ठेवून ती माझ्या मुलांसह वनवासात गेली आहे. तेथे तिचे कसे चालले आहे कांहीं  माहीती मिळत नाही. तिच्याशी खूप बोलावे असें मला वाटते परंतु, ते कसे शक्य होणार ते समज नाही. चौदा वर्ष झाली तिला पाहून. तिला भेटावेसे वाटते, खूप बोलावेसे वाटते काय करू मी ही अशी अभागिनी काय करू शकते. सगळे मनात ठेवून रहावयाचे माझ्या नशिबी आहे, ते भोगलेच पाहिजे नाही कां, गोविंदा? मला समजते कीं, माणसाच्या सुखाचा व त्याच्या त्या जन्मातील कर्माचा कांहीं संबंध नसतो. मला आठवतो तो दिवस जेव्हां त्या हलकट दुःशासनाने माझ्या द्रौपदीला तिचे केस पकडून भर सभेत खेचून नेले होते. त्या प्रसंगाच्या आठवणीने माझ्या सर्वागाचा थरकाप होतो. मला सांग कृष्णा, कारण कीं, तू सगळे जाणतोस असें सगळे म्हणतात, त्यात द्रौपदीचा कोणता अपराध कीं,तिला त्या अवस्थेत कोण्या पुरूषाने असें सगळयांच्या पुढे खेचून न्यावे, अरे ती सामान्य स्त्री नव्हती, ती राजा द्रुपदाची कन्या होती! मी पहात होते, माझे मुलगे, युधिष्ठीर, भिम, अर्जुन, सहदेव आणि नकूल कांहीं करत नव्हते! मला किती दुःख झाले असेल त्याची तू कल्पना कर माझ्या दामोदरा. काय मिळाले त्या नराधमाला तसे करून? मी पहात होते, तेथे जमलेले प्रतिष्ठीत राजे, सोमदत्त, वल्हीक, कृप आपल्या माना खाली घालून बसले होते. कोणी कां नाहीं त्याला अडवले, त्याला असें

करण्याचा अधिकार कोणी दिला होता? एक विदूर सोडले तर बाकी सगळे गप्प कां होते? माणसाची योग्यता त्याच्या विद्वत्तेने अथवा कुळांने ठरत नाही तर त्याच्या वागणूकीने ठरत असते ते मला तेव्हां दिसले. विदूराच्या सारखा सज्जन माणूस साऱ्या जगात मिळणार नाही. मी त्याना फार मानते कारण ते माझे खरे बंधू आहेत, दीर नंतर".

वैशंपायन पुढे सांगतात, कृष्ण भेटल्यामुळे त्या माऊलीला खूप बरे वाटत होते. काय बोलू आणि किती बोलू असे तिचे झाले होते. तिच्या इतक्या वर्षाच्या दडलेल्या भावनां वेगांने तिच्या मुखातून बाहेर येत होत्या. ती कृष्णाला विचारते, माझ्या पतिने एक हरणची मृगया केली व त्यामुळें त्यांचे जीवन बदलले आणि माझ्या मुलांने द्युत खेळून त्याच्या सगळया परिवाराचे अतोनात नुकसान केले आहे. मला सांग, अरे कृष्णा हे दोन छंद प्राचीन काळापासून राजांचा नाश करत आहेत, ते कधी थांबणार आहे कां? त्यासाठी कोणा दुसऱ्याला दोष देणे कितपत योग्य होईल. कोणी कांहीं सांगितले म्हणून स्वतःची बुद्धी गहाण ठेवणे व त्याला नैतिकतेचा आधार असल्याचे दाखवून स्वतःची चूक लपवण्याचा प्रयत्न करणे कसें योग्य ठरते. शेवटी दैवाला दोष देण्याचा फसवा डाव करणे ह्यात कोणता शहाणपणा आहे"? अशा चुका ते स्वतःला शहाणे समजणारे राजे कां पुन्हा पुन्हा करत रहातात. त्यांच्या बरोबर त्यांच्या प्रिय आप्तानासुद्धा ते कशी शिक्षा करू शकतात. एका युधिष्ठीरच्या मूर्खपणासाठी किती लोक दुःख भोगत आहेत असे कसे हे तुमचे नितीशास्त्र!

द्युतात हरल्यामुळें त्यांचे राज्य कसे काढून घेतले जाते त्यात कांहीं कार्याची प्रमाणबद्धता असली पाहिजे ती कशी नाही? मला त्या सगळया गोष्टींचे फार दुःख होते. न्यायाच्या नांवाखाली अन्यायाचे समर्थन होत होते आणि कोणीही कांहीं बोलत नव्हते. माझ्या मुलांनी ते कसे व कां सहन केले त्याचे अजून मला कारण समजलेले नाही. चौदा वर्षें माझी मुलं भोगत आहेत ज्याचे कारण मला अजून समजलेले नाही. मी कधी धृतराष्ट्राची व माझी मुलं असा भेदभाव केला नाही. मला आशा आहे कीं, तू ह्यातून कांहीं मजबूत तोडगा काढशील व माझ्या मुलांना चांगले दिवस दिसतील. युद्धात माझी मुलं कधीच हरणार नाहीत त्यामुळें जर दुर्योधनाला युद्ध करावयाचे असेल तर त्यामुळें त्याचाच नाश होणार आहे हे स्पष्ट होते. माझ्या सध्याच्या परिस्थितीला मी मला किंवा दुर्योधनाला दोष देत नाही, मी माझ्या जन्मदात्याला त्यासाठी जबाबदार समजते कारण,मी खूप लहान असतांने जेव्हां मी चेंडू घेऊन खेळत होते, माझ्या पित्याने मला त्याच्या मित्राला भेट म्हणून देऊन टाकले जसे पैसे देतात. तेव्हां पासून हे सगळे राजेलोकांचे छंद व त्यातून उद्भवणारे व्याप मी पहात आहे. शहाण्याने राजांशी संबंध ठेवू नये असें मला वाटते, कारण असें संबंध केवळ दुःख पदरात पाडतात. जसे माझ्या पदरात पडले आहे. आपली साधी माणसं जास्त सुखी असतात.

त्यांचे व्याप छोटे व त्यांची दुःखसुद्धा छोटी असतात. अरे कृष्णा, आणखीन एक गोष्ट मी तुला सांगते, जेव्हां मी सव्यसाचीला जन्म दिला तेव्हां मी प्रसुतीच्या बिछान्यावर विश्रांती घेत होते, त्यावेळी मला एक विलक्षण आवाज ऐकू आला कीं, "तुझा पुत्र कुरु घराण्याचा नाश करणार आहे. त्यानंतर तो जगावर राज्य करील"! तो आवाज पुढे मला सांगत होता, कीं, "माझी मुलं तीन मोठे यज्ञ करतील". मला माहीत  नाही ते आवाज कसे आले पण जर त्यात तथ्य असेल तर तू ते खरे करून दाखवशील असा मला विश्वास आहे. नवऱ्याच्या मृत्यूचा अथवा संपत्तीच्या नाशाची मला काळजी वाटत नाही. मला दुःख आहे त्या गोष्टीचे कीं मी माझ्या मुलांपासून दुरावले आहे. त्यामुळें मला शांती मिळत नाही. गेली चौदा वर्षें मी त्यांना पाहिलेले नाही कसे माझे होत असेल ते तू समजणार नाहीस कदाचित. अशारितीने जेव्हां लोक भेटेनासे होतात तेव्हां ते मेल्यात जमा असें समजले जाते. त्याप्रमाणे माझी मुलं मला मेल्यात जमा झाली आहेत आणि मी त्यांच्यासाठी मेल्यात जमा आहे असें समजले पाहिजे. दुसऱ्यांच्या कृपेवर जे जगतात त्यांचा धिक्कार असो. तसे जगण्यापेक्षा मरण पत्करले. माझ्या मुलांना सांग माझा निरोप कीं, तुमच्या क्षात्र तेजाची झलक दाखवण्याची जर वेळ आली तर ते दाखवा, खोट्या नैतिकतेच्या गप्पात अडकून घेऊ नका. खऱ्या क्षत्रियांसाठी जगण्यापेक्षा वीरमरण जास्त श्रेयस्कर असते. तुमच्यावर अन्याय करणाऱ्यांना त्यांची जागा दाखवा तरच तुम्ही माझी  मुलं असें मी समजेन. माद्रीच्या मुलांना माझा निरोप दे, अरे कृष्णा, ते क्षत्रिय पिंडाला शोभेल असेंच जीवन जगतील तर त्यात मला आणि त्यांच्या मातेच्या आत्म्याला खरा आनंद होईल. आता अर्जुनाला सांग माझा निरोप, त्यांने द्रौपदीला जे योग्य वाटेल ते करावे आणि आपला पतीधर्म सिद्ध करावा. कृष्णा, तुला माहीत आहे जेव्हां भिम आणि अर्जुन रागावतात व लढतात ते देवांना सुद्धा आटपणार नाहीत. त्या सभेत जो तुमचा अपमान झाला त्याचा पुरता वचपा माझी मुलं काढतील तरच ती माझी मुलं असें मी समजेन. दुर्योधन, कर्ण, दुःशासन ह्याना त्यांच्या अपमानकारक शब्दांची आठवण करून द्याल तरच मी तुम्हाला माझी मुलं समजेन. त्याना सांगा राज्य जाते व परत मिळते पण अपमान झाला तर तो परत करण्यासाठी अपमान करणाऱ्याचा नाश करावयाचा असतो हांच खरा क्षत्रिय धर्म आहे त्याची आठवण ठेवा. द्युतात हरले त्याचे मला विशेष वाटले नाही पण अपमान मला जाळत आहे. जे युद्ध होईल ते राज्य मिळवण्यासाठी असण्यापेक्षा द्रौपदीच्या अपमानाचा बदला घेण्यासाठी झाले तर ते माझ्यामते जास्त योग्य होईल. अपमान कोणत्याही बोलण्याने व क्षमा मागण्याने अथवा क्षमा करण्याने फिटत नाही. केवळ अपमान करणाऱ्याचा नाश करण्यानेच तो मिटतो हे माझे मत त्यांना सांगा. तू असतांना, त्याशिवाय बलराम, तुझा प्रद्युम्न, मोठे मोठे योद्धे माझ्या पांच पांडवांबरोबर असतांना मला कां चिंता खाते तेंच समजत नाही.

वैशंपायन पुढे सांगतात, ते सगळे ऐकल्यावर तिचा पुतण्या कृष्ण, तिचे सांत्वन करण्यासाठी तिला बोलतो, "आपल्या सारखी शूर महिला मी पाहिलेली नाही. सुरसेनाची मुलगी, अजमिदांची सून, उच्चकुलीन जिचा विवाह उच्चकुळात झाला आहे, तुझे नेहमीच तुझा पती कौतुक करत असें असें सांगतात. जिने शूरयोद्ध्यांना जन्म दिले आहेत. जी अनेक गुणांनी परिपूर्ण आहे, जिचे शहाणपण विलक्षण आहे, जिच्यात धीरोदात्तता आहे, तिचे पुत्र तिची इच्छा खचीतच पूर्ण करतील. मला सांगावयाला आनंद होतो कीं, तुझी मुलं तुझ्याच विचारांची आहेत व तेसुद्धा त्या अपमानाचा सूड उगवण्यासाठी दुर्योधनाला युद्धाचे आव्हान देणार आहेत. ते सामान्य माणसाप्रमाणे थोडक्यात समाधान मानणारे नाहीत. त्याप्रमाणे त्यांची सुख व दुःख सुद्धा सामान्य नाहीत. असें लोक सगळ्या गोष्टी मोठ्या तीव्रतेने करत असतात. त्याना त्यात आनंद मिळतो. पांडव आणि तुमची सून माझ्या माध्यमातून आपल्याला वंदन करत आहेत. ते स्वतः आता बरे आहेत. आपल्या तब्यतेची ते चौकशी करत होते. लवकरच ते त्यांच्या सगळ्या शत्रूंचा विनाश करून त्यांचे राज्य ताब्यात घेतील आणि द्रौपदीवरील अन्यायाचासुद्धा हिशोब चुकता केला जाणार आहे. म्हणून आपण आता दुःखी राहू नका. सगळे तुमच्या मनासारखेच होणार आहे".

कृष्णाच्या त्या सांत्वनपर बोलण्याने तिला थोडा धीर येतो असें दिसते. ती जनार्दनाला सांगते, "अरे महाबली कृष्णा, तू जसे योग्य वाटते तसे कर, माझा तुझ्यावर पूर्ण भरवसा आहे. परंतु, ते करतांना निष्पाप लोकांना त्रास होणार नाही असें पहा. त्या कामात पापबुद्धी नसावी नाहीतर सगळे केलेले फुकट जाईल. मला तुझ्या सामर्थ्याची कल्पना आहे. तुझ्या न्याय बुद्धीचीसुद्धा मला माहीती आहे. आमच्या वंशात तू एक पुण्याईचा पुतळा आहेस. तूंच सत्य आणि बैराग्यांचा मानबिंदू आहेस. तू महान आहेस. ब्रह्म तुझ्यात सामावलेले आहे. म्हणून मी तुझ्यावर विश्वास ठेवते".

वैशंपायन पुढे सांगतात, कृष्ण तिचा निरोप घेतो, कुंतीच्या भोवती एक प्रदक्षिणा घालतो आणि त्या दालनातून बाहेर येतो. तेथून तो दुर्योधनाच्या वाड्याकडे निघतो.

भगवत यान पर्व भाग नव्वदावा संपला.

# भगवत यान पर्व

## भाग एक्यांणवावा

वैषंपायन बोलतात, कुतीला एक प्रदक्षिणा घालून तो शत्रूंचा संहार करणारा नारायणाचा अवतार, ज्याला कांहीं सौरी म्हणून बोलतात, दुर्योधनाच्या वाड्यात येतो. तो वाडा समृद्धतेने भरलेला दिसत होता. जणूकाय दुसरे इंद्राचे घर असावे. त्याला कोणी रखवालदार अडवत नाही. कृष्ण तीन प्रशस्त चौक ओलांडून त्याच्या रहात्या घरात येतो ज्याची सजावट अशी होती की ते एकाद्या ढगासारखे दिसत होते. त्याच्या भिंती चमकत होत्या. तेथे कृष्ण दुर्योधनाला त्याच्या सिंहासनावर बसलेला पहातो. त्याच्या भोवती बरेच राजे बसलेले असतात. त्याच्या बाजूला दुःशासन, कर्ण आणि शकूनी त्यांच्या आसनांवर बसलेले असतात. कृष्णाला आलेला पाहून दुर्योधन उठून उभा रहातो व त्याचे स्वागत करतो. कृष्णसुद्धा त्याच्या स्वागताचा स्वीकार करत इतर कौरवांना त्यांच्या ज्येष्ठतेनुसार अभिवादन करतो. त्यानंतर तो त्याला दिलेल्या आसनावर जाऊन बसतो. त्याचे आसन सोन्याच्या जरीने सजवलेले होते. त्यानंतर रिवाजाप्रमाणे कुरु राजा दुर्योघन त्याला पाणी, मध आणि दही देऊन अर्घ्य करतो. एक गाय दिली जाते खाण्यासाठी, तशी प्रथा होती. त्याला सांगण्यात येते कीं त्याची रहाण्याची सोय एका आलिशान वाड्यात केली आहे परंतु, कृष्ण सांगतो कीं तो विदूरांच्या कडे रहाणार आहे त्याला त्याच्या आत्येजवळ रहावयाचे आहे. दुर्योधन त्याला त्या रात्रीच्या जेवणाचे आमत्रण देतो पण कृष्ण तेसुद्धा नाकारतो. त्यानंतर ते सगळे कौरव त्याची पुजा करतात. तो विधी उरकल्यावर दुर्योधन विषयाला हात घालतो. तो केशवाला विचारतो, "अहो जनार्दना, मी दिलेल्या सगळया गोष्टींचा तू अव्हेर करत आहेस, त्याचा मी काय अर्थ समजू? उत्तमोत्तम वस्त्रं, पेये, रहाण्याची व्यवस्था मी तुझ्यासाठी केली होती ती नाकारण्याचे कारण काय? आपले नातेसंबंध चांगले आहेत. तू आम्हा दोघांना मदत करत आहेस. मला तुझी सगळी सेना दिली आहेस ह्याचा अर्थ असा होतो कीं, तुला माझे युद्ध करण्याचे धोरण मंजूर आहे. आम्ही सगळे तुला खूप मानतो. तुला धर्म आणि हित ह्यांचे संतुलन कसे राखावयाचे ते चांगलेच माहीत आहे. म्हणून मला समजून घ्यावयाचे आहे कीं, तू ह्यावेळी माझी विनंती कां नाकारत आहेस"?

वैशंपायन पुढे सांगतात, तो महात्मा गोविंद ज्याचे नेत्र कमळा सारखे विशाल आहेत, त्याचा हात वर करून बोलतो, त्याचा आवाज धीर गंभीर असतो, त्याचे शब्दोच्चार सुस्पष्ट होते,

त्याची शब्द रचना बिनचूक होती, सांगतो कीं, ह्यावेळी तो पांडवांच्या बाजूने आला आहे व त्या नात्याने एका वकीलाला जे करणे योग्य आहे तेंच तो करत आहे. एरवीची वेळ असती तर त्याने ते सगळे मोठ्या आनंदाने स्वीकारले असते. परंतु जर त्याचे कार्य जे करण्यासाठी तो आला आहे ते त्याच्या मनाप्रमाणे सिद्ध झाले तर तो जरूर त्याचा पाहुणचार स्वीकारील. तो व त्याचे सेवक त्याच्या पाहूणचाराचा मनसोक्त आनंद घेतील असा तो शब्द देतो. ते ऐकल्यावर धृतराष्ट्राचा तो उद्धट मुलगा त्याला बोलतो, कीं त्याचे तसे वागणे दुर्योधनाशी, त्याला शोभत नाही. तो पुढे बोलतो कीं, बोलणी यशस्वी होवोत अगर न होवोत त्यांचे नाते संबंध कायम असणार आहेत. कौरवांना नेहमीच कृष्णाचे स्वागत करावयाला आवडेल. पुढे दुर्योधन सांगतो कीं, त्याचे तसे दुजाभाव करण्याचे धोरण त्याला आवडलेले नाही. तो सांगतो, त्यांचे कृष्णाशी जे संबंध आहेत ते प्रेमाचे आहेत. कोणतेही वैर नाही, वाद नाही मग त्या पांडवांसाठी त्याने असें वागणे कितपत योग्य होईल. दुर्योधन कृष्णाला सांगतो कीं, त्याचे असे वागणे हा त्याचा स्वभाव नाही परंतु, कोणाच्या तरी सांगण्यावरून तो तसा त्यांच्याशी वागत आहे. ते ऐकल्यावर जनार्दन त्याच्याकडे व त्याच्या सगळया दरबाऱ्यांकडे पहात बोलतो कीं, "ह्यात इच्छा, क्रोध, द्वेष व मतलब नाही, तसेंच कोणताही वादसुद्धा नाही. अशामुळें माझे गुण प्रभावित होत नसतात. प्रश्न असा आहे कीं, जे वैभव तू दाखवत आहेस ते तुझे नाही, ते तू कपटाने दुसऱ्याचे बळकावलेले आहे हे सगळे जग जाणते, अशा संपत्तीचा भोग घेणे माझ्या सारख्या तत्वनिष्ठास शोभणारे नाही. तू ते दुसऱ्याच्या (शकूनी) कपटकारस्थानाने मिळवलेले आहेस, अशा संपत्तीत तुझे कर्तव्य कांहींच नाही. म्हणून ते तुझे नाही अशा संपत्तीचा मी भोग घेणे तुझ्या सांगण्यावरून धर्माच्या विरुद्ध होईल. ते सगळे तुला त्यांने दान केले आहे. क्षत्रिय दान घेत नसतात ते दान देत असतात. त्या न्यायाने ते धन तुझे नाही तरी ते तुझे असल्याचा दावा करत आहेस. अरे दुर्योधना, तू चोर आहेस नितीशास्त्राप्रमाणे व मी अशा चोरलेल्या संपत्तीचा उपभोग एका चोराच्या विनंतीसाठी करणे अप्रस्तुत आहे. ज्या तुझ्या चुलत भावांचा तू लहानपणापासून विनाकारण द्वेष करत आहेस त्या सत्शिल, गुणी, निष्पाप पांडवांची हि संपत्ती आहे हे तू चांगलेच जाणत आहेस आणि येथे जमलेले सगळे राजे व तुझे दरबारीसुद्धा ते ओळखून आहेत अशा चोरलेल्या संपत्तीचा मी कसा उपभोग घेऊ शकतो. ते माझ्या नैतिक विचारसरणीत बसत नाही. तू राजा म्हणवून घेण्यास सुद्धा अयोग्य आहेस, कोणत्याही क्षत्रिय धर्माच्या नियमांत तुझे ते वागणे बसत नव्हते. तुला जर ही संपत्ती हवी होती तर तू त्यांच्याशी युद्ध करून त्यांना हरवून मिळवली असतीस तर मी मोठ्या आनंदाने तुझा पाहुणचार घेतला असता कारण, ते आपल्या क्षत्रिय धर्माला धरून होते, पण ते झालेले नाही. आता समजले मी कां तुझा पाहुणचार स्वीकारत नाही? अरे दुर्योधना, तू नीचाहूनही नीच आहेस, तुझ्यात लढण्याची कुवत नव्हती म्हणून एका जुगारड्याला तू मदतीला घेतलेस, काय तुझ्याकडे

असा कोणीही शूरयोद्धा नव्हता कीं तू त्यांना द्वंद्वात हरवून ती संपत्ती मिळवू शकशील"? ते बोलतांना कृष्ण कर्णाकडे पहात असतो. त्यानंतर पुढे कृष्ण बोलतो, "मी गुणीजनां बरोबर रहातो, चोरांबरोबर नाही, हे तुला माहीत आहे त्यासाठी मी कां पांडवाबरोबर आहे ते तू समजू शकतोस. केवळ लोभापायी गुणीजनांची फसवणूक करतो त्याच्या इतका नीच माणूस कोणी नसेल. पांडव सगळें सात्त्विक प्रवृत्तीचे आहेत हे तू जणतोस. त्यांचा द्वेष तू कां करतोस व अशा द्वेष करणाऱ्या बरोबर मी कसा समानतेने वागू शकतो. ते माझ्या नियमांत बसत नाही. पांडवांनी तुझे काय नुकसान केले म्हणून तू व तुझे दोस्त त्यांचा द्वेष करता ते मला सांग. ते सात्त्विक असल्यामुळें त्याच्या मी जास्त जवळ आहे. जो वासनांच्या आहारी रहातो सदैव, त्यानुसार क्रोध, लोभ, मोहात अडकून रहाण्यात धन्यता मानतो, त्या कारणाने इतर चांगल्या लोकांना त्रास देण्यात धन्यता मानतो त्याचा आत्मा अंधारात चाचपडत असतो अशा माणसाला कःपुरूष म्हणतात. असा माणूस सदैव पापाचरणात रमत असतो. असा माणूस चांगल्या माणसांचा द्वेष करत असतो. त्यांना त्रास देण्यात त्याला संतोष मिळत असतो. असा माणसाच्या बरोबर असणारेसुद्धा पापात्मेच ठरतात. त्याउलट जे चांगल्या गुणाची अंमलबजावणी करतात ते सगळया संकटांना तोंड देत अखेरीस सुखी होतात. ते बोलल्यानंतर जनार्दन त्याला सांगतो की, तो आता विदूराकडे जात आहे व तेथे तो जेवणार आहे त्याच्या आत्येच्या हातचे खाणार आहे.

दुर्योधनाला कोणी उलट उत्तर देत नसे पण कृष्णापुढे त्याचे कांहीं चालण्यासारखे नव्हते. कृष्णाच्या कोणत्याही प्रश्नाचे त्याच्याकडे उत्तर नसते. त्यानंतर कृष्ण त्या आलिशान वाड्यातून बाहेर येतो व विदूरांच्या घरी जातो. तो विदूरांच्या घरी गेल्यावर थोड्याच वेळांत तेथे द्रोण, कृप आणि भिष्म येतात त्याला भेटावयाला. त्या शिवाय वल्हीक, आणि इतर बरेच कौरव नातेवाईक त्याला भेटावयाला येतात. त्यातील कांहीं त्याला त्यांच्या घरी बोलावतात. पण कृष्ण ते सन्मानपूर्वकपणे नाकारतो. ते सगळे कौरव गेल्यानंतर, विदूर त्याची सगळी व्यवस्था करतात. त्यात कुंतीच्या हातचे रुचकर पदार्थ असतात. त्यांचा आस्वाद तो मोठ्या प्रेमांने घेत असतो. स्वतः जेवण्या आधी तो ब्राह्मणांना त्यांचा शिधा प्रदान करतो. त्यानंतर जे उरलेले असते ते तो खात होता. ते ब्राह्मण वेदाचे चांगले जाणकार होते. जसें वसवा मरुतात तसे तो त्या ब्राह्मणात बसून जेवत होता.

भगवत यान पर्व भाग एक्यांणवावा संपला.

# भगवत यान पर्व

## भाग ब्यांणव्वावा

वैशंपायन बोलतात, जेवणं संपल्यावर व कृष्ण ताजातवाना झाल्यानंतर विदूर त्याला सांगतो, "अहो जनार्दना, माझ्या मते तुझे ह्या निमित्ताने येणे बरोबर नाही. कारण धृतराष्ट्राचा मुलगा फार आगाऊ आहे. त्याला निती, धर्म ह्यांच्याशी कांहीं देणे घेणे उरलेले नाही. तो त्याच्या हलकट कारवायांत रमलेला आहे. त्याला स्वतःला महत्व पाहिजे परंतु, तो ज्येष्ठांचा मान ठेवत नाही. तो वेदातील शिकवणूकसुद्धा मानत नाही. तो त्यामुळे अज्ञानी असल्यासारखा वागत असतो. त्याचे भले पहाणाऱ्यांचाच तो द्वेष करत असतो. त्याला कांहीं चांगले सांगितले तर ते तो कधीच मानत नाही. तो स्वतःला फार शहाणा समजतो व त्याचे जे दोस्त आहेत त्यांच्या सांगण्या प्रमाणे तो त्याची मनमानी करत असतो. अतिशय संशयी स्वभाव आहे. त्याला कोणी विरोध करू शकत नाही. तो कृतघ्न झालेला आहे. तो त्याच्या वासनांचा गुलाम झालेला आहे. त्याने सगळया चांगल्या गोष्टींचा जणू त्याग केलेला आहे. "हम करेसो कायदा", असें त्याचे वागणे आहे. त्याला त्याच्या अंध बापाची साथ असल्यामुळें कोणाचे कांहीं चालत नाही. त्याला असें वाटते कीं, पांडवांचा तो पराभव करू शकतो कारण पांडव भिष्म, द्रोण आणि कृपांच्या पुढे टिकाव धरू शकणार नाहीत. त्याशिवाय त्याचा मोठा भरवसा आहे तो त्या कर्णावर जो त्याला सतत चुकीच्या दिशेने हुसकवत असतो. त्याशिवाय इतर योद्धा जयद्रथ जो त्याच्या बहिणीचा पती आहे त्यावर फार विश्वास आहे. त्याला वाटते कीं, पांडव वनात राहून कमजोर झाले आहेत. त्याशिवाय त्यांने प्रचंड सैन्य जमा केले आहे. त्याच्या जोरावर तो समजतो कीं कोणालाही पराजित करू शकतो. अशा सगळया गोष्टींमुळें त्याचा आत्मविश्वास आणि अहंकार खूप वाढला आहे. त्याला वाटते कीं, त्याने पांडवांना पराजित केल्यासारखेच आहे. त्यामुळें अरे कृष्णा, तो धृतराष्ट्राचा मुलगा तुझ्या समेटाच्या कराराला मानणार नाही. तुझा अपमान होऊ शकतो म्हणून मला काळजी वाटते. त्याला कांहीं शहाणपणा सांगणे म्हणजे गाढवापुढे वेद सांगण्यासारखे आहे. त्या कौरवांना त्या फुकट मिळालेल्या संपत्तीचा इतका मोह आहे किं, ते ती संपत्ती पांडवांना देणार नाहीत हे निश्चित. त्याकारणाने त्यांच्याशी कोणताही सलोखा करणे मला वाटते शक्य नाही. त्याने त्याच्या भोवती त्याच्या सारखेच हलकट स्वभावाचे दोस्त जमा केलेले आहेत. त्यांच्या बळाचा त्यांना गर्व झालेला आहे. त्यांच्याशी कोणताही सामोपचाराचा प्रस्ताव मांडण्यात कांहींच तथ्य मला दिसत नाही. अरे कृष्णा तू त्या बदमाष लोकांत जाणे मला योग्य वाटत नाही. त्यांना चांगले कांहीं

समजत नाही. ते भ्रष्ट क्षत्रियांचे टोळके आहे, तेथे तुझ्यासारख्या सज्जनाने जाऊ नये असें मला वाटते. त्यांच्या जाऊन तू जर कांहीं कठोर बोललास तर कांहीं अनिष्ट होण्याची मला भिती वाटते. ज्येष्ठाचा सल्ला घेण्याची त्यांना माहीती नाही. त्यांना कांहीं  चांगले सांगितले तरी ते त्यांना समजणार नाही कारण त्यांच्या श्रीमंतीचा व ताकदीचा त्यांना गर्व झालेला आहे. त्याच्या मनात तुझ्या बद्दल संशय आहे. त्याकरता तो तुझा सल्ला धुडकावून लावणार असें मला वाटते. तो स्वतःला दुसरा इंद्र समजतो इतका त्याचा अहंकार वाढला आहे. त्याला वाटते कीं तो देवांनासुद्धा हरवू शकतो. अशा विकृत मनस्थितीत असलेला माणूस तुझ्या शब्दांची किंमत ठेवणार नाही. त्याला असें कर्णाने पटवले आहे कीं, तो कधीही कोणापुढे हार मानणार नाही. त्यामुळें त्याचा त्या राधेयावर जास्त भरवसा आहे. निर्णय नेहमी तर्कशुद्ध असावे लागतात परंतु, त्याचे सगळे निर्णय भावनेवर आधारित असतात व म्हणून ते नेहमी चुकीचे असतात पण अफाट संपत्तीच्या बळावर तो गोष्टी मारत नेत असतो. त्याच्याकडे असलेल्या प्रचंड सैन्यामुळें त्याला वाटते कीं, त्यांने आधीच पृथ्वी जिंकलेली आहे. ही वस्तुस्थिती आहे कीं, त्याचे साम्राज्य सगळया पृथ्वीवर पसरलेले आहे व त्याला कोणी प्रतिस्पर्धी नाही. त्याला वाटते कीं ती परिस्थिती तशीच कायम रहाणार आहे. काळाचा महिमासुद्धा तो मानत नाही इतका तो माजला आहे. त्याने त्याच्या साम्राज्यातून असंख्य क्षत्रिय जमा केलेले आहेत पांडवांशी लढण्यासाठी. ते सगळे असें क्षत्रिय आहेत जे पांडवांचा द्वेष करतात. जेव्हां युधिष्ठीर राज्य करत होता तेव्हां वाईट काम करणाऱ्यांना त्याने, भिमांने आणि अर्जुनाने शिक्षा केल्या होत्या ते क्षत्रिय त्याने एकत्र करून त्यांचे सुडाने प्रेरीत असें सैन्य उभे केलेले आहे. त्यामुळें तो मोठ्या आनंदात पांडवांशी लढण्याच्या तयारीत आहे अशा परिस्थितीत तुझी समेटाची शिष्टाई कशी काम करणार? म्हणून अरे दशर्हाच्या वंशजा, तू त्यांच्यात न जाशील तर बरे असें माझे मत आहे. त्या पापी लोकांत तू कोणता पुण्याचा संदेश सांगणार व ते तो मान्य करणार ह्यावर कोणीही विश्वास ठेवणार नाही. मला माहीत आहे तू त्या सगळयांना पुरून उरशील पण ते टाळणे जास्त श्रेयस्कर असें मला वाटते. अरे माधवा, केवळ तुझ्यावरील प्रेमापोटी मी हे सांगत आहे. तुला अक्कल देण्याच्या उद्देशाने नाही. तुला सगळे समजते तरी रहावत नाही म्हणून बोलत आहे. ते लोक चांगले नाहीत कीं, त्यांच्यात तू बसावेस. हे सांगितले नसते तर माझे मन खात राहिले असते म्हणून सांगत आहे एवढेच. तू सर्वज्ञ आहेस आणखीन काय सांगणार"!

भगवत यान पर्व भाग ब्यांणवावा संपला.

# भगवत यान पर्व

## भाग त्र्यांणवावा

भगवान श्रीकृष्ण बोलतात, "असा सल्ला मला आपण देता त्याबद्दल मी आपले आभार मानतो आपली असा सल्ला देण्याची योग्यतासुद्धा आहे. त्यातून आपण आपल्या दूरदृष्टीची झलक दाखवली आहे. एका मित्राला सल्ला द्यावा असा तो मला देत अहात हे मी समजू शकतो. सत्य, धर्म आणि हित ह्याचा विचार करणारा कोणीही तसा विचार मांडेल हे मी समजू शकतो. आपण माझ्यासाठी पिता व माता समान अहात. आपण जे सांगितले ते सत्याला धरून आहे. त्यात बरेच तथ्य आहे. तरी आता माझा दृष्टीकोन काय आहे ते सांगतो ते नीट ऐका. माझा येथे येण्या मागील उद्देश तुम्हाला मी सांगणार आहे. त्या चांडाळचौकडीला चांगले ओळखून सुद्धा मी आलो आहे कारण, त्या दोघांच्या वादात जे असंख्य निरपराध क्षत्रिय नाहक मारले जाणार आहेत त्यांचे जीव वाचावेत हा आहे. ती जीवित हानी कोणामुळें होणार आहे ते जगाला समजावे हा त्या मागील उद्देश आहे. मला माहीत आहे कीं, दुर्योधन युद्धाचा विचार सोडणार नाही व त्यामुळे युद्ध होणार परंतु, ते जेव्हां होईल तेव्हां ते कौरवांच्यामुळे झाले आणि जी जीवितहानी होईल त्याची सगळी जबाबदारी त्यांच्यावर जाईल. पांडव युद्ध टाळण्याचा अखेर पर्यंत प्रयत्न करत होते पण दुर्योधनाच्या हट्टीपणामुळें ते युद्ध घडले ते जगाला समजावे हा ह्या शिष्टाई मागील उद्देश आहे. जरी मला पूर्णपणे माहीत असले कीं तो प्रयत्न फोल आहे तरी तसा प्रयत्न पांडवांकडून झाला ह्याची नोंद होणे आवश्यक आहे. कोणालाही अशा प्रकारे कौरव आणि श्रींजयांच्यात समर नको आहे पण वास्तविकता नाकारणाऱ्याला ते कसे समजणार"? एक भयंकर नरसंहार होणार आहे त्याची जबाबदारी दुर्योधनावर आणि त्याच्या दोस्तांवर असेल ह्याची नोंद देवांतसुद्धा होण्याची गरज आहे. कारण लोकपाल सगळे पहात असतात. हे केवळ माणसाच्या समाजासाठी नाही तर देवांच्या समजण्यासाठी सुद्धा मला वाटते आवश्यक आहे. कांहीं मुठभर लोकांच्या हट्टापाय़ी इतक्या मोठ्या प्रमाणात मनुष्य हानी होणे ह्याचे समर्थन होत नाही. म्हणून पांडवांना फक्त दुर्योधन, दुःशासन, कर्ण आणि शकूनी ह्याचा वध करावयाचा आहे परंतु, ते कौरव स्वतःहून अशा द्वंद्वासाठी तयार नाहीत. त्यांना मोठा समर हवा आहे. ते माझे ऐकणार नाहीत हा तुमचा कयास मला मान्य असला तरी त्या दिशेने प्रयत्न करणे हे एक जबाबदार राजकर्ता म्हणून मला आणि

युधिष्ठीराला आवश्यक वाटते म्हणून हा अखेरचा प्रयत्न होणार आहे. कुटूंबात वैरभाव वाढणे व ते सुद्धा एका माणसाच्या हट्टापायी कारण, त्याला चिथवणारे लोक आहेत हे थांबवले गेले पाहिजे असा माझा प्रयत्न आहे. मला कोणी म्हणू नये कीं, कृष्णाने समझौता करण्याचा प्रयत्नसुद्धा कां नाही केला. ह्याचे कारण ह्या संहारामुळें जे मरतील ते गेले पण ज्या बायका आणि लहान मुलं उरणार आहेत त्यांना काय उत्तर द्यावयाचे ह्याचासुद्धा विचार आपल्याला करावा लागतो हे आपण विदूर जरा लक्षात घ्या. त्या सगळ्या विचारानी मी हे करण्याचे ठरवले आहे. हा प्रयत्न केल्यानंतर मी राजांच्या समाजातून सुद्धा निर्दोष राहीन. माझ्या प्रामाणिक प्रयत्नात जेव्हां मी दुर्योधनाला चांगल्या प्रकारे समजावून सांगेन तेव्हां ते सगळे राजे सुद्धा ऐकणार आहेत. तरी जर तो मानत नसेल तर ह्या युद्धाची जबाबदारी त्यांच्यावर जाईल व मी आणि पांडव निर्दोष शाबीत होऊ, असा ह्या प्रयत्ना मागील उद्देश आहे. आणि जर दैवयोगाने तो माझ्या म्हणण्याला मान्य करील तर मला मोठे पुण्य प्राप्त होईल. अनेक कौरव, त्यांचे सैनिक, घोडे, हत्ती असें सगळेच जीवानिशी वाचतील. त्यांच्या बायका मला दुवा देतील. असा प्रयत्न करण्यात माझ्या मते कांहींच नुकसान होणार नाही. चांगुलपणा वाढवणे हे एक चांगले कार्य असते. होणारच नाही असें समजून प्रयत्नसुद्धा न करणे माझ्या मते अदूरदृष्टीचे ठरेल. आपल्याला वाटते कीं, तो व त्याचे मूर्ख मित्र माझ्यावर हल्ला करतील तर ते होण्याची शक्यता मी पहात नाही. आणि जर तसे झाले तर मी माझे संरक्षण करण्यास समर्थ आहे हे आपण जाणता अहातच. तसा मूर्खपणा त्यांनी व त्याच्या मित्रांनी केला तर मी त्यांना ताबडतोब नष्ट करून हा वाद तत्क्षणी मिटवून टाकेन. एका दृष्टीने ते चांगलेच होईल कारण तशा परिस्थितीत युद्ध टळेल व मोठी मनुष्यहानी होणार नाही. पुन्हा त्या परिस्थितीत सुद्धा नुकसान कांहींच होणार नाही".

वैशंपायन बोलतात, असे सांगितल्यानंतर तो वृश्नींचा प्रमुख यादवांचा राजा त्याच्या उबदार मऊ बिछान्यावर झोपी गेला.

भगवत यान पर्व भाग त्र्यांणवावा संपला.

# भगवत यान पर्व

# भाग चौऱ्यांण्णवावा

वैशंपायन पुढे सांगतात, अशारितीने ते शहाणपणाचे संभाषण रात्री झाल्यानंतर ज्यात दोघाना आपापले विचार स्पष्ट शब्दात एकमेकांना सांगितले होते. त्यातील कृष्णाचे विचार व ते मांडण्याची पद्धत विलक्षण आकर्षक होती. ते दोघे मोठे समजूतदार व नितीशास्त्राचे जाणकार असल्याने त्यांचा संवाद मोठा श्रवणीय होता. दोघेही एकमेकाची बाजू व्यवस्थितपणे सांगत होते त्यानंतर विदूरांची खात्री झाली कीं जे दामोदर करत आहे त्यात मोठा शहाणपणा आहे. रात्र त्यानंतर गेली व पहाटे वाद्यांच्या सुमधूर आवाजाने त्यांची झोप मोडली. जनार्दन उठल्यावर आपले प्रातःकाळचे सगळे विधी उरकून मंत्रोच्चार करत सकाळची सूर्यपुजा सुरू करतो. कृष्णाची सूर्यपुजा अजून संपली नव्हती तेवढ्यात तेथे दुर्योधन, शकूनी येतात व संगतात कीं, धृतराष्ट्र सभेत त्याची वाट पहात बसले आहेत. त्यांच्या बरोबर तेथे भिष्म आणि इतर राजे आहेत. ते जनार्दनाची वाट पहात आहेत. त्यानंतर तो त्याची पुजा आटोपती घेतो व सांगतो प्रथम त्यांचे स्वागत करतो व त्यानंतर तो ब्रह्मणांना बोलावतो त्यांना सुवर्णाचे दान करतो तसेंच तलम कातड्याचे झगे भेट देतो. ते झाल्यावर तो त्याच्या आसनावर बसलेला असतांना त्याचा सारथी दारुक तेथे येतो. कृष्णाला सलाम करतो. त्याने कृष्णाचा भव्य रथ आणलेला असतो. सगळी तयारी झाली आहे हे पाहून तो त्याच्या आसनावरून उठतो व तेथे जमलेल्या ब्राह्मणांना एक प्रदक्षिणा घालतो. त्यानंतर कौस्तुभ रत्न तो परिधान करतो गळयामध्ये, त्याच्या भोवती अनेक कौरव जमा झालेले होते. त्याबरोबर त्याचे वृश्नी सैनिक सज्ज होते, त्याच्या रथाबरोबर विदूराचा रथ तयार होता. असें ते एकत्रपणे राजसभेकडे रवाना झाले. त्यांच्या मागोमाग दुर्योधन आणि शकूनीचे रथ होते. दुसऱ्या रथात सत्यकी, कृतवर्मन आणि इतर महारथी योद्धे जे वृश्नी जातीचे होते ते होते. त्याच्या त्या मिरवणूकीत हत्तीसुद्धा होते. सोन्याने सजवलेले ते सुंदर रथ जे उत्तम घोडे खेचत होते त्यांच्या चाकांचा मोठा आवाज होत होता. ती मिरवणूक रुबाबदार वाटत होती. केशवाच्या रथा बरोबर त सगळे एका मोठ्या आमरस्त्यावर येऊन ठेपतात. तो रस्ता चांगला धूवून स्वच्छ केलेला होता. राजांनी वापरावा असां दिमाखदार रस्ता दिसत होता. त्याच्या स्वागतासाठी शंखनाद आणि झांज वगैरे वाद्य वाजवली जात होती. अधून मधून तुताऱ्या वाजवल्या जात होत्या. वैशंपायन

बोलतात, कृष्णाच्या रथा बरोबर सिंहासारखे दिसणारे योद्धे चालत होते. त्यांची संख्या कांहीं हजारात असेल. त्यांच्या अंगावर गणवेष होता त्यांच्या दर्जाचे प्रदर्शन करत होता. त्यांच्या हातात तलवारी आणि भाले, कुऱ्हाडी होत्या. ते कांहींवेळा कृष्णाच्या रथाच्या पुढे चालत होते. त्यात निदान पांचशे हत्ती होते, रथ असंख्य होते, ते सगळे त्यांच्या मागेपुढे असें चालत होते. त्यांच्या बरोबर त्या नगरातील बायकामुलं सुद्धा फिरत होती. त्यांने ते नवीनच होते. आजूबाजूच्या इमारतीतील माणसे त्यांच्या खिडक्या झरोक्यांतून व कांहीं सज्जात बसून ती मिरवणूक पहात होते. सगळयांना कृष्णाचे दर्शन घ्यावयाचे होते. तेथे जमलेले कुरु कृष्णाची स्तुती करत वेगवेगळया गप्पा तेथे मारत होते. त्यांच्या आवाजाने तो रस्ता गजबजून गेला होता. कृष्ण तेथून जातांना तेथे जमलेल्या प्रजाजनांना अभिवादन करत होता व ते त्याला चांगला प्रतिसाद देत होते. अशारितीने वाजत गाजत ती मिरवणूक सभेच्या ठिकाणी पोहोचते. ते आल्यावर तेथे असलेले सैनिक जोरांने तुतारी वाजवून त्यांच्या येण्याची खबर देतात. तो तुतारीचा आवाज ऐकल्यावर सभेत जमलेले राजे रोमांच उठल्यागत उत्तेजित होतात. त्यांनासुद्धा आनंद झालेला असतो कीं, त्यांना आता जनार्दनाचे भाषण ऐकावयाला मिळणार. ते आवाज व रथांच्या चाकांचा गडगडाट ऐकल्यावर धृतराष्ट्राला समजते कीं, कृष्णाचे आगमन झाले आहे. त्यामुळें त्याच्या अंगावर कांटा उभा रहातो एक प्रकारची भिती त्याच्या मनात उत्पन्न झालेली असते जसे चोराच्या मनात चांदणे. एका परीने त्याला आनंदसुद्धा होत असतो कीं, कदाचित त्या योगांने त्याची मुलं त्या अपोक्षित नरसंहारापासून वाचतील!

कृष्ण सभेच्या प्रवेशद्वारापाशी आलेला असतो. तेथे तो त्याच्या भव्य रथातून खाली उतरतो. ते सभागृह इंद्राच्या सभागृहासारखे भव्य दिमाखदार होते. त्याचे काय वर्णन करावे. त्या सभागृहात दामोदर विदूरांचा हात हातात धरून प्रवेश करतात. त्याच्या जवळून सत्यकी चालत होता. ते येऊन त्यांना दिलेल्या आसनांवर बसतात. ते आसन खास केशवासाठी म्हणून तयार केलेले असते, त्यावर सोन्याचा मुलामा असतो. वासुदेवाच्या समोर दुर्योधन, दुःशासन आणि कर्ण बसतील अशी व्यवस्था असते. त्यांच्या मागे इतर कौरव कृष्णाच्या पाठी कृतवर्मन व इतर वृश्नी बसतील अशी व्यवस्था असते. भिष्म व द्रोण धृतराष्ट्राच्या बाजूला बसतील अशी व्यवस्था होती. कृष्ण येतांच ते तिघे भिष्म, द्रोण आणि धृतराष्ट्र उठून उभे रहातात. त्या बरोबर इतर राजेसुद्धा उठून उभे रहातात. नियोजित केलेल्या जागेवर कृष्ण बसतो तेव्हां ते सगळे बसतात. कृष्ण त्या सभागृहात कोण आहेत ते पहातो त्याला एका बाजूला कांहीं ऋषी बसलेले दिसतात. ज्यांना त्याने हस्तिनापुरात येतांना वाटेत पाहिले होते. ते त्याला आकाशातून त्याचा रथ जात असतांना नारदाबरोबर भेटले होते. त्याना पाहिल्यावर कृष्ण भिष्माकडे वळतो व बोलतो, "अहो आचार्य

तुमचे सभागृह पहाण्यासाठी आकाशातून ऋषी आलेले आहेत व ते तेथे बाहेर उभे आहेत. ते मला येथे येतांना आकाशात नारदमुनींबरोबर दिसले होते. त्यांना सभागृहात आमंत्रण दिले तर ते योग्य होईल कारण ते फार मोठे योगी आहेत. त्यांची धृतराष्ट्राने पुजा करावी म्हणजे योग्य होईल". सभागृहाच्या बाहेर भिष्माला ते उभे असलेले दिसतात. ताबडतोब तो सेवकांना त्या ऋषींच्या बसण्याची व्यवस्था करतो. त्याना रितसर आमंत्रण दिले जाते व त्यांना बसण्यास विनंती केली जाते त्यानंतर त्यांची पुजा अर्घ्य देऊन केली जाते. सत्यकीसाठी दुःशासन खास बनवलेले आसन बसण्यासाठी देतो. विविंसती कृतवर्मनसाठी एक आसन देतो. दुर्योधन आणि कर्ण एकाच मोठ्या आसनावर बसलेले असतात, जणूकाय ते एकच आहेत असें वाटावे. त्यांच्या जवळ शकूनी त्याच्या देशाच्या प्रतिनिधींबरोबर बसतो. शकूनीचा मुलगा उलूक त्याच्या बाजूला बसलेला असतो. विदूर एका प्रशस्थ आसनावर बसला होता ज्याला शुभ्र रंगाच्या कातड्याचे वेष्टण होते व ते आसन कृष्णाच्या आसनाला लागून होते. सगळे राजे कृष्णाकडे टकामका पहात होते. ते सारखे पहात होते पण त्यांचे समाधान होत नव्हते. जसे अमृत प्यावे असें त्याना त्या दर्शनाने होत होते. जनार्दन त्याच्या पितांबरात खुलून दिसत होता. त्याची जागा त्या सभागृहात मधोमध होती. कृष्ण त्याच्या जागेवर बसल्यानंतर त्या सभागृहात निःशब्द शांतता झाली.

भगवत यान पर्व भाग चौऱ्याण्णवावा संपला.

# भगवत यान पर्व

## भाग पंच्याण्णवावा

वैशंपायन पुढे सांगतात, सगळे राजे त्यांच्या नियोजित स्थानावर बसल्यानंतर शांतता पसरते. कृष्ण त्याच्या धीरगंभीर आवाजात त्याचे बोलणे धृतराष्ट्राला सांगू लागतो. त्याचा आवाज असा होता कीं, त्या सभागृहातील सगळयांना तो ऐकू जात होता. तो सांगतो, "कुरु आणि पांडव ह्यांच्यात शांतता रहावी म्हणून व शूरयोद्ध्याचा नाहक संहार होऊ नये ह्याकरतां मी कांहीं हिताचे बोलणार आहे. येथे जो प्रकार झाला आहे पांडवांच्या बाबत त्याची सगळी माहिती सगळयांना आधींच आहे. आपले घराणे मोठे ख्यातनाम आहे कारण, राजा शंतनुच्या ह्या घराण्याची दुसऱ्यांना आनंद देण्यात, दुसऱ्यांच्या दुःखात सामील होण्यात, दुसऱ्यांचे दुःख कमी करण्यात, दुसऱ्यांना इजा न करण्यात, प्रामाणिकपणा, क्षमाशिलता, सत्यव्रत, ह्या भरत कुळाची ख्याती आहे आता पर्यंतच्या काळात. अशा परिस्थितीत जर कोणी त्या घराण्यातील ह्यापेक्षा विपरीत करत असेल तर ते फारच दुःखदायक असेल. आपण आपल्या घराण्याची इभ्रत राखण्यासाठी ते सगळे केल पाहिजे जे एका खानदानी राजघराण्याने केल पाहिजे. विशेष करून कोणाची फसवणूक होत असेल तर न्यायाच्या नियमानुसार त्या फसवणूक करणाऱ्याला योग्य शिक्षा करणे तुमचे काम आहे असे तुमची प्रजा अपेक्षित आहे. परंतु, दुर्दैवाची गोष्ट आहे कीं, तुमचा ज्येष्ठ मुलगा दुर्योधन व त्याचे भाऊ ह्यांनी कुलिन क्षत्रियांच्या व्रतस्थ जीवनाचा त्याग करून आपल्याच सज्जन चुलत भावांना फसवण्याचा गुन्हा केला आहे. तुमच्या मुलांनी पुण्यव्रत आणि हितकारकता ह्या व्रताचा त्याग केला आहे. तो व त्याचे बधू भ्रष्ट क्षत्रिय झाले आहेत. म्हणून ते राज्या करण्यासाठीसुद्धा लायक समजले जात नाहीत. त्यां सर्वांनी माणूसकी, चांगुलपणा आणि भूतदया ह्या तिनही व्रतांचा त्याग केला आहे असें दिसते. ज्यामुळें कुलिन क्षत्रियांची नैतिकता सिद्ध होत असते. ते द्वेष, मत्सर अशा दुर्गुणात रमलेले असल्याचे स्पष्टपणे दिसत आहे. ते दोष जर योग्य नुकसान भरपाईने सुधारले नाहीत तर यथावकाश मोठा नरसंहार होण्याची व त्यात कुरु घराण्याच्या लोकांची हत्त्या होण्याचा संभव दिसत आहे. सांगण्याचा मुद्दा असा आहे कीं, द्युतात हरल्यानंतर युधिष्ठीर त्याचे राज्य कौरवांकडे सांभाळण्यासाठी सुपूर्द करतो त्यावेळी झालेल्या बोलण्यानुसार ते परत आल्यावर त्यांचे राज्य त्यांना कौरवांनी परत करावयाचे होते परंतु,

दुर्योधन आणि त्याचे पिता व इतर भावंड तो शब्द पाळण्याचे नाकारत आहेत. त्यामुळे ते विश्वासघाताचे गुन्हेगार ठरतात. त्यामुळें पांडव त्यांचा हक्क मागण्यासाठी मला त्यांचा प्रतिनिधी म्हणून पाठवत आहेत. जर कौरव व त्यांचा पिता दिलेला शब्द पाळणार नसतील तर त्यासाठी जी कारवाई युधिष्ठीराला करावी लागणार आहे त्यामुळें कौरवांच्या आणि पांडवांच्या अशा दोनही पक्षांच्या क्षत्रियांची मोठी जीवितहानी होण्याचा संभव आहे, ते टाळावे अशी युधिष्ठीराची व त्याच्या भावंडांची व माझीसुद्धा फार इच्छा आहे. आपण आपल्या अधिकाराचा वापर करून आपल्या मुलाला सांगून ते राज्य पांडवांना परत करण्याची आज्ञा द्यावी व हा वाद मिटवावा. नाहीतर जे संहार होतील व त्यात जे मरतील त्या सगळयांची जबाबदारी आपल्यावर पडेल. जर तुम्ही त्याप्रमाणे आज्ञा देऊनही तुमची मुलं त्या आज्ञेचे पालन करणार नसतील तर त्यांना शासन करण्याचे काम युधिष्ठीराचे लोक करण्यास समर्थ आहेत. तशा परिस्थितीत सुद्धा जो नरसंहार होईल त्याची जबाबदारी तुमच्या मुलांवर असेल. पांडव पुनः सांगू इच्छितात की, त्याना कोणताही नरसंहार करण्याची इच्छा नाही पण त्यांना तुमच्याकडून योग्य सहकार्य मिळाले नाही तर तसा संहार ते करण्यास तयार आहेत. अर्थात् त्याचीसुद्धा जबाबदारी तुमच्यावर असेल, ह्याची हस्तिनापुराच्या प्रजेने आणि येथे जमलेल्या समस्त राजांनीं नोंद घ्यावी. जर आपण आपल्या अधिकाराचा उपयोग करून हा संहार होणार नाही असें केले तर त्या पुण्याचे आपण श्रेय घ्याल. त्याशिवाय आपण पांडवांना समजून वागलात म्हणून ते आपल्याला धन्यवाद देतील. आणि भविष्यात सर्व प्रकारचे सहकार्य देतील. त्यानंतर कौरव आणि पांडव एकत्र राहून प्रजेची सेवा करत राहू शकतील. म्हणून आत्ताच त्या बद्दलचा निर्णय घ्यावा अशी मी आपल्याला विनंती करत आहे, पांडवांच्या आणि माझ्यावतीने. त्यामुळें धर्म आणि हित असें दोनही साध्य होणार आहे. पांडवांसारखे मित्र मिळणे मोठे भाग्याचे असेल कारण ते फार शक्तीमान आहेत त्याशिवाय ते आपल्या भावांचे, पंडुचे पुत्र आहेत. तशा व्यवस्थेत आपले राज्य इतके सुखरूप असेल कीं साक्षात इंद्रसुद्धा आपल्यावर आक्रमण करण्याचे धाडस करणार नाही. पृथ्वीवरील राजांचा धोका होण्याचा प्रश्नच नसेल. जर भिष्म, द्रोण, कृप, कर्ण, विविंसती, अश्वत्थामा, विक्रांत, सोमदत्त, वल्हीक आणि जयद्रथ सिंधचा राजा, त्यांच्या बरोबर कलिंगचा राजा, सुदक्षिन, कंबोजचा राजा, त्यांच्या सह पांच पांडव, सत्यकी, युयुत्सू, असें योद्धे जेव्हां एकत्र असतील तेव्हां तशा राज्यावर कोणता शहाणा राजा आक्रमण करण्याचा विचार करील"? अहो सम्राट लक्षात घ्या कीं, जेव्हां तुम्ही अशा शूरांच्या बरोबर असाल तुमचे राज्य नेहमी अजिंक्य राहील. सगळे राजे तुम्हाला खंडणी देतील. ते जे प्रबळ आहेत तेसुद्धा तुमच्या अशा दोस्तीला हात देतील. तशा परिस्थितीत आपण आपल्या मुलाबाळांबरोबर नातवंडांबरोबर सुखाने राहू शकाल. तुमचे वृद्धपण आनंदात जाईल. तुम्ही खऱ्या अर्थाने अजिंक्य सम्राट म्हणून स्वतःला मिरवू शकाल. परंतु, जर तुम्ही माझे

मान्य केले नाही तर जे युद्ध होईल त्यात सगळे तुमचे पुत्र, नातवंडं मारली जातील. दोनही पक्षांचा नाश होणार आहे. त्यातून जो जिंकेल तो राज्य करील त्यात जर पांडव जिंकले तर ते तुमच्या राज्याचे सुद्धा मालक होतील. असें सांगावयाचे कारण अशा युद्धात कौरव जिंकण्याची शक्यता फार कमी आहे हे लक्षात घ्यावे. येथे जमलेले सगळे राजे मारले जातील, तुमची सगळी मुलं ठार होतील. विशेष दुःखाची बाब अशी होईल कीं ज्यांचा ह्या कौटूंबिक वादाशी कांहीं संबंध नाही असें असंख्य क्षत्रिय नाहक मारले जातील. पृथ्वीवरील सगळे उत्तम योद्धे नष्ट होतील, असंख्य बांगड्या फुटतील. असें विनाशाचे दृष्य असेल मग कोणीही जिंकला तरी हा नाश अटळ असेल. हा त्या निष्पाप योद्ध्यांचा दोष नसेल, त्या असंख्य बांगड्या फुटू नयेत आणि असंख्य मुलं अनाथ हऊ नयेत म्हणून आमचे राजे युधिष्ठीर माझ्या द्वारा हा प्रस्ताव मांडत आहेत. तो पूर्ण विचार करून मांडला जात आहे. एका मूर्ख माणसाच्या हट्टासाठी येथे जमलेले कित्येक राजे जे उत्तम कुळातील आहेत, त्यांचा आणखीन इतर जे येथे जमलले नाहीत त्यांचा नाश आपण थांबवू शकाल जर आपण माझे सांगणे मान्य करणार असाल तर. अहो हस्तिनापुराचे सम्राट, आपण ह्या बाबत बुद्धीनिष्ट निर्णय घ्यावा, कोणाच्या बहकाव्यात जाऊन घेऊ नये अशी मी आपल्याला विनंती करत आहे. आपल्या निर्णयावर अवलंबून आहे कीं, हे राजे एकत्र सुखाने नांदणार कीं, एकमेकांचे मुडदे पाडणार. म्हणून तुमचा निर्णय महत्वाचा असेल. त्या दोन चुलत भावांत वितुष्ट कायम रहावे कां ते एकत्र राहून सुखाने नांदावेत ते आपला निर्णय ठरवणार आहे. आपल्या हृदयात आपल्या भावाच्या मुलांबद्दल कांहीं प्रेम आहे कां, ते ठरवणार आहे आपला निर्णय कोणता असेल. आपले पुतणे त्यांच्या बालपणीच त्यांचा पिता घालवून बसले व ते आपल्यात त्यांचा पिता पहात आहेत. त्यामुळेंच युधिष्ठीर आपल्या आग्रहामुळे तो द्युत खेळला व सगळे बिनसले हे आपण जाणताच. जर आपण त्याला द्युत खेळण्याचा आग्रह न करते तर ही वेळच आली नसती. अयोग्य निर्णय घेऊन आपले पुण्य आपण कमी कराल त्याशिवाय हिताचा सुद्धा नाश होणार हे सगळे आपण योग्य निर्णय घेऊन टाळू शकता. युधिष्ठीर सांगतो आहे तुम्हाला कीं, तुम्ही एकदा त्यांचा विश्वासघात केला तसा ह्यावेळी जर पुन्हा तुम्ही करणार असाल तर ते पांडव, पंडुचे पांच पुत्र, तुम्हाला काका मानणार नाहीत व शत्रू समजून तुमच्या मुलांचा संहार करतील. त्या परिस्थितीत जे घडेल त्याची जबाबदारी तुमची असेल. तुम्ही त्याना विचारणार नाही कीं, तुमच्या मुलांचा नाश त्यांनी कां केला म्हणून? बरेच हाल पंडुच्या मुलांनी भोगले आहेत केवळ तुमच्यावर विश्वास ठेवला म्हणून परंतु, ह्यापुढे तसे होणार नाही. दिलेल्या सगळया अटींचे पालन त्यांनी केले आहे तरी जर तुम्ही उलटणार असाल तर त्याची किंमत तुम्हाला द्यावी लागेल. येथे एक गोष्ट स्पष्ट आहे कीं, पांडवांच्या मनात कधीही तुमच्या बद्दल अथवा तुमच्या मुलांबद्दल द्वेष आजही नाही कारण ते क्रोध, मोह व लोभांपासून मुक्त आहेत परंतु, त्यांची न्यायदेवतेशी जी बांधिलकी आहे

ती ते ह्या ठिकाणी अंमलात आणणार आहेत. एका राजाचे काम युधिष्ठीर पूर्ण करणार आहे. एका चोराला व त्याला साथ देणाऱ्यांना ते पांडव आणि त्यांचे दोस्त राजे जालिम सजा देण्याच्या तयारीत आहेत. रिवाजानुसार शिक्षा करण्या आधी एक संधी चोराला द्यावयाची असते त्याप्रमाणे त्यांच्या वतीने मी सांगत आहे कीं, दिलेल्या आश्वासनाचे पालन करावे नाहीतर शिक्षा भोगण्यास तयार व्हावे. अहो सम्राट, आपण नितीशास्त्र चांगलेच जाणता, म्हणून जास्त सांगावयाची गरज वाटत नाही. अजून आपण आमचा विश्वास जिंकू शकता जर दिलेला शब्द आपण पाळला तर. ही त्या चोरांना शेवटची संधी आहे असें समजावे व त्वरित निर्णय घ्यावा. नाहीतर परिणामांना भोगण्यास आपल्या दोघांना तयार असावे लागेल".

त्यानंतर द्रोणाचार्यांकडे व त्यांच्याच बाजूला बसलेल्या कृपाचार्यांकडे पहात कृष्ण बोलतो, "गुरूने गुरू सारखे वागले पाहिजे व शिक्षकांनी शिक्षकांसारखे वागले पाहिजे त्यांच्या शिष्यांशी, असा साधारण नियम आहे. जर विद्यार्थी कांहीं चूक करत असेल तर त्याला समज देणे हे त्यांचे कर्तव्य होते पण ते झालेले नाही. त्यांच्या चुकांत जर गुरू आणि शिक्षक साथ देत असेल तर तेसुद्धा शिक्षेस पात्र ठरतात न्यायाच्या नियमाप्रमाणे हे सगळे येथे जमलेले राजे जाणतात. शिष्यांना चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया हे नियम त्यांने शिकवावयाचे असतात. दुर्दैव आहे कीं, ते कौरवांच्या गुरूने आणि शिक्षकाने केलेले दिसत नाही. ह्या राजांच्या सम्मेलनात जे बसलेले आहेत त्यांना हे सगळे माहीत आहे. राजा न्यायदेवता असला पाहिजे परंतु, जर राजाच चोर असेल तर त्याला कोणी शासन करावयाचे? जे राजे अशा चोरटेगिरीला उत्तेजन देतात ते सुद्धा गुन्हेगारच ठरतात हे उघड आहे. अशा राजांना व तशा गुरू आणि शिक्षकांनासुद्धा शिक्षा करावी लागेल हे उघड आहे. प्राचीन काळापासूनचा जो इतिहास आहे तो तेंच सांगतो कीं, ब्रह्मा शेवटी तशा अनैतिक कृत्य करणाऱ्यांना व त्यांना मदत करणाऱ्यांना यथावकाश नष्ट करत असतो जर ते व्हावे असेच तुम्हाला वाटत असेल तर माझे बोलणे येथे व्यर्थ ठरेल. जो राजा स्वतः गुन्हेगार आहे त्याला राज्य करण्याचा अधिकार नसतो म्हणून अशा सत्ताधाऱ्याचा विनाश करावा लागतो न्याय प्रस्थापित करण्यासाठी असें विधान आहे. आपण लक्षात घ्यावे कीं, पांडव सातत्याने चांगुलपणा, माणूसकी, भूतदया आणि न्याय ह्या तत्त्वाने वागत आहेत. त्यामुळे त्यांना पंडुचे वारस म्हणून न्याय देवतेचे कार्य करावे लागणार आहे. पण एक सुधार करण्याची संधी देऊन तुम्हाला त्या अरिष्ठातून बाहेर येण्याची सवलत मिळत आहे त्याचा फायदा करून घ्याल अशी मी अपेक्षा करत आहे".

"जर माझे म्हणणे आपल्याला योग्य वाटत असेल तर माझा प्रस्ताव मान्य कराल व अनेक जीवांचे जीव अनेक संसार अनेक लहान मुलांचे पिता आपण वाचवू शकाल. नाहीतर जे होईल

त्याची जबाबदारी तुमची असेल ह्यात कोण जिंकतो हे महत्वाचे नाही, कारण तो विषयच नाही. येथे मुद्दा आहे नाहक निरपराध क्षत्रियांच्या जीवनाचा कारण, ज्यांने पांडवांच्या पत्नीचा अपमान केला आहे त्यांचा नाश पांडव करणार आहेतच त्या करतां त्यांचा नाश होणारच आहे जरी राज्याच्या वाटणीचा प्रश्न सलोख्याने सुटला तरी, हे मी येथे नमुद करत आहे. द्रौपदीचा अपमान हा वेगळा विषय आहे त्यासाठी पांडव त्या त्या योद्ध्याशी द्वंद्व करण्याचे सांगत आहेत व त्यात कोणी एक मरणार आहे पण तो संपूर्ण वेगळा मुद्दा आहे मी त्यासाठी बोलण्यास आलेलो नाही. त्यामध्ये इतर राजांना गुंतवणे पांडवांना व मलासुद्धा मान्य नाही. युधिष्ठीर आणि भिम ह्यांना नष्ट करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांच्या सगळया प्रयत्ना नंतरसुद्धा ते जीवंत आहेत व आता तुमच्या पुढे आले आहेत. पांडवांना शून्यातून राज्य उभे करण्याची कला माहीत आहे, त्यामुळें तुमच्या नाकाराने खजिल होणाऱ्यातील ते नाहीत. किती राजांना द्रौपदीचा, राजा पांचालाच्या कन्येचा झालेला अपमान मान्य आहे ते सांगावे. मला माहीत आहे कीं, कोणाही कुलिन क्षत्रियाला ते मान्य होणार नाही. जे कुळहीन आहेत ते कदाचित ते मान्य करतील". असें बोलतांना कृष्ण कर्णाकडे पहात होता.

"असंख्य क्षत्रियांचे जीव वाचवावयाचे कां नाही ह्याचा निर्णय आपल्यावर मी सोडत आहे. आपण राजाचे कर्तव्य जाणता म्हणून त्याप्रमाणे आपण आपल्या मुलाला स्वतः शासन करणार अहात कां, युधिष्ठीराला ते काम सांगणार अहात ते ठरवा. जर युधिष्ठीरावर ती जबाबदारी आपण सोपवत असाल तर त्यांचे चार बंधू ते काम बेलाशकपणे पार पाडतील".

वैशंपायन पुढे सांगतात, तेथे उपस्थित असलेल्या सगळया राजांनी कृष्णाच्या भाषणाला मोठ्याने टाळया वाजवून दाद दिली. कांहीं उठून उभे राहून त्याला दाद देतात. सभागृहात प्रचंड गदारोळ झाला व ते राजे एकमेकांत कृष्णाच्या भाषणाची तारिफ करत गप्पा मारू लागतात. सगळयांना कृष्णाचे मुद्दे एकदम पसंत होते. परंतु, स्पष्टपणे ते दुर्योधनापुढे दाखवत नव्हते कारण ते त्याचे मिंधे झालेले होते.

भगवत यान पर्व भाग पंच्यांण्णवावा संपला.

# भगवत यान पर्व

## भाग श्यांण्णवावा

वैशंपायन पुढे सांगतात, कृष्णाच्या भाषणावर प्रथम दाद देणारे राजे दुर्योधनाला घाबरून नंतर गप्प बसतात व त्या सभागृहात शांतता पसरते. त्या सभेत कृष्णाच्या भाषणाला उत्तर देणारा कोणी पुढे येत नव्हता. थोड्या वेळांनी जमदाग्नीचा पुत्र दुर्योधनाकडे पहात बोलतो, "अरे दुर्योधना, ऐक मी काय सांगतो ते, प्राचीन काळी होऊन गेलेली एक कथा मी तुला सांगत आहे, त्यातून तुला जर बोध झाला तर तुझे, तुझ्या दोस्तांचे आणि त्यांच्या सैनिकांचे जीव वाचतील. ही कथा सर्व राजांनी सुद्धा ऐकावी", असे तो बोलतो. पुढे तो सांगू लागतो, "एक बलवान राजा फार पूर्वी होऊन गेला होता त्यांचे नांव होते, दंभोद्भव. तो सगळया पृथ्वीचा राजा होता. त्याला त्याच्या सामर्थ्याचा गर्व होता. दंभोद्भव दररोज ब्राह्मणांना, क्षत्रियांना, वैश्याना आणि शूद्रांचा आव्हान देत असे कीं, त्यांनी त्याला द्वंद्वात हरवून दाखवावे. परंतु, त्याचे आव्हान कोणीही स्वीकारत नसें कारण त्याला हरवणे केवळ अशक्यप्राय होते. तो तसे विचारत सगळी पृथ्वी फिरत होता. परंतु, त्याचे आव्हान उचलण्याची क्षमता असलेला कोणीही त्याला भेटत नव्हता. त्यामुळें त्याचा गर्व दिवसेंदिवस वाढत होता. त्या अहंकाराने तो फुगलेला होता. असेंच एके दिवशी एका ब्राह्मणाला त्याने तसे आव्हान दिले तेव्हां तो ब्राह्मण चिडून त्याला सांगतो कीं, त्याने गंधमादन पर्वतावर जाऊन तेथे तप करत बसलेल्या त्या दोन ऋषींना आव्हान द्यावे त्याची नांवे नर आणि नारायण अशी आहेत. ते दोनही ऋषी मानव वंशातील आहेत. ते त्याचे आव्हान घेऊ शकतील. राजा त्याच्या सल्लागारांचे मत घेऊन मग त्या उंच पहाडाकडे निघाला, ज्याचे नांव गंधमादन असें होते. तो ब्राह्मण त्याला सांगतो, ते दोघे सध्या घोर तपश्चर्या करत आहेत. तेथे गंधमादन पर्वतावर जाऊन त्यांना तुझा मानस सांग, मग ते काय ते करतील तुझ्याशी. ते ऐकून दंभोद्भव राजा त्या पर्वताकडे निघतो. त्याचे मोठे सैन्य घेऊन तो मोठ्या तयारीने तेथे जातो. त्याच्या सैन्यात सहा प्रकारचे दल होते, त्यात रथदल, हत्तीदल, पायदल, रनगाड्यांचे दल, उंटदल अशी त्या सहा फौजा होत्या. राजाला झाले होते तो कधी एकदाचा त्या दोन सन्याशांना भेटतो व आव्हान देतो. त्या करता तो त्या अजस्त्र पर्वतावर चढू लागतो. त्या ऋषींना शोधू लागतो. शोधत शोधत तो त्या घनदाट अरण्यात येतो जेथे ते दोघे ऋषी तप करत होते. तो राजा त्यांना भेटतो व त्याचे आव्हान त्यांना सांगतो. नर आणि नारायण त्याचे स्वागत करतात फळं आणि कंदमुळं देऊन. ते त्याला बोलतात, "गंधमादन पर्वत स्वर्गाच्या सीमेवर आहे. त्यापुढे स्वर्ग

सुरू होतो व येथे कोणी युद्ध करत नाही कारण येथे वाद, तंटा, बखेडा असें कांहीं होत नाही ज्याकरता लढावे लागेल. येथे फक्त शांतता नांदत असते". राजा त्याच्या दर्पोक्तीत सांगतो त्यांने सगळी पृथ्वी पादाक्रांत केली आहे आणि आता तो त्या दोघांना हरवून अजिंक्य पद मिळवणार आहे. तो पुढे सांगतो त्याने त्याचे सगळे शत्रू मारले आहेत. तो सांगतो, त्याला समजले आहे कीं, ते दोघे कोणाच्यानेही पराजित होत नाहीत व म्हणून तो त्यांना पराजित करण्यासाठी आला आहे. ते ऐकल्यावर नर आणि नारायण त्याला बोलतात, "अरे राजेश्वरा, क्रोध आणि मोह ह्या विकृत्यांना ह्या पहाडावर कांही काम नसते. त्यामुळें युद्धाची ती कारणे ह्या ठिकाणी नसतात. म्हणून येथे युद्धाच्या गोष्टी सुद्धा करावयाच्या नसतात. मग अशा परिस्थितीत आम्ही तुझ्याशी का लढू ते सांग. विनाकारण लढणे मूर्खपणाचे ठरेल. आम्हाला तुझ्या बद्दल अनुकंपा आहे, अशा परिस्थितीत आम्ही तुझ्याशी लढणे पोरकटपणाचे ठरेल. तू दुसऱ्या कोणाशी तरी जाऊन युद्ध कर, आमचा वेळ घेऊ नकोस. पृथ्वीवर बरेच क्षत्रिय तुला लढण्यासाठी मिळतील". परशुराम पुढे सांगतो, असे चांगल्या पणाने सांगूनही तो जायला तयार नव्हता. त्याचा आग्रह कीं ते त्याच्याशी लढावेत. ते ऋषी त्याच्याकडे दुर्लक्ष करूनही, त्याचा पोरकट हट्ट चालूच होता. त्यानंतर तो त्या ऋषींना युद्धासाठी हुसकवू लागला. अखेरीस जसे ते समजले कीं, हा असें मानणार नाही त्यातील नर त्याला त्याच्या हातातील कुस गवताचे पाते दाखवतो व बोलतो, "चल आपण द्वंद्व करू. तू तुझी आयुध सज्ज कर. तुझे सगळे सैन्य लढण्यासाठी तयार ठेव. मी तुझी लढण्याची हौस पूर्ण करतो".

दंभोद्भव त्यावर बोलतो, त्या गवताच्या कुसांना पाहून, "काय तुम्ही ह्या गवतांनी माझ्याशी लढणार? अहो सन्याशी, तुम्हाला काय मस्करी वाटते, किं, तुम्ही ह्या गवतांनी माझ्या सैन्याला हरवणार"? तरी मी तुमच्याशी माझ्या आयुधांनी लढणार आहे कारण हे आव्हान आहे व त्यात मी तुम्हाला पराजित करून दाखवतो". त्यानंतर तो बाणांचा वर्षाव त्या ऋषींवर सुरू करतो. ते सर्व बाण त्या पात्याच्या नुसत्या हलण्याने वेडेवाकडे फेकले जातात. त्यातील एकही बाण त्या ऋषींना लागत नाही. राजाचे सगळे योद्धे त्यांचे वेगवेगळे बाण त्या ऋषींवर फेकतात पण कांहीं उपयोग होत नाही. ते बाण उलट त्या सैनिकांवरच जाऊन त्यांना लागून ते सैनिक घायाळ होतात. ते अजिंक्य ऋषी, त्या राजाच्यावर ती कुसाची पाती फेकून मारतात त्यात मायावी तंत्राचा वापर ते करत असतात. त्यामुळें तो राजा आणि त्याचे सगळे सैनिक जखमी होऊन जमिनीवर पडतात. राजा पहातो कीं सगळे नभ त्या पात्यांनी व्यापलेले होते. दंभोद्भव राजाची खोड मोडते व तो त्या ऋषींना शरण जातो. राजा त्या ऋषींना बोलतो, "मला क्षमा करा. मला तुम्ही संरक्षण द्या". नर त्याला सांगतो, "अरे राजा, जा त्या ब्रह्मणांना शरण जा ज्यांना

तू लढण्यासाठी सारखा सतावत असतोस. हा वेडगळपणा पुन्हा करू नकोस. क्षत्रियांनी त्यांच्या शौर्याचा खेळ करावयाचा नसतो. त्याचे शौर्य केवळ वाईट शक्तींना काबूत आणण्यासाठी असते असें विनाकारण लढण्याची आव्हानं देण्यासाठी नसते. तुझ्या डोक्यातून हे सतत लढण्याचे खूळ काढून टाक. कोणा ब्राह्मणांचा अपमान करू नकोस कारण तो तुझ्याशी लढू शकत नाही. तुझा हा गर्व तू सोडून दे. खरे शौर्य आहे ते पाश जिंकण्यात ज्यामुळें माणूस क्रोध, लोभ, मोह अशा वासनांत अडकतो. कारण अरे राजा ते आपले खरे शत्रू आहेत, त्यांच्यामुळे तुला सगळीकडे माणसांत शत्रू दिसतात. माणूसकी, दयाबुद्धी, क्षमाशिलता असें गुण तू वाढव त्याने तू जग जिंकून दाखव ते खरे शौर्य होईल. आता जा आणि अशारितीने उगाचच कोणाला आव्हान देत बसू नकोस. त्यानंतर तो राजा आपले लढण्याचे खूळ सोडतो व चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया, क्षमाशिलता ह्यात आपले लक्ष ठेवून राज्य करू लागतो. ते एक मोठे कार्य नर आणि नारायणांनी त्या काळी केले होते. त्यातील नारायण नरापेक्षा जास्त मोठा झाला त्याच्या तपस्येने. म्हणून आयुध जशी, काकुदीक, शुक, नक, अक्षीसंतर्जन, संतन, नर्तन, घोर, अस्यमोदक, त्या गांडीवावर ठेवली असतील तर तू त्या धनंजयाला कधी हरवू शकशील कां? तुझा गर्व तो सहज हरण करून तुझा नाश करू शकतो हे तुझ्या लक्षात केव्हां येणार. अरे आता ज्या नर आणि नारायणांबद्दल बोलत होतो तेंच आता आपल्यात अर्जुन आणि कृष्ण असा रुपाने आलेले आहेत. पापाचा नाश करण्यासाठी. अरे दुर्योधना, खरे युद्ध माणसा माणसातील नसते, ते माणसातील दोषांशी असते ते प्रथम समजून घे. लोभ, मोह, गर्व, उद्धटपणा, द्वेष, स्वार्थ, फुशारकी असें दोष राजांत असतात ते त्याचे खरे शत्रू असतात हे समजून घे. त्यांच्या आहारी गेलेले त्याचा विवेक हरवून बसतो. लक्षात ठेव कीं, जेथे नर आहे तेथे नारायण असणारच. ते वेगळे करता येत नाहीत. त्याच्या रथावरील वानर चिन्ह असलेला ध्वज त्याला मायावी शक्ती प्रदान करत असतो. त्यांना कोणीही हरवू शकत नाही. उगाचच कोणी फुशारकी मारत असेल तर त्याच्या त्या फुशारकीवर तू विश्वास ठेवू नकोस. तो धनंजय कुंतीचा पुत्र ज्याला तू चांगलाच ओळखतोस. अरे राजा, जर तू माझ्या बोलण्यावर विश्वास ठेवणार असलास तर तू त्यांच्याशी युद्ध न करणेच कौरवांच्या भल्याचे आहे हे समजून घे. पंडुच्या मुलांशी समझौता कर व हे भांडण येथेच संपवून टाक त्यामुळें तू व तुझे भाऊ भविष्यात सुखाने राहू शकाल. युद्धाचा पर्याय तुमचा नाश करील. प्रतिष्ठेचा प्रश्न करून तू तुझे व तुझ्या घराचे कायम नुकसान करणार आहेस. देव तुला चांगली बुद्धी देवो व तुझे भले हो.

भगवत यान पर्व भाग श्यांण्णवावा संपला.

# भगवत यान पर्व

## भाग सत्त्याण्णवावा

वैशंपायन पुढे सांगतात, जमदाग्न्याचे ते कथन ऐकून तेथे बसलेले ऋषी कण्व दुर्योधनाला सांगतात, ब्रह्मदेव नश्वर आहेत आणि चिरंतनसुद्धा आहेत. ते ऋषी नर आणि नारायण ते सुद्धा तसेंच आहेत. आदितीच्या सगळया मुलांत एक विष्णू अनंत आहे. तो अजिंक्य आणि नित्य चिरंजीव आहे. तो सगळयांचा विधाता आहे. त्यात दैवी गुण आहेत. बाकी सगळे म्हणजे चंद्र, सूर्य, पृथ्वी, पाणी, वारा, अग्नी, आकाश, ग्रह, तारे हे सगळे नष्ट होणारे व पुन्हा उत्पन्न होणारे असे आहेत त्यांचे आयुष्य त्या युगा एवढे असते. जेव्हां युगांत येतो तेव्हा ते ब्रह्मात विरून जातात. आणि नव्या युगात ते पुन्हा उत्पन्न होतात. त्यांच्या आयुष्यमानाच्या तुलनेने चराचराचे आयुष्यमान फारच कमी असते. त्याला राजे अपवाद नाहीत. तेसुद्धा त्यांच्या कर्मविपाकानुसार त्यांचे आयुष्य संपल्यावर पुन्हा यथावकाश जन्म घेऊन येतात. त्या क्षणभंगूर जीवनात प्रतिष्ठेचा प्रश्न करणे केवळ मूर्खपणाचे ठरते. म्हणून तू पांडवांशी सलोखा करून जे आयुष्य दिलेले आहे ब्रह्माने त्याचा चांगल्या प्रकारे उपभोग घेण्यातच शहाणपणा आहे. कोणी असें समजू नये कीं तोंच बलवान, तोंच सर्वशक्तीमान, परंतु, तुझे भाऊ सुद्धा बलवान आणि शक्तीमान आहेत, ते कांही कमी नाहीत. ह्या संदर्भात मला एक कथा आठवते ती सांगतो, मतालीची ती कथा आहे. तो त्याच्या उपवर मुलीसाठी नवरा शोधण्यासाठी निघतो. मताली इंद्राचा सारथी होता. तिनही जगात तो जाऊ शके. मतालीला एक कन्यारत्न होते ती जगातील सर्वात सुदर मुलगी होती. तिचे नांव होते गुनकेशी. अशा लावण्यवतीसाठी योग्य नवरा शोधण्यासाठी तो निघतो. त्याला व त्याच्या बायकोला गुनकेशीची फार काळजी वाटत होती जशी सगळया मातापित्यांना त्यांच्या उपवर मुलींसाठी वाटते. त्याला वाटत असें कीं, उच्च कुळातील सुस्वरुप मुलींच्या लग्नात कांही न कांहीं विघ्न येणार. मुलीचा जन्म तिच्या भोवतीच्या तिन घरांना काळजीत टाकत असतो. तिच्या आजोळचे, तिच्या बापाचे आणि ज्या घरात ती दिली जाते त्या घराचे लोक काळजी करत असतात तिच्यासाठी. पुढे मताली विचार करतो कीं, त्याच्या अंदाजा प्रमाणे त्याने देव आणि माणसे पाहिली परंतु, तिच्या तोडीचा मुलगा त्याला दिसला नाही.

कण्व पुढे सांगतात, त्यांने देवांत दैत्य आणि गंधर्व पाहिले होते पण तिच्या योग्यतेच मुलगा त्याला दिसला नव्हता. त्यानंतर ऋषी त्यांने पाहिले पण त्यात सुद्धा कोणी त्याला आवडला नव्हता. एके रात्री तो त्याच्या बायकोशी, सुधर्माशी बोलत होता त्या लग्नाबद्दल, त्यानंतर मताली ठरवतो कीं तो पाताळात जाऊन कोणी तिच्या योग्यतेचा मिळतो कां ते पहावयाचे. त्याला वाटते तेथे असलेले नाग लोकात एकादा चांगला मुलगा मिळू शकेल. तो विचार आल्यावर मताली त्याच्या बायकोची परवानगी घेऊन व मुलीच्या माथ्याचे चुंबन घेऊन पाताळात जाण्याची तयारी करतो.

भगवत यान पर्व भाग सत्त्याण्णवावा संपला.

# भगवत यान पर्व

## भाग अठ्ठ्याण्णवावा

कण्व पुढे सांगत असतात, मताली त्याच्या मार्गाने जात असतांना त्याला वाटेत नारदमुनी भेटतात. ते वरुण देवाला भेटण्यासाठी निघाले होते. नारदमुनीसुद्धा त्याला पहातात. ते मतालीला विचारतात, "तू कोठे निघाला आहेस? तुझ्या खाजगी कामासाठी जात आहेस कां इंद्राच्या कामासाठी जात आहेस"? मताली सांगतो कीं, तो त्याच्या खाजगी कामासाठी जात आहे. ते एकत्र प्रवास करू लागतात त्या सुमारास मताली त्याची काळजी मुलीच्या लग्नाची असल्याचे नारदमुनींना सांगतो. नारदमुनींना त्याची काळजी कसली आहे ते समजते. ते त्याला बोलतात, "चल आपण एकदमच जाऊ या". नारदमुनी त्याला सांगतात कीं, ते सुद्धा पाताळात वरुणदेवाला भेटण्यास जात आहेत तेव्हां तेथे ते सुद्धा मदत करतील योग्य नवरा शोधण्याच्या कामात. पुढे ते त्याला सांगतात कीं, जर त्यांना कोणी चांगले स्थळ दिसले तर ते मतालीला सांगतील. पाताळाच्या अगदी आतल्या भागात ते फिरत असतात. तेथे ते पाण्याचा सम्राट वरूणदेव पहातात. तेथे वरूणदेव नारदाची पुजा करतो जशी स्वर्गीय ऋषींचा होते. त्याच प्रमाणे मतालीला त्याचा मान मिळतो जो इंद्राच्या सारथ्याला मिळाला पाहिजे. त्यानंतर ते दोघे चतुर बुद्धीचे वेळ साधून वरूणदेवाला मतालीची चिंता काय आहे ते सांगतात. त्यानंतर त्याची रजा घेऊन ते दोघे निघतात वर संशोधनासाठी. ते नागांच्या प्रदेशात जातात. नारदांना त्या भागाची चांगली माहीती होती. ते मतालीला त्याबद्दलची माहीती सांगत असतात. नारद मतालीला म्हणतात, "अरे मताली तू वरूणाच्या भोवती असलेले त्याच्या परिवारातील तरूण पाहिलेस कां? त्यातील कोणी तुला आवडले कां"? वरूणाची मुलं फार गुणी आहेत. त्यांचे सामर्थ्य वाखाणण्यासारखे आहे. त्याचा एक मुलगा ज्याचे नांव पुष्कर आहे व डोळे कमळासारखे आहेत तो फारच चांगला आहे. त्याचा स्वभावसुद्धा आकर्षक आहे. तो फार पवित्र आहे. तो वरूणाचा सर्वात प्रिय मुलगा आहे. त्याला सोमाच्या मुलीने पसंत केले होते. ती सोमाची मुलगी साक्षात श्री सारखी रुपवान आहे. तिचे नांव आहे ज्योत्स्नाकली. असें सांगतात कीं, तिने पहिल्या प्रथम आदितीच्या मोठ्या मुलाला निवडले होते. त्याचे सगळे शरीर सोन्याचे आहे. त्यात वारुणी भरलेली आहे. ती वारुणी प्याल्यानंतर देवांना देवत्व प्राप्त झाले. त्याच्या कडे जी चमकणारी आयुध दिसत आहेत ती

दैत्यांची आहेत ज्यांने ते कोणाचाही वध करू शकतात. त्यांच्या प्रभावामुळें शत्रू कमकुवत होतो. ती फेकली कां त्यांचे काम केल्यावर पुनः फेकणाऱ्या कडे परत जातात. म्हणून त्यांचा वापर पुन्हा पुन्हा करता येतो. ती कधीही नष्ट होत नाहीत. दैत्यांना हरवल्यावर ती शस्त्र देवांना मिळाली. परंतु, ती वापरण्यासाठी मोठी मानसिक उर्जा असावी लागते कारण ती वापरणाऱ्याच्या मनाच्या उर्जेने कार्यरत होतात. ज्याच्याकडे ती मनःशक्ती नाही तो ती शस्त्र वापरू शकत नाही. मानसिक उर्जा कमावण्यासाठी तपोश्चरण करावे लागते. वासनांबद्दल औदासिन्य असावे लागते. एकचित्त करून साधना करण्याने ती मनाची उर्जा प्राप्त होत असते. प्राचीन काळी असंख्य राक्षस आणि दैत्य ती वापर होते. परंतु, त्यांच्यापेक्षा जास्त प्रभावी अस्त्रांचा उपयोग करून शेवटी देवांनी त्यांचा पराभव केला व त्यांना येथे पाताळात पाठवले. तेथे पहा पाण्यात तेजस्वी अग्नी तेवत आहे. तेथेच विष्णूचे सुदर्शन चक्र ठेवलेले आहे. त्याचे तेज पहा मताली. हो फक्त पाताळात पहावयास मिळते. त्यापलिकडे ते गाठी असलेले धनुष्य आहे, तेंच गांडीव ज्याने इंद्र असुरांचा पराभव करत असतो. ते सगळे येथे पाताळात ठेवलेले आहेत. अर्जुन हेंच गांडीव वापरत असतो. ह्या एका धनुष्याच हजारो धनुष्यांची व त्यातून सुटणाऱ्या बाणांची ताकद आहे. युद्धाच्या वेळी त्यात मोठी उर्जा उत्पन्न होते व बाण वेगांने फेकले जातात. त्याची तुलना इतर कोठल्याही तिरकमट्याशी होणार नाही. सगळ्या विकृत मनस्थिती असलेल्या राक्षसी राजांचा नाश करण्यासाठी ब्रह्मणांनी गांडीवाची निर्मिती केली आहे, जे वेदाचा घोष करत असतात. राक्षसांचा शिक्षक शुक्र असां सांगतो कीं, हे गांडीव एक भयंकर शस्त्र आहे ज्यापासून राक्षसांनी सावध रहावे कारण जर त्याच्या बाणांने राक्षस मेला तर त्याला पुन्हा जागे करणे शक्य नसते. ही सगळी अस्त्रं, शस्त्रं वरूणांकडे सुरक्षिततेसाठी जमा केलेली असतात. नारद सांगत होते. पुढे ते जातात तेव्हां नारद त्याला एक छत्रीघर दाखवतात. त्यात अनेक छत्र्या असतात. त्यात एक वरुणाची असते. ती पवित्र आहे चंद्रासारखी परंतु, तिच्या भोवती अज्ञानरुपी अंधार पसरलेला असतो म्हणून ती छत्री सहसा कोणाला दिसत नाही. तिच्यातून ढगाप्रमाणे पवित्र जलाचा पाऊस पडत असतो. ह्या भागात अनेक अजब गोष्टी आहेत पहाण्यासारख्या, असें नारद मतालीला सांगतात. परंतु तू येथे जास्तकाळ राहू नकोस कारण त्याचे तेज तुला फारकाळ सहन करता येणार नाही. म्हणून आपण येथून बाहेर जाऊ.

भगवत यान पर्व भाग अठ्ठ्याण्णवावा संपला.

# भगवत यान पर्व

## भाग नव्याण्णवावा

नारद पुढे सांगत असतात, येथे नाग प्रदेशाच्या मध्यभागी एक नगरी आहे तिला पाताल असें नांव आहे व त्यावरूनच पाण्याखालील सगळया भागाला पाताळ असें नांव मिळाले आहे. येथे दितीची आणि दानुची मुलं रहातात. ते दैत्य आणि दानव आणि इतर लहानमोठे प्राणी येथे रहातात. जे पृथ्वीवर येथून जात असतात. पाण्याच्या जोरामुळें ते होत असते. त्यावेळी ते प्राणी जोरांने किंचाळतात घाबरून जातात. येथेच असुरांचा अग्नी ज्याला बदव असंसुद्धा म्हणतात ठेवलेला आहे. तो पाण्याने चेतवला जातो. देवांच्या मर्जीने त्याचे नियंत्रण होत असते. तो तेथेच असतो कोठे पसरू शकत नाही. ह्याच जागी असुरांचा पराभव केल्यानंतर देवांनी अमृताची चव घेतली होती. उरलेले अमृत त्यानंतर ठेवून दिले होते भविष्यात वापरण्यासाठी. येथून चंद्राच्या कला चांगल्या पहाता येतात. येथे अदितीचा मुलगा विष्णू, घोड्याचे मुख घेऊन पवित्र प्रसंगी बाहेर येत असतो. त्याला सुवर्ण असे म्हणतात. वेदांतील ऋचा आणि मंत्र तो मोठ्याने बोलत बाहेर येतो. कारण चंद्र आणि इतर जल प्रवृत्ती त्यांचे जल येथे सोडतात ह्या भागाला पाताळ असें नांव पडलेले आहे. येथूनच इंद्राचा ऐरावत बाहेर येतो. तो त्याच्या सोंडीने ते थंड पाणी घेऊन ढगांत सोडतो व मग ती ढग ते पाणी पृथ्वीवर आणून टाकत असतात. विविध जलचर येथूनच निर्माण होतात. ते चंद्राच्या प्रकाशात वाढतात परंतु, सूर्याच्या प्रकाशात मरतात. दिवसा मरतात व रात्री पुन्हा जीवंत होतात. असें अव्याहतपणे चालू असते. ते असुर आहेत. त्यांचे वैभव इंद्राने काढून घेतले आहे, कारण ते पापकर्मात मग्न रहातात. येथेच सर्व प्राण्याचा देव, महादेव मोठी तपस्या करत होता अनेक वर्षे. म्हणून तो भूतनाथ झाला. सगळे प्राणी त्याच्या तपस्येच्या उर्जेवर अवलंबून असतात. मोठे मोठे तपस्वी येथेच तपस्या करत असतात. येथून वेदाचा अभ्यास सुरु होतो. प्राणायाम, सोहं जप ते करत असतात. ते कांहीं खाऊन जगत असतात. सोहं करणारे झगा घालून व्रतस्थ जीवन येथे जगत असतात. येथेच सुप्रतिक वंशातील इतर हत्ती उत्पन्न झाले झसें, ऐरावत, वमन, कुमुद, अंजन. त्यातील ऐरावत त्यांचा राजा आहे. एवढे सांगितल्यावर नारद मतालीला बोलतात, "अरे मताली पहा ह्यात तुला तुझ्या पसंतीचा कोणी उपवर मिळतो कां तुझ्या मुलीसाठी? जर कोणी पसंत असेल तर मी तुझ्यावतीने तेथे बोलणे करीन तुझ्या मुलीसाठी"? पुढे

नारद सांगत असतो मतालीला, "पहा तेथे पाण्यात एक अंड आहे. त्याचे तेज पहाण्यासारखे आहे. ह्या विश्वाचा प्रारंभ ह्यातून होतो. ते हलत नाही किंवा फुटतसुद्धा नाही. मला कोणी सांगितलेले नाही अजून पर्यंत केव्हां हे उपजले अथवा केव्हां हे नष्ट होणार आहे. हे अंडे नित्य आहे जसें मार्कंडेय ऋषी आहेत. असें म्हणतात, मताली कांहीं सांगतात की, जेव्हां युग संपेल तेव्हां ह्या अंड्यातून अग्नी निघेल व त्यात सगळे विश्व मिळून जाईल".

नारदाचे बोलणे ऐकत तो मुलीच्या बाप मताली नारदाला सांगतो, त्याला ह्यांपैकीं कोणीही पसंत नाही. तो सांगतो कीं, आपण लवकर येथून निघून दुसरीकडे पाहू.

भगवत यान पर्व भाग नव्याण्णवावा संपला.

# भगवत यान पर्व

## भाग शंभरावा

नारद त्याला सांगत असतात, येथे ती नावाजलेली नगरी आहे. तिचे नांव आहे हिरण्यपूर. ते दानव आणि दैत्यांचे शहर आहे. त्यांच्याकडे दृष्टीभ्रम करण्याच्या अनेक क्लुस्त्या आहेत. ह्या भागाला पाताळ असे म्हणतात. त्याची रचना दैवि सामर्थ्य असलेल्या कारागिरांनी (त्वश्तृंनी) केली आहे. त्याचा मुख्य शिल्पकार आहे दानव माया. दानव फार शूरवीर असतात. ब्रह्माला प्रसंन्न करून घेऊन ते विविध सिद्धी हस्तगत करून देवांना पराजित करण्याचा सतत प्रयत्न करत असतात. इंद्राच्या बरोबरीने असलेले देव जसें यम, वरुण, कुबेर ह्यांना सुद्धा ते भारी जातात. ते येथे रहातात. अरे मताली, त्या असुरांना कालखंन्य म्हणतात व ते विष्णूच्या मधून उत्पन्न झाले आहेत त्याशिवाय दुसरे राक्षस आहेत त्यांना युतूधन म्हणतात व ते ब्रह्माच्या पायापासून आलेले आहेत. त्यांचे सगळे सामार्थ्य त्यांच्या भ्रम कलेवर अवलंबून असते. ते फार भयानक दिसतात, त्यांचे दांत मोठे असतात. त्यांची हिम्मत आणि धाडस वाखाणण्यासारखे असते. त्याशिवाय आणखीन एक प्रकारचे दानव सुद्धा येथे रहातात त्यांना निवटकवच असें नांव आहे. ते कोणालाही हरत नाहीत. त्यांना तुझा इंद्र हरवू शकत नाहीन हे तुला माहीत आहे. तू आणि तुझा मुलगा गोमुख त्या बरोबर शक्र आणि त्याचा मुलगा कित्येक वेळा ह्यांच्या कडून मार खाऊन गेले आहेत. त्यांची घर पहा. ती सगळी सुवर्ण आणि चांदीची आहेत. त्यातील कसब कलेच्या नियमानुसार आहे. त्यांची घरे निलमण्याच्या खड्यांपासून बनवलेली आहेत. अर्कस्पटीकासारखे ते चमकत आहेत. त्यात वज्रसर रत्न बसवलेली आहेत. कांही घर पद्मरग रत्नाची आहेत. त्याशिवाय शुद्ध संगमरवरी लाद्या आहेत. उत्कृष्ट जातीचे लाकूड त्यात वापरलेले आहे. विविध रत्न, माणकं ह्यांनी ती सजवलेली आहेत. त्या घरांच्या स्थापत्याचे काय कौतुक करावे. त्यांच्यावरील सजावटीमुळें ती घरं सुंदर दिसत आहेत. त्याच्या करमणूकीच्या जागा पहा. त्यांची क्रिडांगणं पहा. त्यांचे बिछाने, त्यांच्या घरातील भांडी, जेवणं शिजवण्याच्या चुली पहा. सगळे कसे रेखीव, सुंदर आणि नजर लागेल असे असते. तसे देवांचे नसते कारण देव भोगी नसतात तर हे सगळे भोगी असतात. भोगहीन जीवनामुळें देवांच्या ह्या गोष्टी तेवढ्या सुंदर नसतात. चांगल्यातील कांही उणेपणा येथे जाणवतो मताली. देवांच्या ह्या गोष्टी साधेपणावर असतात

म्हणून त्या तितक्या देखण्या नसतात. तेथे पहा बगीच्यातील कारंजे, ती झाडे पहा ती आपणहून एका जागेवरून दुसऱ्या जागी हलू शकतात. त्यांना भरपून रुचकर फळं लागतात. फुलं येतात. जर तुला इकडचा मुलगा पसंत पडला तर तुझी मुलगी तिचे आयुष्य मजेत घालवेल हे निश्चित. जर तुला नको असेल तर आणखीन दुसरीकडे आपण जाऊ. मताली नारदाला सांगतो कीं, "तो असें कांहीं करू इच्छित नाही ज्यांमुळें स्वर्गस्थ आप्त नाराज होतील. जरी दानव आणि देव मावसभाऊ असले तरी त्यांचे कधीच पटत नाही हे आपण जाणता. त्यांच्यातील दुष्मनी कायम असते. देव निर्भोगी व हे भोगी त्यामुळें त्यांचे पटत नाही. म्हणून शत्रूशी नाते जोडणे मला अप्रस्तुत वाटते. म्हणून आणखीन कोठे चांगले स्थळ मिळते ते पाहू. निदान ह्या लोकांत आता शोध न घेणे योग्य वाटते. मी तुम्हाला चांगलाच ओळखतो तुम्ही नारद, लोकांत भाडण लावण्याचेच काम सदैव करत असता पण ह्याठिकाणी ते तुम्हाला मी करू देणार नाही".

भगवत यान पर्व भाग शंभरावा संपला.

# भगवत यान पर्व

# भाग एकशे एकावा

नारद त्याला बोलतात, "चल आपण दुसरी कडे पाहू कोण मिळतो". त्यानंतर ते दुसऱ्या प्रदेशात जातात. तेथे विविध प्रकारचे पक्षी फिरत असतात. नारद मतालीला त्या बद्दल सांगू लागतात, "हा भाग पक्षांचा आहे. ते धाडशी आहेत. सुंदरसुद्धा आहेत, ते बहुत करून सांपांना खातात. त्यांना उडतांना थकवा येत नाही. ते टोळक्याने भटकत असतात. त्यांची उत्पत्ती गरुडाच्या सहा मुलांपासून झाली आहे. त्यांची नांव आहेत, सुमुख, सुनामन, सुनेत्र, सुवर्चस, सौंच आणि सुवल. शेवटचा त्यांचा राजा आहे. ते सगळे काश्यपाच्या वंशातील आहेत. ती विनताची आहेत. त्यांच्यातील बऱ्याच जणांनी पक्षांच्या अनेक राजवटी उभ्या केलेल्या आहेत. ते सगळे खानदानी व थोर आहेत. ते संपन्न आहेत. त्यांच्या वागण्यावरून असें समजतात कीं ते क्षत्रिय वर्णाचे आहेत. ते फक्त शिकार करूनच रहातात. त्यांना सापांबद्दल कोणतीही दयाबुद्धी नसते हे मात्र खरे. त्यामुळें ते अध्यात्मिक प्रगती करत नाहीत. त्यांची नामावली सांगतो कदाचित तुला कोणी पसंत पडेल, हा वंश विष्णूला विशेष आवडणारा आहे. ते विष्णूची पुजा करतात. विष्णू त्यांचे एकमेव दैवत असते. त्यांची नांव सांगतो, सुवर्णचूद, नागसीन, दारूण, चंदटूंडक, अनल, वैषालाक्ष, कुंदन, पंकजित, वज्रविश्कंभ, वैनतेय, वामन, वतवेग, दिशाचक्षू, निमिष, अनिमिष, त्रिरव, सप्तरव, वाल्मिकी, दिपक, दैत्यद्विप, सरीद्विप, सारस, पद्मकेतन, सुमुख, चित्रकेतू, चित्रवर, अनघ, मेशाहृत, कुमुद, दिक्षा, सर्पांत, सोमभोजन, गुरूभर, कपोत, सूर्यनेत्र, चिरंतक, विष्णूधर्मन, कुमार, परिवर्ह, हरी, सुस्वर, मधूपर्क, हेमवर्ण, मलय, मातरीश्वान, निशाकर आणि दिवारक. ते सगळे गरुडाचे वंशी एकाच प्रदेशांत रहातात. मी फक्त त्यांचा उल्लेख केला जे नावाजलेल आहेत त्यांच्या कर्तबगारीने. तुला ते पसंत नसतील तर आपण दुसरीकडे पाहू तुझ्या कन्येसाठी योग्य स्थळ.

भगवत यान पर्व भाग एकशेएकावा संपला.

# भगवत यान पर्व

# भाग एकशे दुसरा

नारद पुढे सांगतात, अरे मताली आता आपण रसातळात आलो आहोत. हा पृथ्वीच्या दर्जाखाली सातवा आहे. येथे सगळ्या गुरांची माता सुरभि रहाते. ती अरारिताची मुलगी आहे. ती दुध देते जे पृथ्वीवरील अमृतासमान आहे. त्या दुधात सगळ्या सहा रुची असतात ज्यांच्या बद्दल बोलले जाते. ती निर्दोष ब्रह्माच्या तोंडातून निपजली. ती अमृत प्याली आणि ओकली. तिच्या त्या ओकण्यातून दुधाचा समुद्र तयार झाला. त्या दुग्धसागरात विष्णू रहातात व त्याच्या किनाऱ्याला अनेक ऋषी वस्तीकरून असतात. ते ऋषी दुधाच्या फेसावर जगतात. ते प्रखर तपस्या करत असतात. सगळे देव त्यांना घाबरतात. तिच्यातून चार प्रकारचे पशु निर्माण झाले आहेत. अरे मतली, ते चार हिश्यांना आधार देतात म्हणून त्याना दिकपाल असें नांव आहे. सुरभीपासून जन्मलेले ते जे पूर्वेकडील भागाला आधार देतात त्यांना सुरुप म्हणतात. दक्षिणेच्या भागाला आधार देणाऱ्याला हंसिका म्हणतात. वरुणाच्या भागाला जो पश्चिमकडे आहे, आधार देणाऱ्या हिश्याला सुभद्र म्हणतात. उत्तरेकडील भाग जो पुण्याचा आहे त्याचे नांव आहे कुबेर. जो वास्तविक संपत्तीचा कारक समजला जातो. त्याला आधार देणाऱ्या हिश्याला सर्व कमदुघ म्हणतात. देव असुरांबरोबर एकत्र येऊन आणि मंदार पर्वताची रवी करून त्यांनी तो दुधाचा सागर ढवळला. त्यातून कांहीं मौल्यवान चिजा बाहेर आल्या, त्यात वरुणी नावांचे मद्य आले, अध्यात्मिक संपत्तीची देवता लक्ष्मी आली, आणि अमृत आले. त्याशिवाय उच्चैश्रव दैवी घोडा आला, शेवटी कौस्तुभ रत्न आले. सुरभीने जे दुध दिले त्याला स्वाहा म्हणतात. ते जे पितात त्यांना सुद्धा स्वाहा म्हणतात. अमृत पितात त्यांना अमृता म्हणतात. रसातळात रहाणारे एक कवन गातात, ते अजून कांहीं विद्वान गातात, त्यात म्हंटले आहे, नागलोकांत नाही, स्वर्गात नाही, विमान लोकांत नाही, अथवा त्रिपीष्तप मध्ये नाही असें सुख रसातळात रहाणाऱ्यांना मिळत असे.

भगवत यान पर्व भाग एकशे दुसरा संपला.

# भगवत यान पर्व

## भाग एकशे तिसरा

नारद पुढे सांगतात, तेथे जी ख्यातनाम नगरी तू पहात आहेत जी अमरावतीच्या योग्यतेची आहे, तिला भोगवती असें नांव आहे. तिचात वासुकी राज्य करत असतो. तो नागांचा राजा आहे. शेष त्या नगरात रहातो. त्याच्या घोर तपस्येमुळें त्याची नेमणूक पृथ्वीला आधार देण्यासाठी ब्रह्मांने केली आहे. तो एकाद्या शुभ्र पहाडासारखा दिसतो. त्याच्या अगावर दैवी आभूषण असतात. त्याच्या फण्याच शंभर डोकी आहेत. त्या प्रत्येक तोंडातून लांब रक्तवर्णी जिभा ज्वाळांसारखे लवलवत असतात. शेषाचे सामर्थ्य विलक्षण आहे. रसातळात अनेक नाग, सुरस जे विविध आकारात असतात मोठ्या सुखात रहात आहेत. त्यांच्या अंगावर दागिने असतात. ज्यामुळें त्यांचे वैभव सिद्ध होते. त्यांना असंख्य तोंड असतात, कांहींना सहा, कांहींना पांच तर कांहीने हजार तोंड असतात. ते सगळे आकाराने डोंगरासारखे प्रचंड आहेत. ते पृथ्वीवर डोंगर, पर्वत, टेकाडं अशा रुपात पसरलेले असतात. त्यांची संख्या अगणित आहे. कोणालाही माहीत नाही नेमके किती ते आहेत. तरी तुझ्या माहीतीसाठा मी त्यांच्यातील कांहीं ख्यातनाम जे आहेत,त्यांची नांवे सांगतो. त्यात वासुकी, तक्षक, करकोटक, धंजय, कालिया, नहुष, अश्चावतर, वक्याकंड, मणी, अपूर्ण, खग, वामन, इलपत्र, कुकुर, कुकुना, अर्यक, नंदक, कलश, पोतक, कलिकक्ष, पिंजारक, ऐरावत, सुमनमुख, दधीमुख, शंख, नंद, उपनंदक, आप्त, कोटरक, सिखी, निष्थूरक, तितिर, हस्तीभद्र, कुमुद, मल्यापिंदक, दोन पद्म, पुंडरीक, पुष्प, मुद्गरपर्णक, करवीर, पिथारक, समृत्त, वृत्त, पिंदार, बिल्वपत्र, मुशिकद, श्रीशक, दिलीप, शंखशिर्ष, ज्योतिश्क, अपराजित, कौरव, धृतराष्ट्र, कुहर, क्रिशक, विरराज, धरण, सवाहू, मुखर, जय, अंघ, विसुदी, विरस, सरस, ती आणि इतर काश्यपाच्या घरातील आहेत. अरे माताली, तुला ह्यांच्या पैकी कोणी आवडतो कां ते सांग. कण्व पुढे सांगतात, त्यावेळी माताली तेथे उभे असलेल्या कोणाकडे पहात होता. नारदाचे बोलणे संपल्यावर माताली त्यांना बोलतो, अहो ऋषी, हा तेजस्वी दिसणारा कोणत्या कुळाचा आहे ते सांगा. तो कौरव घराण्यातील अर्यकाच्या बाजूला कोण आहे ते सांगा. त्याचे माता आणि पितर कोण ते सांगा. तो कोणत्या नांग वंशाचा आहे ते सांगा. त्या घराचा तो मुख्य असावा असें मला वाटते. त्याच्या एकंदर व्यक्तीमत्वामुळें मी प्रभावित झालो आहे. माताली पुढे बोलतो, त्याला

वाटते कीं तो त्याच्या कन्येसाठी योग्य वर आहे. कण्व पुढे सांगतात, सुमुखाला पाहून मताली संतुष्ट झाला आहे ते नारदाला समजते. नारद त्यानंतर मतालीला सुमुखाच्या खानदानीची सगळी माहीती सांगतो. तो ऐरावताच्या कुळातील आहे, तो अर्यकाचा नातू आहे. वामनाच्या मुलीचा मुलगा आहे, अरे मताली, तो चिरुक ज्याला विनताच्या मुलांनी मारले, ते ऐकल्यावर मताली नारदाला सांगतो कीं, त्याला तो मुलगा जावई म्हणून पसंत आहे. तेथे शब्द टाकून पहा असें नारदाला तो सांगतो. मताली सांगतो कीं, त्याला त्याची मुलगी त्या घरात द्यावयाला आवडेल.

भगवत यान पर्व भाग एकशेतीन संपला.

# भगवत यान पर्व

## भाग एकशे चौथा

नारद सुमुखाच्या लोकांना बोलतात, हे सारथी आहेत शक्राचे. त्याचे वागणे पवित्र असते, ते पुण्यवंत आहेत. ते इंद्राचे मित्र, साथीदार आणि सल्लागारसुद्धा आहेत. सगळया युद्धात ह्याचा यशाचा वाटा आहे जेव्हां इंद्र जिंकले आहेत. सगळया देव आणि दानवातील युद्धांत हा इंद्राच्या रथाचा चालक होता. त्याच्या रथाचे हजार घोडे हा लिलया सांभाळत होता. ह्याच्या रथ चालवण्यामुळें इंद्राला प्रत्येक वेळी यश मिळत होते. त्यामुळें ते देवांचे शत्रू नेहमी हरवले जात होते. त्यांना प्रथम हा सारथी मताली त्याच्या घोड्यांच्या टापाखली मारत असें नंतर इंद्र त्यांना मारत असें. अशा ह्या गुणी सारथ्याला एक गुणी कन्या आहे. तिचे सौंदर्य तिनही जगात अतुलनीय आहे. तिचे गुण किती वाखाणणार मी. सत्यवादी, विविध कलांत प्रावीण्य तिच्यात आहे. तिचे नांव गुनकेशी आहे. हल्ली हा मताली त्याच्या मुलीसाठी योग्य वर शोधण्यासाठी निघाला आहे". त्वरित तुझे मन तयार कर. जशी लक्ष्मी विष्णूने स्वीकारली, स्वाहा अग्नीने तसें तुझा नातू गुनकेशीला स्वीकारेल तर बरे होईल. जशी सांची इंद्रासाठी शोभते तशी गुनकेशी तुझ्या घरात नांदेल. त्या सुमुखाचे पिता नसले तरी त्याच्या गुणामुळें आम्ही त्याला स्वीकारत आहोत. ऐरावताचे आणि आपले सौजन्य आणि सुमुखाचे गुण त्याच्या मनाची शुद्धता, चांगली वागणूक, संयमीपणा असें सगळे गुण मतालीला फार आवडले आहेत. म्हणून तो तुझ्या कुटूंबाशी सोयरिक करत आहे. मतालीच्या विनंतीचा मान ठेवण्यात तुझे भले होईल.

कण्व पुढे सांगतात, अशाप्रकारे नारदांनी अर्यकाला विनंती केली. अर्यकाला त्याच्या मृत मुलाची आठवण येते परंतु, नाते उत्तम आहे म्हणून तो समाधानी असतो. त्यानंतर अर्यक नारदाला बोलतो, "तुमचे म्हणणे योग्य असले तरी मी गुनकेशीला माझी सून म्हणून कशी स्वीकारू शकतो"? ते शक्य नाही. अहो मुनी कोणालाही इंद्राशी जवळीक करणे आवडेल परंतु, ज्या परिस्थिती आहेत त्या पहाता असें नाते साकारणे जमणार नाही. असें नाते फारकाळ टिकणार नाही. ह्या मुलाच्या पित्याला गरुडाने खाल्ले आहे. त्यामुळें आम्ही खूप दुःखात आहोत. त्यात भर म्हणजे तो गरूड परत जातांना धमकी देऊन गेला कीं, एक महिन्यानंतर तो येईल व सुमुखला

खाऊन टाकेल. ज्या अर्थी तो तसे बोलला म्हणजे तो सुपर्ण, ते खरे करणार. आम्ही फार दुःखात आहोत.

कण्व पुढे सांगतात, ते ऐकल्यावर मताली त्यांना बोलतो कीं, त्याच्याकडे एक योजना आहे. मी त्याला माझा जावई म्हणून स्वीकारलेला आहे तेव्हां त्याला अभय देण्याची माझी जबाबदारी आहे. तुम्ही असं करा कीं त्याला आमच्या बरोबर येण्याची परवानगी द्यावी, आम्ही त्याला आमच्या बरोबर घेऊन जाऊ. मी सुपर्णाच्या मार्गात अडचणी उत्पन्न करीन. त्याशिवाय सुमुखाच्या आयुष्याचा दोर किती लांब आहे तेसुद्धा पाहू. मी त्याला विष्णूच्या पुढेच घेऊन जाणार आहे. त्यांच्या बरोबर अर्यक सुद्धा निघतो. ते चौघे शक्राच्या सभेत येतात. तेथे विष्णू सुद्धा होते. नारद तेथे तो सगळा प्रकार तेथे जमलेल्या देवांना सांगतात.

कण्व पुढे सांगतात, नारदाचे बोलणे ऐकल्यावर विष्णू पुरंदराला सांगतात, ह्या तरुणाला अमृत पाज. त्याला देवांप्रमाणे अमरत्व मिळून जाऊ दे. अशाप्रकारे नारद, मताली आणि सुमुख त्यांची मनिषा पूर्ण झाली म्हणून आनंदी होतात. परंतु, इंद्र विनताच्या मुलाच्या जोराचा विचार करत विष्णूला बोलतो, आपणच अमृत त्या तरूणाला पाजाल तर बरे होईल. ते ऐकल्यावर विष्णू त्याला बोलतात, अरे, तू ह्या जगाचा राजा आहेस तुला कसली भिती वाटते. तुला कोण विरोध करू शकतो"? तरी इंद्र त्याला अमृत देत नाही त्या ऐवजी त्याला दिर्घायुष्याचा वर देतो. ते ऐकून तो सुमुख आनंदी होतो त्याचा चेहरा खुलतो. त्यानंतर त्याचा विवाह गुनकेशीशी होतो व ते दोघे सुखाने राहू लागतात. ती दोघ विष्णू आणि इंद्राची भक्ती करू लागतात.

भगवत यान पर्व भाग एकशेचार संपला.

# भगवत यान पर्व

## भाग एकशे पांचवा

कण्व पुढे सांगतात, ते त्या बलशाली गरुडाला समजते. नाग सुमुखाला दीर्घायुष्य मिळाले ते त्याला समजते. त्याला राग येतो. त्याच्या पंखांच्या केवळ फडफडण्याने सगळया सृष्टीत वादळं उठतात असा तो पक्षीराज शक्राकडे जातो. त्याला बोलतो मला न विचारता माझ्या खाण्याच्या गोष्टीत कां लक्ष घातलस म्हणून त्याला प्रश्न विचारतो. तुला तो अधिकार कोणी दिला? तुझ्यामुळेंच मी सापांना खात आहे तो तू दिलेला दुवा तू कसा काढून घेऊ शकतो? ब्रह्माने माझे खाद्य निश्चित केले आहे त्यात तू कसा ढवळाढवळ करतोस? मी त्या मोठ्या नागाला ठरवले होते माझे पुढचे खाद्य म्हणून व तू त्यात अडचण करत आहेस. मग मी व माझे लोक काय खाणार? तुझ्या त्याला दिलेल्या आशिर्वादामुळें माझ्या वंशाची खाण्याची पंचाईत होत आहे, त्यामुळें सृष्टीच्या कारभारात व्यत्यय येतो ते तुला समजत नाही? सांग आता मी काय खावे? आम्हाला अशाने मरावे लागेल त्याचा तू विचार केला आहेस कां? तू हे विसरतोस कीं, मीसुद्धा इंद्रच आहे. तुझ्या बरोबरीचा आहे, वालखिल्यांनी मला निर्माण केले हे तू कसा विसरतोस. पण मला तुम्ही पक्षी म्हणून दुसऱ्याची सेवा करावयाला लावता व तू मोठा देवांचा राजा बनला आहेस. विष्णूने मला खालच्या कामाला लावले आहे. म्हणून तुझे फावत आहे. मलासुद्धा दिक्षापासून एक मुलगी आहे. मी काश्यपाच्या घरचा आहे मला तुम्ही कमी ठरवता हे मला मान्य नाही. मी न थकता पृथ्वीचा भार घेऊ शकतो, माझी ताकद तुझ्यापेक्षा कितीतरी जास्त आहे. दैत्यांबरोबरच्या लढाईत मीसुद्धा मोठी कामगिरी केली आहे. दितीच्या श्रृतश्री, श्रृतसेन, विवस्वर, रोचनामुख, प्रसृर, कालकक्ष ह्यांना मी पराजित केले आहे. तुझ्या धाकट्या भावाच्या रथाच्या ध्वजावर बसून मी त्यालासुद्धा अनेक युद्धात मदत केली आहे. कधी मी तुला व तुझ्या भावाला माझ्या पंखांवर घेऊन जातो ते वेगळे. कदाचित मी ते सगळे करतो म्हणून माझी किंमत तू करत असशील तर ते योग्य नाही. ह्या सृष्टीत दुसरा कोण आहे जो अशी काम करू शकतो? ह्या सगळया गोष्टी लक्षात घेता तू मला न विचारता थेट असा निर्णय घेऊ शकत नाहीस. त्याच प्रमाणे विष्णूनेसुद्धा त्याची मर्यादा ओलांडली आहे. तो आदितीच्या उदरातून आला असेल तर मी विनताच्या अंड्यातून आलो

आहे. विष्णू लढण्यात हुशार आहे तर मी शक्तीत वरचढ आहे. ह्यावरून हे स्पष्ट होते कीं तुम्हाला माझ्या गोष्टात नाक खुपसायला अधिकार नाही.

कण्व पुढे सांगतात, गरुडाची ती प्रौढी ऐकून तारक्ष्य विचारात पडतो. नंतर तो गरुडाला सांगतो, अरे अंडज कधीच माणसाच्या बरोबरीला येऊ शकत नाहीत. माझे वजन तिनही जग एकत्र केली तरी त्यापेक्षा जास्त आहे. मला माझे वजन उचलावे लागते. त्याबरोबर तुझेसुद्धा घेऊ शकतो. असें बोलून तो त्याचा एक हात गरुडाच्या पंखावर ठेवतो. त्याच्या वजनाने गरुड आडवा पडतो, त्याला त्या एका हाताचे वडन पेलत नाही. परंतु, विष्णू त्याला मारत नाही कारण त्याला फक्त त्याचा गर्वहरण करावयाचे असते. गरुडाबद्दल त्याच्या मनात खूप प्रेम असते. त्याच्या तक्रारीची योग्य दखल घ्यावी लागणार असते कारण, तो त्या प्रजातीच्या जगण्या मरण्याचा सवाल होता. गरुड त्या भाराने पूर्णतया थकून जातो व धापा टाकू लागतो. त्याला श्वाससुद्धा घेणे कठीण झाले होते. त्याची शुद्ध जाण्याची पाळी आलेली असते. त्याचा गर्व गेला होता. तो विनम्रपणे विष्णूला बोलतो, हे विश्वाचे वजन आहे म्हमून मला पेलत नाही. ते फक्त आपणच पेलू शकाल. मला क्षमा करा मी तुमच्या ध्वजावर बसण्याच्या लायकीचाच आहे. नी माझी मर्यादा ओलांडली त्याबद्दल आपली दिलगिरी मागतो. मला आपल्या शक्तीचा कधीच अंदाज आला नव्हता. ते त्याचे विनवणीवजा बोलणे ऐकून विष्णू त्याला सोडतात. त्यानंतर उपेंद्र सुमुखाला एका आंगठ्याने उचलून गरुडाच्या छाताडावर ठेवतो व बोलतो आजपासून साप आणि गरूड मित्र झाले. अशारितीने अरे, दुर्योधना त्या गरुडाचे गर्वहरण झाले.

कण्व पुढे सांगतात, अरे, गांधारी पुत्रा तुझासुद्धा गर्वहरण करावे लागणार आहे. पण ह्यावेळी त्याबरोबर तुझा जीवसुद्धा जाण्याची शक्यता आहे म्हणून तू पंडुच्या मुलांशी समझौता करणे तुझ्या सगळया परिवाराच्या भल्यासाठी आवश्यक आहे. त्यात भिम आहे, तो वायुपुत्र आहे त्याला कोणीही पराजित करू शकणार नाही. दुसरा आहे अर्जुन तो साक्षात नर आहे त्यामुळें त्या हरवणे कोणालाही शक्य नाही. त्यांच्या बरोबर विष्णू आहे कृष्णाच्या रुपात त्यांना तू किवां कोणीही कधीही जिंकू शकणार नाही. तुम्ही कौरव त्यांच्या बरोबर युद्धभूमीवर समोरा समोर उभेसुद्धा राहू शकणार नाही, त्याना हरवण्याची गोष्टच नको. युद्ध टाळून तू तुझ्या घराण्याला संहारापासून वाचवू शकतोस. वासुदेव आला आहे त्या निमित्ताने ती चांगली संधी तुझ्याकडे आहे कीं, तू माघार घेऊ शकतोस व त्यात कोणताही कमीपणा तुला येणार नाही.

वैशंपायन पुढे सांगतात, ऋषींचे ते ऐकल्यावर दुर्योधनाच्या भुवया वर चढल्या. त्याचा श्वास वाढला. त्यानंतर तिरक्या नजरेने तो कर्णाकडे पहातो. त्यानंतर ते दोघे जोराजोराने हसूं

लागले. त्यानंतर तो उद्धट आपल्या मांडावर थाप मारतो. तो ऋषींना बोलतो त्याच्या मग्रूरीत अहो ऋषीवर, मला विधात्याने जसा बनवला आहे तसा आहे. जे होणार ते होणारच. माझ्या नशीबात जे दिले आहे ते माझ्याबाबत होणारच. त्यापेक्षा वेगळे मी करू शकत नाही. म्हणून अशा गोष्टी करणे मला निरर्थक वाटते.

भगवत यान पर्व भाग एकशेपांचवा संपला.

# भगवत यान पर्व

# भाग एकशे सहावा

जनमेजय बोलतो, "पापाशी लग्न झालेला, द्वेषाने अंध झालेला, कुकर्म करण्याचे व्यसन असलेला, ज्याने विनाश करण्याचा निश्चय केला आहे असा, जो आपल्याच आप्तांचा नाश करणारा, मित्रांच्या दुःखात भर घालणारा, शत्रूंना आनंद देणारा, सदैव चुकीच्या मार्गाने जाणारा, त्याला त्याचे मित्र आणि त्याचे आजोबा भिष्म कां समजावण्याचा प्रयत्न करत नाहीत"?

वैशंपायन सांगतात, भिष्म आणि नारद त्याला सांगण्याचा प्रयत्न करतात. ते सगळे तुला सांगतो. ते पुढे सांगतात, नारद दुर्योधनाला बोलतात, "मित्र जे चांगला सल्ला देतात तो ऐकणारे कमी असतात, तसेंच खरा चांगला सल्ला देणारे लोकसुद्धा कमी असतात. असें बघ तू लोकांचे ऐकत जा, त्याला तोडू नकोस. त्या वागण्याला उद्धटपणा म्हणतात. अशा वागण्याने मोठा घात तुझा होणार आहे. ह्या संदर्भात मला एक किस्सा आठवतो तो विश्वामित्राचा छात्र गलव्याचा आहे. उद्धटपणामुळें त्याचे कसे नुकसान झाले ते तुला समजेल. फार प्राचीन काळी विश्वामित्राची परीक्षा घेण्यासाठी जो घोर तपस्येत गुंतला होता, धर्मदेव स्वतः त्याला भेटण्यासाठी गेला होता. त्यांने ऋषी वसिष्ठचे रुप घेतले होते. ऋषी सात ऋषींपैकी एक आहेत. जे ह्या सृष्टीचे काम पहात असतात. त्यानी फार भुकेले असल्याचे सोंग घेतले होते. अशारितीने ते यमराज कौशिकाच्या मठात येतात. त्यांना पाहून विश्वामित्र चकीत झाले व त्यांच्यासाठी भात दुधात शिजवण्यास घेतात. त्यात गुंतल्यामुळें तो विश्वामित्र त्याच्या अतिथीकडे पुरेसे लक्ष देऊ शकत नाही. त्याचे दुधभात शिजवून तयार होण्या आधी धर्मदेव दुसऱ्या सन्याशाने दिलेले जेवण खाऊन जातात. तरीसुद्धा तो दुधभात गरमागरम असा घेऊन तो त्यांना देतो. तेव्हां यमराज त्याला बोलतात की, मी माझे भोजन उरकले आहे. जरा थांब असें ते त्याला बोलतात. त्यानंतर ते कोठेतरी निघून जातात. डोक्यावर ते गरम भांडे घेऊन तो ऋषी त्यांची येण्याची वाट पहात उभे रहातात. त्यावेळी एक दुसरा सन्याशी ज्याचे नांव गलव होते, त्यांच्यावर लक्ष देऊन तेथे रहातात. अशा परिस्थितीत शंभर वर्षे जातात. त्यानंतर यम पुनः वसिष्ठांचे सोंग घेऊन तेथे येतात. त्याना जेवण करण्याची इच्छा असते. ते त्या ठिकाणी विश्वामित्राला त्याजागी दुधभाताचे भांडे डोक्यावर घेतलेल्या अवस्थेत उभा असलेला पहातात. धर्म ते दुधभात त्यावेळी घेतात आणि

खातात. त्याला सांगतात किं, ते त्याच्यावर संतुष्ट झाले आहेत. तसे बोलून ते निघून जातात. ते ऐकून विश्वामित्र ज्याने स्वतःला ब्राह्मण वर्णाचे समजण्यास सरूवात केली होती तोसुद्धा खूष होतो. त्याचा छात्र सन्याशी गलवच्या कामावर विश्वामित्र संतुष्ट होतात व विचारतो तुला काय पाहीजे ते सांग मी ते तुला देणार आहे. ते ऐकून आनंदी झालेला गलव मधूर वाणीत त्याला विचारतो मी कोणती भेट आपल्याला दिली तर आपल्याला आनंद होईल ते सांगा. योग्य भेट दिल्यानंतरच तो यज्ञ संपन्न होत असतो. तशी भेटवस्तु देणारा मुक्त होतो. त्यानांच मनाची शांतता म्हणतात. ती मिळाल्यानंतर तो स्वर्गात जातो. म्हणजे मी माझ्या शिक्षकासाठी काय द्यावे ते सांगा. ते मी त्यांच्यासाठी मिळवण्याचा प्रयास करीन. त्यावर विश्वामित्र त्याला बोलतो, "अरे ते जाऊ दे". विश्वामित्राला समजते कीं, त्याच्या शिष्याने त्याला जिंकले आहे. म्हणून विश्वामित्र त्याला जाण्यास सांगतो. परंतु, गलव पुन्हा त्याला विचारतो, कृपा करून सांगा, "मी काय दिले पाहिजे ते"? ते ऐकून विश्वामित्राला राग येतो व तो सांगतो, "जा माझ्यासाठी आठ हजार घोडे आण. प्रत्येक चंद्र प्रकाशासारखा शुभ्र असला पाहिजे. त्यातील प्रत्येकाचा एक कान काळा असला पाहिजे. आणि आता जा, लवकर निघ".

भगवत यान पर्व भाग एकशेसहावा संपला.

# भगवत यान पर्व

## भाग एकशे सातवा

नारद पुढे सांगतात, विश्वामित्राने तशी मागणी केलेली ऐकल्यावर गलवाची झोप उडते, त्याला कांहींच सुचत नाही. तो काळजीत चूर होतो. त्याला खाणे जात नाही. केवळ दुःख करण्याशिवाय. तो दुसरे कांहीं करू शकत नव्हता. त्याची अंगकांती फिकट झाली. त्याचा सांगाडा झाला कारण एवढे घोडे तो कोठून आणणार ह्या चिंतेने तो व्यग्र झाला होता. अरे दुर्योधना, तो विचार करत असतो कीं, त्याला कोठे अशा मित्र मिळेल जो त्याला मदत करू शकेल. त्याच्याकडे कांहीं बचतसुद्धा नव्हती की तो कांही खरेदी करू शकेल. त्यासाठी मी पैसे कोठून आणू? जरी पैसे आले तरी असे कांती असलेले घोडे मला कोठून मिळणार? मला खाणे कसे जमेल, मी आयुष्य कसे सुखात घालवीन, सारे जीवन माझ्यासाठी भकास झाले आहे. परदेशात जाऊन ते कसे मिळणार, कदाचित ह्या विवंचनेत मी माझे जीवन संपवणेच रास्त आहे. गरीबाला कसले जीवन आहे? जरी मला कोणी मदत केली तरी तिची परतफेड मी कशी करमार? जो दिलेले वचन पालत नाही तो अध्यात्मिक दृष्ट्या भ्रष्ट होतो. म्हणजे मी भ्रष्ट होणार आहे. जो खोटेपणाने आयुष्य जगतो त्याचा पुढला जन्म दारिद्र्यात जातो. त्याचा अखेरीस नाश होतो. मी माझ्या शिक्षकाची इच्छा पूर्ण करू शकत नाही म्हणजे मी एक नालायक छात्र ठरतो. मी देवांकडून कांहीं मागितलेले नाही, असें विचार करत तो ठरवतो कीं, तो विष्णूच्या कृपेत गेला पाहिजे. ते मला ह्यातून वाचवतील. तो ठरवतो कीं, तो कृष्णाकडे जाऊ शकतो. तो कृष्ण देव आणि असुर दोघांना मदत करतो, मग मला कां नाही करणार. अशारितीने तो दुःखात विचार करत असतांना त्याचा मित्र गरुड त्याला भेटावयाला येतो. तो त्याला आनंदी करण्यासाठी प्रयत्न करतो व बोलतो मित्राचे काम असते कीं तो दोस्ताचे दुःख कमी करील. तो त्याला बोलतो, "अरे गलवा आपण चांगले मित्र आहोत, मला सांग तुला कसली चिंता सतावत आहे"? माझ्याकडे सगळे आहे व ते विष्णूची मला दिले आहे. तुला काय पाहिजे ते सांग"? मी तुझ्यासाठी त्यांना मदत करावयास सांगेन कांहीं चिंता करू नकोस. चल आपण त्यांना भेटू. मी तुला त्या सागराच्या पैलतीरी घेऊन जातो. आता वेळ घालवू नकोस, आपण निघू या.

भगवत यान पर्व भाग एकशे सातवा संपला.

# भगवत यान पर्व

# भाग एकशे आठवा

गरूड पुढे बोलतो, "अरे गलवा, देवाच्या आज्ञेनुसार मी तुला विचारतो की, प्रथम कोठल्या भागात तू शोध घेणार आहेस"? पूर्व, दक्षिण, पश्चिम कां उत्तर ते सांग. तू सांगशील त्या भागात मी तुला घेऊन जाईन. जेथून सूर्य उगवतो ती दिशा, ती पूरव दिशा तिचे महत्व सांगतो, त्या दिशेने साध्य आपली साधना संध्याकाळी करतात, ह्या दिशेने पहिले बुद्धीसामर्थ्य उपजले, जेथे यमाचे दोन डोळे आहेत, ह्या दिशेने साजूक तूप यज्ञात दिले गेले व नंतर सर्वत्र पसरले, त्या दिशेत आहे दिवसाचा दरवाजा, आणि त्या धिशेला दक्षानी अतिप्राचीन काळी तिच्या संततीला जन्म दिले. ह्याच दिशेत काश्यपाची संतती वाढत गेली. सगळया संपन्नतेची हि दिशा आहे. ह्या दिशेत इंद्राली प्रथम देवांचा राजा म्हणून जाहीर केले गेले होते. ह्या दिशेत सगळे देव आणि इंद्रसुद्धा त्यांची वैराग्यपूर्ण साधना करू लागले होते. म्हणून ह्या भागाला पूर्व असें नांव मिळाले आहे. येथे सुरांचा विकास झाला. जे देव संमृद्धीची अपेक्षा करतात ते ह्या दिशेने त्यांची साधना करतात. येथूनच दैवी ऋषी वेद बोलले. ह्या दिशेत प्रथम गायत्री सूर्याने गायली होती. ह्या दिशेत प्रथम सूर्याने यजुर्वेद सांगितला. जो याज्ञ्यवल्क्याच्या रुपात आला होता. येथे सुर सोम प्रथम प्याले होते. येथे होमातील अग्नीने आहुत्या घेतल्या होत्या. येथूनच वरुणदेव पाताळाकडे निघाला होता. तेथे तो समृद्ध झाला. ह्या भागात ऋषी वसिष्ठचा जन्म, जीवन आणि अंत झाले होते. येथूनच शंभर शाखा ओमच्या सुरू झाल्या. ह्या भागात वराहाच्या असंख्य प्रजाती इंद्राने मारल्या होत्या. त्यांचा बळी यज्ञात दिला होता. हि दिशा तिनही जगांचे द्वार आहे. येथूनच स्वर्गाचा रस्ता जातो. अरे ब्रह्मणा आपण प्रथम तेथून सुरूवात करू. मी तुझ्यासाठी कांहींही करण्यास तयार आहे. मी तुला आता दुसऱ्या दिशेची माहीती सांगतो.

भगवत यान पर्व भाग एकशेआठवा संपला.

# भगवत यान पर्व

## भाग एकशे नववा

गरुड पुढे बोलतो, आदिकाळात जेव्हां विवस्वात यज्ञ करतो, तो त्याचा हिस्सा त्याच्या शिक्षकाला दक्षिणा म्हणून देतो. म्हणून ह्या भागाला दक्षिणा कींवा दक्षिण असें नांव पडले. ह्या भागात पितरांची वस्ती असते. अरे ब्राह्मणा, कांहीं दैविक शक्ती ज्या धुरावर गजराण करतात तेसुद्धा येथे रहातात. विश्वश्वदेवसुद्धा येथे रहातात. ते पितरांबरोबर असतात. त्यांची पुजा होते यज्ञ करतांना जगभर. ह्याला यमाचा दुसरा दरवाजा असें म्हणतात. ह्या ठिकाणी माणसाला दिलेले दिवस मोजले जातात. ह्या भागात नेहमी दैवी ऋषी रहातात. त्यांना पितृलोक ऋषी आणि राजर्षी असें म्हणतात. ह्याभागात ते मोठ्या सुखात असतात. येथे धर्म आणि सत्य असते. ह्या ठिकाणी माणसाच्या कर्माचा हिशोब होतो. मेलेले लोक ह्या ठिकाणी येत असतात. ब्राह्मण मेल्यावर येथे येतात. ह्या ठिकाणी अनेक धूर्त कावेबाज राक्षस रहातात. ते पापीलोकांना दिसतात. येथे मंदार पर्वताच्या दऱ्यांत आणि ऋषींच्या घरात गंधर्व साम गात असतात. ह्या ठिकाणी तो दैत्य ज्याचे नांव आहे रैवत ते साम ऐकून स्वतः गाभ लागला. त्याने त्यानंतर बायकामुलांना सोडून संन्यास घेतला होता, ह्या ठिकाणी मनु आणि यवकृताच्या मुलांनी एक मर्यादा घातली होती ती सूर्य कधी ओलांडू शकत नाही. येथेच पुलस्यच्या घराण्यातील रावण ह्यांनी मोठी तपस्या करून अजरामर होण्याचा आशिर्वाद देवांकडून मागितला होता. ह्या भागातच वृत्राने त्याच्या नीच हरकतूमुळें इंद्राचा राग ओढवून घेतला होता. येथे ते जीव येतात त्यांची विविध रुप टाकून व नंतर त्यांचे विभाजन पांच मुलत्त्वात होत असते. येथे पापी लोकांना त्यांच्या कुकर्मानुसार यातना भोगाव्या लागत असतात. ह्या भागातून वैतरणा नदी वाहत जाते. तिच्यातून त्या पापी लोकांची कलेवरं वहात असतात. ह्या भागात आलेल्याना सुख आणि दुःख ह्यांचे कमाल व किमान अनुभव येतात. येथे सूर्य आल्यावर त्यातील पाणी सोडतो. त्यानंतर तो वसिष्ठांच्या जागी जातो. ह्याच ठिकाणी मी एका प्रचंड आकाराच्या हत्तीला आणि त्याचा भाऊ कासव ह्यांना खाल्ले होते. ह्या ठिकाणी सूर्यापासून ऋषी चक्रधानू उत्पन्न झाला होता. त्यालाच पुढे लोक कपीलमुनी म्हणून ओळखत होते. त्याच्यामुळें राजा सागराचे साठ हजार पुत्र मेले होते. ह्या ठिकाणी ब्राह्मणांतील शिव ज्यानी वेद संपूर्ण आत्मसात केले होते व वैरागी म्हणून समजले जाऊ लागले होते. सगळे वेद

आत्मसात केल्यामुळें त्यांना मोक्ष प्राप्त झाला होता. ह्याच भागात भोगवती नदी आहे. त्या नगरीचा राजा आहे वासुकी. त्या नगरावर तक्षकाने व ऐरावताने सुद्धा राज्य केले होते. जे मृत्यूनंतर येथे येतात त्यांना अंधार जाणवतो. तो अंधार इतका दाट असतो कीं, सूर्य किंवा अग्नी त्याला हटवू शकत नाहीत. आता सांग पुढे ह्या मार्गाने जावयाचे कीं नाही. नाहीतर पश्चिमेची माहिती सांगतो ती ऐक.

भगवत यान पर्व भाग एकशेनववा संपला.

# भगवत यान पर्व

## भाग एकशे दहावा

गरुड पुढे सांगत असतो, "अरे गलवा, हा भाग वरुणराजाला फार आवडतो. तो सागराचा राजा आहे. पाण्याच्या राजाची सुरूवात येथून झाली. त्याचे राज्य येथे पसरलेले आहे. दिवसाच्या अंती सूर्य येथे विसावतो. अरे ब्राह्मणा, म्हणून त्याला पश्चिम दिशा असें म्हणतात. सगळया जलचर प्राण्यांचे व्यवस्थापन आणि पाण्याचे व्यवस्थापन असें बरेच कार्य त्याला पहावे लागते. मान तेजस्वी काश्यप ह्याने वरुणाला ते काम दिले. वरुणाचे सहा अर्क पिऊन चंद्र पहिल्या पंधरवड्यात लहान असतो तो कळा कळानी मोठा होत पंधरवड्याच्या शेवटी पूर्ण मोठा होतो. त्या पंधरवड्यात दैत्य हरवले गेले होते. त्यांना वायूदेवांने घट्ट बांधून ठेवले होते. परंतु, एका जोराने आलेल्या वादळामुळें ते त्यातून सुटले. ते आणखीन खाली असलेल्या भागात गेले जेथे नित्य निद्रा मिळते. तेथे अस्त नांवाचा पहाड आहे. त्याच्यामुळें संध्याकाळ होते. संधीप्रकाश पसरतो. सूर्य त्यात मोठ्या आनंदाने डुबून जातो. ह्या भागातून रात्र आणि निद्रा उत्पन्न होतात. जगणाऱ्या जीवांचा अर्धा काळ ह्यात (रात्र आणि निद्रा) जात असतो. येथेच इंद्र त्याच्या सावत्र आईला पाहतो कीं, ती गर्भवती असतांना तिच्या गर्भाचे एकोणपन्नास तुकडे करते व त्यातून मरुत उत्पन्न होतात. ह्या दिशेने हिमालयाचे पाय मंदारकडे पसरत असतात. जो पाण्यात रुतला आहे. हजार वर्षे प्रवास करूनसुद्धा त्या मुळांजवळ कोणी जाऊ शकत नाही. ह्याच भागात सुरभि तलावाच्या किनाऱ्याला येत असते ज्या तलावात सोनेरी कमळ आहेत. त्यात ती तिचे दुध सोडत असते. तेजस्वी स्वरभानु (राहू) जो सदैव सूर्य आणि चंद्राला ग्रासण्याचा प्रयत्न करत असतो येथे उगवतो. येथे वेदांचे गाणे मोठ्याने ऐकावयाला येते. ते सुवर्णशिरस करत असतात जे अजिंक्य आहेत, आणि फार शक्तीमान सुद्धा आहेत. त्यांचे केस हिरव्या रंगाचे आहेत. ह्याच भागात हरीमेधाची मुलगी आकाशात सूर्यामुळें कायमची अडकली गेली. कारण सूर्य तिला थांब, थांब असें बोलत होता. अरे गलवा, वारा, अग्नी, आणि धरती, पाणी, हे येथे रात्रंदिवस मुक्त असतात. ह्या भागापासून सूर्याचे किरण सरळ मार्ग सोडतात. त्यामुळें सगळी नक्षत्र सूर्याच्या मंडलात प्रवेश करतात. अशारितीने अठ्ठावीस दिवस सूर्याच्या बरोबर राहिल्यानंतर ते चंद्राच्या मंडलात जातात. सागराला मिळणाऱ्या नद्यांचे उगम ह्या भागातून होत असतात. कारण ह्याच भागात तिनही जगाचे सारे

पाणी साठवलेले आहे. ह्याच भागात अनंताचे घर आहे. जो नागांचा राजा आहे. तोंच विष्णू आहे. ज्याला आदि आणि अंत नाही. ह्याच भागात ऋषी काश्यपांचे घरसुद्धा आहे. जो मारिचाचा पुत्र आहे. मी पश्चिम दिशेची माहिती सांगितली. आता मित्रा मला सांग, आपण कोठे जाऊ म्हणजे तुझे काम होईल.

भगवत यान पर्व भाग एकशे दहावा संपला.

# भगवत यान पर्व

## भाग एकशे अकरावा

गरूड पुढे बोलतो, अरे ब्राह्मणा, हा भाग पापापासून मुक्त असतो. म्हणून येथे माणसाला मुक्ती मिळते. त्यासाठी ह्याला उत्तर दिशा असें म्हणतात. तसेंच सगळे संपत्तीचे साठे पूर्वेपासून पश्चिमेकडे पसरलेले आहेत, तिला मध्यमा असेसुद्धा सांगतात. हि दिशा सर्वात उत्तम समजली जाते. ज्यांच्यात चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया नाही असा कोणाही येथे राहू शकत नाही. येथे एक आश्रम आहे त्याला बद्री नांव आहे. येथे नारामण ऋषी रहातात. त्यांच्या बरोबर जिश्नु सुद्धा असतो. त्यांच्या बरोबर ब्रह्मदेव सुद्धा असतो. हिमालयाच्या माथ्यावर महेश्वराचे राज्य आहे. त्यांच्यातून उत्पन्न होणाऱ्या अग्नीने युगाचा अंत होणार असतो. नर आणि नारायणांशिवाय इतर कोणालाही ते दिसत नाहीत. आणि अरे द्विजा, गंधर्व, यक्ष आणि सिद्ध सुद्धा पाहू शकत नाहीत. कारण ते सगळे मायेच्या प्रभावाखाली असतात. तो हजार डोळे आणि हजार हात पाय असलेला विष्णू त्याला पाहू शकतो. ह्या भागात चंद्रमाची नेमणूक केली गेली सर्व ब्राह्मणात. ह्या भागात महादेवांनी चंद्राला आपल्या भालप्रदेशात स्थान दिले. पवित्र गंगा त्यानंतर आली. ह्या दिशेत उमादेवीने तिची तपस्या पूर्ण केली. जे महादेवाचे स्त्रीरुप आहे. ह्या उत्तर दिशेत कामदेव, शिवाचा क्रोध आणि उमा एकत्र आले होते. अरे गलवा ब्राह्मणा, येथेच कुबेराची नेमणूक वास्तविक संपत्तीचा मुख्य म्हणून केली गेली. त्याचा दिमतीला राक्षस, यक्ष आणि गंधर्व योजले गेले. येथेच कुबेराचे उद्यान ज्याला चित्ररथ म्हणून ओळखले जाते ते आहे. ह्या दिशेला आहे मुनी वैखनास ह्यांचा आश्रम आहे. ह्या ठिकाणाहूनच स्वर्गीय नदी मंदाकिनी उगम पावते. येथून तू मंदार पर्वताची शिखरं पाहू शकतोस. ह्याठिकाणी तो स्वर्गीय बगीचा आहे ज्याचे नांव आहे सैगंधीकनक, त्याचे संरक्षण राक्षस करत असतात. येथे विस्तीरण पसरलेली गवताची कुरणं आणि केळीची बन आहेत. येथे तो स्वर्गीय वृक्ष शौतानक आहे. ह्या भागात ऋषी व सिद्ध त्यांच्या मनाप्रमाणे रहात असतात. येथे ते सात ऋषी आणि अरुंधती आपल्याला दिसू शकते. नक्षत्र स्वाती येथून दिसते. येथे यज्ञदेवतेच्या बरोबर ब्रह्मदेव बसलेले दिसतात. ह्या ठिकाणाहून सूर्य, चंद्र व इतर तारे फिरतांना दिसतात. तो सत्य वचनी देव यम गंगेच्या उगमाचे संरक्षण करत असल्याचे दिसते. येथे असलेल्या मुनींच्या घोर तपस्येची कोणाला कल्पना करता येणार नाही. ते

त्यांच्या नुसत्या इच्छेने हवेते खाद्य पदार्थ उत्पन्न करू  शकतात. त्याचे तंत्र हा एक गहन विषय आहे. अरे ब्राह्मणा, ह्याच्या पुढे कोणी गेलेली नाही. जर कोणी प्रयत्न केला तर त्याचा नाश होतो. परंतु, फक्त नारायण आणि त्याचा साथी जिश्नु म्हणजे आताचा अर्जुन असें दोघेंच ते करू शकले आहेत. ह्या पलिकडे कुबेराचे वस्तीस्थान सुरू होते. ह्या भागात त्या दहा अप्सरा जन्मल्या होत्या ज्यांचे नांव आहे, विद्युतप्रभा. अरे ब्राह्मणा, विष्णूने तीन पावलात सगळी तीन जग जिंकली राजाबलीकडून ते येथेच झाले. असें सांगतात, त्या ठिकाणी विष्णूचे एक पाऊल जमिनीत उठलेले दिसते. राजा मरुताने येथे उशिरवीज नांवाच्या ठिकाणी जे सोन्याच्या खाणींजवळ आहे एक यज्ञ केला होता. तेथे ऋषी जिमुत ह्याचा आश्रम आहे. त्या यज्ञात राजाने त्याची सगळी संपत्ती ब्राह्मणांना दान केली. त्या काळापासून तेथे मिळणाऱ्या सोन्याला जैमुती सोने असें बोलले गेले. ह्या जागी बसून ब्रह्मा दररोज जाहिर करतात कोणी कोणते काम त्या दिवशी करावयाचे आणि तसे होत असते. अशा गोष्टींमुळें हा उत्तर भाग ओळखला जातो. सर्व दिशांत त्याला सर्वश्रेष्ठ समजले जाते. मी तुला सगळ्या दिशांची माहीती सांगितली आहे. आता सांग कोणत्या दिशेने तुला जावे असें वाटते ते सांग. मी तुला तेथे घेऊन जाण्यास तयार आहे.

भगवत यान पर्व भाग एकशे अकरावा संपला.

# भगवत यान पर्व

## भाग एकशे बारावा

गलव बोलतो, "अरे मित्रा गरुडा, सर्वांचा नाश करणारा, तुझ्या अंगावर सुंदर पिसं आहेत, तू विनताचा मुलगा आहेस, मला पूर्वदिशेला घेऊन जा जेथून यमाचे डोळे उघडतात. तू म्हणाला होतास कीं, तेथे सगळे देव असतात तर मला त्यांना भेटावयाचे आहे. म्हणून मला तू तेथे घेऊन चल".

नारद पुढे सांगतात, ते ऐकल्यावर विनताचा मुलगा त्याला बोलतो कीं, त्यानें त्याच्या पाठीवर स्वार व्हावे. त्या प्रमाणे तो विश्वामित्राचा शिष्य त्याच्या पाठीवर बसतो. त्यानंतर गलव बोलतो, "अरें सर्प खाणाऱ्या सूर्यासारख्या तेजस्वी पक्षा ज्याच्या केवळ पंख फडपडवण्याने वादळी वारे उत्पन्न होतात आणि झाडे कोसळतात, तुझा वेग मोठा आहे, तू आकाशातील एक तारा असावास असें वाटते. तुझ्या पंखांच्या हलण्याने जमिनीवरील धुळ उंच आकाशात उडते व समुद्राचे पाणी उंच हवेत खेचले जाते, त्यातील मांसे मी आकाशात उडत असलेले पाहिले आहेत. त्यात लहान मोठे मांसे, सुसरी, साप दिसत आहेत. त्यातील कांहींना माणसाचे चेहरे आहेत. गरुडाच्या उडण्यामुळें निर्माण झालेल्या वादळामुळें ते होत होते. माझे कान त्या आवाजाने बधीर झाले आहेत. मी एवढा घाबरलो आहे कीं मला कांही दिसत नाही. अरें आकाशाच्या लक्षात असू दे, ब्राह्मणाचा मृत्यू झाला तर त्याची शिक्षा काय आहे. मला कोणतीही दिशा समजत नाही. मी पूर्णपणे बधीर झालो आहे त्या वाऱ्याच्या आवाजाने. मला फक्त एक दाट धुके पसरले आहे असेंच वाटते. मला फक्त दोन डोळे दिसतात ते दोन तेजस्वी रत्नासारखे वाटतात. मला वाटते तुझ्या बरोबर मी यायलाच नको होते अशी माझी अवस्था झालेली आहे. मी माझ्या शिक्षकाला दान करण्याचे आश्वासन दिले आहे व त्या कामात तू मला निर्मळ मनाने मदत करत आहेस पण हा तुझा वेग मला सहन होत नाही. मला समजत नाही मी तुझ्या मदतीने ते कसे पूर्ण करू शकेन. मला वाटते माझ्याकडे एकच पर्याय उरतो व तो असा आहे कीं, मी माझा जीव टाकून द्यावा किंवा त्याचेच दान शिक्षकाला करावे. मी निर्धन आहे, माझ्या कोणाकडे धन सुद्धा नाही, त्यामुळें ते दान करण्याची माझी क्षमता नाही".

नारद पुढे सांगतात, अशारितीने गयावया करत तो ब्राह्मण गलव रडू लागतो. ते पाहून विनताचा मुलगा त्याला हसतो परंतु, त्याचा वेग यत्किचीतही कमी न करता उडत असतो. तो बोलतो, "अरे मित्रा, तुला अक्कल कमी आहे ते मी समजलो आहे". असें पहा मृत्यू तू मागून मिळणार नाही. तुझ्या आयुष्याचे दोर यमाच्या हातात आहेत, जेव्हां तो ठरवेल तेव्हांच तू मरू शकतोस. अरे मूर्खा, मला आधी कां नाही सांगितलेस कीं, तुला काय पाहिजे"? मी त्याची व्यवस्था केली असती. येथे एक पर्वत आहे त्याचे नांव आहे वृषभ. येथे थांबून विश्रांती घेऊन मग पुढे जाऊ. थोडे कांहीं खाण्यासाठी मिळते कां ते पाहू. तू विश्रांती घे तोवर मी जाऊन येतो.

भगवत यान पर्व भाग एकशे बारावा संपला.

# भगवत यान पर्व

# भाग एकशे तेरावा

नारद पुढे सांगतात, त्या प्रचंड पक्षावरून तो ब्राह्मण खाली त्या वृषभ पर्वताच्या शिखरावर उतरतो. त्यानंतर ते तेथे एक ब्राह्मण बाई पहातात. तिचे नांव होते, संदिली. ती तेथे तपस्या करत होती. गलव आणि गरूड तिला वाकून नमस्कार करतात. तीसुद्धा त्यांची चौकशी करते. त्यांना बसण्यासाठी आसन दिले. त्यानंतर त्या बाईने शिजवलेले खाद्य ते खातात. स्वतः खाण्याआधी ते त्या खाद्यातील कांहीं भाग मंत्र बोलून ब्रह्माला अर्पण करतात. त्या खाण्यानंतर ते तेथेच जमिनीवर आडवे होतात आणि गाढ झोपतात. ते झोपेतून उठतात व निघण्याची तयारी करत असतांना गरुडाचे पंख निखळून पडतात. तो पंखहीन होतो. त्याची ती केविलवाणी अवस्था पाहून गलवालासुद्धा आश्चर्य वाटते व वाईटसुद्धा वाटते. येथे येण्यामुळें ते झाले कां असें ते विचार करू लागतात. आता येथेच रहावे लागते कीं काय असे ते विचार करू लागतात. तुझ्याकडून असें कोणते पाप झाले म्हणून हे घडले, असा ते विचार करत असतात. गरुड गलवाला बोलतो, "अहो द्विज, माझ्या मनात ह्या तपस्वी बाईला उचलून घेऊन जाण्याचा विचार केला होता. तिला घेऊन मी महादेवांच्याकडे नेणार होतो. माझे ते विचार एक पाप ठरले आहे कारण त्यामुळें माझे पंख खुडले आहेत. मी त्या साध्वीची क्षमा मागतो. माझ्या मनात असें विचार येणे माझ्यातील अहंकाराचे प्रतिक होते म्हणून मला हि शिक्षा मिळाली आहे. त्यानंतर तो गरुड त्या साध्वीला पाया पडून तिची क्षमा मागतो. आपण चुकीच्या प्रकारे विचार करत होतो व तो योग्य नव्हते हे तो मान्य करतो. ती त्यानी जी कबूली दिली तेव्हां त्या साध्वीने त्याला माफ केले. ती त्याला सांगते कीं ह्यापुढे कधीही कोणा बाईबद्दल असें विचार आणू नकोस. स्त्रीबद्दल तिला कमी समजणारे विचार करणे हो मोठे पाप आहे. मग ती बाई कोणीही असो, कोठेही असो, कशीही असो पुरूषानी स्त्रीबद्दल सदैव आदरानेच वागले पाहिजे. कारण ती पुरूषांना जन्म देत असते. ती मातृतत्त्वाची प्रतिनिधी असते जे तत्त्व ब्रह्मापेक्षा श्रेष्ठ आहे. ती त्याला पुनः पंख येतील असें बोलते व त्याप्रमाणे त्याची पंख पुन्हा येतात जी पहिल्यापेक्षा जास्त मजबूत असतात. ती त्या दोघांना सांगते, "आपल्या वागण्यात बोलण्यात शुद्धता असली पाहिजे. तीच आपली खरी संपत्ती आहे. चांगल्या वागणूकीने अनेक अरिष्ट टळतात, कामं सोपी होतात. लोक आपल्याला आपल्या

वागणूकीतून ओळखत असतात म्हणून ती चांगली असावी. मनात खोटे विचार आलें कीं त्याची प्रतिक्रीया स्वाभाविकपणे सुरू होते. वाईट विचारांसाठी वाईट प्रतिक्रीया असते. जेवढ्यास तेवढे हा नियम आखून दिला आहे. ह्यापुढे असें विचार तुझ्या मनात येणार नाहीत अशी सावधानता बाळगत जा. कधीही बायकांबद्दल तुच्छतेचे विचार आणू नकोस असा सल्ला ती गरुडाला देते." त्याला पंख येतात व तो गरुड आणि गलव संदिलीच्या पाया पडतात. तेथून निघतात. त्यांना पाहिजे तसे आणि तितके घोडे मिळत नाहीत. तशात त्यांना वाटेत विश्वामित्र भेटतात. विश्वामित्र त्याला बोलतात कीं, त्यानी अजून त्याची दक्षिणा दिलेली नाही ती त्यांनी वेळीच दिली पाहिजे अशी ताकीद तो ऋषी देतो. शिक्षकाचे ते बोलणे ऐकून गलव दुःखी होतो. त्याला दुःखी पाहून गरुड त्याला सांत्वनासाठी बोलतो, "आपण आणखीन शोधू त्यासाठी. ह्या विषयावर आपण थोडी चर्चा करू. आपण तुझ्या शिक्षकाला त्याला ठरलेली दक्षिणा दिल्याशिवाय तू शांत बसू शकत नाहीस.

भगवत यान पर्व भाग एकशे तेरावा संपला.

# भगवत यान पर्व

## भाग एकशे चौदावा

नारद सांगतात, गरुड त्या दुःखी ब्राह्मणाला बोलतो, ऐक मी काय सांगतो ते, संपत्ती अग्नीच्यामुळे पृथ्वीच्या उदरात तयार होत असते. त्या कामाला वायू मदत करत असतो. पृथ्वीला म्हणूनच हिरण्यमयी असें नांव आहे. त्यातील संपत्तीला हिरण्य म्हणतात. संपत्तीमुळें जग चालते व सगळया गोष्टी संपत्तीच्या जोरावरच होत असतात, म्हणून त्याला धन असं म्हणतात. हे धन जगाच्या आरंभापासून आहे. शुक्रवारी पूर्वभद्रा किंवा उत्तराभद्रा उगवतात, अग्नी त्याने उत्पन्न केलेली संपत्ती माणसाला देतो. त्यामुळें कुबेराच्या धनात वाढ होते. परंतु, पृथ्वीमध्ये जी गाडलेली आहे (संपत्ती) ती अजैकपाद आणि अहिब्रदन नांवाच्या देवता पहात असतात. त्यांना प्रसन्न करणे फार अवघड आहे. त्यामुळे ती गाडलेली संपत्ती सहसा कोणाला मिळत नाही. संपत्ती शिवाय कांहीं तरणोपाय नसतो माणसाला. तुला पाहिजेत ते घोडे विकत घेण्यासाठी तुला संपत्ती पाहिजे. त्यासाठी तू कोणा राजाकडे दान मागितलेस तर ते जमेल, एरव्ही मुष्किल आहे. परंतु, माझ्या परिचयात एक चंद्रवंशी राजा आहे, त्याच्याकडे अमाप संपत्ती आहे. त्याला राजर्षीला ययाति म्हणून सगळे ओळखतात. तो राजा नहुषाचा पुत्र आहे. त्याचे सामर्थ्य विलक्षण आहे. त्यालान भेटून तू जर विनंती केलीस तर कदाचित तुझे काम होईल. तो कुबेरा इतकाच श्रीमंत आहे. त्याच्या कडून दान घेऊन तू तुझ्या शिक्षकाची दक्षिणा देऊन टाक व मोकळा हो. ते गलवाला पटते व ते दोघे ययातिकडे जातात. ययातिची राजधानी प्रतिष्ठान येथे तो होता. तेथे राजा त्यांचे सप्रेम स्वागत करतो. त्यांच्या येण्याचे कारण विचारतो. तेव्हां गरुड त्याला गलवाचा प्रश्न सांगतो. तो बोलतो अहो राजन हा ब्राह्मण वैराग्यमूर्ती आहे. हा माझा मित्रसुद्धा आहे. तो विश्वामित्राचा अनेक वर्षे शिष्य आहे. जेव्हां त्याला विश्वामित्राने जाण्याची परवानगी दिली तेव्हां हा निष्पाप ब्राह्मण रिवाजाप्रमाणे बोलला, त्यांची दक्षिणा काय. सुरूवातीला विश्वामित्र त्याला जा, जा, असें बोलला. पण जेव्हां ह्यांने त्याला पुन्हा पुन्हा दक्षिणा किती असें विचारले तेव्हां त्यांने रागावून असेल, बोलले, कीं, त्याला आठ हजार अश्व जे चंद्रासारखे शुभ्र रंगाचे व एक कान काळा आहे असें मागितले. आणि निघून गेला. ह्याला ती दक्षिणा देण्याची इच्छा आहे परंतु, अहो राजन आपण जाणताच म्हणून तो माझ्या बरोबर आपल्याकडे दान घेण्यासाठी आला आहे. आपण जर कृपा

केली तर मोठे उपकार होतील व हा ब्राह्मण आपल्यासेवेत राहून ती परतफेड करू इच्छितो. आपण स्वतः राजर्षी अहात म्हणून त्याची अडचण समजू शकाल असें वाटले म्हणून मी त्याला आपल्याकडे आणले आहे. त्याची वैराग्याची अफाट संपत्ती तो तुम्हाला देण्यास तयार आहे, त्यामुळें तुमचासुद्धा भरपूर फायदा होईल. राजा त्यावर विचार करू लागतो.

भागवत यान पर्व भाग एकशे चौदावा संपला.

# भगवत यान पर्व

## भाग एकशे पंधरावा

नारद बोलतात, सुपर्णाचे ते प्रांजळ निवेदन ऐकल्यावर तो काशीचा दानशूर राजा ययाति त्याच्या मित्राला ब्राह्मण गलवाला शांतपणे विचार करून सांगतो, "अशा कामात मदत करण्यासारखे पूण्यकर्म दुसरे नाही. विशेष म्हणजे सगळे सूर्यवंशी राजे वाटेत असतांना त्यांना सोडून तुम्ही माझ्याकडे एका चंद्रवंशी राजाकडे आलात ह्याचे मला फार कौतुक वाटते. हा माझ्यासाठी मोठा भाग्याचा दिवस आहे. परंतु, आता अडचण अशी आहे कीं, माझ्याकडे आठ हजार घोडे नाहीत त्या वर्णनाचे. माझ्याकडे दोन हजार आहेत ते मी देऊ शकतो पण मला जाणीव आहे कीं, त्यांने ब्राह्मणाचा प्रश्न सुटणार नाही. तरी तुमची फेरी व्यर्थ जाऊ नये म्हणून मी कांहीं सुचवू इच्छितो. ब्राह्मणाला सांगणे कीं, मी मदत करू शकत नाही हे एका राजाला न शोभणारे आहे, विशेषकरून तो तुझ्या बरोबर आला आहे. अशांने नाराज झालेला ब्राह्मण माझ्या घराण्याचा नाश करू शकतो. म्हणून असें करा माझ्याकडे माझी मुलगी आहे जी लावण्यवती आहे. मी तिचे दान करू शकतो. ब्राह्मण तिला देऊन कोण्या राजाकडून हुंड्याच्या स्वरुपात उरलेले घोडे मिळवू शकेल. बऱ्याच राजांना अशा माझ्या कन्येपासून पुत्र हवे असतात. अनेक राजे तिचा हात माझ्याकडे मांगत आहेत. कित्येक देव तिला मांगणी घालत असतात. पण मी अजून तिला दिलेली नाही. केवळ एक पुत्रासाठी तू तिला त्या राजांना देऊन त्याच्याकडून तुझे घोडे मिळवू शकशिल. मला वंश चालवण्यासाठी तिच्यापासून एक पुत्र हवा आहे. तेवढा मिळाला की माझी गरज पूर्ण होईल. तिचे नांव आहे माधवी. ते घोडे आणि माधवी घेऊन गरुड आणि गलव ययातिचा निरोप घेतात तेव्हां बोलतात आम्ही परत आपल्याला भेटण्यास लवकरच येऊ. गलव गरुडाला बोलतो निदान कांहीं मार्ग सांपडला आहे तुझ्यामुळें. त्यानंतर गरुड त्याच्या ठिकाणी गेला. त्यानंतर गलव त्या माधवीला घेऊन निघाला अशा राजांच्या शोधात जे तिला स्वीकारून त्याला हुंडा देतील. त्यासाठी तो राजा हर्यास्व कडे जाण्याचे ठरवतो. तो इश्वाकू घराण्याचा राजा होता. तो अयोध्येवर राज्य करत होता. त्याच्या ताकदीची सगळीकडे तारिफ होत असें त्याच्याकडे चार प्रकारची सैनिकी दल होती. त्याच्या संपन्नतेची सर्वत्र चर्चा होत असे. तो त्याच्या प्रजाजनांत प्रिय होता. परंतु त्याला संतती नव्हती. ब्राह्मण गलव त्याला भेटतो व सांगतो जर तू माझ्या माधवीशी

लग्न केलेस तर तुला एक गुणी पुत्र ती देईल. परंतु. त्यासाठी तुला हुंडा द्यावा लागेल. ती देण्याचा विचार कर. राजाला पुत्र हवा होता परंतु त्याच्या कडेसुद्धा सहा हजार घोडे त्या वर्णनाचे नव्हते. तो फक्त दोन हजारच देऊ शकला असता.

भगवत यान पर्व भाग एकशे पंधरावा संपला.

# भगवत यान पर्व

## भाग एकशे सोळावा

नारद पुढे सांगतात, तो ख्यातनाम सम्राट हर्यास्व विचारात पडतो. त्याला पुत्र हवा होता व ती कन्या ययातिची आहे हे समजल्यावर तो विशेष खूष झाला होता. तो मुलीच्या लक्षणांची चौकशी करू लागतो. ती लक्षणं अशी,

हाताच्या दोनही पंजांचा मागील भाग गुबगुबीत असला पाहिजे, पाठीच्या मणक्याच्या दोन बाजूस असलेले भाग मांसल असले पाहिजेत, दोनही स्तन उन्नत व घट्ट असले पाहिजेत. ते तसे होते माधवीचे.

जे सहा भाग बाईच्या शरीराचे असें असले पाहिजेत ते आहेत, त्वचा मृदू असली पाहिजे, दांत मोत्याच्या दाण्यासारखे असले पाहिजेत, हाताची व पायाची बोटं निमूळती व लांबसडक असली पाहिजेत, कमर आणि मान बारीक असली पाहिजे, तसें ते भाग माधवीचे त्या प्रमाणे होते,

ते तीन भाग खोल असले पाहिजेत ते, बेंबी, आवाज आणि समजूतदारपणा ते माधवीचे तसे होते.

जे सात रक्तवर्णी असले पाहिजेत ते हाताचे पंजे, दोनही डोळ्याचे कोपरे, जिभ, ओठ, गाल, ते माधवीचे होते.

अशारितीने माधवी राजाच्या परीक्षेत उतरते. राजा गलवाला बोलतो ह्या मुलीला देव आणि दानव मोठ्या आनंदाने स्वीकारतील. त्याशिवाय ती विविध कला व शास्त्रांत प्रवीण आहे. इतर शुभ लक्षणं सुद्धा आहेत, त्यामुळें हि कन्या माझ्यासाठी योग्य आहे, तिच्या पासून मला एक पुत्र मिळाला तर चांगले होईल. तिच्या पासून होणारा पुत्र सम्राट होईल तरी तुला हुंडा किती पाहिजे ते सांग"?

गलव सांगतो कीं, त्याला दोन हजार कुलिन घोडे पाहिजेत जे चंद्रासारखे नितळ शुभ्र आहेत व एक कान काळा आहे. तो हुंडा जर तू दिलास तर हि कन्या तुझ्यासाठी एक पुत्र देईल व त्यानंतर मी तिला घेऊन जाईन".

राजा हर्यास्व त्या ब्राह्मणाला सांगतो त्याच्याकडे फक्त आठशे त्याप्रकारचे घोडे आहेत इतर घोडे यज्ञात बळी देण्याच्या कामाचेच आहेत, त्याशिवाय माझ्या राज्यात इतरत्र कितीतरी त्याप्रकारचे घोडे असतील परंतु आत्ता एवढेच आहेत. व्यवहार तुटतो आहे असे दिसते तेव्हां माधवी गलवाला बोलते, "जे मिळतात ते ताब्यात घ्या आणि एक पुत्र दिल्यावर मी परत तुझ्याकडे येईन तेव्हां आपण दुसऱ्या राजाकडून अशाच प्रकारे सौदा करून उरलेले घोडे मिळवू. गलवाला ते योग्य वाटते. गलव म्हणतो कीं, एकदा लग्न झाल्यावर तुझे कौमार्य संपुष्टात येईल त्याचे काय"? माधवी त्याला सांगते, "अहो ब्राह्मण, ब्रह्माने मला आशिर्वाद दिला आहे कीं, एक पुत्र दिल्यावर मला पुन्हा कौमार्य प्राप्त होईल, त्यामुळें तो प्रश्न उरणार नाही. तेव्हां तू मला त्याला देऊन पहा". त्यामुळें गलवाला आणखीन आठशे घोडे मिळतात. गलव विचार करतो अशा प्रकारे आणखीन चार राजांकडून हुंडा घेऊन तो त्याची गरज पूर्ण करू शकतो. राजा त्या अटींवर तो सौदा मंजूर करतो. त्यामुळें यथावकाश ती एका पुत्राला जन्म देते ज्याचे नांव आहे, वसुमनस. पुढे तो महापराक्रमी सम्राट होतो. तो वसुंसारखा दिसत असतो. योग्य समयी गलव राजाला भेटतो व माधवी मागतो. त्याप्रमाणे हर्यास्व दिलेल्या शब्दाप्रमाणे माधवी त्याला परत करतो. माधवीसुद्धा त्या वैभवातून बाहेर पडते व ब्राह्मणाबरोबर जाण्याला निघते. राजाला सांगतो कीं, त्याचे घोडे राजाने सांभाळावेत जोवर तो ते मागत नाही. असे ठरल्यावर गलव आणि माधवी देवूदास नांवाच्या राजाकडे निघतात.

भगवत यान पर्व भाग एकशेसोळावा संपला.

# भगवत यान पर्व

## भाग एकशे सतरावा

नारद बोलतात माधवीला, आता आपण राजा देवूदासाकडे जात आहोत, तो राजा भिमसेनाचा मुलगा आहे. माझ्या बरोबर तुला यावे लागते ह्याबद्दल तुला त्रास होत असेल पण त्याचा माझा इलाज नाही, मला त्याबद्दल क्षमा कर. हा राजा संयमी आहे, इतर उत्तम गुण त्याच्यात आहेत त्यामुळे जर सौदा पटला तर तू आणखीन कांही काळ त्याच्या कडे मजेत राहू शकशील.

देवूदास त्यांचे यथोचित स्वागत करतो व त्यांच्या आगमनाचे कारण त्याला आधीच माहित असल्याचे सांगतो. तो त्यांना सांगतो त्याची परिस्थिती हर्यास्वा सारखीच आहे. त्याला सुद्धा पुत्र हवा होता. मला जेव्हां समजले कीं आपण माझ्याकडे त्यासाठी येत अहात मला संतोष झाला. मला एकच मुलगा मिळाला तरी ते योग्य असेल. त्यांचा विवाह होतो त्याच अटीनुसार. देवूदास माधवी बरोबर जीवन जगू लागतो जसें सूर्य प्रभावती बरोबर, अग्नी स्वाहा बरोबर, वसवा सांची बरोबर, चंद्र रोहीणा बरोबर, यम उर्मिले बरोबर, वरूण गौरी बरोबर, कुबेर सिद्धी बरोबर, नारायण लक्ष्मी बरोबर, सागर जान्हवी बरोबर, रुद्र रुद्राणी बरोबर, ब्रह्म सरस्वती बरोबर, वसिष्ठाचा मुलगा सक्त्री अद्रीस्यानी बरोबर, वसिष्ठ अरुंधती बरोबर, च्यवन सुकन्या बरोबर, पुलस्त्य संध्या बरोबर, अगस्त्य लोपामुद्रा बरोबर, सत्यवती सावित्री बरोबर, भृगु पुलोमा बरोबर, काश्यप अदिती बरोबर, जमदाग्नी रेणुका बरोबर, विश्वामित्र हेमवती बरोबर, बृहस्पति तारा बरोबर, शुक्र शतप्रवे बरोबर, भूमिपति भूमी बरोबर, पुरुरव उर्वशिबरोबर, ऋचिक सत्यवती बरोबर, मनु सरस्वती बरोबर, दुष्यंत शकुंतले बरोबर, धर्म धृती बरोबर, नळ दमयंती बरोबर, नारद सत्यवती बरोबर, जरत्कारू जरत्कारु बरोबर, पुलस्त्य प्रतिचा बरोबर, उर्नयूस मेनके बरोबर, तुंवृ रंभे बरोबर, वासुकी शतशिर्षा बरोबर, धनंजय कुमारी बरोबर, राम सीते बरोबर, जनार्दन रुख्मिणी बरोबर असा त्यांचा देवूदास व माधवीचा संसार होत होता. त्याना एक पुत्र झाला त्यानंतर गलव परत आला व माधवीला घेऊन जाण्याच्या गोष्टी करू लागला. राजाने दिलेल्या शब्दाप्रमाणे माधवी त्याला परत केली. गलव त्याला सांगतो त्याच्या घोड्यांचा निगा तो पाहिल कारण ते घोडे विश्वामित्राचे आहेत.

भगवत यान पर्व भाग एकशे सतरावा संपला.

# भगवत यान पर्व

## भाग एकशे अठरावा

नारद पुढे सांगतात, माधवी ते वैभव सोडून गलवाबरोबर निघाली. आता ते भोजांच्या नगरीकडे जातात. तेथे राजा उशिनराला भेटतात कारण त्यालासुद्धा पुत्र पाहिजे असतो. राजाला भेटल्यावर तो ब्राह्मण गलव त्याला सांगतो कीं, ही माधवी त्याला पुत्र देईल पण त्यासाठी त्याला हुंडा द्यावा लागेल जसे तो आधीच्या राजांना बोलत होता ते बोलतो. तो सांगतो हि कन्या तुला दोन पुत्र देऊ शकते जे सूर्य आणि चंद्रासारखे तेजस्वी असतील. त्यासाठी त्याला गलवाला आठशे घोडे त्या प्रकारचे द्यावे लागतील. ते घोडे विश्वामित्राचे असतील कारण ती माझ्याकडून त्याला गुरूदक्षिणा आहे. माझ्या अटी मान्य असतील तर बोल. पुत्राशिवाय तू नरकात जाशील त्यापेक्षा माझा प्रस्ताव स्वीकारशील तर सुखी होशिल. राजा त्याला सांगतो, तुझ्या अटी मान्य आहेत पण माझ्याकडे फक्त दोनशे घोडे त्या प्रकारचे आहेत. ते घोडे देतो हुंडा म्हणून व माधवी बरोबर माझे लग्न होऊ दे. दोन पुत्र झाल्यावर तू तिला घेऊन जा कारण मी तुझी गरज पूर्ण करू शकत नाही. तो राजा पुढे त्या ब्राह्मणाला बोलतो, अरे ब्राह्मणा हि जी संपत्ती आहे ती माझ्या प्रजेची आहे. मी फक्त माझ्या योगक्षेमा पुरते वापरू शकतो त्यांमुळें मी ती तुझ्यावर उधळू शकत नाही. त्यांचे लग्न होते. गलव वनात तपस्या करण्यासाठी नेहमीप्रमाणें जातो. उशीनर आणि माधवी सुखाने संसार करू लागतात. यथावकाश त्यांना एक पुत्र होतो. त्याचे नांव सिवी ठेवले जाते. तो एक महापराक्रमी सम्राट होतो. सिवीच्या जन्मानंर गलव येतो व माधवीला घेऊन जातो. आता त्याची दक्षिणेची गरज पूर्ण झालेली असते व म्हणून तो गरुडाला भेटण्याचे ठरवतो.

भगवत यान पर्व भाग एकशे अठरावा संपला.

# भगवत यान पर्व

## भाग एकशे एकोणीसावा

नारद पुढे सांगतात, गलवाला पाहून विनताचा मुलगा हसत हसत त्याला विचारतो, "अहो ब्राह्मणा, तुझे नशिब सुधारले कीं नाही"? गलव त्याला सगळे जे घडले ते सांगतो. तो पुढे बोलतो की अजून काम पुरेसे झालेले नाही. ते ऐकून गरुड त्याला बोलतो किं, त्याने माधवीला घेऊन विश्वामित्राकडे जावे. आणखीन घोडे मिळवण्यासाठी प्रयत्न करण्यात समय वाया दावडू नकोस. त्यात तूला यश येणार नाही. तुला सांगतो फार प्राचीन काळी, ऋचिकने कन्यकुंज्व गधीच्या मुलीचा सत्यवतीचा हात मागितला होता. त्यावर गधी त्याला बोलला, "अहो ऋषी, मला एक हजार शुभ्र घोडे एक कान काळा असलेले आणून दे". ऋचिक त्या उत्तर देतो, तथास्तु, त्यानंतर तो अश्वतीर्थाला जातो, ते वरुणाचे घर आहे. त्याला पाहिजे होते तसे घोडे मिळाले ते तो गधीला देतो. गधीने ते घोडे ब्राह्मणांना दानात दिले. उरलेले चारशे घोडे वितस्ता नदीवरून जात असतांना नदीत बुडले. म्हणून तू जसे समजतोत तसे नेहमी होत नसते. म्हणून आता तू असें कर, ह्या मुलीला घेऊन तुझ्या शिक्षकाकडे जा आणि त्याला ते घोडे आणि ही कन्या देऊन विचार कीं, ह्याने दक्षिणा पुर्ण होईल कां? कारण अरे ब्राह्मणा हि कन्या त्या सगळया घोड्यांपेक्षा जास्त मोठी गोष्टच आहे". गलव त्यानी मिळवलेले घोडे आणि माधवीला घेऊन तो विश्वामित्राकडे गरुडाबरोबर जातो. विश्वामित्राला बोलतो, "हे आठशे घोडे तुम्हाला हवे होते ते आणि उरलेल्या घोड्यांच्या बदल्यात ही कन्या मी आणली आहे. ह्याने काम होईल कां"? म्हणून विचारतो. पुढे तो सांगतो, "ह्या कन्येने आता पर्यंत तीन गुणी मुलांना जन्म दिला आहे व ती त्यानंतर सुद्धा कौमार्यातच आहे. ती ययातिने मला दानात दिली होती जेव्हां मी त्याच्याकडे घोड्यांचे दान मागितले होते. ते ऐकल्यावर विश्वामित्र त्याला गरुडासमक्ष विचारतात, "अरें तुला जर ही मुलगी मिळाली होती तर तिलाच त्यावेळी माझ्याकडे कां नाही आणलेस? मी तेव्हांच तुला मुक्त केले असते, किती भोळा आहेस रे ब्राह्मणा, तुझ्यात किंचितसा वैश्य गुण नाही रे, जर ही आधी आणली असतीस तर मी चार पुत्र तिच्याकडून मिळवले असते, माझ्या कुळाच्या उद्धारासाठी". त्यानंतर ते आणलेले घोडे विश्वामित्र वनात सोडून देतो. विश्वामित्र माधवी बरोबर मजेत कालक्रमणा करू लागतो. माधवीला त्याच्या पासून एक मुलगा होतो. त्याचे नांव अष्टक. अष्टकाला त्याचा पिता

पुण्य आणि हित ह्यांचे संतुलन कसे करावयाचे ते शिकवतो. त्याला सहाशे घोडे देतो व शहराकडे जाण्यास सांगतो. अष्टक त्या सोमनगरी सारख्या तेजस्वी नगरात जातो आणि स्वतः विश्वामित्र माधवीची जबाबदारी आपल्या शिष्यांना देऊन तपोश्र्चरण करण्यासाठी अरण्यात जातो. गलव गरुडासह निघून जातो. त्या आधी गलव माधवीचे आभार मानण्यासाठी तिला बोलतो, "अहो गुणी कन्या, तू तीन मुलांना जन्म देऊन तीन राजांना वाचवले आहेस, त्यामुळें तू तुझ्या पित्याला, मला आणि त्या चार राजांना नरकापासून वाचवसे आहेस. तुझे उपकार झाले आम्हा सगळयांवर. असें तो आभार व्यक्त करतो आणि तपोश्र्चरणासाठी स्वतः वनात निघून जातो. विश्वामित्राचे शिष्य माधवीला राजा ययातिकडे घेऊन जातात व तिला त्याच्या स्वाधीन करतात.

भगवत यान पर्व भाग एकशे एकोणीसावा संपला.

# भगवत यान पर्व

# भाग एकशे विसावा

नारद पुढे सांगतात, राजा ययाति माधवीचा स्वयंवर करण्याचे ठरवतो. त्यासाठी तो तिला घेऊन गंगा आणि यमुना नद्यांच्या उगम स्थानी असलेल्या आश्रमांत जातो. त्यांच्या बरोबर माधवीचे भाऊ पुरु आणि यदू असतात. त्या सुमारास त्या ठिकाणी नांग लोकांचा मोठा मेळावा जमलेला होता. त्यात तक्षक आणि कांहीं माणसेसुद्धा सामील होती. त्या बरोबर गंधर्व, विविध प्राणी, पक्षी आणि त्या डोंगराळ भागातील वन्य लोक सुद्धा जमा झाले होते. तेथे असलेल्या वनातील ऋषीसुद्धा जमा झाले होते. ती सगळयांना नमस्कार करते आणि त्या पवित्र वनात तपस्या करण्यासाठी निघून जाते. जणूकाय तिने वनाला वरले होते. तेथे ती घोर तपस्या करते इतकी कीं ती तेथील हरणात मिसळून जाते. ती हरणांप्रमाणे कोवळी गवतं खाऊन राहू लागते. तेथील झऱ्यातील शुद्ध पाणी पिऊन रहात असते. ती त्या जंगलातील हरणांबरोबर भटकत असते. माधवीने कठोर ब्रह्मचर्य आचरलेले असते. तिचे अध्यात्मिक तेज वाढत असते. त्याच सुमारास तिचा पिता त्याचे जीवन संपवून निघालेला असतो. त्याचे वंशज पुरु आणि यदू कुळातील मोठे भरभराटीला आलेले होते. त्यातील नहुष ख्यातनाम झाला होता. हजारो वर्षे स्वर्गात ऋषींच्या बरोबर रहात असतांना एक मूर्खपणा करतो. तो त्याच्या अहंकारामुळें ऋषी, देवगण आणि इतर गुणीजनांकडे दुर्लक्ष करतो. स्वर्गाचा राजा शक्र ते समजतो कीं, ययातिचा अहंकार वाढलेला आहे. तो प्रश्न विचारू लागतो, "हा कोण इसम आहे? हा कोणाचा पुत्र आहे? हा स्वर्गात काय करत आहे? कोणत्या कर्मामुळें त्याला हे यश प्राप्त झाले? त्याला कोणी ओळखतो कां? कोणी स्वर्गस्थ ह्याला ओळखतात कां"? असें सगळयांना विचारू लागतो व त्यावेळी कोणीही स्वर्गस्थ त्याला ओळखत नसल्याचे सांगतात आणि ययातिचा पाणउतारा होतो. तो पृथ्वीवर फेकला जातो.

भगवत यान पर्व भाग एकशे विसावा संपला.

# भगवत यान पर्व

## भाग एकशे एकविसावा

नारद पुढे सांगतात, ते झाल्यावर त्याला काय चुक आपल्या कडून झाली ते समजते व तो घाबरून जातो. तो अपमान त्याला अस्वस्थ करतो. त्याची बुद्धी काम करेनाशी होते. त्याच्या अंगावरील स्वर्गीय दागिने जातात आणि तो असा होतो कीं कोणी त्याला ओळखू शकत नाही. अशा अवस्थेत तो पृथ्वीवर खाली डोक्यावर पडतो. तो पडत असतांना विचारतो स्वतःला कीं, असा कोणता विचार माझ्या मनात आला म्हणून माझे असें अधःपतन शक्र करतो? ते होत असतांना स्वर्गातील सिद्ध, अप्सरा, त्याच्याकडे पाहून हसत असतात ते तो पहातो. ते पहात असतांना एक दूत येतो ययाति जवळ ज्याचे काम असते भ्रष्ट स्वर्गीयाला पृथ्वीवर फेकावयाचे. तो त्याला सांगतो कीं, त्याला कां स्वर्गातून रद्द केले आहे, कारण तसे सांगण्याची पद्धत होती. तो सांगतो तू फार गर्विष्ठ झाला आहेस. तुझा अहंकार मातला आहे म्हणून तू येथे रहाण्या योग्य राहिला नाहीस. तू सगळयांचा अपमान करत होतास स्वर्गात ते चालत नाही. म्हणून तुला पृथ्वीवर जावे लागेल. अरे राजा तू स्वर्गात रहाण्यास नालायक ठरला आहेस. जा आता तुला मी खाली टाकत आहे. ते ऐकल्यावर राजा बोलतो जर माझा अधःपात होणार आहे तर मला सज्जन लोकांत टाका. त्यानंतर तो विचार करू लागतो कोणत्या लोकांत मी पडावे? त्याला चार सामर्थ्यवान राजे दिसतात ज्यांच्यात तो पडणार असतो. ते प्रदर्धन, वसुमनस, सिवी, आणि अष्टक होते. ययाति त्यांच्यात जाऊन पडतो. त्या वेळेस ते चारही जण निमिषात जमले होते. ते राजे ययातिला पाहून त्याचे शुद्धीकरण करण्यासाठी वाजपेय यज्ञ करतात. त्या यज्ञाच्या होमातून जो धूर येत होता तो थेट स्वर्गात पोहोचतो. त्याची धार अशी दिसत होती कीं, जणूकाय तो धूर पृथ्वी आणि स्वर्गांना जोडणारा एक सेतू असावा. त्याची तुलना गंगेच्या धारेशी करता यावी अशी ती धार होती. ययाति त्यांच्यात पडल्यानंतर पहातो कीं, ते सगळे राजे त्याचे आप्तसुद्धा आहेत. ते चार राजे त्याला पाहतात व विचारतात, आपण कोण अहात? आपण कोणी यक्ष अहात कां? कां गंधर्व कीं राक्षस? आपण मानव दिसत नाही, कोणत्या उद्देशाने आपण भूमीवर आला अहात? ययाति त्यांना सांगतो, "मी राजर्षी ययाति आहे. माझे पुण्य संपल्यामुळें मला स्वर्गातून खाली टाकण्यात आले आहे. ते ऐकल्यावर त्या सात्त्विक राजांना वाईट वाटते व ते ययातिला बोलतात

कीं, ते त्यांचे सगळे पुण्य त्याला देण्यास तयार आहेत. मला गुणी लोकांत टाका असें सांगितले होते त्याप्रमाणे त्या स्वर्गीय सेवकांनी मला तुमच्यात टाकले आहे. ययाति त्यांना सांगतो, "अहो मी ब्राह्मण नाही कीं, कांहीं दान घेईन, मी क्षत्रिय असल्यामुळें मला माझे पुण्य माझे स्वतः कमवावे लागेल. मी आपल्या पुण्याचा हिस्सा घेऊ शकत नाही व ते मला शोभणारसुद्धा नाही". नारद पुढे सांगतात, त्या सुमारास माधवी भटकत भटकत त्या अरण्यात आली होती. ती त्या चार राजांना पहाते. तेसुद्धा तिला पहातात व उठून तिला वंदन करतात. ते विचारतात माधवीला ती कोणत्या कारणांने येथे आली आहे? पुढे ते तिला सांगतात, आपण आम्हाला आज्ञा करा आम्ही आपले काम करू. आम्ही आपलीच मुलं आहोत. ते ऐकून माधवीला फार संतोष होतो. त्यानंतर ती ययातिला पहाते व त्याच्याजवळ जाते. ती आपल्या पित्याला वंदन करते. माधवी तिच्या मुलांच्या माथ्याला स्पर्श करते व दुवा देते, त्यानंतर ती ययातिला बोलते, "हे माझे मुलगे आहेत म्हणजे तुमच्या मुलीचे मुलगे आहेत. आपण एक कुटूंब आहोत. तुम्ही तुमच्या नातवंडांची मदत घेऊ शकता, तशी प्रथा आहे. त्यात कांहींच गैर नाही असें ती तिच्या पित्यास सांगते. पुढे ती त्या सगळयांना सांगते अरण्यात हरणासारखे राहून मी सुद्धा पुण्य जमवले आहे". ती ययातिला समजावते कीं, संततीच्या पुण्याचा वाटा घेण्यात पित्याला कमीपणा वाटण्याचे कारण नाही. माझ्या पुण्याईचासुद्धा मी आपल्याला वाटा देण्यास तयार आहे. ते माधवीचे संभाषण ऐकून ते पुण्यवंत राजे माधवी आणि ययातिला त्यांचे आई आणि आजोबा म्हणून पुन्हा एकदा वंदन करून त्यांच्या पाया पडतात. त्यांचा निर्धार होतो कीं, ते त्यांचे पुण्य देऊन त्यांच्या आजोबाला परत स्वर्गात पाठवणार. त्याच वेळी गलव सुद्धा त्या निमिषाच येतो व त्या सगळयांना पहातो. ते राजे मोठ्याने ओरडून सांगत असतात कीं, ते त्यांचे पुण्य त्यांच्या आजोबास देण्यास तयार आहेत. गलव सुद्धा ययातिला सांगतो, "अहो राजे, तुमच्या कृपेमुळें मी ऋणमुक्त झालो आहे तेव्हां मीसुद्धा तुमच्यासाठी माझे पुण्य देण्यास तयार आहे ते घ्या आणि परत स्वर्गात जा".

भगवत यान पर्व भाग एकशे एकविसावा संपला.

# भगवत यान पर्व

# भाग एकशे बाविसावा

नारद पुढे सांगतात, जसें ते पुण्यवंत त्यांचे पुण्य ययातिला देण्याचा निर्धार सांगतात, राजा ययाति उचलला जातो व पुन्हा स्वर्गात नेला जातो. तेथे गेल्यावर त्याची सगळी चिंता संपुष्टात येते व तो पुन्हा त्याच्या स्वर्गीय तेजाने चमकू लागतो. त्याचे पाय पृथ्वीला लागतच नाहीत. त्यासुमारास, वसुमनस ओरडून जाहिर करतो कीं, त्याचे सगळे पुण्य, त्याचा सगळा चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया ज्यांने तो पुण्य जमवत आहे तेसुद्धा तो त्याच्या आईच्या पित्यास देत आहे. अशा घोषणांमुळें ययातिचे पुण्य वाढत जाते व तो स्वर्गात जाण्यास योग्य होतो परंतु, नारद तेथे सांगतात किं, त्यामुळें ययातिचा अहंकार कमी झालेला नसल्यामुळें ययाति स्वर्गाच्या दरवाजा पर्यंतच जातो, आत प्रवेश मिळत नाही. क्षात्रतेजाने चमकणारा सदैव पुण्यकर्मात व्यग्र असलेला प्रदर्धन बोलतो, माझे सगळे श्रेय मी आपल्याला प्रदान करत आहे. त्यानंतर उशिनराचा प्रज्ञावंत मुलगा सिवी त्याच्या गोड आवाजात बोलतो, मी कधीही खोटे बोलत नाही, परिस्थिती कशीही असो, त्या पुण्याईचे मी आपल्याला दान करत आहे. त्यामुळें आपल्यासाठी स्वर्गाचे द्वार उघडेल. मी सगळे त्याग करू शकतो पण सत्याची कांस सोडू शकत नाही. त्या एका गुणामुळें सगळे लोकपाल देव माझ्यावर संतुष्ट असतात. ते माझे सत्य तुमचा स्वर्गाचा रस्ता सोपा करण्यात मदतगार हो. शेवटी राजर्षी अष्टक बोलतो, "मी शेकडो पुंड्रीक यज्ञ, गोसव यज्ञ, वाजपेय यज्ञ केले आहेत. त्या सगळयांचे पुण्य मी आपल्याला दान करत आहे. मी ते यज्ञ करतांना कसलीच चुक केलेली नाही. असें सगळे माझे श्रेय मी तुम्हाला देत आहे". ते तो बालत असतांना ययातिसाठी स्वर्गाचे दरवाजे थोडे थोडे उघडू लागतात. त्या राजांच्या पुण्याईमुळें ययातिला आणखीव एक संधी मिळते स्वर्गात प्रवेश मिळण्याची. त्या चार राजांच्या पुण्याईचा परिणाम दिसत होता.

ते चार जण व माधवी एकत्र जोरांने ओरडून बोलतात, कीं, आमची सगळी पुण्याई त्यांना मिळो.

भगवत यान पर्व भाग एकशे बाविसावा संपला.

# भगवत यान पर्व

## भाग एकशे तेविसावा

नारद पुढे सांगत असतात, त्या गुणी राजांच्या कृपेने ययाति पुन्हा स्वर्गात गेला. त्याचे रितसरपणे स्वागत झाले. तो तेथील स्वर्गीय पाण्याने आंघोळ करतो. अत्तरं लावतो. गळयात दैवी फुलांच्या माळा घालतो. हे सगळे होते कारण त्याच्या वंशजांनी त्याच्यासाठी त्याग केलेला असतो. स्वर्गीय गाण्याच्या आवाजाने त्याचे अप्सरा स्वागत करतात. गंधर्व, असुर त्याच्यासाठी गाणी गाऊ लागतात. जसे स्वर्गात प्रवेश मिळण्याने होते ते सारे होते. विविध राजर्षी आणि चरण त्यांचे कौतुक करू लागले. देवता त्याची आरती ओवाळतात. त्याचा मोठा सत्कार करतात. त्याला आत्म्याची शांती मिळते, ब्रह्मदेव त्याला बोलतात, "तू तुझ्या पृथ्वीवरील प्रतिष्ठेने धन्य झाला आहेस. आता तू कायम येथे राहू शकतोस. परंतु, तुझ्या गर्विष्ठपणामुळें तुझे स्वर्गातील स्थान घालवले आहेस. परंतु, तुझ्या मुलीच्या व नातवांच्या प्रेमाने तू वाचला आहेस. ह्यापुढे तरी तू असा गर्विष्ठपणा करणार नाहीस अशी अपेक्षा आहे". ययाति त्यावर उत्तर देतो, "अहो पवित्र, मला एक शंका आहे ती विचारू इच्छितो. अहो ब्रह्मदेव, माझे कर्तृत्व मोठे होते, माझ्या गुणांनी मी ते मिळवले होते, त्यासाठी अनेक यज्ञ मी केले होते. दान दिली होती, असे सगळे माझे कर्तृत्व एका क्षणात कसे संपुष्टात आले? आपण जाणता कीं, माझ्यासाठी जे क्षेत्र दिले होतो ते नित्य होते मग अशाप्रकारे त्यात अचानक बदल कसा झाला"? सगळी माझी पत प्रतिष्ठा क्षणात कशी नष्ट होऊ शकते"? ब्रह्मदेव त्याला उत्तर देतात, हजार वर्षाचे उत्तम कार्य आणि यज्ञाने मिळवलेले पुण्य एका चुकीने संपू शकते. त्यामुळें तू पृथ्वीवर फेकला गेलास. गर्व हा मोठा दोष आहे. अहंकाराची ती अवस्था स्वर्गात रहाणाऱ्यांना मंजूर नसते. गर्व करणे स्वर्गातील लोकांना पसंत नसते. गर्व असल्यास तो स्वर्गात रहाण्यास अयोग्य असतो. तुझे सत्कर्म हे तू ब्रह्माला अर्पण केल्यानंतर तू गर्व कसा करू शकतोस? तुझे कांहीं नाहीच मग गर्व कसला? ज्या अर्थी गर्व तू करतोस त्याअर्थी तू तुझे सत्कर्म अजून मनाने ब्रह्माला अर्पिलेले नाहीस मग अशा परिस्थितीत तू स्वर्गात रहाण्यास अयोग्य झालास म्हणून पृथ्वीवर पुन्हा सुधारण्यासाठी फेकला गेलास. गर्व, दुराभिमान, शक्तीची घमेंड, द्वेष, कपटीपणा, हे तेव्हांच उत्पन्न होतात जेव्हां तू कोणाला तुझ्यापेक्षा कमी लेखू लागतोस.

गर्व करणे हे मोठे पाप असते. त्यामुळें अनेक वर्षाचे पुण्य कर्म व्यर्थ जात असते. जे ह्याचा विचार करतील ते त्या पापापासून बचावतील.

नारद पुढे सांगतात त्या सभेतील मंडळीना की, अहो ह्या सभेतील सदस्यानो, पहा गर्वामुळें ययाति सारख्याची काय अवस्था झाली आणि गलव एक ऋषी असूनही केवळ हट्टामुळें तो कसा नको त्या संकटात पडला होता. विश्वामित्र त्याला दक्षिणेपासून मुक्ती देत असतांना तो त्याच्या अहंकारामुळें त्यांना पुन्हा पुन्हा दक्षिणा काय देऊ असे विचारत राहिला ज्याची गरज नव्हती. म्हणून माणसाने गर्व आणि हट्टीपणा जी दोन अहंकाराची रुप आहेत ती सोडावयाची असतात. हट्ट हा मोठा दोष सांगितला आहे. तो माणसाचा नाश करतो. प्रत्येक गोष्टीची मर्यादा असते ती सांभाळून आपण आपल्या इच्छा ठरवावयाच्या असतात. हे समजावे म्हणून मी ह्या दोन कथा तुम्हा सगळयांना सविस्तरपणे सांगितल्या. पुढे तो मुनी बोलतो, "अरे गांधारीच्या मुला, तू गर्व आणि हट्ट (प्रतिष्ठेचा प्रश्न) ह्याच अडकलेला आहेस. म्हणून त्या दोन दोषांची मी येथे विशेष चर्चा सोदाहरण करीत आहे. तुझा गर्व सोडून तू पंडुच्या मुलांबरोबर समझौता कर. ते केल्याने अनेकांचे जे चांगले व्हावयाचे ते होईल पण तुझ्यासाठी मोठा फायदा असा कीं, तू तुझा गर्व आणि हट्ट सोडल्यामुळें मृत्यूनंतर स्वर्गात सहजपणे जाऊ शकशिल. इंद्र तुझे तेथे स्वागत करील, ययाति सारखा पृथ्वीवर फेकला जाणार नाहीस. तुझा क्रोध सुद्धा विनाकारण आहे. त्यागाचे महत्व तुला समजले असें ब्रह्माला दिसेल. उचित त्याग हा यज्ञात आहुती देण्यासारखा असतो. त्यामुळें कधीही भलेच होत असते. मी जे सांगतो आहे ते विविध प्राचीन धर्मग्रंथातून वेगवेगळया प्रकारे निवेदन केलेले आहे, त्यात कांहीं नवीन मी सांगत नाही. तुलासुद्धा ते माहीत आहे पण तुझा अहंकार तुला अडवत आहे. त्याला आवरते घाल, त्यामुळे सगळयांचे भले होणार आहे. हाच पुण्य आणि हिताचा मार्ग आहे. असें केल्यास तू ह्या पृथ्वीचा स्वामी होशिल.

भगवत यान पर्व भाग एकशे तेविसावा संपला.

## भगवत यान पर्व

## भाग एकशे चोविसावा

धृतराष्ट्र बोलतात, "अहो पवित्र मुनी, मला आपले म्हणणे मान्य आहे. तुमच्या सांगण्यात मोठे सत्य दडलेले आहे. मी आपल्या मताचाच आहे. अशारितीने प्रतिष्ठेचा प्रश्न करणे श्रेयस्कर नाही. परंतु माझ्याकडे ते अमलात आणण्याचे अधिकार नाहीत".

वैशंपायन सांगतात, कुरु राजा नारदांने असें बोलल्यानंतर कृष्णाकडे वळून बोलतो, "अहो केशवा, स्वर्गात जाण्याचा मार्ग तू सांगितला आहेस. त्याशिवाय एकंदर जगासाठी काय हितकारक आहे व कशात पुण्य आहे ते समजले. परंतु, ते सगळे मला मान्य असले तरी मी मुखत्यार नाही. मी निर्णय घेत नाही जरी मी नांवापुरता सम्राट आहे. सगळे अधिकार दुर्योधनाकडे दिलेले आहेत. त्यामुळें तो जे ठरवेल तेंच होणार आहे, मला पसंत असो अगर नसो. त्याशिवाय दुर्योधन माझ्या मतानुसार काम करत नाही असें मला समजले आहे. म्हणून मी अरे जनार्दना, तुला विनंती करतो कीं, तू त्याला नालायकाला समजावण्याचा प्रयत्न कर. तो कोणाचेच ऐकत नाही. त्याच्या चांडाळ चौकडीच्या मतानुसारच तो वागत असतो. खरे राजे तेंच आहेत. विदूर बोलोत, भिष्म बोलोत अगर त्याची आई बोलली, तो कोणाचेच ऐकत नाही. सगळयांची चेष्टा करत असतो. कोणालाही तो गांभिर्याने घेत नाही. आता तू त्या विकृत मनाच्या पापकृत्याची आवड असलेल्या राजाला सांगण्याचे प्रयत्न करावेस. खऱ्या मित्राला शोभेल असें ते होईल जर तू त्याला पटवू शकलास. ती आज्ञा समजून कृष्ण दुर्योधनाच्या जवळ जातो त्याला सांगण्यासाठी. गोड मधूर आवाजास कृष्ण सांगतो त्या कौरवाला, "अरे दुर्योधना, माझे जरा ऐक, मी केवळ तुझ्यासाठी सांगत आहे. तुझा जन्म एका श्रेष्ठ अशा कुळात झाला आहे. त्यासाठी तुझ्यावर एक जबाबदारी आहे कीं, तू अशा परिस्थितीत शहाणा निर्णय घेशिल. तू सगळी शास्त्र शिकला आहेस म्हणून तू जाणतोस काय योग्य आणि काय अयोग्य. जे हलक्या कुळात जन्म घेतात त्यांच्या कडून सल्ला घेणे व त्यानुसार काम करणे एका श्रेष्ठ कुळातील राजाला शोभणारे नसते कारण, त्या हलक्या कुळाचे संस्कार त्यांच्या सगळ्या विचारांत व कृतीत असतात. तू असें निर्णय घ्यावयास पाहिजे जे तुझ्या कुळाच्या इभ्रतीला शोभणारे असतील. मित्र म्हणून ते नीच कुळातील लोक असले तर कांहीं हरकत नसते पण त्याच्या विकृत मनातून आलेले विचार तू स्वीकारत आहेस हे चुकीचे आहे.

सतत तसे वागणे पापकारक असते. त्यामुळें अनर्थ होत असतो. तुझे नुकसान झाले तर त्या लोकांना कांही फरक पडत नाही. ज्या धोरणामुळें केवळ आपल्या कुळाच्या शत्रूंचा फायदा होईल असें कां तू वागत आहेस. सर्वनाश डोळयासमोर स्पष्टपणे दिसत असतांना तू असा धादांत चुकीचा निर्णय कां घेत आहेस. त्यापेक्षा जे तुझ्या पित्याला, आईला, विदूरांना आणि भिष्मांना उचित वाटते ते केल्याने तुम्ही सगळे एकत्र येऊन राज्य करू शकाल. जसे पूर्वी होते द्युताचा खेळ होण्या आधी. तुम्ही तुमचे सांभाळा व ते त्यांचे सांभाळतील. असें केल्याने धृतराष्ट्र, भिष्म, द्रोण, सोमदत्त, वल्हीक, कृप असें सगळे तुझे चाहते समाधान पावतील. त्या सगळया वडीलधाऱ्यांना तू कां दुःखी करत आहेस. तुला त्यांच्या विचारांची कांहींच किंमत नाही कां"? अश्वत्थामा, विकर्ण, संजय, विविंगसती, असें बरेच तुझे चाहतेसुद्धा तेंच सांगत आहेत त्यांच्या विचारांना तुझ्याकडे कांहींच किंमत नाही कां"? भावंडांत शातता आल्याने तुम्ही सगळे जग जिंकू शकाल. तू तुझ्या पुढच्या पिढीसाठी असा निर्णय घेऊन एक आदर्श उभा करू शकशिल. छोट्या मोठ्या राग रुसव्यात न अडकण्याचा आदर्श तू त्यांना देऊ शकशिल. जे बाप करतो तेंच मुलं करतात म्हणून तुझ्यावर एक मोठी जबाबदारी आहे कीं, तू चांगले उदाहरण त्यांच्या पुढे, तुझ्या पुढच्या पिढी पुढे ठेवशिल. तुझे पिता सांगतात कीं तू पांडवांशी समझौता करावा तर तसें तू कां करत नाहीस? प्रतिष्ठेचा प्रश्न कां करतोस? आपल्या सल्लागारांची तू अशारितीने कां अवहेलना करत आहेस? असे वागणाऱ्याचे अखेरीस अतोनात नुकसान होत असते. त्यामुळें त्यानंतर पश्चात्ताप करण्यासाठी सुद्धा तुला वेळ मिळणार नाही. सल्ला नेहमी गुणवंतांचा घ्यावयाचा असतो. जे स्वतः विकृत मनाचे आहेत त्यांच्याकडून सल्ला घेतला तर तो सल्लासुद्धा तसांच विकृत असतो व परिणामतः तुझे नुकसान होईल त्याचा विचार कर. स्वतःच्या हितचिंतकांच्या मताचा अव्हेर करणारा अंती घोर दुःखात जातो. त्याचा पृथ्वीसुद्धा त्याग करते. स्वतःच्या सामर्थ्यवान आप्तांचा त्याग करून जो परक्यांचे ऐकतो त्याला अंती कोणीही वाचवू शकत नाही. तू पांडवांच्या त्यांच्या जन्मापासून द्वेष करत असतांना ते मात्र तूझा द्वेष करत नाहीत हे तू कां लक्षात घेत नाहीस? ते पांचही जण क्रोध, द्वेष, ह्या दोषांपासून मुक्त आहेत. तू तसा कां वागू शकत नाहीस? गंधर्वानी तुला अटक केले होते तेव्हां पांडवांना तुला गंधर्वांकडून शिक्षा करता आली असता परंतु, त्यानी तुला गंधर्वांकडून सोडवले, ते कां ते माहित आहे कां? केवळ कुळाच्या इभ्रतीसाठी त्यांनी ते केले परंतु, त्याची तू आठवण कां ठेवत नाहीस? तुझ्या पांडवांशी होत असलेल्या कोणत्याही वागण्यात मला सुसंस्कृतपणा दिसत नाही. त्यांच्यावर रागावण्यासारखे कोणते असें कारण आहे ते सगळयांना सांगशील कां? अहंकाराची ती विकृत रुप आहेत त्यात, क्रोध, हट्ट, द्वेष, आसुया येतात. तू त्या दोषांत अडकला आहेस. अशामुळें तुझे अध्यात्मिक नुकसान होत आहे त्याचा तू विचार कां करत नाही"? तुला माहीत आहे कीं, माणसाचा जन्म अध्यात्मिक उद्धारासाठी असतो, त्यालाच जर तू विसरला

असशील तर तुझे अध्यात्मिक भवितव्य संपुष्टात आले आहे असें होईल. सत्ता, अधिकार हे दुय्यम आहेत. पांडव पहा कसे त्यांची अध्यात्मिकता सांभाळत सत्ता आणि अधिकाराच्या दिशेने वाटचाल करत आहेत. त्यामुळें अरे दुर्योधना, तू त्यांना युद्धात कधीच हरवू शकणार नाहीस. पांडव पृथ्वी आणि स्वर्ग ह्या दोघात आपले स्थान निश्चित करत आहेत त्या उलट तू पृथ्वीवरसुद्धा पुरेशा तयारीने काम करत नाहीस. पुण्य, हित ह्यांच्या इच्छांचे व्यवस्थापन कसे करावे ते नितीशास्त्रात तू अभ्यासले आहेस पण त्याचा तुला विसर पडला आहे. लोभाच्या आहारी गेलेले पुण्याचा त्याग करत स्वार्थ साध्य करण्यात गुंतलेले असतात. त्यांना थोडे कांहीं मिळते अथवा नाही मिळत परंतु, पुण्याचा नाश झाल्यामुळें त्याची अधोगती होत असते ते तू समजून घेत कां नाहीस. जीवनात काय श्रेष्ठ आहे, सत्ता, अधिकार कां पुण्य? जो पुण्य सांभाळत सत्ता आणि अधिकारात यशस्वी होतो तो खरा क्षत्रिय समजला जातो. जो पुण्याचा त्याग करून सत्ता आणि अधिकाराच्या मागे लागतो तो भ्रष्ट क्षत्रिय समजला जातो. तुझ्यातील क्रोध, हट्ट, द्वेष ह्या दोशांमुळें तू पुण्यापासून दूर जात आहेस. त्यामुळें दैविक शक्तीसुद्धा तुला सोडून जात आहेत. अरे दुर्योधना, जे लोक सज्जनांशी कपट कारस्थानं करतात ते त्यांच्या स्वतःच्या पायावर धोंडा टाकत असतात. दुर्जनांच्या सहवासात तू असें चुकीचे निर्णय घेत आहेस ते थांबवलेस तर त्यातच तुझे भले आहे. दुर्जन कधी कोणाचे भले करत नाहीत, ते फक्त वाईट करण्यात गुंतलेले असतात. अशांपासून तू दूर राहिले पाहिजेस. तुला अजून सांगता येत नाही कीं, नेमके असें काय कारण आहे कीं, तू पांडवांचा द्वेष करत आहेस? जर अशा परिस्थितीत युद्ध झाले तर मला सांग असा कोणता तुझा दोस्त आहे कीं, तो भिमाला आव्हान देऊ शकेल, अर्जुनाला आव्हाम देऊ शकेल? मला सांग कोणाच्या हिम्मतीवर तू हे युद्ध करू इच्छित आहेस"? मला तरी असा कोणीही योद्धा तुझ्या बाजूने दिसत नाही ज्याच्या आधाराने तू तेयुद्ध जिंकू शकशिल. काय दुःशासन आहे, कां सुवल आहे, कां कर्ण आहे, कां दुर्विंश आहे, कां कोण इतर आहे जो पांडवांशी युद्ध करू शकेल. दुसरे आहेत भिष्म, द्रोण, कृप, अश्वत्थामा, भूरिश्वर, सोमदत्त, जयद्रथ हे अर्जूनाशी मुकाबला करू शकतील कां? त्यातील कांहींनी स्पष्ट सांगितले आहे कीं, ते युद्धात केवळ औपचारीकता म्हणून भाग घेणार आहेत व पांडवांशी लढणार नाहीत. ह्याचा अर्थ असा आहे कीं, तुझा हट्ट युद्ध करण्याचा कोणत्याही विवेकांनी केलेला नाही. फक्त भावनिक निर्णय आहे, ज्यात प्रतिष्ठेचा प्रश्न गुंतलेला आहे. तुला चांगलेच माहित आहे कीं, क्षत्रियांनी कधीही निर्णय विवेकांनी घ्यावयाचे असतात कारण भावनिक निर्णय चुकीचे असतात, ते नाशास कारणीभूत असतात. अरे दुर्योधना देव, असुर, गंधर्व, राक्षस असे कोणीही धनंजयाशी दोन हात करण्यास समर्थ नाहीत अशा परिस्थितीत तू कोणाच्या बळावर हा युद्ध करण्याचा निर्णय ठामपणे घेत आहेस ते आम्हाला सांग. जर हे निश्चत आहे कीं, युद्ध झाले तर त्यात तुझ्या सैन्याचा दारूण पराभव होणार मग हा

अविवेक कां करत आहेस? तुला माहीत आहे खांडवप्रस्थात पांडवांनी कसे सगळे गंधर्व, यक्ष, पन्नग मारून ते मोकळे केले होते. सगळयांना माहित आहे जेव्हां तुझे कौरव विराटाची गुरं पळवण्यासाठी मत्स्यदेशात गेली होती तेव्हां एकट्या अर्जुनाने बाईच्या वेषात असूनही तुम्हा सगळयांची कशी फजिती केली होती. ते माहीत असूनही तू युद्धाचा निर्णयाला कां धरून आहेस? अर्जुनाकडील दैवी अस्त्र आणि शस्त्र तुझ्या सगळया फौजांचा पाडाव करणार आहेत. अर्जुनाने साक्षात शिवाला द्वंद्वात आव्हान दिले होते त्यानंतर शिव त्याच्यावर संतुष्ट झाले आणि त्यांनी त्यालान त्यांची जहाल आयुध प्रदान केली हे सर्वश्रूत आहे. अशा पांडवांशी लढण्याचा विचार फत्क एक मूर्ख माणूसच घेऊ शकतो. तू मूर्ख आहेस कां? अरे, ज्याच्याशी साक्षात इंद्र लढण्याच्या गोष्टी करत नाही त्याला तू आव्हान देत आहेस ह्याचा अर्थ तुझी बुद्धी नाठी झाली आहे. तुझ्या एकट्याच्या चुकीच्या निर्णयामुळें हे सगळे मरणार हे कोणालाही पसंत नाही. जर तू पांडवांशी समझौता केलास तर तू तुमच्या राज्याचा युवराज घोषित केला जाशील व तुझे पिता सम्राट रहातील. त्यामुळें तुमची हल्लीची समृद्धी कायम राहील, मग काय हरकत आहे समझौता करण्याला? पृथाची मुलं त्यांच्या राज्याचे रहातील व दोघात मैत्री करारामुळें तुम्ही दोघे इतर राजांवर सत्ता गाजवू शकाल. आणखीन काय पाहिजे तुला"?

भगवत यान पर्व भाग एकशे चोविसावा संपला.

# भगवत यान पर्व

## भाग एकशे पंचविसावा

वैशंपायन पुढे सांगतात, केशवाचे ते बोलणे ऐकल्यावर शंतनुपुत्र भिष्म बोलतात दुर्योधनाला, "कृष्णाने जे उचित आहे तेंच तुला आता सांगितले आहे. ते जर तू मान्य केलेस तर शांतता आपल्या कुटूंबात नांदणार आहे. त्यात क्रोधासारख्या दोषांना वाव नाही. त्याचे ऐक. त्यानुसार धोरणात बदल कर. जर ते तू केल नाहीस तर जी समृद्धी आहे तीसुद्धा रहाणार नाही तुझ्यासाठी. क्षत्रिय फक्त युद्ध करण्यासाठी नसतात, त्यांचे इतर कार्य असते शांतता राखणे. तुझ्या व इतर कुरु जनांच्या हिताचा सलाला त्यांने दिला आहे. पृथ्वीचे निर्मनुष्य होणे त्यामुळें टाळता येईल. धृतराष्टाराच्या जीवन काळातच तू सगळे बरबाद करणार आहेस कां? तुझ्या उद्धटपणाच्या वागण्यामुळें तुझे हितचिंतकसुद्धा तुझ्यापासून दूर जात आहेत. कृष्णाच्या आदेशाचे पालन केले नाहीस तर तुझ्याबरोबर तुझ्या सगळया आप्त्यांचा नाश होणे अटळ आहे. तू तुझ्या पित्याचे ऐकत नाहीस, तुझ्या काकांचे ऐकत नाहीस, तू माझे ऐकत नाहीस ह्याचा अर्थ काय? सगळया घराण्याचा नाश करण्याचा तुझा इरादा आहे कां? एवढा पापी होऊ नकोस कीं तुला नरकातसुद्धा जागा मिळणार नाही. भिष्माचे बोलणे झाल्यावर द्रोण बोलू लागतात, "कृष्णाचे सांगून गेला आहे ते तुझ्या आणि इतर संबंधित जनांच्या भल्याचे होते. शंतनु पुत्र सुद्धा योग्य तेच सांगत आहेत, तुझ्यामुळें तुझे पिता व माता दुःख सागरात बुडणार आहेत हेंच खरे". दुर्योधन ते ऐकत असतांना जोर जोरांने श्वास घेत असतो. फार मोठ्या दबावाखाली तो असल्याचे जाणवत होते.

द्रोण पुढे बोलतात, "ते दोघेही जगाचा अनुभव घेतलेले आहेत, त्यांचे ऐकणे तुझ्यासाठी बंधनकारक आहे. त्यांचे ऐक अरे राजा, आणि सगळयांचे भले कर. माधवाच्या सांगण्याला जर तू तुझ्या नेहमीच्या सवयीप्रमाणे दुर्लक्षिलेस तर मोठा अनर्थ होईल. तू युद्धात जिंकणे केवळ अशक्य आहे हे स्पष्टपणे दिसत असतांना तुला कां युद्धाचा आग्रह आहे? तुझे दोस्त तुला ह्या लढाईत यश मिळवून देऊ शकणार नाहीत कारण कृष्ण दुसऱ्या बाजूने आहे व जेथे जनार्दन तेथे विजय हा सृष्टीचा नियम आहे. उगाच लोकांचे वध का घडवू पहात आहेस. ह्या लढाईत तू आणि तुझे सगळे आप्त मारले जाणार आहेत. क्षत्रियांनी मरावयाला भ्यायचे नसते हे जरी खरे असले तरी नाहक मरणे हेसुद्धा क्षत्रियाला नामुष्किचे असते. क्षत्रिय मूर्खासारखा मरू नये. अर्जुन जमदाग्नींनी

सांगितले त्यापेक्षा जास्त पराक्रमी आहे. हे सगळे तुला आम्ही सगळे वारंवार सांगत आहोत. त्यापेक्षा जास्त सांगण्यासारखे आता कांहीं उरलेले नाही. तू शहाण्यासारखा सगळयांच्या हिताचा निर्णय घ्याव असें सांगतो".

वैशंपायन पुढे सांगतात, द्रोणांचे सांगणे संपल्यावर विदूर सांगू लागतात. त्याला त्याचा मोठा भाऊ प्रेमाने क्षत्री असें बोलत असे. उद्धट दुर्योधनाच्याकडे नजर रोखून तो सांगतो, अरे राजा मला तुझ्या मृत्यूमुळें मुळीच दुःख होणार नाही. परंतु मला ह्या वृद्ध जोडप्याची चिंता खात आहे. असें बोलून तो धृतराष्ट्र आणि गांधारीकडे पहातो. तुझ्या सारख्या नालायक मुलाला जन्माला घालण्याची मोठी चूक त्यांच्याकडून झालेली आहे. तू त्यांचा वारस झाला आहेस. त्यांची काळजी घेण्याचे काम इतरांना करावे लागत असते. त्यांना कोणी मित्र नाहीत. कोणी बोलायला नाही. जसें पंख तुडलेले पक्षी असावेत असें ते रहात आहेत. द्युताच्या खेळापूर्वी पांडवांची आई त्यांना आधार देत होती पण त्या दुर्दैवी प्रसंगानंतर ती त्यांना भेटू इच्छित नाही. एकच मैत्रीण होती तुझ्या आईला, कुंती वहिनी, तीसुद्धा तुझ्या मूर्खपणाने राहिली नाही. ते ऐकल्यावर पुढे विदूर कांहीं बोलणार इतक्यात धृतराष्ट्र मोठ्याने ओरडून दुर्योधनाला आज्ञा करतो कीं त्याने जसे कृष्ण सांगत होता तसेच केल पाहिजे. तो पुढे बोलतो कीं, एका कृष्णाच्या मदतीने आपण सगळे राजे सुखाने एकत्र राहू शकतो. कृष्णाचे नेतृत्व आपल्याला जे पाहिजे ते मिळवून देऊ शकते मग कशाला ह्या मारामाऱ्या करावयाच्या. तुला सुखच पाहिजे नं मग त्याच्या कृपेने ते भरपूर मिळेल. आपण त्याच्या बरोबर राहू. बाकी सगळे तो जगन्नाथ सांभाळून घेईल. युधिष्ठीर आणि तू दोघात मन मिलाफाचा कार्यक्रम योजू. त्यात आनंदी आनंद असेल. कृष्ण त्यात मुख्य भूमिका बजावेल. मला वाटते तसे करण्याची वेळ आली आहे. परंतु जर तू ही संधी गमावलीस तर तुला भविष्य उरलेले नसेल हे लक्षात ठेव.

भगवत यान पर्व भाग एकशे पंचविसावा संपला.

# भगवत यान पर्व

# भाग एकशे सव्विसावा

वैशंपायन पुढे सांगतात, धृतराष्ट्राचे ते बोलणे ऐकून पुन्हा भिष्म आणि द्रोण बोलतात, कीं, अजुन ते दोघे (अर्जुन व कृष्ण) त्यांची चिलखत नेसलेले नाहीत. त्यांची शस्त्रं तयार केलेली नाहीत, धौम्याने शत्रूचा नाश करणाऱ्या यज्ञात आहूती दिलेली नाही, महारथी युधिष्ठीर अजून त्याच्या नेहमीच्या कपड्यातच वावरत आहे, त्याने रागावून कौरवांकडे पाहिलेले नाही, तेवढ्याच आपण हे शत्रूत्व सोडण्यात अर्थ आहे. एकदा कां त्या गोष्टी होऊ लागल्या कीं, मात्र विनाश होणे अटळ आहे. तो महाबली भिमसेन त्याच्या आयुधांसह रणांगणात आलेला नाही तोवर शांततेच्या गोष्टी करून घेऊ. प्रिशताच्या घरातील दृष्टद्युम्न, नकूल, सहदेव आणि विराटाची मुलं, शिखंडी, शिशुपालाचा मुलगा त्यांची चिलखत नेसलेले नाहीत तोवर शांतता करार झाला पाहिजे. त्यांची पोलादाची शस्त्रं कौरवांच्या दागिन्यानी मढलेल्या राजांवर पडू लागली कीं सगळे संपले असें समजावे लागेल. युधिष्ठीराची मिठी मारून भेट घेत नाहीस तोवर व त्याच्याकडे झालेल्या सगळया गोष्टींबद्दल दिलगिरी व्यक्त होत नाही तोवर विनाश अटळ आहे. त्या सत्यवादी पंडुपुत्राचा पुजेचा हात तुझ्या पाठीवरून फिरू देत. तो सालवृक्षासारखा धिप्पाड भिम तुला प्रेमाने आलिंगन देऊ देत. तुझ्याशा प्रेमाने गप्पा मारू देत. ते अर्जुन व मांद्रीचे जुळे तुझ्या कपाळाचे प्रेमांने चूंबन घेऊ देत. तुम्हाला असे एकत्र असलेले पाहून आपले सगळे मित्र राजे आनंदाश्रू ढाळू देत. ह्या समझौत्याची वार्ता सगळीकडे वाऱ्यासारखी पसरू दे. पूर्वे कडील राज्य तू साभाळ आणि तुझ्या मनातील द्वेष आणि क्रोध झाडून टाक.

भगवत यान पर्व भाग एकशे सव्विसावा संपला.

# भगवत यान पर्व

## भाग एकशे सत्ताविसावा

वैशंपायन पुढे सांगत असतात, दुर्योधन ते सगळे ऐकत असतो जे त्याला मान्य नसते. त्यानंतर दुर्योधनाची पाळी येते बोलण्याची तेव्हां तो बोलतो, "अरे केशवा, तुला जे सांगावयाचे ते तू तुझ्या मताप्रमाणे सांगितले आहेस. ते मला आवडलेले नाही. मला आवडले नाही कीं, तुम्ही मलाच सगळा दोष देत अहात. तुला पार्थाच्या मुलांचा कळवळा आहे हे सगळे जाणतात. त्याप्रमाणे तुझा सल्ला आहे. आमच्या दोघांचे बळ पाहून मलाच कमी ठरवले आहे. मला माहीत आहे, तू आणि क्षत्री, माझे पिताश्री, आमचे शिक्षक आणि गुरू, स्वतः आजोबा सगळे मलाच खोटा शाबित करत आहेत. कोणीही कशाप्रकारे घटना घटल्या त्याचा विचार करत नाहीत. द्युताच्या खेळापासून ते सुरू झाले. पांडव म्हणजे युधिष्ठीर मोठ्या खूषीने खेळण्यास तयार झाला व त्याच्या अटीसुद्धा त्यांने स्वतःहून मान्य केल्या होत्या. त्यात माझा किंवा माझ्या कोणाचा काय दोष? खेळात तो हरत गेला त्यात माझा काय दोष? द्युत तो शकूनीशी खेळत होता माझ्याशी नाही, मग मला कसा दोष लागतो. त्यानंतर त्यांनी हरलेली सगळी त्याला मी परत केली तरी मी दोषी कसा? पुनः ते खेळावयाला आले, ते पुनः हरले. त्यांना खेता येत नाही हा काय माझा दोष? त्यावेळी ठरलेल्या अटींप्रमाणे ते वनवासात गेले त्याशिवाय एक वर्ष अज्ञातवासात गेले ते त्या अटींप्रमाणे झाले त्यात माझा कसा दोष? त्यासाठी ते मला त्यांचा शत्रू मानत असतील तर तो माझा कसा दोष? अरे कृष्णा मला सांग ते पांडव माझ्याशी कां भांडण उकरून काढत असतात? मी त्याना कोणती इजा केली आहे ते दाखवा. ते मात्र आमचा खतमा करण्याच्या गोष्टी कां करत आहेत ते सांगा. आम्हीसुद्धा क्षत्रिय आहोत त्याच पिंडाचे म्हणून मी त्यांच्या धमक्यांना घाबरत नाही. मी इंद्राला सुद्धा भित नाही. पंडुच्या मुलांना अजिबात आम्ही घाबरत नाही. काय करावयाचे आहे त्यांना ते त्यांनी करावे. आम्ही आमचे काय ते पाहून घेऊ. आम्ही सच्चे क्षत्रिय आहोत. मराणाला भिणारे नाही. युद्धात मरून आम्ही स्वर्गातच जाऊ त्यापेक्षा आणखीन चांगले कोणते हित आहे ते सांगा. आजारपणाने, रोगांने, अपघाताने असें बिछान्यात मरण्यासाठी खरे क्षत्रिय नसतात. आमचा जन्म रणांगणात मरण्यासाठी असतो. समझौता कमजोर करतात पांडवांतील युधिष्ठीर कमजोर आहे ते सगळयांना माहीत आहे. म्हणून त्यांने कृष्णाला येथे शांतता

करार करण्यासाठी पाठवले. मी कृष्णाला व त्याच्या सामर्थ्याला मानतो पण म्हणून मी असा भित्रेपणा कदापिही करणार नाही. जर युधिष्ठीरात दम असता तर त्यांने सरळ आमच्यावर स्वरी केली असती परंतु, तो मुलखाचा भित्रा म्हणून अशा समझौत्याच्या गोष्टी करण्यासाठी कृष्णाला पाठवले आहे. म्हणून आम्हाला युद्धाची भिती दाखवण्याचे काय कारण आहे ते सांग मला अरे केशवा. द्युताच्या वेळी युधिष्ठीराच्या आज्ञेत रहाण्यामुळें भिम, अर्जुन नकूल आणि सहदेव कसे हवालदील झाले होते, सगळी शक्ती असूनही, तेसुद्धा सगळयाने पाहिले आहे. जर नेता भित्रा असेल तर शूरवीरांची कशी पंचाईत होते ते सगळयानी पाहिले आहे. म्हणून नेता भित्रा नसावा. मी माझ्या बाजूचा नेता आहे व मी भित्रा अजिबात नाही. आमच्या बाजूस भिष्म, द्रोण, कृप, कर्ण, अश्वत्थामा असे रथीमहारथी असतांना मी कां घाबरू त्यांना. शस्त्राने कापले जाणे हे क्षत्रियांसाठी भूषणावह असते त्याला मी व माझे सैन्य घाबरत नाही. तशा मृत्यूची आम्ही क्षत्रिय वाट पहात असतो. सगळे खरे क्षत्रिय मांतंगाची (महादेव) आज्ञा मानतात. ती सांगते नेहमी युद्धासाठी तयार रहा. युद्धात मरण्यासाठी आम्ही जन्मतो व तसे मेल्याने आम्ही क्षत्रिय स्वर्गात जातो. ती आज्ञा आम्हाला प्रमाण आहे. तो पुढे आज्ञा करतो क्षत्रियांना की, शरण जाण्यापेक्षा मरण स्वीकारा. अरे जनार्दना, आम्ही लायक ब्राह्मणापुढे वाकतो. दुसऱ्या क्षत्रियापुढे वाकत नाही. प्रत्येक क्षत्रियांनी मांतंगांच्या आज्ञांचे पालन करावयाचे असते. मी तेंच करणार आहे व माझे सगळे साथीसुद्धा तेंच करणार आहेत. माझ्या पित्याने जो वारसातील हिस्सा त्यांना दिला होता तो मी त्यांना कदापिही देणार नाही. जोवर मी जीवंत आहे त्यांना तो मिळणार नाही. जो पर्यंत माझे पिताश्री हयात आहेत आम्ही दोघे त्यांच्या आज्ञात रहाणार आहोत असें मी समजतो. आधी जे दिले गेले, अज्ञानामुळे अथवा भितीपोटी ते आता मी देणार नाही. पांडवांना ते कधीच मिळणार नाही. मी जोवर हयात आहे तोवर आमच्या ताब्यात त्यांचा जो भाग आहे तो त्यांना मी देणार नाही. सुईच्या टोकावर राहिल इतकासुद्धा त्याना मिळणार नाही. त्यांना जे करावयाचे ते करू देत. आम्ही त्यांच्या सामर्थ्याला भित नाही. भगवत यान पर्व भाग एकशे सत्ताविसावा संपला.

# भगवत यान पर्व

## भाग एकशे अठ्ठाविसावा

वैशंपायन पुढे सांगतात, ते ऐकल्यावर संतापलेला कृष्ण ज्याचे डोळे लाल झाले होते, दुर्योधनाकडे पहात बोलतो, "तुला गणांगणात मरावयाचे आहे तर तेसुद्धा होईल. तू व तुझे सगळे सल्लागार ह्यांना तसा मृत्यू मिळेल लवकरच. लवकरच एक भयानक संहार होणार आहे असें दिसते. पांडवांवर तू कोणताही अन्याय केला नाहीस असें जे तुझे म्हणणे आहे ते कसें चूकीचे आहे ते सांगतो, येथे जमलेले सज्जन त्याबद्दल निर्णय घेतील. पांडवांच्या समृद्धीमुळें मत्सराने पेटलेला तू व तुझे दोस्त कारस्थान करतात. तुम्ही युद्धात पांडवांना हरवू शकत नाही ते माहित असल्यामुळें द्युताचा डाव तू मांडलास. तेथे तू तुझ्या भावजयीची इज्जत लुटण्याचा पर्यत्न केलास. तिला अर्धवस्त्रात भर सभेत खेचून आणलेस तिचा अपमान केलास, तिला तुमची दासी करण्याच्या गोष्टी केल्यात, जी धृतराष्ट्राची तुझ्या पित्याची सून होती, पांडवांची पत्नी होती, दुःशासनाला ते करण्यासाठी तू उद्युक्त केलेस. ते हरले द्युतात म्हणून त्यांचा सतत अपमान करण्याचे काय कारण होते? ते तुझे जवळचे नातेवाईक असतांना तू असे कसे वागू शकत होतास? पांडवांचा द्वेष करण्याचे काय कारण होते? द्वेष करणे हे पाप समजले जाते व त्याची शिक्षा धर्मात दिली आहे ते तुला माहीत नाहीं कां"? लहानपणापासून तू त्यांचा नाश करण्यासाठी किती योजना आखत होतास त्याची माहीती सगळया क्षत्रियांना आहे. वरनावत मध्ये त्यांना लक्षागृहात मारून टाकण्याची योजना तू आखली होतीस हे विदूरानी सांगितले आहे. परंतु, त्यात तुला यश आले नाही. त्या घटनेनंतर कुंती व तिच्या मुलांना अज्ञातवासात कांहीं काळ कसे रहावे लागले तेसुद्धा सगळे जाणतात. एकचक्र मध्ये ते ब्राह्मणाच्या वेषात रहात होते कारण त्यांना तू मारण्याचा प्रयत्न पुन्हा करशील अशी भिती कुंतीला वाटत होती. पांडवांना विषप्रयोगानी मारण्याचा तुझा प्रयत्न फसला. ते तुझ्याकडून होत असतांना पांडव मात्र त्यांचे व्रतस्थ जीवन अढळपणे जगत होते. एवढे करून तू सांगतोस कीं, तू कांहीच त्रास पांडवांना दिला नाहीस? त्यांची मिळकत परत करण्याची बोली तू केली होतीस ती तू मानत नाहीस म्हणजे न्यायशास्त्रानुसार तू एक चोर आहेस. अनेक अपराध करून त्यावर तू मखलाशी करत आहेस कीं, तू त्यांचा कांहींच अपराध केला नाहीस? तुझ्या नीचपणाला कांहीं मर्यादा राहिलेली नाही. तुझ्या अशा पापकर्मात तू भिष्म, द्रोण

इत्यादींना सामील करत आहेस ह्यापेक्षा मोठा गुन्हा कोणता असू शकेल. एवढे अपराध करूनसुद्धा तू विचारतोस कीं, तू काय वाईट केलेस पांडवांचे? किती सोंग घेशिल? भिष्म, द्रोण, विदूर सगळे तुला समझौता करण्यास सांगत आहेत तरी तू क्षत्रियांच्या गोष्टी करत आहेस. ते क्षत्रिय नाहीत कां"? तू फक्त पापकर्मच करू शकतोस हे ह्यावरून सिद्ध होते. वैशंपायन पुढे सांगतात, कृष्ण ते बोलत असतांना, दुःशासन हट्टी दुर्योधनाला ओरडून बोलतो, अरे राजा जर तू निमुटपणे वडिलधाऱ्यांचे मानणार नसशील तर आम्ही तुझी सगळी भावंड तुला ते मान्य करावयाला लावू. तुझे हातपाय बांधून पांडवांच्या पुढे नेऊन ठेवू. भिष्म, द्रोण आणि आमचे पिताश्री मला, विकर्तनाला व इतर कौरवांना पांडवांच्या हवाली करतील.

वैशंपायन पुढे सांगतात, त्याच्या भावाचे ते रागात काढलेले उद्गार ऐकल्यावर तो महाहट्टी, उद्धट दुर्योधन जोराजोराने श्वास घेत उठतो विदूर, धृतराष्ट्र, महान राजा वल्हीक, कृप, सोमदत्त आणि भिष्मांकडे दुर्लक्ष करत त्या सभेतून निघून जातो. त्याला निघून जांताना पाहून त्याचे मित्र राजेसुद्धा उठतात व त्याच्या मागून जाऊ लागतात. विवेकाचा नाश झालेले हे राजे त्या भावनेने निर्णय घेणाऱ्या दुर्योधनाबरोबर जात आहेत ते सगळे नजिकच्या काळात यमाकडे जाणार आहेत असें दिसते. त्या कुकर्मी दुर्योधनाला फक्त क्रोध आणि द्वेष एवढेच नियंत्रित करत आहेत. अरे जनार्दना, त्या सगळया क्षत्रियांचा काळ आला आहे तेंच त्याच्या बरोबर उठून जात आहेत. भिष्माचे ते उद्गार ऐकल्यावर तो कमलनयनी भगवान तेथे बसलेल्या राजांना सांगतो, हे घडम्यामागेसुद्धा कुरु घराण्याच्या वडीलधाऱ्यांचाचच दोष आहे. कारण ते अजूनही त्या मूर्ख दुर्योधनाला बांधून सुधारत नाहीत, तो अजूनही राजा कसा राहू शकतो? ज्या राज्याचा राजा क्रोध, हट्ट आणि द्वेषाने प्रेरीत होऊन काम करतो ते राष्ट्र नष्ट होते हे त्यांना माहीत नाहीं कां"? पुढे कृष्ण बोलतो, अजून वेळ गेलेली नाही. अजून नरसंहार टाळणे शक्य आहे. माझे जर ऐकले तर कांहीं हितकारक निर्णय घेता येईल. तो कंस ज्यांने बळजबरीने त्याच्या वृद्ध पित्याची गादी काढून घेतली त्याला त्याच कारणासाठी मला मारावे लागले होते. त्याला त्याच्या ह्याच दोषामुळें सगळया आप्तांनी टाकले होते त्याला शेवटी मी ठार मारले होते. जो त्याच्या वंशजांच्या जोरावर मोठा झाला होता तो त्यांना विसरला होता. तो मेल्यानंतर त्याचे लोक सुखी झाले होते. जेव्हां देव आणि दानव आपापली शस्त्रं घेऊन लढण्यासाठी उभे होते तेव्हां परमेस्थीन बोलले होते, जे ह्या परिस्थितीला लागू होते म्हणून सांगत आहे.

असें सांगतात, कीं, जेव्हां जगाची लोकसंख्या दोनात विभागलेली होती व असुर, दैत्य, दानव विरुद्ध आदित्य, वसु, रुद्र असे युद्ध होते त्यात परमेस्थीन बोलल्याप्रमाणे आदित्य, वसु आणि रुद्र जिंकतात. त्याच प्रमाणे जगाच्या अंतकाळी देव, मानव, गंधर्व, नाग, राक्षस भावनेच्या

आवेगात एकमेकांना ठार मारतील. ते समजल्यावर परमेस्थीन यमाला सांगतात, दैत्य आणि दानवांना बांधून वरुणाच्या ताब्यात दे. तशी आज्ञा झाल्यावर यम त्यांना बांधून वरुणाच्या ताब्यात देतो. वरुण त्यांना तसें बांधलेले समुद्रात सुरक्षितपणे अटक करून ठेवतो. त्यामुळें तो संघर्ष ठळतो. तसेंच आता दुर्योधनाला त्याच्या सल्लागारांसह (कर्म, शकुनी) बांधून पांडवांच्या कडे देण्याचे जे दुःशासन बोलत आहे ते करावे लागेल. कुटूंबाच्या भल्यासाठा एकाचा बळी देण्यास परवानगी आहे. राज्यासाठी एक गाव योडावे लागले तर ते चालते. स्वतःच्या भल्यासाठी सगळी पृथ्वी सोडण्यास हकरत नसते. अहो धृतराष्ट्र तुम्ही दुर्योघनाला बांधण्याची आज्ञा द्यावी. एका माथेफिरू माणसासाठी अनेकांचे जीव जाणे श्रेयस्कर नसते.

भगवत यान पर्व भाग एकशे अठ्ठाविसावा संपला.

# भगवत यान पर्व

## भाग एकशे एकोणतिसावा

वैशंपायन पुढे सांगत असतात, कृष्णाचे ते बोल ऐकल्यावर धृतराष्ट्र विदूराला आज्ञा करतो कीं, "अरे मुला, गांधारीला बोलावून आणा". ती खूप शहाणी व दूरदृष्टी असलेली आहे. तिला घेऊन या. तिच्या मदतीने मी आमच्या पापी मुलाला समजावण्याचा अखेरचा प्रयत्न करून पहातो. कदाचित तो मूर्ख तिचे ऐकेल. जर तिला ते संकट टाळता आले तर बरे होईल. तसे जमले तर चांगले होईल व सगळे आनंदाने राहू शकू". धृतराष्ट्राची आज्ञा झाल्यावर ताबडतोब विदूर गांधारीमातेला सभेत घेऊन येतो. ति आल्यावर धृतराष्ट्र तिला समजावतो कीं, "तिचा मुलगा एक अनर्थ करण्याचा हट्ट करत आहे तो कोणाचेच एकत नाही. त्याचा विवेक नष्ट झाला आहे. त्याला जर आवरले तर सगळे क्षत्रिय एका अनावश्यक संहारापासून वाचवले जातील. तो तुझा नालायक मुलगा कोणाचेही न ऐकता सभेतून निघून गेला आहे. त्याच्या भल्याचा सदोदीत विचार करणाऱ्यांचेसुद्धा तो ऐकत नाही. तुला जमते कां, त्याला चांगली बुद्धी देण्याचे, ते पहा".

वैशंपायन पुढे सांगतात, आपल्या पतिचे ते ऐकून ती बोलते, "त्याला माझ्याकडे ताबडतोब आणा. त्या राज्यलोभी विकृत मनस्थिती असलेल्या माझ्या मुलाला माझयाकडे आणा. ज्याच्या पुण्य व हिताचे संतुलन करण्याची क्षमता नाही त्याला गादीवर बसण्याचा अधिकार नसतो. तरीसुद्धा तुला राज्य मिळाले ज्याच्यात उद्धटपणा ओतप्रोत भरलेला आहे". खरोखरच एहो धृतराष्ट्र आपण त्या मुलाबाबत फार हळवे अहात. त्यामुळे हे झाले आहे. तुमचा मुलगा वासनांध आणि क्रोधी आहे. तो त्याच्या भ्रामक कल्पनांचा गुलाम झाला आहे. त्यामुळें आता त्याला सुधारणे केवळ अशक्य आहे. त्याचे अतोनात लाड करून तुम्ही हे मिळवले आहे. अशा अज्ञानी, विकृत मनस्थिती असलेला, द्वेषाने भरलेला राजा तुम्ही नेमला आहे आता पश्चात्ताप करून काय उपयोग? त्याच्यामुळें जवळच्या नातेवाईकात संघर्ष ओढवला गेला आहे. हे पाहून आपले शत्रू आनंदीत होत असतील. जे सामोपचाराने होऊ शकते त्यासाठी ह्याला युद्ध कां पाहिजे"?

वैशंपायन पुढे सांगतात, क्षत्री धृतराष्ट्राच्या व त्याच्या पत्नीच्या सांगण्यावरून दुर्योधनाला पुनः सभेत बोलावतो. तो त्याच्या आईचे बोलणे ऐकण्यासाठी येतो. त्याचे डोळे तापलेल्या लोहासारखे लाल होते संतापाने तो जळत होता जणू. त्याचा श्वास जोरात होत होता. त्याची आई त्याचा हात धरते जो चुकीच्या दिशेने जात होता. गांधारी त्याला पुष्कळ धम भरते. त्याची कान उघडणी करते. भावंडात सलोखा आणण्यासाठी त्याच्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न करते. गांधारी त्याला बोलते, "अरे दुर्योधना, माझ्या प्रिय मुलां मी जे सांगते ते नीट ऐक. तुझ्या हितचिंतकांचे तू कां ऐकत नाहीस? तुला तुझ्या पित्याच्या शब्दाची किंमत नाही, आजोबांच्या शब्दाची किंमत नाही, तू स्वतःला कोण समजतोस"? कृप, द्रोण, विदूर तुझे दुष्मन नाहीत. जर त्यांचे ऐकलेस तर त्यांचा मान राखल्याचे श्रेय तुला प्राप्त होईल ते तुला पुढे उपयोगाचे आहे. मलातरी कांही किंमत आहे कां, तुझ्या नजरेत"? त्यांच्या शब्दाचा मान राखणे तुझे कर्तव्य आहे. कोणीही एकटा त्याच्या हिम्मतीने राज्य सांभाळू शकत नाही. त्यांच्या शिवाय तू एकटा राज्य कसे सांभाळणार आहेस ते सांग. जो क्रोध, दुराग्रह, द्वेष अशा दोषात अडकला आहे तो राज्य करू शकत नाही. वासना आणि लोभीपणा माणसाच्या क्षमता कमकुवत करतात. माणसाने प्रथम त्यांच्यावर नियंत्रण मिळवावयाचे असते. त्या ऐवजी तू उलट त्यांत गुरफटत आहेस हे चांगले नाही. ज्याने ते मनातील शत्रू जिंकले तो सगळे जग जिंकत असतो. त्या दोषात अडकलेला राजा फारकाळ त्याचे राज्य सांभाळू शकत नाही. ज्याला साम्राज्य करावयाचे आहे त्यांने पहिल्या प्रथम पुण्य आणि हिताचे संतुलन करण्याचे शिकले पाहिजे. तसा संयमी राजा त्याचा विवेक वापरू शकतो व योग्य निर्णय घेऊ शकतो. ते नाहीं जमले तर ते मनाचे शत्रू तुझा नांश करतील. त्यासाठी राजाने त्याच्या अनुभवी सल्लागारांचे ऐकावयाचे असते. ज्या राजाने क्रोध, हट्ट, द्वेष, गर्व जिंकले तो राजा जगावर राज्य करतो. जो स्वाताच्या जवळच्या नातेवाईकांशी मत्सराने वागतो त्याला त्याचे आप्त मदत करत नाहीत. ज्यांने त्याच्या अशा वासनांवर ताबा मिळवला तो अजिंक्य होतो. म्हणून राजा नेहमी संयमी असावा लागतो. जो वासनांच्या आहारी जाऊन स्वतःच्या लोकांना फसवतो त्याला कोणीही मदत करत नाहीत. त्याला खरे मित्र मिळत नाहीत. हे सगळे तुला त्या वरिष्ठ मंडळींना आधीच सांगितले आहे वेळोवेळी, तेंच मी पुन्हा सांगत आहे. ते दोघे कृष्ण आणि धनंजय कधीही हरणारे नाहीत त्याशिवाय इतर पंडुची चार मुलं दैवी शक्ती घेऊन आलेले आहेत म्हणून तेसुद्धा तुझ्या सैन्यांने हरणारे नाहीत. मग तुला काय केवळ रणभूमीवर मरावयाची हौस झाली आहे कां? अशा मृत्यूने कोणालाही स्वर्ग मिळत नाही, हे तुला माहीत आहे. तुला माहीत आहे कीं, केवळ केशव आपल्यावर संतुष्ट असला तरी सगळे मिळून जाते तरी तू त्याला कां विरोध करत आहेस? तुझ्या ह्या वागण्यामुळें आपले शत्रू खूष होत आहेत. घरातील भांडण अशी चवाठ्यावर आणावयाची नसतात. तसे करणारे मूर्ख समजले जातात. ज्या युद्धात पुण्य नाही,

हित नाही तसे युद्ध तुला आनंद तरी कसे देणार"? त्यात अशा युद्धात जय तुला मिळेल असे तू खात्रीने सांगू शकत नाहीस मग त्यात मरणे कसे शहाणपणाचे असेल. तुला वाटते भिष्म, तुझे पिता आणि वल्हीक पूर्वी त्यांचे हिस्से घाबरून पांडवांना दिले असें जे तुला वाटते त्यात तथ्य नाही. पांडव कांहीं करत नाहीत म्हणून तू पृथ्वीचा राजा आहेस जर ते हल्ला करतील तर तुला पळून जावे लागेल जसे विराटाच्या वेळी झाले होते. तेथे फक्त एक अर्जुन तुम्हाला भारी गेला आता तर ते सगळे लढणार आहेत. अशांत तू जिंकणे केवळ अशक्य आहे हे तू का समजून घेत नाहीस. त्यांना जो शब्द तू त्यावेळी दिला होतास तो पाळावा एवढेच ते मागत आहेत, तुझ्या राज्याचा हिस्सा ते मागत नाहीत. तू जर दिलेला शब्द पाळत नसशील तर तो तुझा दोष आहे. त्यात तुला कोणताही सज्जन राजा साथ देणार नाही. तुला माहीत आहे ते पंडुची मुलं शून्यातून साम्राज्य उभे करू शकतात जे तुला कधीच शक्य नाही. अशा स्थितीत केवळ त्यांचा द्वेष करून तू काय साध्य करणार आहेस. अशांशी शहाणा राजा दोस्ती करतो दुश्मनी नाही. त्यांचा हिस्सा तुला द्यावाच लागेल. तू चोर आहेस कां? त्यांचा हिस्सा म्हणे जीवंत असे पर्यंत देणार नाही, ह्याचा अर्थ काय तू समजतोस कां? त्यांना तेरा वर्षे विनाकारण अरण्यात जावयाला लावलेस ते तुझ्याच्याने पुरेसे झाले नाही? आणखीन किती द्वेष तू त्यांचा करणार आहेस व कां"? त्यांच्या संपत्तीवर तुझा कांहीही हक्क नाही ती तुला सोढावीच लागेल. तुला वाटते भिष्म, द्रोण, कृप आणि सोमदत्त, वल्हीक तुझ्यासाठी पांडवांवर शस्त्र चालवतील तर तो तुझा भ्रम आहे. ते त्यांना स्पर्शसुद्धा करणार नाहीत. केवळ एक तो सुतपुत्र कर्ण तुझ्या बरोबर आहे त्याचा क्रोध त्याला ती शस्त्र चालवू देणार नाहीत कारण ती शस्त्र चालवण्याठी संयम असावा लागतो. जो क्रोधामुळें नष्ट होतो. पांडवांना क्रोध नाही, वासनिकता नाही, ते ब्रह्मचर्य पाळतात त्यामुळें त्यांची शस्त्र तुमच्या शस्त्रांपेक्षा जास्त प्रभावी ठरणार आहेत. द्वेष करणारे कधी संपन्न होत नाहीत. प्रतिष्ठेचा प्रश्न करू नकोस, त्याने तुझेच व तुझ्या बरोबर तुझ्या आप्तांचे नुकसान होणार आहे.

भगवत यान पर्व भाग एकशे एकोणतीसावा संपला.

# भगवत यान पर्व

# भाग एकशे तिसावा

वैशंपायन पुढे सांगतात, आईचे अर्थपूर्ण विवेचन पालथ्या घडावर पाणी असें होते. तो मूर्ख मुलगा कांहीं न बोलता सभेतून निघून जातो. आईला दिसत नसल्यामुळें ते तिला समजत नाही. मात्र तो सुवलाच्या मुलाचा सल्ला घेण्यास जातो कारण, गांधारीचा तो भाऊ असतो. तो त्याची चांडाळ चौकडी म्हणजे, तो स्वतः, कर्ण, शकूनी, दुःशासन, असें चार ठरवतात कीं, कृष्णाला जबरदस्तीने ते ताब्यात घेऊन त्याला ओलीस ठेवून त्याद्वारा पांडवांकडून जे हवे ते मिळवावयाचे, बेत ठरतो. सभेत कृष्ण निःशस्त्र आलेला होता.

वैशंपायन पुढे सांगतात, त्याच्या आईने एवढे सांगूनसुद्धा तो त्याचा विचार सोडत नाही. त्याच सुमारास सत्यकी त्याच्या दिव्य दृष्टीने दुर्योधनाचा डाव ओळखतो. तो हृदीकाचा मुलगा कृतवर्मन ह्याला सावध करतो. तो त्यास त्यांच्या लष्कराला सज्ज रहाण्याचे आदेश देण्यास सांगतो. सत्यकी स्वतः राजसभेकडे निघतो जेथे कृष्ण बातचित करत होता. तेथे गेल्यावर तो प्रथम कृष्णाला त्याला जे समजले ते सांगतो. त्यानंतर धृतराष्ट्राला सांगतो. त्यानंतर विदूराला त्या कटाची माहिती देतो. कृष्ण ते ऐकून हसूं लागतो. तो बोलतो, ते हलकट लोक त्यांना जे करावयाचे करू देत. परंतु, त्यांना तसे कदापिही करता येणार नाही. त्यांनी तसे केले तर त्यांच्या पापीप्रवृत्तीची तू हद्द असेल. लहान मुलांनी कागदात अग्नी पकडण्याचा प्रयत्न करावा तसा तो प्रकार असेल. किंवा कपड्याने अग्नी विझवण्याचा प्रयत्न असेल. ते सत्यकीचे बोलणे ऐकल्यानंतकर विदून धृतराष्ट्राला बोलतो, "अहो राजश्री, आपल्या मुलांचा अंत काळ समीप आला आहे असें वाटते. कारण तो एक असे कृत्य करू इच्छित आहे जे सर्वनाशास कारणीभूत होऊ शकते. ते चौघे एकत्र येऊन कृष्णाला ताब्यात घेऊ इच्छितात. त्या मार्गाने ते पांडवांना शह देण्याचा प्रयत्न करणार आहेत. जर कृष्णाने मनावर घेतले तर आत्ताच सगळयांचा नाश तो करू शकतो, एकापरिने ते चांगलेच होईल परंतु, नितीशास्त्राचे नियम पाळणारे जनार्दन तसे कांहीं करणार नाहीत". कृष्ण ते ऐकत होता. त्यानंतर धृतराष्ट्राकडे पहात तो बोलतो, "अहो राजन, त्यांना जर मला पकडावयाचे असेल तर त्याना अडवू नका, मी त्यांना माझे खरे रुप दाखवीन. मी तरीसुद्धा त्यांना ह्यावेळी ठार मारणार नाही. कारण मी ज्या उद्देशाने येथे आपल्यासगळयांना भेटण्यास आलो आहे त्याप्रमाणे ते उचित होणार नाही. मी त्यांना पकडून पांडवांच्या हवाली करून हा प्रश्न कायमचा सोडवून टाकू शकेन. ते त्यानंतर पांडवांचे कैदी म्हणून रहातील, त्यात आपल्याला कांहीं

दोष लागणार नाही. आपण सगळे जे पांडवांच्या प्रस्तावाला अनुमोदन देत अहात ते सुरक्षित असतील. मला काय करणे अशक्य आहे"? तरी मी तसे ह्यावेळी करणार नाही. मी त्याला माझे खरे रुप दाखवणे त्या ऐवजी जास्त योग्य समजतो. मी तुमच्च्या मुलाला मला कैद करम्याची मुभा द्यावी. बाकीचे सगळे मी सांभाळीन. कदाचित त्या अनुभवानंतर तुमचा मुलगा सुधारेल अशी आपण सगळे अपेक्षा करू या. विदूर आज्ञा देतो कीं, त्या नालायक दुर्योधनाला त्वरित सभेत आणा. शेवटचा प्रयत्न त्याला सुधारावयाचा करून पाहू. दुर्योधन सभेत नाईलाजाने येतो. त्याच्या बरोबर त्याचे मित्र राजे व इतर भावंडे असतात. दुर्योधनाच्या दोन बाजूस कर्ण आणि दुःशासन असतात. तो पुढे त्याला बोलतो तू व तुझे पापाचरणी मित्र जे करू पहात अहात ते शक्य नाही हे तुम्हाला कसे समजत नाही. पांडवांच्या वकीलाला, कृष्णाला आपण अशारितीने कैदी कसे करू शकतो? जे केवळ अशक्य आहे ते करण्याच्या योजना तुम्ही आखत अहात, तुमची अक्कल शेण खायला गेली आहे कीं"? ज्याला सगळे सैन्य आवरू शकत नाही त्याला तुम्ही कैदी करण्याच्या गोष्टी करत अहात. दृतराष्टाराच्या त्या उद्गारा नंतर, विदूर दुर्योधनाला रागावून बोलतो, "अरे नालायका, मी काय सांगतो ते नीट ऐक. सौभाच्या दरवाज्यात असतांना तेथील माकडांनी मोठे मोठे दगड टाकून रस्ता बंद केला होता तरी त्यातून केशव सहीसलामत बाहेर आला ते तू विसरलास कां? अशा कृष्णाला तू पकडण्याच्या योजना आखत आहेस? नरकासुराला मारून त्यांने बंदी केलेल्या हजारो बायकांना त्यांने मुक्त केले होते ते तू विसरलास कां? निर्मोचन नगरीतसहा हजार असुर त्याला पकडू शकले नाही. एक लहान बालक असतांना त्यांने पुतना राक्षसिणीला मारले होते ते विसरलास कां"? त्याने एका हाताच्या कलंगडीवर गोवर्धन पहाड उचलला होता त्याला तू कैदी करण्याच्या गोष्टी करत आहेस, काय म्हणावे तुझ्या मूर्खपाणाला. ज्याने मोठे असुर, जसें अरिष, धेनुक, चानूर मारले हातोहात त्याला तू पकडण्याच्या गोष्टी करत आहेस. त्यांने कंस, जरासंध ह्याना मारले आहे. ज्यांने राजा वरुण, पावक ह्याना त्याने हरवले होते जेव्हां तो स्वर्गातून पारिजात पृथ्वीवर आणत होता. त्यावेळी त्यांने इंद्रासुद्धा हरवले होते. त्यांने असुर मधू आणि कैतभाला मारले आहे. एका अवतारात त्याने हयग्रीव्हाला हरवले होते. अरें मूर्खा दुर्योधना कृष्ण हा साक्षात उर्जास्रोत आहे सगळया ऋषीमुनींचा त्याला पकडण्याच्या गोष्टी करत आहेस. तो जे इच्छिल ते होत असते. कारण तो सगळया गोष्टींच्या मुळाशी असतो. त्याला तू ओळख व शरण जा. त्यातचतुझे व आमचे सगळयांचे भले आहे. त्याला पकडण्याच्या प्रयतनात तू व तुझे सगळे साथी नष्ट होतील.

भगवत यान पर्व भाग एकशे तिसावा संपला.

# भगवत यान पर्व

## भाग एकशे एकतिसावा

वैशंपायन पुढे सांगतात, विदूराने ते बोलल्यानंतर कृष्ण धृतराष्ट्राच्या मुलाला म्हणतो, तुझा भ्रम आहे कीं, मी एकटा आहे. मींच काय कोणीही कधीच एकटे नसतात. अदृष्य शक्ती सदैव प्रत्येकावर नजर ठेवून असतात. माझ्याबाबत विशेष आहे कारण, सगळे वसु, आदित्य, रुद्र, साध्य आणि मरुत माझ्याभोवती असतात. त्याशिवाय देवर्षी लक्ष देऊन आहेत माझ्याकडे. त्याशिवाय मानवी स्वरुपात वृश्नी, अंधक भोज आहेत सैन्याच्या रुपात ज्यांचे काम सत्यकी व कृतवर्मन पहात आहेत. असें बोलून कृष्ण जोराजोराने हसू लागले. जसे महान भगवान शौरी हसत होते तेव्हां त्यांच्या अंगातून अग्नी येऊ लागला. त्यातून असंख्य देव विविध रुपात बाहेर येत होते. विश्वदेव, यक्ष, गंधर्व आणि राक्षस त्या आगीतून बाहेर येत होते. ते रुद्र रुप भयावह होते. त्यांचे आकार आंगठ्या एवढे होते. त्या सगळयांच्या वर साक्षात ब्रह्म बसलेले दिसत होते. कृष्णाच्या दोन हातांतून एका बाजूस शंकरशन म्हणजे बलराम हातात औत घेऊन व दुसऱ्या हाता जवळ धनंजय त्याच्या गांडीवासह उभे दिसत होते. ते एक विश्वरुप होते. ते दर्शन होत असतां त्याच्या भोवती भिम, युधिष्ठीर, नकूल व सहदेव होते. कृष्णाची आयुध शंख, भाला, सुदर्शन चक्र, गदा, धनुष्य सारंग अशी चमकत होती. त्याच्या डोळयातून ठिणग्या बाहेर येत होत्या. ते रुद्र रुप पाहून तेथे जमलेले राजे भेदरून गेले. ते विश्व दर्शन त्यांना कृष्णाने दिले ते दाखवण्यासाठी कीं दुर्योधन किती मूर्ख आहे. जे खरोखरच तत्त्वनिष्ठ होते जसें भिष्म, द्रोण, विदूर, पवित्र संजय, आणि कांही ऋषी ते दृष्य पाहू शकत होते. त्यावेळी स्वर्गातील वाद्ये वाजू लागली. कृष्णाच्या अंगावर दैवी फुलांचा शिडकावा होऊ लागला. सगळी पृथ्वी थरारू लागली होती. समुद्रात प्रयंड लाटा उठू लागल्या होत्या. सगळे प्राणी अजब झाल्यासारखे करत होते. त्यांना तो विलक्षण अनुभव होता. त्या स्वरुपात कृष्ण एका बाजूस सत्यकी व दुसऱ्या बाजूस कृतवर्मन असे सावकाशपणे चालत त्या सभागृहाबाहेर आले. तेथे जमलेल्या ऋषींना वंदन करत त्याच्या रथाकडे जात होता. सभागृहात प्रचंड गदारोळ उठला. कण्व, नारद त्यांच्या ठिकाणी जाण्यासाठी अदृष्य झाले. जसे जनार्दन त्याच्या रथाकडे जात होता सगळे राजे, कौरव त्याच्या मागून चालत होते. जसे देव इंद्राच्या मागे चालतात. बाहेर रथाजवळ दारुक सारथी तयार होता. कृष्णाचा रथ पांढरा शुभ्र होता व त्याला

छोट्या घंटा शोभेसाठी लावलेल्या होत्या. रथावर रत्नांची सजावट होती. त्यातील आसनांवर शुभ्र वाघाच्या कातड्याची वेष्टण होती. त्याच्या बाजूने वृश्नी योद्धा सत्यकी आणि हृद्रीकाचा मुलगा कृतवर्मन होते. कृष्ण त्याच्या जाण्याच्या तयारीत होता. तेव्हां धृतराष्ट्र त्याला बोलतो, "अहो भगवंत, तुम्ही पाहिले आहे कीं माझे तो ऐकत नाही. आम्हा दोघांचा तो उपमर्द करत कसा वागत होता. तुला आता सगळे ठाऊक झाले आहे. ह्या लढाईत माझा कांहीं सहभाग नसेल. कुरु आणि पांडवात समेट करण्याचे माझे प्रयत्न त्यांने उद्ध्वस्त केले आहेत. अशा परिस्थितीत तुला माझा कांहीं संशय आलेला नाही असें मी समजतो. तो त्याच्या आईचेसुद्धा ऐकत नव्हता हेसुद्धा आपण पाहिले आहे. मी शांतता प्रस्थापित करण्याचे माझ्यापरीने प्रयत्न केले ते तू पहात आहेस.

वैशंपायन पुढे सांगतात, ते ऐकल्यावर भगवंत धृतराष्ट्र, द्रोण, भिष्म, क्षत्री, वल्हीक, सोमदत्त, कृप ह्यांना बोलतो, दुर्योधन एकाद्या अज्ञानी माणसासारखा हट्ट करत आहे. त्याचा विवेक संपुष्टात आला आहे. ज्यारितीने ते रागावून गेला, त्यात राजा धृतराष्ट्र बोलतात कीं, ते सत्ताहीन झाले आहेत, त्यात सगळे आले. आता तुम्हा सगळयांची परवानगी घेऊन मी माझ्या आत्येच्या घरी जात आहे. असें बोलून तो त्याचा रथ कुंतीच्या वाड्याकडे न्यायला सांगतो. त्याच्या रथापाठून सगळे महारथी भिष्म, द्रोण, कृप, क्षत्री, अश्वत्थामा, विकर्ण, युयुत्सु चालत होते. रथ सावकाशपणे विदूराच्या वाड्याच्या दिशेने सरकत होता.

भगवत यान पर्व भाग एकशे एकतिसावा संपला.

# भगवत यान पर्व

## भाग एकशे बत्तिसावा

वैशंपायन पुढे सांगतात, कृष्ण कुंतीच्या निवासस्थनी जातो व तिच्या पाया पडतो. तेथे तो तिला सभेत जे घडले ते थोड्यात सांगतो. ऋषी आणि मी विविधप्रकारे त्याला त्याला समजावून सांगण्याचा प्रयास केला. परंतु, दुर्योधन मनायला तयार नव्हता. ह्याचा अर्थ दुर्योधन व त्याच्या दोस्तांचा काळ समीप आला आहे हे स्पष्ट होते असें कृष्ण म्हणाला. पुढे तो कुंतीला सांगतो की, तो तिचा निरोप घेऊन लवकर युधिष्ठीराला भेटू इच्छितो. आता मला सांग आत्ये मी तुझा काय निरोप तुझ्या मुलांना देऊ ते साग. ते मला ऐकायला आवडेल.

कुंती कृष्णाला सांगते, "अरे केशवा, त्याला सांग, अरे माझ्या मुला, तुझे पुण्य कमी होत आहे. व्यर्थ कोठलीही हालचाल करू नकोस. जसे वेदाचे अभ्यासक असतात जे वेद वाचतात पण त्यातला अर्थ मात्र ते समजत नाहीत. अशांना वेद वाचूनही अज्ञानीच समजले जाते. तुझ्या क्षत्रिय कर्तव्याबाबत तुझे दुर्लक्ष झालेले आहे. तू ब्राह्मणांची नक्कल करण्यात स्वतःला धन्य समजतोस, ते उचित नाही. स्वयंभूने दिलेल्या आदेशानुसार तू तुझे क्षत्रिय कर्तव्य पार पाडत नाहीस. सगळयांच्या संरक्षणासाठी ब्रह्माच्या हातातून क्षत्रिय उत्पन्न झाले हे तू विसरला आहेस. क्षत्रिय स्वावलंबी असावा लागतो. त्या संदर्भात एक किस्सा फार पूर्वीपासून सांगितला जातो तो मी तुला सांगते. फार प्राचीन काळी वैश्रावण एकदा संतुष्ट झाल्यामुळें राजर्षी मुचुकुंदाला जग दान करतो. परंतु तो राजर्षी ते दान स्वीकारत नाही. तो राजर्षी वैश्रावणाला सांगतो की, तो दान घेत नाही, त्याला त्याच्या कमाईचे वैभव पाहिजे. ते ऐकल्यावर वैश्रावणाला फार आनंद होतो. त्यानंतर यथावकाश मुचुकुंद त्याच्या सामर्थ्याने पृथ्वी जिंकतो. त्यानंतर महसुल म्हणून जनतेकडून उत्पन्नाचा सहावा भाग त्याचा हिस्सा म्हणून स्वतःकडे ठेवतो. तसे करुन प्रत्येक वर्णाच्या लोकांनी त्यांची त्यांची कर्तव्ये सांभाळली तर जग सुखाने राहू शकते. जो राजा त्याची कर्तव्य पार पाडतो तोंच फक्त देवांचा प्रतिनिधी समजला जातो. केवळ गादीवर बसला म्हणून तो राजा समजला जात नाही. अशारितीने जर सगळे वर्ण आपापले कार्य इतरांचा मान राखून करत असतील तर तेथे सत्ययुग अवतरते. ती राजाची जबाबदारी असते. चांगलान राजा त्याच्या राज्यात सत्ययुग आणू शकतो. समाजात सत्ययुग आहे कां कलीयुग हे त्या राज्याच्या शासन कर्त्यावर अवलंबून

असते. समाजातील माणसे ठरवू शकतात कीं, कोणते युग त्यांच्या राज्यात कार्यरत असावे. तुझ्या राज्यात कोणते युग असावे ते ब्रह्मदेव ठरवत नाही हे जे समजतात ते आपापल्या जबाबदाऱ्या योग्य प्रकारे सांभाळतात. राजा ठरवतो त्याच्या राज्यात सत्ययुग असावे कीं, त्रेता की, द्वापार किंवा कली. जो राजा त्याच्या राज्यात सत्ययुग अथवा त्रेतायुग आणतो तो स्वर्गात जातो. ज्या राजाच्या राज्यात कलूयुग असते तो राजा पापी समजला जातो. त्याचा सर्वनाश होतो. तसा राजा मृत्यूनंतर नरकात जातो. तुला राजर्षी व्हावेसे वाटते त्यासाठी जे करावयाचे ते तू करत नाहीस. केवळ ब्राह्ममांत बसल्याने व दानं दिल्याने तू राजर्षी होणार नाहीस. तू जसे करत आहेस ते तुझ्या पित्याच्या मनाप्रमाणे नाही. मलासुद्धा ते मान्य नाही. तुझ्या कोणत्याही पूर्वाजांना सुद्धे ते मान्य नाही. तुझ्यासाठी मी ब्राह्मणांचे आशिर्वाद, कृपा, देवांचे दुवे, पितरांचे दुवे मागत आले आहे. तुमच्या दीर्घायुष्यासाठी, संपन्नतेसाठी, मुलाबाळांसाठी मी व्रत करत आहे. मातापिता नेहमीच आपल्या मुलांचे भले व्हावे म्हणून प्रयत्न करत असतात. भल्याबुऱ्या मार्गाने ते केले जाते. अरे कृष्णा ते उच्च कुळात जन्मूनही अजून निर्वासित आहेत. त्यांचे राज्य नाही. त्यांच्या सगळया हिम्मती व धाडसा सकट ते भिकाऱ्यासारखे रहात आहेत. सुख म्हणून त्यांच्या नशिबात नाही. एकादा भिकारी संपन्न माणसाच्या आश्रयात राहून सुखाचा घास खात असतो. म्हणजे सुखाचा घास मिळण्यासाठी स्वतःचे कर्तुत्व आवश्यक नसते. केवळ तशा माणसाच्या आधारात रहाण्याचे शहाणपण असावे लागते. ब्राह्मण भिक मागून रहातो, क्षत्रिय संरक्षण देऊन त्यातून कमाई करतो, बैश्य व्यापर करून धन कमावतो व शुद्र सेवा देऊन जगतो. तू क्षत्रिय म्हणून तुला भिक मांगता येणार नाही. तुम्ही क्षत्रिय म्हणून इतरांचे संरक्षण करणे हाच तुमचा धंदा ठरतो. तुम्हाला तुमच्या हाताच्या बळावर जगावयाचे आहे. तुम्हाला स्वबळावर भिक न मांगता तुमच्या पित्याचे राज्य व स्वतःचे राज्य पुनः मिळवावयाचे आहे. तुमची माता असून मला दुसऱ्याच्या कृपेवर रहावे लागते ह्यांची तुला लाज वाटत नाही कां? शेवटी सांगते तुझे नेतृत्व क्षत्रियाला शोभणारे नाही. तू सतत दुसऱ्याच्या सल्ल्याच्या शोधात असतोस जसे तुला स्वतःची अक्कलच नाही. निदान ह्यापुढे तरी तू खऱ्या क्षत्रियाला शोभेल असें काम करावे अशी मी तुला आज्ञा देत आहे. प्रसंगी वृकोदराचे ऐकत जा. नकूलाचे सहदेवाचे ऐकत जा. ते तुझ्यापेक्षा जास्त चांगले राजे झाले असते असे मला कधी वाटते. पापाचरण न करता कार्य करत रहा.

भगवत यान पर्व भाग एकशे बत्तीसावा संपला.

# भगवत यान पर्व

## भाग एकशे तेहतीसावा

कुंती पुढे सांगते, ह्या संदर्भात एक किस्सा मी त्याला सांगू इच्छिते. त्यातून युधिष्ठीर कांहीं शिकेल तर बरे. विदूला नांवाची एक महिला होती. ती उच्चकुलीन होती. ती तिच्या भागात प्रसिद्ध होती. थोडी रागीट होती. ती थोडी लुच्चीसुद्धा होती. तिच्याच क्षत्रियबाणा ओतप्रोत भरलेला होता. ती सुशिक्षित सुद्धा होती व जगाच्या व्यवहाराचा तिला चांगला अनुभव होता. तिला जगातील सगळे राजे ओळखत होते. तिने विविध विद्वानांच्या मताचा अभ्यास केला होता. एकदा तिचा मुलगा सढाईत हरल्यामुळें दुःखी होऊन जमिनीवर पडून रडत होता. ते पाहून विदुलाला राग आला व ती त्याला सांगते, ते मी युधिष्ठीराला अरे कृष्णा, तुझ्या माध्यमातून सांगू पहाणार आहे. विदुला त्या म्हणते, "अरे संजया, तू माझा मुलगा शोभत नाहीस. तू तुझ्या शत्रूंना आनंद देत आहेस. तू तुझ्या पित्याचासुद्धा मुलगा राहिला नाहीस. तुला तुझ्या पराजयाचा राग कसा येत नाही? जर तुला अशा परिस्थितीत राग येत नसेल तर तुला पुरूष कसे समजता येईल. तू हिजडा झाला आहेस कां? अशारितीने रडत बसून तू काय मिळवणार आहेस. तुझे भले व्हावे असें तुला वाटत असेल तर तू उठ आणि नव्याने लढण्याची तयारी कर. अशारितीने रडत बसून तू स्वतःचा सुद्धा अपमान करत आहेस. हे खऱ्या क्षत्रियाचे लक्षण नाही. तुझ्या अशा वागण्याने तुझे शत्रू जास्त मातातील. त्याचा तुला त्रास होत राहील. अशारितीने गप्प बसल्याने तू लवकर नष्ट होशिल. प्रतिकार करत रहाणे हे क्षत्रियाचे कार्य असते रडत बसण्याने तो क्षत्रिय ठरत नाही. तुझी हिम्मत वाढव, जीवाची बाजी लावून पुन्हा लढण्याच्या तयारीत हो. गरूडासारखा तुझ्या शत्रूवर हल्ला करून जा. खरा क्षत्रिय जीवंत असे पर्यंत कधीच हार मानत नाही. तो सतत लढत असतो, असें रडत बसत नाही. शत्रूचा नाश होई पर्यंत ते लढत असतो. एकदा अपयश आले म्हणून असें रडत बसावयाचे नसते. कोणालीही अनेक प्रयत्नानंतरच जीत मिळत असते. थोड्या थोडक्या अपयशाने रडत बसणे क्षत्रियाला शोभत नाही. लोकांना समजू दे कीं, माझा मुलगा हरण्याने थांबत नाही तर उलट जास्त जोरांनी मुसंडी मारून उठतो. त्यातच खऱ्या क्षत्रियाची शान असते. आग कशी भडकते तसे हरणाऱ्या क्षत्रियाचे असले पाहिजे. त्यांने असे धुमसत रहाणे योग्य नाही. म्हणून म्हणतात लढत लढत मरणारा क्षत्रिय जिंको अगर न जिंको तो श्रेष्ठ असतो व म्हणून तो

स्वर्गात जातो. इंद्रसुद्धा तशा हार न मानणाऱ्या क्षत्रियांचा सन्मान करतात. हार मानणाऱ्या क्षत्रियाचे सगळे अधिकार संपुष्टात येतात. त्याच्या जगण्यात कांहीं तथ्य नसते. तो जगूनसुद्धा मेल्यागत असतो. शुद्रसुद्धा त्याच्यापेक्षा श्रेष्ठ समजला जातो. जो शत्रूचा निःपात करतो त्याला शत्रूला ठार मारल्यामुळें पाप नाही तर पुण्य लाभत असते. तुझा पुरूषार्थ जिंकण्यात आहे रडत बसण्यात नाही. हार मानणारा पुरूष नसतो व बाईसुद्धा नसतो. कारण क्षत्रिय बाणा दोघांत असावा लागतो. बायकासुद्धा क्षत्रिय असतात ज्या कधी हार मानत नाहीत. हार मानणारा हिजडा समजला जातो. पुरूषार्थ शौर्याचे तपस्येचे, अभ्यासाचे असें विविध असतात. त्या सगळयात जिंकत रहाणे ह्यालाच पुरूषार्थ समजले जाते. तू भिक मागणाऱ्या माधूकऱ्यासारखा वागू नकोस. तो तुझा पिंड नाही. तू माझा पुत्र आहेस. अशा भित्र्या माणसाला कोणी मित्रसुद्धा लाभत नाही".

कुती पुढे सांगते युधिष्ठीराला उद्देशून, राज्या घालवलेला, सगळया साधनसामुग्री घालवलेला, सुखाची साधनं घालवलेला अशा माणूस  जगण्यासाठी नालायक समजला जातो. त्या अवस्थेत माझी मुलं त्या एका युधिष्ठीराच्या नकर्तेपणामुळें गेलेली आहेत. अशा माणूस माझ्या पोटी जन्मला ह्याचे मला दुःख होते. नितीशस्त्राची सबब सदैव पुढे करून तो त्याच्या नकर्तेपणाचे समर्थन करत आला आहे. त्याला अरे कृष्णा, तू तरी शिकव खरे नितीशस्त्र जे तू आचरत आहेस. अशा नकर्त्या पुत्राला कोणत्याही बाईने जन्माला घालू नये. ते मी केले आहे ह्याचे मला खूप वाईट वाटते. त्या हिम्मतवान इतर मुलांची त्यामुळें किती कुतरओढ होत असेल ते मी समजू शकते. मींच त्यांना सांगितले कीं. ते त्यांच्या मोठ्या भावाच्या आज्ञेत रहातील व त्याचे मला फार दुःख होत आहे. हा माझा मुलगा नेता बनण्याच्या योग्यतेचा नाही हे मी मान्य करते.

भगवत यान पर्व भाग एकशे तेहतीसावा संपला.

# भगवत यान पर्व

## भाग एकशे चौतिसावा

विदुला पुढे सांगते, जे कुंती सांगत असते. अशा परिस्थितीत तू सापडला आहेस म्हणून तू पुरूषार्थ सोडत असशील तर ते योग्य नाही. तसे असेल तर तुला शुद्रापेक्षाही शुद्र असा होऊन जगावे लागेल. जो क्षत्रिय त्याचे कर्तव्य पार पाडत नाही त्याला चोर समजले जाते. कारण ते त्याच्या कर्तव्यात चुकला आहे. त्याला क्षमा देवसुद्धा करत नाहीत. तसे तुझे तू होऊ देऊ नकोस. विदुला मान्य करते कीं, त्याचा शत्रू सिंधचा राजा ज्याला बरेच मित्र आहेत. तेसुद्धा त्या सिंधच्या राजाच्या नाशाची वाटच पहात आहेत, त्याचा तू फायदा उठवला पाहिजेस. त्यांच्यात दुफळी करण्याचा प्रयत्न कर. क्षत्रियांनी केवळ लढावयाचे नसते, त्या बरोबर कुटील नितीचा वापर सुद्धा करावयाचा असतो, त्यात कोणतेही पाप नाही. कुंती पुढे कृष्णाला बोलते, अरे कृष्णा तू तरी माझ्या मुलाला ते सगळे शास्त्र शिकवावयास पाहिजे होते ज्यात तू तरबेज आहेस. कृष्ण ते ऐकून फक्त स्मित करतो व गप्प बसतो. युद्धाने जे मिळत नाही ते कुटील नितीने क्षत्रिय मिळवत असतो. त्यासाठी त्याला पुण्य आणि हित ह्यांचे संबंध चांगले माहीत असले पाहिजेत. असहायता ही मृत्यूपेक्षा जास्त वाईट असते. तू त्यातून बाहेर ये व प्रयत्नाला सुरूवात कर. मी उच्च कुलीन जन्म झालेली जशा मुली एका घरातून दुसऱ्या घरात जातात तशी मी सुद्धा आले आहे. अशा मातेचा मुलगा असहाय होऊन रहात असेल तर ते कसे शोभेल. आपण जर अशारितीने हरलो तर आपले वैभव नाहीसे होईल. आपले नोकर आपल्याला सोडून आपल्या शत्रूच्या घरात कामासाठी जातील हे तुला आवडेल कां? आपले पुरोहित आपल्याला सोडून जातील कारण आपण त्यांची दक्षिणा देऊ शकत नाही हे कसे दिसेल त्याचा विचार कर. तुझ्या अपयशामुळें माझी काय परिस्थिती होईल ते पहा. मला जर दुसऱ्याच्या मदतीने जगावे लागले तर मी माझा जीव देईन. आईबापाची मुलं त्यांसाठी सहारा असतात. जर ते असे हात गाळून बसले तर त्यान मातापित्यानी काय करावयाचे? अशारितीने जगण्यापेक्षा मरण पत्करले. जेव्हां क्षत्रिय लढाईत जिंकत असतो त्याचे सुप्त वैरीसुद्धा त्याला बिचकून वागत असतात. एका वृत्राला इंद्राने मारले तेव्हां त्याला देवाचे राज्य मिळाले. युद्धात जिंकण्याने कधी पापसुद्धा लागत नाही. न्यायासाठी पापकारक शत्रूचा नाश करणे ह्यासाठी ब्रह्माने क्षत्रिय वर्णाची निर्मिती केली आहे. जर तोंच असा हताश झाला तर

कसे चालेल? मला तू असा निराश झालेला पहाणे आवडत नाही. तुझ्या अशा वागण्याने तुझया शत्रूची ताकद वाढत आहे ते योग्य नाही. उठ मुला, आणि जिंकण्यासाठी तयार हो. तुझ्या कुळाला शोभेल असेच तू वागले पाहिजेस. जर तू तुझ्या जेत्याच्या मागून चालत आहेस व त्याची स्तुतीसुमनं गात आहेस असें मला पहावे लागले तर त्यापेक्षा मी मृत्यू स्वीकारीन. अशाने माझ्या आत्म्याला कोठून सुख मिळणार? अरे, त्यापेक्षा तू जन्मला नसतास तर ते जास्त चांगले झाले असते. एका क्षत्रियाला दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी प्यावे लागणे कितीतरी निंदनीय असते. आपल्या घराण्यात अशारितीने कोणी दुसऱ्याच्या ओंजळीने न पाणी प्याले अथवा मागून चालले. मी तुला क्षत्रियांच्या कार्‍याचे सांगितले. हे सगळे ब्रह्माच्या आदेशानुसार आहे. जो हे क्षत्रियांचे गुण जाणतो तो कधीही कोणापुढे वाकणार नाही. कितीही छळ केला, त्रास दिला तरी तो सच्चा क्षत्रिय हार मानत नाही. त्या बदल्यात तो मृत्यू धन्य मानतो. उच्च कुलीन क्षत्रिय एकाद्या मस्तवाल हत्तीसारखा फिरत असला पाहिजे. त्याची प्रत्येक कृती अन्याया विरुद्ध लढण्यासाठी असते. तो ब्राह्मणापुढे नमतो ते त्यांच्यातील ज्ञानसागराचा मान ठेवण्यासाठी. त्याने इतर वर्णाना मार्गदर्शन करावयाचे असते. त्याचे दान सत्पात्र असले पाहिजे. त्याचे सगळे निर्णय तर्कशुद्ध असले पाहिजेत. तो भावनाविवशतेने लुब्ध होणारा नसतो. तो त्याच्यासारखे लोक जमवून त्याची ताकद वाढवतो. तो असाच जगला पाहिजे.

भगवत यान पर्व भाग एकशे चौतीसावा संपला.

# भगवत यान पर्व

# भाग एकशे पस्तीसावा

कुंती बोलते, ते विदुलाचे म्हणणे ऐकल्यावर त्याच्या आईला बोलतो, "तू किती निर्दय आहेस माते, तुला क्षात्रतेजाचे कौतुक आहे, माझ्या अवस्थेची तुला अजिबात पर्वा नाही. त्या क्षत्रिय धर्माची छीत्तू करतो मी ज्यामुळें माझी ही अवस्था झाली. त्या नितीप्रमाणे तू मला लढण्यास सांगत आहेस, जसें तुला माझ्याबद्दल जराशीसुद्धा अनुकंपा नाही. त्या क्षात्रधर्मासाठी तू तुझ्या मुलाचा बळी देण्यास तयार आहेस जणूकाय मी तुझा मुलगा नाहीच, कोणती आई अशी वागेल. मी तुझा एकुलता एक पुत्र आहे ह्याचा तुला विसर पडला आहे. तुला तुझ्या मुलाच्या हिताची पर्वा नाही, तू जगाचे काय कल्याण करणार? तू फक्त स्वतःच्या अस्मितेचाच विचार करत आहेस".

ते ऐकल्यावर ती माता त्याला सुनावते, पुण्य आणि हितासाठी सगळया शहाण्या गोष्टी केल्या जातात. त्या पुण्य आणि हिताचा विचार करूनच मी तुला सांगत होते. त्यात तुझ्याबद्दल प्रेम नसण्याचा विषय होत नाही. त्या पुण्याच्या संरक्षणासाठी व त्यातून जे हित साध्य होणार आहे ते पहाता तू लढण्यास तयार होणे हेंच श्रेयस्कर आहे. तुझे सामर्थ्य दाखवण्याची हींच वेळ आहे. जर आता तू लढलास नाही तर तू असें कांहीं करण्यास जाणार आहेस किं, त्याची मला लाज वाटेल. ज्या कुप्रसिध्दीने तुझी इज्जत चवाठ्यावर येणार आहे त्याचा विचार तुला करावाच लागेल. मी तुला जे सांगते ते माझे कर्तव्य आहे. जो मार्ग ज्ञानी लोकांनी खोटा ठरवला आहे तो तू स्वीकारू इच्छित आहेस त्याचे मला वाईट वाटते. तू मूर्खांच्या मार्गाने जात आहेस. ज्या मार्गाने शहाणे क्षत्रिय कधीच जात नाहीत. अज्ञानात आसरा शोधण्याचा प्रयत्न बरेच प्राणी करत असतात. तरी तू मात्र ते करू नये असें सांगावेसे वाटते. तसे केलेस तर तू मला अधिक प्रिय होशिल. जर तू पुण्य आणि हिताचा मार्ग अनुसरुन प्रयत्न केलेस तर देवसुद्धा तुला मदत करतील. चांगले वळण असलेली मुलं असण्यात सुख असते आईबापाचे. नालायक, भाडखाऊ, रड्या मुलाचा अभिमान शहाणे मातापिता बळगत नाहीत. जे सतत खोट्या गोष्टीत रमतात ते अखेरीस दुःखी होतात. ब्रह्माने क्षत्रिय उत्पन्न केले ते लढण्यासाठी आणि लढाया जिंकण्यासाठी. तो जिंको अगर न जिंको, मरो अगर न मरो ते महत्वाचे नसते. त्याला त्यांने त्याचे कर्तव्य केले म्हणून तो इंद्राच्या ठिकाणी जातो. शत्रूचा पराजय करण्यात जे सुख क्षत्रियाला मिळते ते स्वर्गातसुद्धा मिळत नाही. सुडाने पेटून जो पर्यंत तो क्षत्रिय आपल्या शत्रूचा पराजय करत नाही तोवर त्याच्या मनाला शांती नसते.

जो सूज्ञ आहे तो त्यापेक्षा कांहीं कमी स्वीकारायला तयार नसतो. जो ते स्वीकारतो तो नालायक ठरतो. तो नालायक नंतर गंगा जशी समुद्रात गेल्याने नाहीशी होते तसा तो नाहीसा होतो. ते मातेचे बोलणे ऐकून तिचा मुलगा संजय तिला बोलतो, "आई तू तुझ्या मुलाला असें कांहीं शिकवू नकोस. त्याला दयाळूपणा शिकव, क्षमा करायला शिकव, शत्रूवर प्रेम करायला शिकव".

त्याच्या बाजूला असलेली ती माता त्याला सांगते, "तुझे हे बोलणे ऐकून माझे कान धन्य झाले. तू तुझ्या शत्रूला हरवल्यानंर पाहिजे तर दया दाखव, क्षमा कर. प्रेस दाखव पण ते त्याला हरवल्यानंतर. त्या आधी नाही. माझी इच्छा आहे कीं तू त्या सिंधवांचा पराजय करून विजयाचा मुकूट धालून माझ्या पुढे यावास. मार खाललेला क्षत्रिय काय क्षमा करकणार? दया दजाखवणार? प्रेम करणार? त्यानंतर तो मुलगा तिला बोलतो, तू जे सांगशील ते मी करायला तयार आहे. त्यावर आई त्याला बोलते, "अपयशच येईल अशारितीने नकारात्मक रित्या विचार करण्याचे सोडून दे. जे काम करावयाचे ते त्यांने केलेच पाहिजे. चिडून व मूर्खपणाने कोणतेही कार्य केले तर त्यात चुका होतात. यश येईलच असें जरी नसले तरी प्रयत्न करत रहाणे हेंच क्षत्रियाचे कार्य असते. यश येईल का नाही अशारितीने विचार करणारा कांहींच करू शकणार नाही. प्रयत्नात दोन गोष्टी असतात, एक तर यश किंवा यश न मिळणे. ज्यांने आधीच ठरवले कीं, त्याला यश मिळणार नाही तो कांहींच करत नाही. सतत प्रयत्न करत रहावे असें समजले जाते. हा नि.म केवळ क्षत्रियांपुरता मर्यादीत नाही, तो वैश्यांना व शुद्रानासुद्धा लागू होतो. त्यालाच प्रयत्नवाद असें म्हणतात. त्यालाच पुरूषार्थ असेंसुद्धा म्हणतात. पुढे त्याची आई त्याला म्हमते, कीं, त्याला ती कायसांगू इच्छिते ते समजले असावे. ती त्याला आज्ञा करते, तेवढे बौद्धीक झाल्यावर की, उठ आणि प्रतिकाराला सुरूवात कर. तुझ्या शत्रूंचे शत्रू कोण ते शोध, त्यांना एकत्र कर आणि प्रतिहल्ला कर. तुझ्या दोस्तांना थोडे जास्त धन दे म्हणजे ते तुझ्यावर खूष होतील. त्यांचे उत्तम सहाय्य तुला प्राप्त होईल. त्यांना इतर प्रकारची सुद्धा मदत कर. तू शक्तिमान झाला आहेस हे समजल्यावर तुझा शत्रू सावध होईल. साम, दाम व दंड हे तीन मार्ग शत्रूला नमवण्यासाठी वापरावचाचे असतात. सामोपचाराने काम केल्याने तुझी संपत्ती वाढेल. त्यामुळे तुझे मित्र तुझ्या अधिक जवळ येतील. जर तू असंपन्न झालास तर तुझे मित्र तुझ्यापासून दूर जातील. ते तुझा तिरस्कार करू लागतील. तसें झाले तर तुला तुझे राज्य परत मिळवणे जास्त अवघड होईल. त्याला त्याच्या शत्रूशी सांभाळून जगावे लागेल.

भगवत यान पर्व भाग एकशे पस्तीसावा संपला.

# भगवत यान पर्व भाग

# एकशे छत्तीसावा

माता बोलते, जरी राजावर संकट कोसळले तरी तो कधी विश्वासघात करणार नाही. राजा हरतो आहे ते पाहून त्याची जनती, त्याचे कारभारी व त्याचे सैन्य अस्वस्थ होत असते. ते त्याच्यापासून दूर जाण्याचा संभव असतो. ज्यांचा अपमान राजाने केला होता ते उत्तेजित होत असतात व त्यांच्याकडून राजाला धोका संभवत असतो. त्याचे खरे मित्र त्याला मदत करू शकत नसल्यामुळें जरी दुःखी झाले तरी संधी शोधत असतात कीं, ते त्याला मदत करू शकतील. तुला पुष्कळ मित्र आहेत ज्यांची तू खातरदारी केली आहेस. ते तुला मदत करण्यासाठी तयार असतात. तशा मित्रांना दुःखवू नकोस रागाच्या व निराशेच्या भरात. नाहीतर तेसुद्धा तुला सोडून जातील. मी हे सगळे बोलते ते तुझा जोर वाढावा ह्यासाठी. मी जे सांगतेते तुला समजले असेल असें मी समजून बोलत आहे. अरे संजया, माझ्या मुला, मोठ्या तयारीने तू सज्ज हो. तुला माहित नाही अशी भरपून संपत्ती आपल्याकडे आहे. त्याची माहीती फक्त ला आहे. ती सगळी मी तुला देणार आहे. तुझ्याकडे चांगले मित्रसुद्धा आहेत. ह्यापुढे रणभूमीतून माघार घेऊ नकोस. त्या मित्रांच्या मदतीने तू यश मिळवू शकशिल. कुंती पुढे सांगत असते, संजय त्याच्या बोलण्याने उत्तेजित झाला. ताबडतोब तो उठला जरी तो तितका हुशार नव्हता. तरी तो त्याच्या वारसाचे राज्य वाचवण्यासाठी तयार झाला. कुंती सांगते, ते त्या आई मुलाचे संभाषण होत असतांना ती गुपचुपपणे त्यांचे संभाषण ऐकत होती. तिचा मुलगा म्हणतो तुझे बोलणे अमृतासारखे आहे मला. कुंती पुढे सांगत असते, आईच्या उपदेशामुळें प्रभावित झालेला तो राजपुत्र त्याच्या शत्रूवर तुटून पडतो. ती सांगते,जेव्हां एकादा राजा अशा परिस्थितीत असतो तेव्हां त्याला ही कथा त्याच्या हितचिंतकांनी सांगितली पाहिजे. त्यामुळें त्याचा जोर वाढेल. ह्या कथेचे नांव आहे जय ती सगळयांनी ऐकली पाहिजे. ती कथा ऐकून त्याच्यात पृथ्वी जिंकण्याची शक्ती प्राप्त होईल. ही कथा ऐकणारी बाई शूरवीर पुरूषाला जन्म देईल. ज्याचे तेज व हिम्मत थोर आहे असें पुत्र ती जन्माला घालेल. खरे क्षत्रिय तिच्या पोटी जन्म घेतील जे तपस्या, वैराग्य अशा उत्तम गुणांनी पूर्ण असतील. दुर्जनांचा तो नाश करील. युद्धात कधी माघार न घेणारा असेल. जशी माझी मुलं आहेत.

भगवत यान पर्व भाग एकशे छत्तीसावा संपला.

# भगवत यान पर्व

## भाग एकशे सदोतिसावा

कुंती पुढे सांगते, अरे कृष्णा तू अर्जुनाला सांग, जेव्हां तो जन्मला तेव्हां त्याची आई प्रसवण्याच्या बिछान्यावर विश्रांती घेत असतांना तिला आकाशवाणी ऐकू आली होती, त्यावेळी मी एका आश्रमात रहात होत्ये व माझ्या भोवती बऱ्याच स्त्रिया जमलेल्या होत्या. तो आवाज बोलतो कीं, "अहो कुंती, तुझा पुत्र इंद्राच्या बरोबरीचा आहे. तो पुढे युद्धात सगळया कौरवांचा नाश करणार आहे. त्याला तुझा दुसरा मुलगा भिम मदत करणार आहे. तो सगळी पृथ्वी पादाक्रांत करील व त्याची ख्याती स्वर्गाला पोहोचेल. तो त्याच्या भावंडांबरोबर तीन मोठे यज्ञ करणार आहे. तो त्याच्या बापाची राजसत्ता त्यांच्याकडून काढून घेईल. तो अत्युच्च समृद्धीला पोहोचेल. विभत्सु किती धीरोदात्त आहे ते तू जाणतोसच कृष्णा, जर त्यात कांहीं तथ्य असेल तर तो आवाज खरा होईल. तुम्ही दोघे ते साध्य करणार अहात असें मला वाटते. कुंती सांगते कीं, तिचा त्या आवाजावर विश्वास आहे. तो खोटा असूंच शकत नाही. चांगुलपणा हा सर्वश्रेष्ठ गुण आहे. त्यामुळें सगळे प्राणी सुखाने जगत आहेत. ते धनंजयाला तू सांग.

कुंती सांगते, तू वृकोदराला माझा निरोप दे, त्याला सांग मी म्हणते कीं, खरा क्षत्रिय शत्रूला पाहून घाबरत नाही. उलट त्याला उत्साह येतो लढण्यासाठी. अरे कृष्णा तुला माहीत आहे त्याचे मन कसे आहे. तो त्याच्या शत्रूचा नाश केल्याशिवाय थांबत नाही. अरे माधवा, तू माझ्या द्रौपदीला सांग, जी गुणी आहे. तिला सांग कीं, माझे सगळे आशिर्वाद तिच्यासाठी आहेत. ज्या पद्धतीने ती माझ्या मुलांचा सांभाळ करत आहे ते विलक्षण कौतुकास्पद आहे. तू माद्रीच्या जुळयांना सांग कीं, मी त्याचे क्षात्रतेज ओळखत आहे. तुमच्या समक्ष पांचालाचा अपमान झाला आहे त्याचे उकटे काढल्याशिवाय गप्प बसू नका. तिचा अपमान करणाऱ्याला क्षमा नाही. मला त्यांच्या राज्य जाण्याचे दुःख कमी आहे, मला जास्त संताप होतो तो त्या अपमानाचा. त्याची द्युतातील हार मला विशेष त्रास देत नाही, द्रौपदीचा अपमान करणाऱ्यांचा नाश झालाच पाहिजे, व ते मी त्यांच्यांकडून अपेक्षित आहे. माझी सून क्षत्रिय गुणाचीच आहे. तिच्या सांगण्याप्रमाणे तुम्ही सगळे पांडव करणार असे मी समजते. जे ती सांगेल ते मींच सांगितले आहे असें समजून तिच्या इच्छा पूर्ण करा. त्या साऱ्या जगाला हरवणाऱ्या वीरांची धर्मपत्नी कोणी भर सभेत खेचून

आणिल ते कसे सहन केले जाईल? ते सगळे आछवत रहा म्हमजे तुमचा जोर वाढत जाईल व तुम्ही सगळे पांडव त्या नीच कौरवांचा नाश कराल. पुढे ती बोलते कीं, ती सगळया तिच्या नातवंडांची व इतर सुनांची सुद्धा आठवण करत असते ते त्यांना सांगा. त्यांना सांग कीं, मी सुरक्षित आहे विदूर भाऊ माझी उत्तम काळजी घेत आहेत. अरे कृष्णा शेवटी तुला सांगते, तू माझ्या मुलांचे संरक्षण कर".

वैशंपायन पुढे सांगतात, कृष्ण कुंतीला नमस्कार करतो व तिला एक प्रदक्षिणा घालतो. तिच्या घरातून तो बाहेर पडतो. त्याच्या बरोबर तेथे आलेले भिष्म आणि इतर कुरुंना तो रजा देतो. परंतु, कर्णाला ते त्याच्या रथात घेतो. कुरु नगरीतून निघतो. त्याच्या बरोबर सत्यकी असतो. कृष्ण निघून गेल्यावर ते सगळे कौरव एकत्र जमून जे घडले त्याच्यावर चर्चा करू लागतात. कृष्माने जे दिव्य दर्शन त्या सभेला दिले त्याची खूप चर्चा होत रहाते. बहुतेक जम मान्य करतात कां, दुर्योधनाच्या मूर्खपणामुळें बहुतेक क्षत्रिय लवकरच मारले जाणार आहेत. ते दोघे, कृष्ण व कर्ण रथात बऱ्याच गोष्टांवर बोलत असतात प्रवासात. त्यानंतर तो कर्णाला त्याच्या ठिकाणी सोडते व नंतर दारुकाला सांगतो कीं, रथाचा वेग वाढव. तो रथ वादळाच्या वेगांने युधिष्ठीराकडे उपप्लव्याकडे जाऊ लागतो.

भगवत यान पर्व भाग एकशे सदोतिसावा संपला.

# भगवत यान पर्व

## भाग एकशे अडतिसावा

वैशंपायन पुढे सांगतात, कुंती जे कृष्णाला सांगत होती ते सगळे भिष्म आणि द्रोण ऐकत असतात. ते दुर्योधनाला बोलतात, "कुंतीचे ते कठोर वचन तू ऐकले नाहीस जे कुंती कृष्णाला सांगत होती. तिच्या सूनेचा अपमान तिला जिव्हारी लागला आहे. तिला राज्यात रस नाही पण त्या अपमानासाठी तिच्या मुलांनी युद्ध करून सगळया कौरवांचां निःपात करावा असें ती सांगत होती, ते त्याला सांगतात. त्या अपमानासाठी तिची मुलं व त्यांच्या बरोबर जनार्दन युद्ध करणार आहेत असें दिसते. त्यांचा हिस्सा हा मुद्दा त्यांच्या आईला विशेष महत्वाचा वाटत नाही. अर्जुन त्याच्या अत्ययावत शस्त्र सामुग्रीनी लढणार आहे जी कर्णाच्या आयुधांपेक्षा कितीतरी जास्त प्रभावी आहेत, भिम त्याच्या निश्र्चयाचा पकाका आहे, त्यंचे गांडीव आणि दोन न संपणारे भाते, अर्जुनाचा रथ, त्यावरील ध्वज ज्यात चमत्कारी सिद्धी लपलेल्या आहेत, त्याशिवाय ते दोघे माद्रीचे ज्यांच्या क्षात्रतेजापुढे कोणीही उभे राहू शकत नाही. त्यात त्यांना वासुदेवाचे बळ आहे, अशा तयारीत असलेला युधिष्ठीर तुम्हाला माफ करणार नाही. हे सगळे आपण स्वतःच्या नजरेने पहात अहात. तुम्हाला जिंकण्याची सुतराम शक्यता नाही. विराटाच्या वेळी अर्जुनाने एका हाताने तुम्हा सगळयांना हरवून लज्जास्पदरीत्या परत पाठवले होते त्याचा इतक्या लवकर तुला विसर पडला आहे कां? त्याशिवाय कित्येक राक्षस आणि असुर त्यांने लोळवले आहेत हे आठव. गंधर्वाने तुम्हाला पकडले होते ते पांडवनांनी सोडले हे विसरलास कां"? म्हणून तू व तुझे बंधू पांडवांशी समझौता करतील तर ते श्रेयस्कर ठरेल. युधिष्ठीर तुझा मोठा भाऊ आहे हे सत्य तू नाकारू शकत नाहीस. तो तुमच्याशी प्रेमांने वागत आला आहे. तुझ्यी सगळया पापांकडे तो दुर्लक्ष करून तुम्हाला क्षमा करेल हेयाची आम्हाला खात्री आहे. त्या त्याच्या चांगुलपणाचा तुम्ही फायदा करून घ्यावा. तुझ्या तोंडावरील आठ्या काढून तू व तुझे दोस्त जर त्यांना मैत्रीपूर्वक मिठी मारतील तर ते सगळयांच्या भल्याचे होईल. माद्रीची दोन मुलं तुझ्या आज्ञांचे पालन करतील असें ते होईल, कितीतरी चांगले ते असेल सगळयांसाठी. तसे झाले तर दशर्हांच्या घराण्यातील ते राजे आनंदाश्रू ढाळतील. गर्व सोडून दे. हट्ट सोडून दे. तसे तू नही केलेस तर जो नरसंहार होईल त्याची तुलना ह्या आधी झालेल्या कोणत्याही युद्धाशी करता येणार नाही. सगळे तारे तुमच्या

विरुद्ध आहेत. त्यामुळें मोठ्या प्रमाणात क्षत्रियांचा विनाश होणे संभवते. तसे समझौत्याचे तू मान्य केलेस तर सगळे राजे मोठ्या खूषीने त्यांच्या राज्यात निघून जातील. आकाशात अनेक अशुभशकुन होत आहेत. कोल्हे ओरडत आहेत, आकाशात गिधाडं घिरट्या मारत आहेत. गांढव खिंकाळत आहेत. अशनि मोठ्या प्रमाणात खाली येत आहेत. तू बऱ्याबोलाने तुझ्या आईच्या आज्ञेचे पालन करावेस व हा वाद मिटवावा. तू जर नाहीच ऐकणार तर आम्ही जे दृष्टांत पहात आहोत ते खरे होतील.

भगवत यान पर्व भाग एकशे अटतिसावा संपला.

# भगवत यान पर्व

## भाग एकशे एकोणचाळीसावा

वैशंपायन बोलतात, ते ऐकल्यानंतर दुर्योधनाच्या कपाळावर आठ्या उठतात. त्याचा चेहरा पडतो. तो कांहीं प्रत्युत्तर देत नाही. ती त्याची मुद्रा पाहून भिष्म व द्रोण एकमेकाकडे पहात त्याला सांगतात, "ते कितीतरी दुःखदायक असेल जर आम्हाला आमच्या प्रिय नातवांविरुद्ध, शिष्यांविरुद्ध आमची शस्त्र उचलावी लागली तर. क्षत्रिय अन्याया विरुद्ध शस्त्र उचलतो परंतु, येथे नेमके त्याविरुद्ध होणार आहे. आम्हाला अन्यायासाठी आमची शस्त्र न्यायासाठी लढणाऱ्यांच्या विरुद्ध उचलावी लागतील, जे अधर्माचे कार्य होईल".

द्रोण बोलतात, "मला धनंजय माझ्या पोटच्या पोरापेक्षा अश्वत्थामापेक्षा जास्त जवळचा आहे. त्याच्या गुणांचे मला फार कौतुक आहे. तरी क्षत्रिय कर्तव्य असें सांगतात कीं, ज्या राजाकडे तो काम करतो त्याचे संरक्षण करणे त्याचे कार्य असते. त्या नियमांने मला पांडवांच्या विरुद्ध उभे रहावे लागेल असें दिसते. अशा क्षत्रिय कार्याचा मी तिरस्कार करतो जे अन्याय करावयाला लावते एकाद्याला. मी ज्याला धनुर्विद्या शिकवली त्याच्या समोर मला उभे रहावे लागत आहे, हे मोठे दुर्भाग्य आहे माझ्यासाठी आणि हे त्याच्यासाठी मला करावे लागणार आहे जो पापी आहे, जो देव मानत नाही, जो चांगुलपणा मानत नाही, जो माणूसकी विसरला आहे, जो यज्ञ करत नाही, जो दान करत नाही, ज्याच्या प्रत्येक कामात द्वेष, क्रोध आणि लोभ ह्याशिवाय दुसरे कांहीं नाही अशा एका नालायक राजासाठी मला लढावे लागणार आहे. तू कितीही वाईट वागत असलास तरी ते पंडुचे, तुला सांभाळून घेण्याचाच प्रयत्न करत असलेले दिसत आहेत. तुला सगळे तुझे वडीलधारे परोपरीने सांगत असतांना तू तुझा हट्ट सोडत नाहीस हे सगळ्या क्षत्रियकुळासाठी दुर्दैवजनक असेंच आहे. तुझे हित कशात आहे ते तू समजून घेण्यास तयार नाहीस त्याला काय करावे ते समजत नाही. तू समजतोस कीं, तुझ्याकडे मोठा फौजफाटा आहे, त्यांच्या मदतीने तू पांडवांचा उच्छाद करू शकशिल. परंतु, गोष्टी तितक्या सहजसोप्या नाहीत. युधिष्ठीराची मालमत्ता त्यांने टाकून दिलेल्या झग्यासारखी तुला मिळाली कांहीं हिम्मत न दाखवता केवळ चोरी केल्यासारखी ती ताब्यात आली त्यामुळें तू समजतोस कीं, तू त्याचा मालक झाला आहेस. अटींचे पालन न करता ती ताब्यात ठेवली आहेस म्हणून ती चोरी ठरते. तू त्या

राज्याचा अधिकृत मालक म्हणवून घेऊ शकत नाहीस हे तुला माहीत आहे. क्षत्रियाला मालमत्ता जिंकावी लागते तरच ती त्याची समजली जाते हे तू लक्षात घेत नाहीस. ते पांडव जंगलात बसले आहेत, ब्राह्मणांमध्ये बसले आहेत त्यांना कोणाचा आधार नाही असं तू समजतोस. वस्तुस्थिती मात्र तशी नाही हे तू लक्षात घेतच नाहीस. पांडवांना कुबेर हवी तेवढी संपत्ती देऊ शकतो त्यामुळें त्यांना त्यात हरवणे तुला अजिबात शक्य होणार नाही. पांडवांचे संबंध देवांशी उत्तम आहेत कित्येक राक्षससुद्धा त्यांना मानतात ह्या गोष्टी तू लक्षात घेत नहीस. उच्च दर्जाच्या ब्राह्मणांचे आशिर्वाद त्याना मिळत आहेत. आम्ही दोघांनी पांडवांच्या भल्यासाठी पुजा केल्या आहेत, ब्रह्मणांना दान केली आहेत, त्याशिवाय आमचा काळ संपत आला आहे. तू आमच्या बळावर विसंबून असशील तर ती तुझी मोठी चुक ठरणार आहे. तू जर युद्ध करू इच्छित असशील तर तुझे सुख आनंद सगळयाचा तुला कायमचा त्याग करावा लागणार आहे. कारण तू त्यांना जिंकू शकणार नाहीस. ज्यांच्या बरोबर जनार्दन आहे त्यांना कोणीही जिंकू शकत नाही हे माहीत असतांना तू असा आग्रह करत आहेस म्हणजे तुझा नाश निश्चित होणार आहे. अजून सांगतो आम्ही कीं, तू युद्धाचा विचार टाकून दे. अजून वेळ आहे. समेट करण्यात मुत्सद्देगिरीची चमक आहे जेसुद्धा क्षत्रियाचे लक्षण असते, केवळ लढणे म्हणजे क्षत्रियत्व नाही. पांडवांच्या बाजूने तपोसामर्थ्य पणाला लावणारे ज्ञानी आहेत, त्यांच्यापुढे तू कसा टिकणार"?

ते दोघे पुन्हा त्या दुर्योधनाला सांगतात, "आम्ही अखेरचे सांगतो जे तुझ्या भल्याचे आहे, दुर्योधना तू युद्धाचा विचार मनातून काढून टाक. त्यात तुझ्या मुलांचे नातवांचे व सगळया राज्याचे हित आहे.

## - भगवत यान पर्व संपले –

# भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७६ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे ४० खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळया नितीशास्त्र शिकवणाऱ्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी तयार होत नाही आणि

ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षें मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईंदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबऱ्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉंटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकऱ्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चांने शेतकऱ्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे, माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व

योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनीपेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळिराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात

लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बऱ्याच गटांना आवडत नाही. बऱ्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता, जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील

सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकाऱ्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,

ashokkothare@yahoo.co.in

## ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्याकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यंत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून  देऊ.

ई साहित्यची पुस्तके www.esahity.com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मागवा.

धन्यवाद